
एप्रिल–मे २०२३/पाने ९२/किंमत ₹१०

# लोकराज्य



## शाश्वत शेती, समृद्ध शेतकरी

# ‘महाराष्ट्र दिन’ उत्साहात साजरा...




महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६३व्या वर्धापन दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर मुख्य शासकीय सोहळ्यात राज्यपाल रमेश बैस यांनी समारंभीय संचलनाकडून मानवंदना स्वीकारली.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६३व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी छत्रपती शिवाजी महाराज उद्यान मुंबई येथे झालेल्या मुख्य शासकीय सोहळ्यात राष्ट्रध्वज फडकावला व जनतेला संबोधित केले.

यावेळी राज्यपालांनी संचलनाचे निरीक्षण केले. तसेच समारंभीय संचलनाकडून मानवंदना स्वीकारली. मुख्य शासकीय सोहळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव मनोज सौनिक, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रशासक इकबाल सिंह चहल, पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत, मानद वाणिज्यदूत, सशस्त्र सैन्य दलांचे वरिष्ठ अधिकारी तसेच प्रशासन, पोलीस दलातील ज्येष्ठ अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

या वेळी राज्य राखीव पोलीस दल, बृहन्मुंबई सशस्त्र पोलीस दल, बृहन्मुंबई दंगल नियंत्रण पथक, बृहन्मुंबई महिला सशस्त्र पोलीस दल; मुंबई लोहमार्ग पोलीस दल, महाराष्ट्र पोलीस ध्वज, बृहन्मुंबई पोलीस ध्वज, राज्य राखीव पोलीस बल ध्वज व मुंबई अग्निशमन सेवा संचालनालय ध्वज यांच्या निशाण टोळ्या, बृहन्मुंबई वाहतूक पोलीस दल, मुंबई अग्निशमन दल, बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दल, सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा; तसेच ब्रास बँड व पाईप बँड वाद्यवृंद पथकाने दिमाखदार संचलन केले. संचलनात बृहन्मुंबई पोलीस विभागाची ४ महिला निर्भया पथके व मुंबई अग्निशमन दलाची अत्याधुनिक वाहनेदेखील सहभागी झाली होती.

## हुतात्म्यांना अभिवादन

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत प्राणाची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांना महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हुतात्मा चौक येथील स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी मुंबई उपनगरचे पालकमंत्री तथा पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव विकास खारगे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रशासक इकबाल सिंह चहल, मुंबई शहरचे जिल्हाधिकारी राजीव निवतकर, निवासी जिल्हाधिकारी सदानंद जाधव उपस्थित होते.

वर्ष ७४ वे | अंक ७ | एप्रिल-मे २०२३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — जयश्री भोज
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, डॉ. राहुल तिडके
- संपादक — अनिल आलूरकर
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# अंतरंग

| | |
|---|---|
| शेतकऱ्यांचे हित केंद्रस्थानी | ६ |
| यंत्र, तंत्र आणि एकत्र | ८ |
| पशुजन्य उत्पादनात अग्रेसर | १० |
| मत्स्योत्पादनात आघाडी | १२ |
| फलोत्पादनात अव्वल | १४ |
| आत्मनिर्भर बळीराजा | १६ |
| सहकारातून समृद्धी | १८ |
| मृद् व जलसंधारण योजना | २० |
| मत्स्यव्यवसायाला चालना | २३ |
| कृषी योजना... | २६-३२ |
| फलोत्पादन क्षेत्राचा विकास | ३३ |
| शेतीपूरक व्यवसायाला प्राधान्य | ३५ |
| शेतकऱ्यांना भक्कम साथ | ३८ |
| विदर्भाच्या कृषी विकासाला नवसंजीवनी! | ४० |
| समृद्ध शेतीकडे वाटचाल | ४२-५२ |
| सन्मान शेतीतील 'ती'चा | ५३ |
| पाऊल पडते पुढे | ५५-६७ |
| मंत्रिमंडळात ठरले! | ६८-७३ |
| विधानसभा कामकाज | ७४ |
| विधानपरिषद कामकाज | ७८ |
| भारतीय चलनाच्या उत्क्रांतीची मीमांसा | ८४ |
| अर्थक्रांतीची शाश्वत सूत्रे | ८६ |
| कृषिविषयक विचार | ८८ |

# पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान




**राज्य** शासनाच्या वतीने पद्मश्री डॉ. आप्पासाहेब ऊर्फ दत्तात्रेय धर्माधिकारी यांना सन २०२२चा 'महाराष्ट्र भूषण' हा सन्मान केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री अमित शहा यांच्या हस्ते देण्यात आला. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील, रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, खासदार श्रीरंग बारणे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार प्रशांत ठाकूर, राज्याचे मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव, धर्माधिकारी प्रतिष्ठानचे डॉ. सचिन धर्माधिकारी, उमेश धर्माधिकारी आदी व्यासपीठावर उपस्थित होते. समाजासाठी, दुसऱ्यांसाठी, काम करण्याची शिकवण आप्पासाहेबांनी दिली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊनच भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कारानेही सन्मानित केले आहे. मुलांसाठी शिक्षण, वृक्षारोपण, स्वच्छता, रक्तदान, जलसिंचन, विहिरींची सफाई, महिला सशक्तीकरण, व्यसनमुक्त समाज अशा विविध क्षेत्रांत आप्पासाहेबांनी मोलाचे कार्य केले आहे. राज्यात गेल्या अनेक पिढ्यांपासून लोकांना दिशा देण्याचे काम करत असून, ज्ञानाच्या ज्योती घराघरात लावण्यासाठी या परिवाराचे मोठे योगदान आहे.

# शाश्वत शेती, समृद्ध शेतकरी

देशातील बहुसंख्य जनतेचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. आजही ६० टक्क्यांहून अधिक नागरिक शेती व शेतीपूरक व्यवसायाशी निगडित आहेत. पारंपरिकतेपासून आजच्या 'हायटेक' तंत्रज्ञानाचा आविष्कार या व्यवसायाने अंगीकारलेला आपणांस पाहावयास मिळतो. कृषी क्षेत्रात आजवर हरितक्रांती, नीलक्रांती, श्वेतक्रांती असे विविध टप्पे घडून आले आहेत.

शेतीला पूरक व्यवसाय म्हणून अनेक पर्याय पुढे आलेले आहेत. यापैकी पशुपालन हा पूर्वापार चालत आलेला व्यवसाय आहे. दुग्धव्यवसायामुळे शेतकऱ्यांना चांगले आर्थिक स्थैर्य प्राप्त झालेले आहे. शेळीपालनासारख्या व्यवसायातील बदल लक्षवेधी आहेत. नवे प्रयोग, नव्या वाटा उमेदीने जोपासल्या, जागवल्या जात आहेत. रोपवाटिकेतून शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ मिळत आहे. ज्या परिसरामध्ये रोपवाटिका, नर्सरी आहेत, त्या परिसरातील शेतीत अनेक चांगले प्रयोग घडताना दिसतात. भाजीपाला, फळबागा, फुलझाडे, शोभेची झाडे; तसेच ऊस रोपवाटिका व्यवसायाच्या संधी या व्यवसायाने दिल्या आहेत. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होताना दिसत आहे.



राज्याचा एक तृतीयांश भाग कमी आणि अनियमित पावसाच्या पर्जन्यछायेच्या क्षेत्रात येतो. राज्यातील निव्वळ पेरणी क्षेत्र एकूण भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे ५४ टक्के आहे. उपलब्ध संसाधनांचा उपयोग होण्याच्या दृष्टीने पिकांमध्ये विविधता आणणे व पीक पद्धतीमध्ये बदल करणे महत्त्वाचे आहे. संसाधनांचा शाश्वत वापर, पीक विविधतेला चालना देणे आणि बाजार, हवामान, क्रेडिट सुविधा आणि ई-कॉमर्सची माहिती शेतकऱ्यांना देणे, यासाठी शासन प्रोत्साहन देत आहे. राज्यात जानेवारी २०२३ पासून 'जलयुक्त शिवार अभियान २.०' राबवण्यात येत आहे. पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात जुलै २०२२ पासून 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना' २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना राबवण्यात येत आहे.

२०२१-२२च्या जमीन वापराच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र राज्याच्या एकूण ३०७.५८ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी एकूण पिकांखालील स्थूल क्षेत्र २४१.४९ लाख हेक्टर, तर पिकांखालील निव्वळ पेरणी क्षेत्र १६५.९० लाख हेक्टर (सुमारे ५३.९ टक्के) असे होते. राज्यात अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसानाला सामोरे जावे लागते. नुकसानभरपाई देण्यासाठी राज्य शासनाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एसडीआरएफ)साठी केंद्र सरकारने निकष आणि दरांमध्ये सुधारणा केल्या असून, त्या सुधारणा स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच 'सततचा पाऊस' ही राज्य शासनामार्फत नैसर्गिक आपत्ती घोषित करून शेती पिकांच्या नुकसानाकरिता मदत देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आता शेतकऱ्यांना मदत देण्यात येणार आहे. हळद संशोधन आणि प्रक्रिया धोरण जाहीर करण्यात आले असून, या धोरणांतर्गत हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले आहे, असे अनेक निर्णय राज्य शासन घेत असून राज्यातील शेतकऱ्यांना समृद्ध करण्याचे काम होत आहे.

भरड धान्यांचा वापर वाढून मागणीत अधिक वाढ होण्यासाठी व्यापक प्रमाणात भरड धान्यांच्या वापराचा प्रचार केंद्र शासनाकडून विविध व्यासपीठांवरून करण्यात येत आहे. याबाबत जनजागृती निर्माण व्हावी व भरड धान्यांचे उत्पादन आणि वापरात वाढ व्हावी, या उद्देशाने २०२३ हे वर्ष संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून घोषित केले आहे. याअनुषंगाने राज्यात 'महाराष्ट्र श्री अन्न अभियान' राबवण्यात येत आहे.

शेती व शेतीपूरक व्यवसाय हे क्षेत्र अर्थव्यवस्थेतील प्रमुख क्षेत्रांपैकी एक असून त्याचा एकूण राज्य मूल्यवृद्धीत सरासरी १२.१ टक्के हिस्सा आहे. महाराष्ट्र राज्यातील निम्म्यापेक्षा जास्त ग्रामीण लोकजीवन शेती व शेतीपूरक व्यवसायावर अवलंबून आहे. या क्षेत्राला मदत करण्यासाठी शासन विविध योजना आणि कार्यक्रम राबवत आहे. तसेच नैसर्गिक आपत्तींचा या क्षेत्रांवर होणाऱ्या परिणामांचा सामना करण्यासाठी विविध उपाययोजना राबवत आहे. शेती व शेतीशी निगडित असलेल्या कृषी, फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, सहकार व पणन, मृद् व जलसंधारण आदी विभागांच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनांच्या माहितीचा समावेश या अंकात करण्यात आला आहे.

या शेतीविषयक विशेषांकात राज्यातील शेतकऱ्यांनी राज्य शासनाने राबवलेल्या विविध योजनांचा लाभ घेऊन आपले जीवन सुखकर बनवले, अशा लाभार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण यशकथा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे विशेष लेख; तसेच महत्त्वाच्या घडामोडी, मंत्रिमंडळात ठरले या सदरांचाही समावेश करण्यात आला आहे. हा अंक आपणांस उपयुक्त ठरेल, असा विश्वास आहे.

**जयश्री भोज**
(मुख्य संपादक)

**'शेतकरी सुखी, तर राज्य सुखी' हा मंत्र आहे. त्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पात राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मोठ्या योजनांची घोषणा केली. तसेच त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. आपली अर्थव्यवस्था ही शेतीवर आधारित आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या हिताचा विचार हा केंद्रस्थानी ठेवून उपाययोजना योजल्या आहेत. बळीराजाला स्थैर्य देणं, त्याला बळकट करणं आणि शेतीला नुकसानापासून वाचवण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणं हे आमच्या सरकारचे उद्दिष्ट आहे.**

# शेतकऱ्यांचे हित केंद्रस्थानी

**एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री

मी राजकारण आणि समाजकारणात आहे; पण त्याही अगोदर मी एक शेतकरी आहे, हे मी कधीच विसरत नाही. आपल्यापैकी बहुतेकांची नाळ ही खेड्यांशी, शेतकऱ्यांशी जोडली गेलेली आहे. आपली अर्थव्यवस्थाच मुळी शेतीवर आधारित आहे आणि त्यामुळेच राज्याच्या बाबतीत विचार करताना सरकारसाठी शेतकऱ्यांच्या हिताचा विचार हा केंद्रस्थानी असतो आणि राहिलाही पाहिजे.

## विविध योजनांची अंमलबजावणी

'शेतकरी सुखी, तर राज्य सुखी' हा मंत्र आहे. त्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पातसुद्धा आम्ही राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मोठ्या योजनांची घोषणा केली. तसेच त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेत राज्यातर्फे प्रति शेतकरी ६ हजार रुपये देत आहोत. ज्याचा लाभ १.१५ कोटी शेतकरी कुटुंबांना होईल. याशिवाय केवळ १ रुपयांत पीकविमा देत असून पुढील पाच वर्षे महा कृषी विकास अभियान राबवत आहोत.



शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणं गरजेचं आहे, हे लक्षात घेऊन अखंडित वीज पुरवठ्यासाठी २०२५ पर्यंत ३० टक्के कृषी वीजवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करत आहोत. महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत १२.८४ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ४,६८३ कोटी रुपये जमा केले आहेत. महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पास ४८.१७ कोटी निधी दिला.

## शेतकऱ्यांना मदत

नैसर्गिक आपत्तींचा विषय निघाला म्हणून सांगतो की, आजपर्यंत सततचा पाऊस शेतकऱ्यांचे नुकसान करीत होता. पण त्याला निकषात नसल्याने भरपाई मिळत नव्हती. आम्ही सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती म्हणूनच घोषित केली आहे, जेणेकरून नुकसानग्रस्तांना भरपाई मिळेल. गेल्या दहा महिन्यांत निकषापेक्षा जास्त अशी १२ हजार कोटींची मदत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केली आहे. गेल्या आठवड्यात मी स्वतः गारपीटग्रस्त पारनेरमध्ये गेलो होतो. तिथं मी शबरी घरकुल योजनेमधून तत्काळ पक्की घरकुले देण्याचे निर्देश दिले. अडचणीतल्या शेतकऱ्यांसाठी आम्हाला कोणत्याही बैठका वगैरे घेण्याची गरज नाही. तत्काळ जागीच आदेश काढून त्यांना मदत केली पाहिजे अशी माझी भूमिका असते. आता तर अवकाळी पाऊस आणि त्यामुळे होणारं नुकसान किंवा दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना एक जोडधंदा म्हणून पशुपालनाला आम्ही प्रोत्साहन देत आहोत. देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन, संरक्षणासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय आम्ही यासाठीच घेतला आहे. या आयोगामार्फत गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना, गोमाय मूल्यवर्धन योजना राबवण्यात येईल.

नुकसानाचे पंचनामे करताना अद्ययावत तंत्रज्ञानाची मदत घेण्यावरही आमचा भर असणार आहे. सध्या महसूल विभागाच्या माध्यमातून आम्ही ई-फेरफार, संगणकीय सातबारा उतारे वगैरेसारख्या योजना यशस्वीपणे राबवत आहोतच.

## महाराष्ट्र मिलेट मिशन

आता आपण मिलेट मिशन राबवीत

## शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी

गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या काही भागात अवकाळी पाऊस पडतोय, काही ठिकाणी कधी झाली नाही अशी गारपीटही झाली. वेगवेगळ्या प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती आता आपल्या जीवनाचा अविभाज्य अंगच बनत चालल्या आहेत. मध्यंतरी अडीच वर्षांपूर्वी कोविड विषाणूने आपलं जीवन जणू थांबवूनच टाकलं होतं, पण अशा नकारात्मक आणि भीतीदायक वातावरणात फक्त अन्नदाता शेतात काम करीत होता. त्यावेळी तर कृषी विकास दर लक्षणीयरीत्या वाढलेला आपल्याला माहिती आहे. सांगायची गोष्ट म्हणजे, पाऊस येवो, न येवो, टंचाई परिस्थिती असो किंवा नसो, कोणताही मोसम असो, शेतकऱ्याला शेतात काम करावेच लागते. मग एक शासन म्हणून त्यांच्या पाठीशी उभं राहणं आमचं कर्तव्य ठरतं आणि गेल्या दहा महिन्यांत आमच्या युती सरकारने यात कुठेही कसर सोडलेली नाही.



आहोत. आपल्या ज्वारी-बाजरी आणि तृणधान्यांच्या पौष्टिकतेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आंतराष्ट्रीय स्तरावर नेलेलं आहे. आपल्या कोरडवाहू भागातील छोट्या शेतकऱ्यांना या पौष्टिक तृणधान्य पिकांची लागवड करण्यास प्रोत्साहन मिळणार आहे. शासनस्तरावरून या पिकांच्या क्षेत्रवाढीसाठी, उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करता येतील, ते सर्व प्रयत्न करणार आहोत. म्हणूनच या पिकांच्या किमान आधारभूत किमतीतही मोठी वाढ केली आहे. ज्वारीसाठी ७३ टक्के, बाजरीसाठी ६५ टक्के आणि नाचणीसाठी ८८ टक्के इतकी ही वाढ आहे. या महाराष्ट्र मिलेट मिशनसाठी आपण २०० कोटी रुपयांहून अधिकची तरतूद केली आहे. यात या तृणधान्य प्रक्रिया उद्योगांना अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया, मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया योजना, स्मार्ट प्रकल्प यांची सांगड घालून शेतकरी उत्पादकांच्या ३० कंपन्यांना अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे. जेणेकरून या पिकांचं उत्पादन आणि त्यांची विक्री यांची मूल्यसाखळी विकसित होईल.

आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहोत. गेल्या सहा महिन्यांमध्ये आपण अशा निर्णयांचा धडाकाच लावला आहे. राज्यातील शेतकरी हितांचे निर्णय आपण घेतले आहेत. धानासाठी हेक्टरी १५ हजार रुपयांचा बोनस जाहीर केला आहे, तर कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीला धाऊन जात ३५० रुपये क्विंटल अनुदान आम्ही देत आहोत.

## जलसंवर्धनात महाराष्ट्र पहिला

नुकताच केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने भारतातील जलाशयांच्या गणनेचा पहिला अहवाल जाहीर केला असून, त्यात महाराष्ट्राचा देशात पहिला क्रमांक आला आहे. जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे आदी योजना एकत्रितपणे राबवल्याचे हे यश आहे. अन्य राज्यात तळी आणि जलसाठे अधिक असली, तरी जलसंवर्धनाच्या बाबतीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आला आहे. २०१८-१९ या वर्षात ही गणना करण्यात आली होती. या अहवालातील महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे बहुसंख्य जलसाठे हे जलसंवर्धन योजनांमधील आहेत. राज्यातील जलाशयांची आणि जलसाठ्यांच्या निर्मितीत झालेली वाढ ही जलयुक्त शिवार अभियानामुळे झाली आहे, याचे श्रेय अर्थातच तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आहे. आता आम्ही जलयुक्त शिवार अभियान २.० नव्या दमानं राबवणार आहोत. हे अभियान देशातील अन्य राज्यांसाठीही एक आदर्श, मार्गदर्शक अभियान ठरेल, असा विश्वास आहे.

## सिंचन प्रकल्पांना मान्यता

आमचं युती सरकार आल्यावर आम्ही २७ सिंचन प्रकल्पांना मान्यता दिल्या आहेत. साडे पाच लाख हेक्टरपेक्षा जास्त जमीन यामुळे सिंचित होणार आहे. ज्यामुळे विशेषतः मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांना वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेता येतील. कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प, कोकणातील सिंचन सुविधा इत्यादी प्रमुख सिंचन प्रकल्पांसाठी राज्य सरकारने २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद केली आहे.

नुकतीच आम्ही नाबार्डच्या अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली आहे. आज हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्ती, प्रादेशिक असमतोल, मर्यादित सिंचन सुविधा, लहान जमीनधारकांच्या समस्या, काढणीनंतरचे नुकसान, बियाण्यांची वाढती किंमत, शेतमालाला अपुरा भाव अशी अनेक आव्हाने शेतकऱ्यांसमोर आहेत. त्यातून या अन्नदात्याला कसं सावरायचं हे आपण पाहिले पाहिजे. बँकर्सनी त्यांचे क्रेडिट प्लॅन तयार करावेत जेणेकरून शेतकऱ्यांच्या सर्व कर्ज गरजा बँकिंग प्रणालीतून पूर्ण केल्या जातील, हे आम्ही त्यांना सांगितले आहे.

अशा रीतीने बळीराजाला स्थैर्य देणं, त्याला बळकट करणं आणि शेतीला नुकसानीपासून वाचवण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणं हे आमच्या सरकारचे उद्दिष्ट आहे.

**शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे,**
मा. मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

**आपल्याकडे जेवण झाले की, 'अन्नदाता सुखी भव!' म्हणण्याची पद्धत आहे. जो कष्ट करून, ऊन, पाऊस, वारा सहन करून अन्न पिकवतो, त्या अन्नदात्या शेतकऱ्याला एकप्रकारे 'थँक यू' म्हणणे किंवा आपली सकारात्मकता त्याच्या पाठीशी देणे, हाच यामागचा हेतू आहे; परंतु आता फक्त तेवढेच पुरेसे नाही. शेती आणि शेतकरी सुखी-समृद्ध व्हावा, यासाठी 'यंत्र, तंत्र आणि एकत्र' हाच यापुढे शेतीचा मंत्र असणार आहे.**

# यंत्र, तंत्र आणि एकत्र

**देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री

प्रख्यात शेती-अर्थतज्ज्ञ एम.एस. स्वामीनाथन म्हणतात, जर शेती चुकीची झाली, तर देशात इतर कोणत्याही क्षेत्राला योग्य वाटेवर संधी मिळणार नाही आणि हे अगदी खरे आहे. कारण भारत हा कृषिनिष्ठ, कृषिजीवी देश आहे. शेती हेच येथील ७० टक्क्यांहून अधिक लोकांचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष उपजीविकेचे साधन आहे. मग ती फायद्याची झाली तरच शेतकरी सुखी-समृद्ध होणार आणि तो सुखी समृद्ध झाला तरच संपूर्ण देश सुखी होणार.

आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहोत. या ७५ वर्षांत सारेच काही बदलले आहे. तसेच कृषी क्षेत्रदेखील बदलले आहे. कधी काळी आपण अन्नधान्यासाठी इतर देशांवर अवलंबून होतो; पण आज परिस्थिती बदलली आहे. कृषिक्रांती झाली आणि त्यानंतर या देशाने नीलक्रांती, श्वेतक्रांती अशा कितीतरी क्रांती शेतीक्षेत्रात बघितल्या, अनुभवल्या. आज देश अन्नधान्याच्या बाबतीत फक्त स्वयंपूर्ण नाही, तर आपण निर्यातदार झालो आहोत.

***एका बीजा केला नास ।***
***मग भोगिले कणीस ।।***

यंदाचा अर्थसंकल्प सादर करताना सुरुवातीलाच जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या अभंगातील वरील चरणांचा दाखला मी दिला होता, कारण यापुढे शेतीमध्ये शाश्वततेचा विचार प्राधान्याने करावा लागेल. शेतीतील शाश्वतता आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय अशा तीन प्रकारची आहे. ही शाश्वतता महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रात आणण्यासाठी आपण विविध योजनांसाठी निधीची भरीव तरतूद केली, ज्याची फळे येत्या काळात दिसतील. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यावर आपण भर दिला आहे. शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांच्या मर्यादेत प्रोत्साहनपर लाभ, अतिवृष्टीग्रस्तांना एनडीआरएफच्या मदतीपेक्षा दुप्पट मदत, उपसा जलसिंचन योजनेमधील शेतकऱ्यांना वीज दरात सवलत, शेतकऱ्यांसाठी २ लाख सौर कृषिपंप आदी निर्णयांचा प्रामुख्याने येथे उल्लेख करता येईल.

अनेक संकटांचा सामना करत शेतकरी शेती कसत असतो. पाऊस, बाजारभावाची कुठलीही शाश्वती नसताना शेतकरी हजारो रुपये मातीत गुंतवतो. शेती हे आपले प्रथम कर्तव्य मानून तो ती कसत असतो. त्यामुळे बळीराजाला उत्पन्नवाढीसाठी मदत व्हावी, म्हणून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेली प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजना केंद्र सरकार राबवत आहे. त्याला जोड देत 'नमो शेतकरी महासन्मान निधी' ही योजना आपण राबवत आहोत. यामुळे शेतकऱ्यांना प्रति वर्ष केंद्र सरकारचे ६ हजार रुपये व राज्य सरकारने या योजनेंतर्गत घातलेली ६ हजार रुपयांची भर असे एकूण १२ हजार रुपये मिळणार आहेत. याचा लाभ १.१५ कोटी शेतकरी कुटुंबांना होईल. या योजनेचेही सकारात्मक परिणाम पुढील काळात दिसू लागतील.

आपण २०१५ मध्ये सुरू केलेल्या 'मागेल त्याला शेततळे' योजनेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. त्याला चळवळीचे रूप आले होते. त्यामुळे आपण या योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला. यामध्ये मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळे, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे आणि कॉटन श्रेडर हे घटक उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

## सौर कृषिपंप

शेतीसाठी पाणी जेवढे आवश्यक आहे तेवढीच वीजही. त्यामुळे आपल्या सरकारने मुबलक विजेसाठी सौर ऊर्जा प्रकल्पांना गती देऊन सौर कृषिपंप वितरणावर भर दिला आहे. त्याअंतर्गत राज्यभरात २ लाख सौर कृषिपंप वाटपाचे उद्दिष्ट आपण ठेवले असून या वर्षभरातच दीड लाख सौर कृषिपंपांचे वाटप करण्यात येणार आहे. त्याचबरोबरच दिवसा मुबलक विजेसाठी कृषिफिडरदेखील सौरऊर्जेवर आणले जात आहेत.

सुरुवातीला ४००० मे.वॅ.चे फिडर सौर ऊर्जेवर आणण्यात येतील. अशा फिडरसाठी शेतकऱ्यांना आपली पडीक जमीन उपलब्ध करून देण्याचा पर्याय खुला असल्याने या जागेच्या भाड्यातून शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचा मार्ग खुला झाला आहे. एकरी ५० हजार आणि हेक्टरी १.२५ लाख भाडे प्रति वर्षी मिळेल आणि त्यात वार्षिक ३ टक्के वाढ असेल.



## पीकविमा संरक्षण

प्रधानमंत्री पीकविमा योजनेचा लाभ घेण्यासाठी यापूर्वी विमा हप्त्याच्या २ टक्के रक्कम शेतकऱ्यांना भरावी लागत होती. मात्र ही रक्कमही आता राज्य शासन भरणार असल्याने शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीकविम्याच्या पोर्टलवर केवळ १ रुपयात पीकविमा नोंदणी करता येणार आहे. १ रुपयात पीकविमा संरक्षण मिळणार असल्याने पिकविमा उतरवण्याचे प्रमाण वाढणार आहे. शिवाय यामुळे नुकसानभरपाई वेळेत मिळण्यास मदत होणार आहे. महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत, मागील दोन अर्थसंकल्पात जाहीर झालेल्या; पण न दिलेल्या नियमित पीककर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ आपण दिला. याचा १२.८४ लाखांहून अधिक पात्र खातेधारकांना लाभ झाला. त्याचबरोबर २०१७ मध्ये सुरू केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत मधल्या काळात ज्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला नाही, अशा उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ देण्याचा निर्णयही आपण घेतला आहे.

## सानुग्रह अनुदान

राज्यातील शेतकऱ्यांसाठी 'गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना' राबवणार असून, या सुधारित योजनेत अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे. यापूर्वी विमा कंपन्यांमार्फत गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना राबवण्यात येत होती. मात्र अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना विमा दावे प्राप्त करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाठपुरावा करावा लागत असल्याने ही सानुग्रह योजना सुरू करण्यात आली आहे. यामुळे विनासायास अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना मदत मिळणार आहे.

## अन्नधान्याऐवजी रोख रक्कम

विदर्भ आणि मराठवाड्यातील १४ विपत्तीग्रस्त जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना अन्नधान्याऐवजी रोख रक्कम थेट त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात देण्यात निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमध्ये भरीव मदत केली जाणार आहे. यापूर्वी एसडीआरएफच्या निकषात नसणाऱ्या सततच्या पावसासाठी मदत मिळत नसे; पण आता ती वर्गवारी करून शेतपीक नुकसानीसाठी ठरावीक निकषाने मदत देण्यात येणार आहे.

## महाराष्ट्र श्री अन्न अभियान

'पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३' निमित्त 'महाराष्ट्र श्री अन्न अभियान' राज्यात राबवले जात आहे. उत्पादन व उत्पादकता वाढ, पोषणमूल्य व आरोग्यविषयक फायदे, मूल्यवर्धन प्रक्रिया व पाककृती विकास, नव उद्योगातून व्यावसायिक दृष्टिकोन वाढवणे, प्रचार-प्रसिद्धीतून जनजागृती निर्माण करणे, निर्यात वृद्धी, घोरणात्मक निर्णयातून अंमलबजावणी या सप्तसूत्रीच्या माध्यमातून पौष्टिक तृणधान्य विकास साधण्याचा प्रयत्न भविष्यात केला जाणार आहे. त्याचबरोबर सोलापूर येथे श्री अन्न उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.



## धान उत्पादकांना दिलासा

धान उत्पादक शेतकऱ्यांनादेखील मोठा दिलासा देण्याचा प्रयत्न आपण केला आहे. यापूर्वी धानविक्रीवर प्रतिक्विंटल बोनस देण्याची पद्धत प्रचलित होती. आता नवीन योजनेद्वारे धानाची विक्री न तपासता ७/१२ नोंदीवरील लागवडीच्या क्षेत्रप्रमाणात धान उत्पादक शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२२-२३ साठी डीबीटीद्वारे दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी १५ हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम प्रदान करण्याचा निर्णय आपण घेतला आहे. यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन मिळणार आहे. त्याचबरोबर नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे वेळेत व्हावेत, पंचनाम्यांबद्दल शेतकऱ्यांच्या तक्रारी येऊ नयेत, यासाठी मानवी हस्तक्षेप टाळून, माहिती तंत्रज्ञानाची मदत सॅटेलाईटद्वारे पंचनामे करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांना पारदर्शक पद्धतीने व तातडीने मदत मिळावी, याकरिता सर्वेक्षणासाठी उपग्रहाची व ड्रोनची मदत घेऊन संगणकीय प्रणाली वापरली जाईल.

## सेंद्रिय पद्धतीने शेती

सेंद्रिय शेती आता काळाची गरज झाली आहे. त्यामुळे सेंद्रिय पद्धतीने शेती करण्याला प्रोत्साहन देण्याचे धोरण राज्य शासनाने ठरवले आहे. त्याअंतर्गत आगामी ३ वर्षांत राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणण्यात येणार आहे. १००० जैवनिविष्ठा स्रोत केंद्रे स्थापन केली जाणार असून, डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनची व्याप्ती वाढवण्यात येणार आहे. त्यासाठी भरीव तरतूदही यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आली. त्याचबरोबर कोकणात उत्पन्न वाढीसाठी काजू बोंडू प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत.

कृषी व संलग्न क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन व प्रसार करण्यासाठी नागपूर येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन केले जाणार आहे. त्याचबरोबर काटोल व कळमेश्वर (जि. नागपूर), मोर्शी (जि. अमरावती) तथा बुलडाणा जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारली जाणार आहेत. कृषी उत्पन्न बाजार समिती असलेल्या ठिकाणी शेतकरी बांधवांना मुक्कामासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन बांधण्यात येतील. तसेच त्यांच्या जेवणाच्या सोयीसाठी शिवभोजन थाळी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. 'फ्रॉम फार्म टू द टेबल' हा नव्या जीवनशैलीचा भाग बनला आहे. या पार्श्वभूमीवर मातीचे आरोग्य, भूजल संवर्धन, वृक्षलागवड, जैविक व्यवस्थापन आणि पारंपरिक बियाण्यांचे संवर्धन या पंचसूत्रीने केलेली नैसर्गिक शेती समृद्धीचे वरदान ठरणार आहे. पूर्वी इर्जिक घालण्याची प्रथा होती. शेतीक्षेत्राच्या समृद्धीसाठी शेतकऱ्यांची श्रमशक्ती आणि विविध योजनांच्या माध्यमातून शासन, प्रशासनाची आर्थिक शक्ती यांचे इर्जिक घालू या !

**शब्दांकन : कीर्ती पांडे,**
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

**आपल्या राज्याची अर्थव्यवस्था कृषी क्षेत्रावर आधारित आहे. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन आदी व्यवसाय या अर्थव्यवस्थेला पूरक आहेत. हवामान बदलामुळे कृषी उत्पादनावर होणारे विपरीत परिणाम, घटणारे उत्पादन व उत्पन्न, पर्यायाने शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना हे व्यवसाय आधार म्हणून मोठा हातभार लावतात. ही बाब लक्षात घेऊनच पशुपालन, दुग्धव्यवसाय, शेळी-मेंढीपालन या व्यवसायांना जास्तीत जास्त प्राधान्य देण्याचे राज्याचे धोरण आहे.**

# पशुजन्य उत्पादनात अग्रेसर

**राधाकृष्ण विखे-पाटील**
मंत्री, महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास

राज्यातील पशुपालक व शेतकरी बांधवांना पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा, यासाठी संशोधन व प्रशिक्षणाद्वारे पशुसंवर्धनाशी निगडित व्यवसायात आधुनिकता आणण्याचे काम पशुसंवर्धन विभाग करतो. २० मे १८९२ रोजी स्थापन झालेल्या पशुसंवर्धन विभागाची शतकोत्तर रौप्यमहोत्सवाकडे वाटचाल होत आहे. दुग्ध व कुक्कुटपालन व्यवसायाला नवीन दिशा मिळावी, यासाठी खात्याचे कार्य अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे.

## पशुसंवर्धनातून आर्थिक विकास

कोविडच्या पार्श्वभूमीवर आरोग्याच्या दृष्टीने पशुजन्य उत्पादनाचे जसे की, दूध, अंडी व मांस यांचे महत्त्व वाढले. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानांकनानुसार प्रतिव्यक्ती प्रतिदिन २८३ ग्रॅम दूध, वार्षिक १८० अंडी आणि वार्षिक ११ किलो मांसाची गरज आहे. एकूणच उपलब्धता आणि गरज याचा विचार करता ग्रामीण रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रमाची गरज आहे. त्यासाठी विभागाने पुढाकार घेऊन दुग्धव्यवसाय, शेळी मेंढीपालन, कुक्कुटपालन व्यवसाय व त्याला पूरक अशा विविध योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून निर्णायक पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे भविष्यात पशुसंवर्धनविषयक व्यवसायातून आर्थिक विकास व रोजगाराची संधी निर्माण होणार आहे.



## लम्पी लस निर्मितीत राज्य स्वयंपूर्ण

पशुधनाच्या लम्पी आजारावरील मोफत लसीकरणासाठी शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाने राज्यात दीड कोटी पशुधनाचे कमी कालावधीत विक्रमी मोफत लसीकरण केले. पशुधनाचे उपचार व मृत पशुधनाची शास्त्रीय विल्हेवाट लावल्याने इतर राज्यांच्या तुलनेत पशुधनाचा मृत्युदर कमी झाला. राज्य सरकारच्या वतीने पशुधन गमावलेल्या शेतकऱ्यांना ९४ कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. लम्पी चर्मरोग प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी प्रति जिल्हा ३ कोटी रुपये याप्रमाणे एकूण १०२ कोटी रुपयांचा निधी जिल्हा वार्षिक योजनेमधून उपलब्ध करून देण्यात आला आहे. पशुजैवपदार्थ निर्मिती संस्था, पुणे राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ७० कोटी रुपयांची प्रयोगशाळा उभारण्यात आली.

## पशुरोगाचे निदान तत्काळ

सप्टेंबर २०२३ पर्यंत लम्पी लस निर्मिती करणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरणार आहे. राज्यातील पशुरोग निदानासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत राज्यात ७ ठिकाणी विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळांमध्ये आरटी-पीसीआर ही आधुनिक चाचणी सुरू करण्यात आली आहे. तसेच रोग अन्वेषण विभाग, पुणे अंतर्गत अत्याधुनिक बीएसएल-२ व बीएसएल-३ प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे भविष्यात जनावरांच्या झोनोटिक रोगाचे निदान अचूक व कमी वेळेत होण्यास मदत मिळणार आहे.

## महापशुधन एक्स्पो

शिर्डी येथे शेती महामंडळाच्या ४० एकर जागेवर देशभरातील सर्वात मोठे महापशुधन एक्स्पो-२०२३चे आयोजन करण्यात आले होते. आठ देशांतील राज्यातून विविध ७७ प्रजातींचे ८०० पशुधन या प्रदर्शनात आले होते. शासकीय, केंद्र शासकीय संस्थांचे

स्टॉल, तज्ज्ञांचे पशुसंवर्धनविषयक परिसंवाद, मार्गदर्शन, पशुपालन व्यवसायातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, प्रात्यक्षिके इत्यादीचे ३०० पेक्षा जास्त स्टॉल उभारण्यात आले होते. या एक्स्पोला तीन दिवसांमध्ये जवळपास ८ लाख पशुपालक, शेतकरी, महिलावर्ग, विद्यार्थी यांनी भेट दिली.

## ए–हेल्पअंतर्गत पशुसखींना मानधन

पशुवैद्यकीय सेवांच्या बळकटीकरणासाठी ए-हेल्पअंतर्गत पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) व भारत फायनान्शियल इन्क्लुजन लिमिटेड यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. जिल्ह्यात पशुपालकांना पशुवैद्यकीय दवाखान्यासोबत दुवा म्हणून काम करणाऱ्या पशुसखीला भारत फायनान्स इन्क्लुजन लि. यांच्यामार्फत (सीएसआर) निधीतून मदत करण्यात येणार आहे. या पशुसखींना मानधनाशिवाय अतिरिक्त कामाचेही वेतन मिळणार आहे. हा पायलट प्रोजेक्ट धाराशिव जिल्ह्यातील भूम व कळम या तालुक्यात राबवण्यात येणार आहे.

## नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय

ग्रामीण भागात दर्जेदार पशुवैद्यकीय सेवेची आवश्यकता व गरज लक्षात घेता अहमदनगर येथे नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी २०२३-२४ करिता ४५ कोटी रुपये अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आले आहेत. तसेच पशुवैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासिता विद्यार्थ्यांना आंतरवासिता भत्ता सहा हजार रुपयांवरून वैद्यकीय विद्यार्थ्यांइतका ११ हजार रुपये केला आहे.

## दूध भेसळ रोखण्यासाठी कारवाई

सध्या राज्यात ७० टक्के दुधाचे संकलन खासगी क्षेत्राकडून, तर ३० टक्के सहकारी क्षेत्राकडून संकलित केले जाते. दूध भेसळ रोखण्यासाठी हेल्पलाईन तयार करण्यात आली आहे. या हेल्पलाईनवरून ग्राहकांना दूध भेसळीबाबत तक्रार करता येऊ शकते. जागतिकीकरण व खुल्या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर दुधाचे दर हे बाजारातील मागणी व पुरवठ्यावर अवलंबून असतात. दुधाच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने एक अभ्यासगट तयार केला आहे. यामध्ये ग्रामीण भागातील प्रतिनिधी व त्या क्षेत्रातील तज्ज्ञ यांचा समावेश असणार आहे.

## महाराष्ट्र गो–सेवा आयोगाची स्थापना

देशी गो-वंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षण करणे यासाठी महाराष्ट्र गो-सेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. या आयोगाच्या माध्यमातून राज्यातील गोवंशीय पशुधनाच्या कत्तलीस आळा घालणे, दुधासाठी, पैदाशीसाठी, शेतीविषयक प्रयोजनांसाठी अनुपयोगी ठरविण्यात आलेल्या पशुधनाच्या संगोपनावर देखरेख करणे, पशुसंवर्धनाशी संबंधित अधिनियमांची अंमलबजावणी करणे, कत्तलीवर संनियंत्रण करणे, याबाबतीत शासनाच्या विविध विभागांना सहाय्य देणे, गोशाळांमार्फत पशुंच्या स्थानिक जातींची पैदास वाढवणे, राज्यातील गोशाळांच्या कार्यपद्धतीचे निरीक्षण व संनियंत्रण करणे, गोशाळांमार्फत वैरणीच्या सुधारित जातींची लागवड हाती घेणे, पर्यावरणपूरक बाबींचा विचार करून गायीचे दुध, शेण, मूत्र, बैलाच्या शक्तीपासून विद्युत निर्मिती करणे, बायोगॅस निर्मिती करणे तसेच महाराष्ट्र प्राणी रक्षण (अधिनियम) १९९५ तसेच केंद्र शासनाच्या प्राण्यांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६०ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे इ. मुख्य उद्दिष्टे व कार्ये आयोगामार्फत केली जाणार आहेत.

## विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प राबवण्यात येत होता. त्यामध्ये विदर्भ व मराठवाड्यातील ११ जिल्ह्यांतील ४,२६३ गावांमध्ये अनुदानावर पशुखाद्य व खनिज मिश्रण



पुरवठा, संतुलित आहार सल्ला, दुधाळ जनावरे वाटप, वैरण विकास कार्यक्रम, प्रशिक्षण, वंध्यत्व निवारण शिबिरे, गोचिड निर्मूलन इत्यादी बाबी राबवण्यात आल्या आहेत. प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्यासाठी शासनाने ३१२.८२ कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यापैकी १५७.६८ कोटी रुपये इतका राज्याचा हिस्सा आहे.

## दुधाळ जनावरांच्या किमतीत वाढ

राज्यात विविध योजनेंतर्गत दुधाळ जनावरांच्या किमतीत वाढ करण्यात आली आहे. यापूर्वी गाय व म्हशींसाठी ४० हजार रुपये मोजावे लागत होते. गायींसाठी ७० हजार व म्हशींसाठी ८० हजार रुपयांची वाढ केली आहे. यापूर्वी ही योजना अहमदनगर व पुणे विभागातील जिल्ह्यांना लागू नव्हती. आता राज्यात सर्वच जिल्ह्यांमध्ये ही योजना राबवण्यात येणार आहे.

## सहकार महामंडळाची स्थापना

राज्य सरकारने शेळी-मेंढी पालनाला चालना देण्यासाठी मेंढी व शेळी सहकार विकास महामंडळाची स्थापना केली आहे. या महामंडळाचे राज्याचे मुख्यालय अहमदनगर येथे आहे. यासाठी वार्षिक दहा हजार कोटींची तरतूद केली आहे. हा व्यवसाय करणाऱ्या तरुणांना १ लाख ७५ हजार रुपयांचे बिनव्याजी कर्ज दिले जाणार आहे.

हरितक्रांती व धवलक्रांतीच्या माध्यमातून विकासाचे अर्थचक्र अधिकाधिक गतिमान करण्याचा सरकारचा दृढ संकल्प आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके–आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

महाराष्ट्राला ७२० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभलेला आहे. येणाऱ्या काळात पर्यटन आणि मत्स्यव्यवसायाला चालना देण्याचे काम राज्य शासन प्राधान्याने करणार आहे. मुंबईतील कोळीवाड्यांचे सुशोभीकरण, पुनर्विकास, त्यांना मिळणाऱ्या सोयीसुविधा, त्यांची सुरक्षा यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार आहे. मत्स्यव्यवसाय विकासाला चालना देणारे आणि मत्स्य उत्पादनात महाराष्ट्र आघाडीवर असेल, असे समग्र मत्स्य विकास धोरण लवकरच आणण्यात येणार आहे.

# मत्स्योत्पादनात आघाडी

**सुधीर मुनगंटीवार,**
मंत्री, वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय

गोड्या पाण्यातील मत्स्यपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात रोजगार मिळवून देणारे तसेच निर्यातक्षम क्षेत्र आहे. शेततळे असणाऱ्या शेतकऱ्याला आपल्या शेततळ्यात मत्स्यपालन करता यावे, यासाठी 'शेत तेथे मत्स्यतळे' योजना राबवण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मत्स्यसंपदा योजनेसाठी ६ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. पुढच्या पिढीलासुद्धा मत्स्य उत्पादनाचा लाभ मिळावा, यासाठी मत्स्य संगोपन व संवर्धनासाठी मच्छीमार बांधवांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.

मुंबईतील सर्वात महत्त्वाचे ससून बंदर असून त्याच्या विकासाला प्राधान्य देण्याचे नियोजन आहे. मासे विक्री साखळी प्रक्रिया तयार करणे, मत्स्यव्यवसाय उद्योगाला चालना देणारे पूरक जोडधंदे आणि रोजगार उपलब्ध करणे यावर राज्य शासन भर देत आहे.

## गोड्या पाण्यातील मत्स्यपालन

केंद्राप्रमाणे राज्य शासनाने सागरी मासेमारीसोबत गोड्या पाण्यातील मत्स्यपालनावर विशेष भर देण्याचे ठरवले आहे. याकरिता केंद्र शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेत मत्स्यपालन क्षेत्राचे योगदान मोठे असणार आहे. व्यावसायिक मत्स्यपालन करण्यासाठी विविध परवानग्या घेणे आवश्यक होते. मात्र त्यात बदल करून शेतकऱ्याला शेततळ्यात मत्स्यपालन करताना कोणत्याही परवानगीची आवश्यकता लागू नये अशी राज्य शासनाची भूमिका आहे.

## समुद्र पिंजऱ्यातील मत्स्यपालन

धरण, तळे, तलाव अशा गोड्या पाण्याच्या जलाशयात मत्स्यबीज संवर्धन, पिंजऱ्यातील मत्स्यपालन अशा प्रकारे वेगळ्या पद्धतीने मत्स्यपालन केले जाते. समुद्रातही पिंजरा पद्धतीने मत्स्यपालनास प्रोत्साहन देण्याचे राज्य शासनाने ठरवले आहे.

## मत्स्यसंवर्धनासाठी 'सीबा' करार

निमखाऱ्या पाण्यात मत्स्य संवर्धनाच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय क्षेत्रात रोजगार आणि उद्योगवाढीसाठी मत्स्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ ब्रॅकिश वॉटर ॲक्काकल्चर (सीआयबीए) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. सातारा, सांगली, अकोला आणि अमरावती या भागातील खारपान पट्ट्यातील मत्स्य संवर्धनाचे प्रश्न सुटणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विविध प्रकारचे मत्स्यबीज निर्माण करणे, पालन, संसाधनांचा उपयोग करून घेणे यासाठी ही संस्था राज्याला मार्गदर्शन करणार आहे.

## डिझेल परतावा नियमित

मच्छीमारांना १२० हॉर्स पॉवरवरील पर्यंतच्या बोटींना डिझेल परतावा नियमित दिला जाणार आहे. यासाठी १०० कोटी



## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मच्छीमारांप्रती संवदेनशीलता

काही दिवसांपूर्वी १० लोकांच्या मच्छीजाळीचे नुकसान झाले होते. १० मच्छीमारांची जाळी जळाल्याने त्यांना मत्स्यव्यवसाय करण्यास अडचण येत होती. त्यामुळे ही बाब लक्षात घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तत्काळ त्या १० मच्छीमारांना जाळीसाठी ५४ लाख रुपये मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

- कुटुंब कल्याणासाठी ५० कोटी रुपयांचा मत्स्य विकास कोष करण्यात येणार.
- विमा आणि डिझेल अनुदानाचा दिलासा, केंद्राच्या मदतीने पाच लाखांचा विमा.
- प्रकल्पबाधित मासेमारांना नुकसान भरपाई धोरण.
- मासेमारांना डिझेल अनुदानासाठी १२० अश्वशक्तीची अट रद्द.
- अनुशेष पूर्तीसाठी २६९ कोटी रुपयांची तरतूद.

रुपये निधी उपलब्ध आहे. डिझेल परतावा वेळेवर मिळण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार आहे.

## व्यापक आराखडा

राज्यातील बांधकाम प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या मच्छीमारांसाठी राज्यस्तरीय नुकसानभरपाई धोरण तयार करण्यात आले आहे. यामध्ये मच्छीमारांना सहा लाख रुपयांपर्यंतची मदत मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या टीसीबी-३ या प्रकल्पामुळे मच्छीमार बाधित झालेले आहेत. त्यानुषंगाने राज्यस्तरीय नुकसान भरपाई धोरणाचा व्यापक आराखडा तयार करण्यात आलेला आहे. मच्छीमारांच्या होणाऱ्या नुकसानीसाठी सहा श्रेणी निश्चित करण्यात आल्या आहेत. मच्छीमारांना नुकसानभरपाई धोरण राबवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.

## हक्काची बाजारपेठ

मत्स्य उत्पादन विक्री करण्यासाठी मच्छीमार बांधवांना हक्काची बाजारपेठ आवश्यक असल्याने पालघर जिल्ह्यातील साटपाटी येथे सर्व सुविधायुक्त आदर्श मच्छी बाजारपेठ उभारली जाणार आहे.

## तलाव ठेका माफीचा निर्णय

गोड्या पाण्यातील जलाशयात मासेमारी करणाऱ्या मच्छीमार बांधवांना तलाव ठेका माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. राज्यातील मच्छीमार मत्स्य संवर्धक व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांची २०२१-२२ या वर्षात तलाव ठेका रक्कम भरणा केलेल्या तलावांची ठेका रक्कम २०२३-२४ या वर्षात समायोजित करण्यास; तसेच २०२१-२२ या वर्षात तलाव ठेका रक्कम भरणा करू शकलेले नाहीत, अशा मच्छीमार मत्स्य संवर्धक व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांची २०२१-२२ या वर्षाची तलाव ठेका रक्कम माफ करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

## तज्ज्ञ समिती गठित

महाराष्ट्र मासेमारी अधिनियम १९६० मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. याकरिता राज्य शासनाने तज्ज्ञ समिती गठित करण्याचा निर्णय घेतला आहे. या समितीमध्ये मत्स्यव्यवसाय आयुक्त हे या समितीचे अध्यक्ष असतील. तसेच मत्स्यव्यवसाय विभागाचे उपसचिव, केंद्रीय मत्स्यकी शिक्षण संस्थेचे वरिष्ठ वैज्ञानिक, नागपूरच्या म्हापसू मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू, रत्नागिरीच्या मत्स्य महाविद्यालयाचे वरिष्ठ वैज्ञानिक/प्राध्यापक, लातूरच्या उद्गीर येथील मत्स्य महाविद्यालयाचे वरिष्ठ वैज्ञानिक, भंडाऱ्याचे डॉ. उल्हास फडके, महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय राज्यस्तरीय संघाचे प्रतिनिधी यामध्ये सदस्य असतील. याशिवाय वासुदेवराव सुरजुसे, रविकिरण तोरसकर, रणजीत रासकर, शहाजी पाटील, शंकर वाघ, दिलीप परसने, डॉ. केतन चौधरी या समितीमध्ये सदस्य असतील. सदर समिती वेळोवेळी बैठका घेऊन भूजलाशयीन मत्स्यव्यवसाय धोरणांतर्गत नियमित तसेच सहकारी संस्था नोंदणी संबंधातील शासन निर्णय आणि परिपत्रक यांचा अभ्यास करून महाराष्ट्र मासेमारीबाबत अधिनियम १९६० मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

## मच्छीमारांच्या अनुदानात वाढ

मच्छीमारांना १० टनापर्यंतची, लाकडी फायबर, बांधणी नौका खरेदी करण्यासाठी एक लाख रुपयांपर्यंतच्या अनुदानाची मर्यादा वाढवून ती अडीच लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. पाच लाख रुपयांपर्यंतच्या अथवा ५० टक्के किंवा अडीच लाख रुपये यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान मच्छीमारांना मिळणार आहे. मच्छीमारांच्या तयार जाळी खरेदी व बिगर यांत्रिकी नौका बांधणीच्या अनुदानात वाढ करण्यात आली आहे. यामुळे पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या मच्छीमारांना फायदा होणार आहे. मासेमारी करणाऱ्या नौकांवर वापरण्यात येणाऱ्या नायलॉन व मोनोफिलामेंट जाळी खरेदीवर ५० टक्के अनुदान देण्यात येणार आहे.

## मत्स्यबीज उत्पादनासाठी 'क्लस्टर'

गोड्या पाण्यातील मत्स्य संवर्धनापैकी ५०% वाटा हा विदर्भाचा आहे. गोड्या पाण्याचे साठे विदर्भात विपुल प्रमाणात असल्यामुळे मत्स्य उत्पादन सहज वाढू शकते. सेंट्रल इन्स्टिट्युट फॉर फ्रेशवॉटर ॲक्वाकल्चर आणि महाराष्ट्र ॲनिमल आणि फिशरी सायन्सेस युनिव्हर्सिटी यांच्या सहभागातून चंद्रपूरमध्ये 'रिजनल रिसर्च सेंटर' मंजूर करण्यात येणार आहे. विदर्भात मत्स्यबीज उत्पादनासाठी 'क्लस्टर' म्हणून विकसित होण्याची क्षमता आहे. यामुळे मत्स्यपालनाला अधिक चालना मिळेल.

## मत्स्यबीज निर्मितीत महाराष्ट्र स्वयंपूर्ण

राज्यातील ६४ शासकीय मत्स्यबीज केंद्र सार्वजनिक, खासगी, भागीदारी (पीपीपी) या तत्त्वावर भाडेपट्टीने देण्यात येणार आहे. यामुळे महाराष्ट्रात आवश्यक मत्स्यबीज निर्मिती होईल. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेतून खासगी मत्स्यबीज निर्मितीला चालना देणे, शासकीय आणि खासगी मत्स्यबीज संवर्धन क्षेत्र वाढवणे, सागरी क्षेत्रात पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धन करणे, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेबाबत सुधारित निर्णय घेणे, किसान क्रेडिट कार्डद्वारे मच्छीमार आणि मत्स्यशेतकरी यांना खेळते भांडवल उपलब्ध करून देणे असे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.

येणाऱ्या काळात महाराष्ट्रात हरित आणि पर्यावरणपूरक उद्योगांबरोबरच मत्स्यव्यवसायाला चालना देणारे उद्योग महाराष्ट्रात आणले जाणार आहेत, यासाठी राज्य शासन प्रयत्न करत आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील शेतकरी सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात प्रगतिपथावर आहेत. त्यामुळे फलोत्पादनाच्या बाबतीत राज्याने देशपातळीवर इतर राज्यांच्या तुलनेत क्रांतिकारक प्रगती केलेली आहे. राज्याच्या सकल उत्पादनामध्ये फलोत्पादनाचा वाटा निश्चितच महत्त्वाचा राहिलेला आहे.**

# फलोत्पादनात अव्वल

**संदिपानराव भुमरे**
मंत्री, रोजगार हमी योजना, फलोत्पादन

देशामध्ये महाराष्ट्र राज्य कृषी क्षेत्रात अग्रगण्य आहे. राज्यातील जमीन, हवामान, पाऊस, पाणी इत्यादींमध्ये वैविध्यता आहे. हवामानावर आधारित विविध कृषी हवामान विभाग राज्यात आहेत. राज्यातील वैविध्यपूर्ण हवामानामुळे वेगवेगळ्या प्रकारची फळे, भाजीपाला, फुले, औषधी, सुगंधी वनस्पती, मसाला पिके इत्यादींची लागवड केली जाते. राज्यात विविध फळपिकांना असलेले पोषक हवामान विचारात घेता संबंधित विभागात त्या त्या फळपिकांच्या रोपवाटिकांची स्थापना करण्यात आली आहे. राज्यामध्ये दर्जेदार रोपनिर्मिती व गुणवत्तापूर्ण कलमे/रोपांची निर्मिती करून शेतकऱ्यांना उच्चप्रतीची कलमे/रोपे पुरवण्यासाठी शासकीय रोपवाटिकांची स्थापना करण्यात आली आहे.

## वैशिष्ट्यपूर्ण ठेवा

राज्यातील फलोत्पादनामध्ये झालेल्या वाढीमध्ये शासकीय योजनांचा जसा सहभाग आहे, तसेच राज्यातील शेतकऱ्यांचेसुद्धा मोठे योगदान आहे.

राज्याने केवळ फलोत्पादन पिकांच्या क्षेत्र वाढीमध्येच प्रगती केलेली आहे, असे नाही तर राज्यातील मोठ्या प्रमाणावर फळे व भाजीपाल्याचीही निर्यात युरोपियन युनियन व इतर देशांमध्ये होत आहे. राज्यातील वैविध्यपूर्ण हवामानामुळे काही फळे व भाजीपाला पिके ठरावीक क्षेत्रातच येतात व त्या भागाचा तो वैशिष्ट्यपूर्ण ठेवा आहे. याबाबतचा विचार करून हापूस, केशर आंबा, द्राक्ष, बेदाणा, सीताफळ, चिक्कू, भरीत वांगी, मोसंबी, अंजीर व हळद इ. पिकांच्या उत्पादनाला भौगोलिक चिन्हांकन प्राप्त करून घेण्यासाठी राज्य शासनाने विशेष प्रयत्न केलेले आहेत.

## महाकृषिविकास अभियान

या अभियानांतर्गत राज्यातील शेतमालाच्या उत्पादन ते मूल्यवर्धनासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. तसेच तालुका, जिल्हानिहाय शेतकरी गट आणि समूहासाठी योजना राबवण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी राज्यात एकात्मिक प्रकल्प आराखडा तयार करण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांच्या



शेतमालाची मूल्यसाखळी उभारण्यासाठी अभियान राबवण्यात येणार आहे. राज्यातील पडीक जमीन व फळपिकास अनुकूल असलेले हवामान, या बाबींचा विचार करता भविष्यातसुद्धा फलोत्पादनास चांगला वाव आहे. शेतीच्या शाश्वत विकासासाठी 'महाकृषिविकास अभियान' नक्कीच फायद्याचे ठरणार आहे. या अभियानातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ होईल, तसेच आगामी पाच वर्षांत या योजनेसाठी तीन हजार कोटी रुपये उपलब्ध करून दिले जाणार आहे.

### मागेल त्याला फळबाग

महाराष्ट्रामध्ये मागील काही वर्षांपासून पावसाचे प्रमाण अनिश्चित झालेले आहे. यामुळे शेतकऱ्यांना कोरडवाहू शेती करताना नेहमी पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. या सर्वांचा परिणाम शेतीच्या उत्पादनावर होतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. राज्यातील पावसावर आधारित कोरडवाहू शेतीसाठी 'मागेल त्याला शेततळे' ही योजना राज्य सरकारने सुरू केली. त्याप्रमाणे मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळे, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे आणि कॉटन श्रेडर हे घटक शेतकऱ्यांना राज्य सरकार उपलब्ध करून देणार आहे. या विविध योजनांकरिता २०२३-२४ मध्ये एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### काजू फळ विकास योजना

काजूच्या लागवडीपासून प्रक्रिया आणि विक्रीपर्यंत शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन पुढील पाच वर्षांसाठी ही योजना राबवण्यात येईल. या योजनेकरिता एक हजार ३२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही योजना संपूर्ण कोकण, कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व आजरा या तालुक्यांमध्ये राबवण्यात येणार आहे. तसेच आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रेही उभारण्यात येणार आहे. यासाठी २० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एकंदरीत फलोत्पादन विभागाने विविध योजनांसाठी ६४८ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

### फळझाड फूलपीक लागवड

राज्य शासनाने पाणंद शेतरस्त्यांकरिता फळझाड व फूलपीक ही योजना सुरू केली आहे. यासाठी रोजगार हमी योजना विभागास १० हजार २९७ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून दिला आहे. रोहयोअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या एकसलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर अमृतमहोत्सवी फळझाड, वृक्षलागवड आणि फूलपीक लागवड करण्याचा कार्यक्रम राज्य शासन राबवणार आहे.

### हळद संशोधन केंद्र

हिंगोली जिल्ह्यात मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्रासाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



### मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना

राज्यातील अनेक शेतकरी कोरडवाहू शेती करतात, म्हणजेच निसर्गावर अवलंबून असलेली शेती आहे. मात्र सध्याची परिस्थिती पाहता शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. पाऊस अनिश्चित असल्यामुळे शेती करणे फार कठीण आहे. त्यामुळे कोरडवाहू शेती आता धोक्यात आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना विहिरी उपलब्ध करून दिल्यास याचा शेतकऱ्यांना नक्कीच फायदा होईल. राज्य सरकारने सुरू केलेल्या यासारख्या योजना शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणतील. वैयक्तिक लाभार्थ्याला सिंचन विहिरीचा लाभ देण्याबाबत राज्य सरकारने सुधारित मार्गदर्शक सूचना वेळोवेळी दिलेल्या आहेत. सिंचन विहिरीच्या खर्चाची मर्यादा चार लक्ष रकमेपर्यंत वाढवण्यात आली आहे. अनुसूचित जाती-जमाती व दारिद्र्य रेषेखालील कुटुंब यांकरिता दोन सिंचन विहिरींमधील किमान १५० मीटर अंतराची अट रद्द करण्यात आली. तसेच सुरक्षित पाणलोट क्षेत्रामध्ये विहिरीचे स्थळ निश्चित करण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे नमूद करण्यात आली आहेत.

कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी महाराष्ट्र शासनाकडून सातत्याने प्रयत्न केले जातात. त्यासाठी शासनाकडून विविध सिंचन योजना राबवल्या जातात. अशीच एक सिंचन योजना शासनाद्वारे सुरू करण्यात आली आहे. 'मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना' या योजनेंतर्गत सरकार शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न करणार आहे.

राज्यातील सर्व तालुक्यांतील शेतकऱ्यांना मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचनास पूरक अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याकरिता मुख्यमंत्री कृषी सिंचनांतर्गत २०२२-२३ करिता २०४ कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे. फेब्रुवारी २०२३ अखेर प्राप्त झालेल्या २.२३ लाख अर्जापैकी २.०५ लाख लाभार्थ्यांच्या बँक खात्यात २६१.७६ कोटी रुपये अनुदान जमा करण्यात आले आहे.

### कृषी निर्यातीमध्ये अग्रेसर

देशातून होणाऱ्या कृषी मालाच्या निर्यातीमध्ये महाराष्ट्र राज्याचा मोठा वाटा आहे. देशातून एकूण निर्यातीच्या ८१ टक्के द्राक्ष, ९२ टक्के आंबा, ८३ टक्के केळी, ४३ टक्के डाळिंब, ५१ टक्के कांदा, ४६ टक्के भाजीपाला, ३५ टक्के आंबा पल्प, २८ टक्के प्रक्रिया केलेले फळे व भाजीपाला निर्यात करण्यात येत आहेत.

**शब्दांकन : राजू धोत्रे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**बळीराजा हा राज्यातील महत्त्वाचा घटक. राज्यातील शेतकरी - कष्टकरी सर्वसामान्य जनतेचा आर्थिक आधार बळकट करणे, नैसर्गिक आपत्तीच्या काळात त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे, या बाबींसाठी राज्य सरकार सकारात्मक निर्णय घेत आहे. राज्याच्या २०२३-२४ या अर्थसंकल्पातून शेतकरी आणि कष्टकरी यांच्यासाठी भरीव तरतूद केली आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी, प्रगतीसाठी राज्य शासन सदैव कार्यरत आहे.**

# आत्मनिर्भर बळीराजा

**अब्दुल सत्तार,** मंत्री, कृषी

कृषी विभागासह मदत आणि पुनर्वसन, पशुसंवर्धन, सहकार व पणन, जलसंपदा, जलसंधारण अशा विविध विभागांच्या माध्यमातून बळीराजाला बळकटी देण्याचे काम सुरू आहे. राज्यातील शेतकरी सुखी व समृद्ध व्हावा, यासाठी राज्यशासन विविध योजना राबवत आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासामध्ये कृषी क्षेत्राचे योगदान महत्त्वपूर्ण राहिलेले आहे.

## शेतकऱ्याच्या कष्टाला शासनाची साथ

शेतीसाठी तंत्रकुशलतेची जोड देण्याचा संकल्प राज्य शासनाने केला आहे. शेती, सहकार आणि सिंचनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कष्टाला राज्य शासनाची साथ मिळणार आहे. शेतकऱ्यांची उन्नती व्हावी, यासाठी राज्य शासन प्रयत्न करत आहे. सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती आहे असा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांना मदत मिळणे सोपे होणार आहे.

## अर्थसंकल्पात भरीव तरतूद

राज्य शासनाने केंद्र सरकारच्या धर्तीवर 'नमो शेतकरी सन्मान निधी' योजना लागू करून शेतकऱ्यांना प्रतिवर्षी सहा हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना या दोन्ही योजनांचा लाभ मिळून प्रतिवर्ष त्यांच्या खात्यात १२ हजार रुपये जमा होणार आहेत. त्यासाठी २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी ६ हजार ९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

महा कृषी विकास अभियानाच्या माध्यमातून पीक, फळपीक या मूलभूत घटकांच्या उत्पादनापासून मूल्यवर्धनापर्यंतची प्रक्रिया, तसेच तालुका, जिल्हानिहाय शेतकरी गट समूहासाठी एकात्मिक पीक आधारित प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला आहे.

## मागेल त्याला शेततळे

'मागेल त्याला शेततळे' या योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला आहे. शेतकऱ्यांची ही गरज ओळखून त्यात अन्य काही घटकही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. फळबागा, ठिबक सिंचन, शेडनेट, हरितगृहे, आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर या घटकांचाही समावेश करण्यात आला आहे.

## एक रुपयात पीक विमा

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप आणि रब्बी पिकांसाठी विमा ही योजना राबवण्यात येते. ठरावीक रक्कम भरून शेतकरी त्यांचे पीक संरक्षित करतात. यामध्ये राज्य आणि केंद्र शासनाचा हिस्साही जोडला जातो. याआधी एकूण विमा रकमेच्या दोन टक्के रक्कम शेतकऱ्यांना भरावी लागत होती. आता केवळ एक रुपया भरून शेतकऱ्यांना पीक विमा घेता येणार आहे. राज्यातील १.५२ कोटी शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या ३३०० कोटी रुपयांचा विमा हप्ता राज्य शासन भरणार आहे.

## स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा

राज्य शासनाने गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना सुरू केली आहे. यामध्ये अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला प्रत्येकी दोन लाखांचे सानुग्रह अनुदान मिळणार आहे. या वर्षी १२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



## सेंद्रिय शेतीला प्राधान्य

नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आगामी तीन वर्षांत २५ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणण्यासाठी जैवनिविष्ठा स्रोत केंद्रांची स्थापना केली जाणार आहे. त्यासाठी एक हजार कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र श्री अन्न अभियान

पौष्टिक तृणधान्य वर्षाच्या अनुषंगाने राज्याने 'महाराष्ट्र श्री अन्न अभियान' सुरू केले आहे. उत्पन्न वाढीसाठी तंत्रज्ञानाचा प्रसार, प्रात्यक्षिक, यांत्रिकीकरण करणे, प्रक्रिया करणे, मूल्यसाखळी विकास याचा समावेश आहे. राज्यात भरड धान्याचा प्रसार करणे, त्याचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवणे यासाठी श्री अन्न अभियान महत्त्वाचे ठरणार आहे.

## कृषी कन्व्हेंशन केंद्र

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत नागपूर कृषी महाविद्यालय येथे परिपूर्ण आंतरराष्ट्रीय दर्जाचे कृषी कन्व्हेंशन केंद्र स्थापन केले जाणार आहे. संत्री पिकावर प्रक्रिया करण्यासाठी नागपूर, काटोल, कळमेश्वर (जि. नागपूर), मोर्शी (जि. अमरावती) आणि बुलडाणा येथे संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारली जाणार आहे.

## अतिवृष्टी आणि पूरग्रस्तांना दुप्पट मदत

मदत व पुनर्वसन विभागाच्या माध्यमातून अतिवृष्टी आणि पूरग्रस्तांना एनडीआरएफच्या मदतीच्या दुप्पट रक्कम देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. सुमारे ४० लाख नुकसानग्रस्तांना सुमारे ५ हजार कोटींची मदत करण्यात आली आहे. उर्वरित २ हजार ३४२ कोटी २६ लाख रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. लातूर, उस्मानाबाद व बीड या जिल्ह्यात शंखी गोगलगायीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीपेक्षा वाढीव दराने मदत केली आहे. तसेच महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत नियमित पीक कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ दिला आहे. यामध्ये १२ लाख ८४ हजार पात्र खातेधारकांच्या बँक खात्यात ४ हजार ६८३ कोटी रुपये थेट जमा केले आहेत.

## स्मार्ट प्रकल्प

कृषी विभागाने मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प कार्यान्वित केला आहे. शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे, शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्यसाखळी विकसित करणे, इत्यादी उद्दिष्टे केंद्रस्थानी ठेवून हा प्रकल्प सुरू केला आहे. सध्या राज्यात



एकूण ३७४ उपप्रकल्पांना मंजुरी दिली आहे. स्मार्ट प्रकल्पाच्या माध्यमातून एकूण ५२५ उपप्रकल्प प्रस्तावित आहेत. यामध्ये उत्पादक भागीदारी - १२०, बाजार संपर्क - १३०, धान्य गोदाम आधारित - २२५ आणि नावीन्यपूर्ण ५० अशा उपप्रकल्पांचा समावेश आहे. पायाभूत सुविधा आणि सेवांचे अपेक्षित लाभार्थी १९ लाख, मूल्यसाखळी विकास शाळा अपेक्षित लाभार्थी एक लाख, शेतकरी संस्थांनी उभारलेल्या गोदाम सुविधेचे लाभार्थी एक लाख, बाजारभाव अंदाजाचा प्रत्यक्ष लाभ घेणारे अपेक्षित शेतकरी संख्या १२ लाख, नवीन रोजगार निर्मिती ९,७०० आणि प्रकल्पामुळे आकर्षित होणारी अपेक्षित खासगी गुंतवणूक ४१० कोटी रुपये इतकी आहे.

## प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना

केंद्राप्रमाणे राज्य सरकारही शेतकऱ्यांसाठी विविध योजनांची अंमलबजावणी करत आहे. ही योजना केंद्रपुरस्कृत आहे. केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० असा आहे. या योजनेंतर्गत १४४ प्रकल्प मंजूर असून प्रकल्पांचे एकूण क्षेत्र ५ लक्ष ६५ हजार १८६ हेक्टर इतके आहे.

## राष्ट्रीय कृषी विकास योजना

सध्या ३४ राज्यांत ही योजना राबवण्यात येत आहे. २०२२-२३ पासून 'राष्ट्रीय कृषी विकास' योजना - 'प्रति थेंब अधिक पिक' या योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन योजना राज्यात राबवण्यात येत आहे. लहान व सीमांत शेतकऱ्यांना ५५ टक्के, तर इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान ५ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत तुषार व ठिबक सिंचनासाठी शेतकऱ्यांना देण्यात येते. या योजनेसाठी ६६६ कोटी ६६ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना

या योजनेंतर्गत १५० तृणधान्यांवर आधारित प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. आतापर्यंत ६००० प्रक्रिया केंद्रांना मान्यता देण्यात आलेली आहे. पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेत महाराष्ट्र राज्य भारतात प्रथम क्रमांकावर आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राज्यात आतापर्यंत ८३ हजार १६६ कांदाचाळी उभारण्यात आल्या आहेत. यामुळे १९ लक्ष ४८ हजार मे. टन साठवणूक क्षमता निर्माण झाली आहे.

राज्यातील शेतकऱ्यांसाठी आवश्यक त्या सर्व बाबींना प्राधान्य देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. सततच्या होत असलेल्या हवामान बदलामुळे शेतपिकांवर प्रतिकूल परिणाम होऊ नये आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट होऊ नये, यासाठी राज्यातील कृषी विद्यापीठेदेखील प्रयत्न करत आहेत. शेतकऱ्यांच्या जीवनातील अडचणी दूर करण्याचा राज्य शासनाकडून प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे.

**शब्दांकन : दीपक चव्हाण,**
विभागीय संपर्क अधिकारी

**सहकारी संस्थांच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करून ग्रामीण वित्त, कृषी, पणन, औद्योगिक, सहकार, बाजार नियामक आणि कर्ज देण्यासारख्या बाबींशी संबंधित ग्रामीण पतपुरवठा क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी सहकार व पणन विभागाकडून अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या सर्व वित्तीय संस्था, बाजार, सेवा आणि भागीदार यांचा समावेश असलेल्या वित्तीय प्रणालीवर राज्य शासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे.**

# सहकारातून समृद्धी

**अतुल सावे,**
मंत्री, सहकार, इतर मागास बहुजन कल्याण

'सहकारातून समृद्धी' हा विकासात्मक दृष्टिकोन वास्तवात आणण्यासाठी केंद्र सरकारने 'सहकार मंत्रालयाची' स्थापना करण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. राज्यातील शेतकऱ्यांना शेती कर्जपुरवठा करण्यात त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा संरचनेची महत्त्वाची भूमिका आहे. यामध्ये राज्य स्तरावर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा स्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व गाव पातळीवर प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचा समावेश होतो. तळाशी प्राथमिक सहकारी संस्था असून सभासदांसाठी त्या शेतमालाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार करत असतात. समुदायाधारित विकासात्मक भागीदारीसाठी केंद्र सरकार अधिक काम करत आहे. या व्यापक भूमिकेत महाराष्ट्र कायम आघाडीवर आहे.

## शेतकरी कर्जमुक्ती योजना

नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होते. या सर्व परिस्थितीमुळे शेतकरी हैराण होतो, या सततच्या नुकसानामुळे पिकांना योग्य भाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना नेहमी कर्ज काढावे लागते. या सर्व बाबींमुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. शेतकऱ्यांच्या या गंभीर परिस्थितीचा विचार करून राज्य शासनाने शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी व कर्जमुक्त करण्यासाठी 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना' सुरू केली आहे.

या योजनेत ३२ लाख शेतकऱ्यांना खात्यावर २० हजार ४२८ कोटी रुपये वितरित करण्यात आले. अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचा फायदा झाला आहे. जवळपास १२ लाख पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर ४ हजार ६८३ कोटी रूपये इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.



## भूविकास बँकेच्या कर्ज माफीचा निर्णय

भूविकास बँकेचे कर्ज घेतलेल्या ३४ हजार ७८८ शेतकऱ्यांनी, २९ भूविकास बँकाकडून घेतलेल्या ९६४ कोटी १५ लाख रुपये इतक्या थकीत कर्जाची रक्कमदेखील राज्य शासनाने माफ केली आहे. सुमारे ६९ हजार हेक्टर शेतजमिनीवरील भूविकास बँकांच्या कर्जाचा बोजा कमी करून या शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. तसेच विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी एक कोटी एवढा निधी वितरित करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

## ऊस उत्पादकांना १००% एफआरपी

साखर कारखान्यांसाठी ऊस जेवढा आवश्यक आहे, तसेच ऊस उत्पादकांना कारखाने गरजेचे आहेत. उसाचा दर एका निर्धारित नियमावलीत ठरवला जातो. त्यामध्ये ऊस उत्पादकांपासून ते कारखानदार या सर्वांचाच फायदा बघितला जातो. प्रतिटन उसामागे उत्पादकांना मिळणारा दर म्हणजे एफआरपी! उसाचा वैधानिक किमान भाव म्हणजे एफआरपी होय. यंदा शेतकऱ्यांना ४२ हजार ६५० कोटी रुपयांची एफआरपी देण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना भक्कम आर्थिक दिलासा मिळणार आहे. एफआरपी एकत्र मिळाल्याने शेतकऱ्यांची कर्ज काढण्यापासून सुटका होणार आहे. देशातील प्रमुख नगदी पीक म्हणून उसाकडे पाहिले जाते. ऊस उत्पादनात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. साखरेसोबतच आता इथेनॉल निर्मितीवरसुद्धा राज्य शासन भर देत आहे. तसेच सहकार क्षेत्राला गतिमान करण्यासाठी राज्य शासन अधिक सक्षमपणे काम करत आहे.

## कांदा उत्पादकांना अनुदान

कांद्याचे दर घसरल्याने राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आला होता. आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांच्या

पाठीशी खंबीरपणे राज्य शासन उभे आहे. सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ३५० रुपयांचे अनुदान जाहीर केले आहे. राज्य सरकारने कांदा उत्पादकांना ३५० रुपयांचे अनुदान देण्यासाठी प्रक्रिया जाहीर केली आहे. कांदा निर्यातीमध्ये ३३ टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे. २०२२-२३ या वर्षात जवळपास ३.८४ लाख हेक्टर क्षेत्रांवर कांद्याची लागवड झालेली आहे.

## नाफेडमार्फत कांदा खरेदी विक्री

कांदा बाजारभावातील घसरण थांबविण्यासाठी किंमत स्थिरता निधी अंतर्गत कांदा खरेदीसाठी २ लाख मे.टन अतिरिक्त उद्दिष्ट देऊन नाफेडमार्फत कांदा खरेदी करावी अशी विनंती केंद्र सरकारला केली आहे. १ फेब्रुवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीमध्ये ज्या शेतकऱ्यांनी लेट खरीप हंगामातील लाल कांदा संबंधित



तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती, खासगी बाजार समिती, थेट पणन अनुज्ञप्तीधारकाकडे अथवा नाफेडकडे विक्री केला आहे, अशा शेतकऱ्यांना रुपये ३५० प्रति क्विंटल (२०० क्विंटल प्रति शेतकरी मर्यादेत) याप्रमाणे अनुदान देण्याची योजना राबवण्यात येत आहे. हे अनुदान थेट (डायरेक्ट बँक ट्रान्सफर) शेतकऱ्यांच्या बचत बँक खात्यात जमा होणार आहे.

## कांदा बाजारभावातील उपाययोजना

कांद्याच्या दरात सातत्याने घसरण असून राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे कांदा बाजारभावातील घसरण थांबवण्यासाठी राज्यशासनाकडून समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने राज्यातील शेतकरी, व्यापारी, अडते, निर्यातदार, तज्ज्ञ, शास्त्रज्ञ, यांच्या भेटी घेऊन अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांचा अहवाल राज्य शासनाला देण्यात येणार आहे.

## रेल्वे वॅगन्स उपलब्धीसाठी विनंती

निर्यात धोरणात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे बांग्लादेशाने भारतीय कांद्यावर आयात बंदी केली आहे. त्यासाठी आयात शुल्कदेखील लागू केले आहे. बांग्लादेशाने राज्यातील कांदा निर्यातदारांना पाहिजे त्या प्रमाणात व वेळेत कांदा पाठवण्यासाठी, कांद्याच्या वाहतुकीसाठी पुरेशा रेल्वे वॅगन्स उपलब्ध करून द्याव्यात यासाठी राज्य शासनाने केंद्रीय रेल्वेमंत्री यांना विनंती केली आहे.

## महाॲग्रीटेक प्रकल्प

राज्यातील कृषी क्षेत्राच्या स्थितीत सुधारणा व्हावी, यासाठी राज्य शासनाने महाॲग्रीटेक हा वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प हाती घेतला आहे. पीकनिहाय क्षेत्राची अचूक गणना करणे, पीक आरोग्य सर्वेक्षण करणे, काढणी पश्चात उत्पादनाचे अनुमान काढणे, इत्यादींकरिता सॅटेलाईट इमेजिंग व ड्रोन तंत्रज्ञान यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे आणि विविध माहितीचे एकत्रिकरण करून शेतकऱ्यांना अचूक सल्ला व मार्गदर्शन करणे, यासाठी संगणकीय व मोबाईल ॲप्लिकेशन प्रणाली तयार करणे हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी स्वतंत्र वेबपोर्टल व मोबाइल ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे.

## शेतकरी भवन

कृषी उत्पन्न बाजार समिती असलेल्या ठिकाणी शेतकरी बांधवांना मुक्कामासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन बांधण्यात येत आहे. तसेच शिवभोजन थाळी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार

बाजार समित्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना बाजार समितीच्या निवडणुकांमध्ये थेट मतदानाचा अधिकार



देण्याचा महत्त्वाचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. समित्यांच्या निवडणुकीत मर्यादित मतदार असल्याने सातत्याने विशिष्ट मंडळीच निवडून येतात. हेच लोक समित्यांच्या सत्तास्थानी राहून शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण करतात. ज्यामुळे राज्यातील बाजार समित्यांमध्ये शेतकरी हित जपले जात नाही. या गोष्टीला आळा बसावा म्हणून बाजार समितीत शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे.

त्यातून शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून बाजार समित्यांची निर्मिती करण्यात आली आहे. बाजार समित्यांना शेतमाल पुरवणाऱ्या शेतकऱ्यांना बाजार समित्यांमध्ये मतदानाचा हक्क देण्यात येणार आहे. महाराष्ट्रात सहकाराची पाळेमुळे खोलवर रूजल्यामुळे देशासाठी महाराष्ट्र राज्य हे सहकार क्षेत्रात पथदर्शी राज्य म्हणून भूमिका बजावत आहे. राज्यात एकूण ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व २०.९८६ प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था कार्यरत आहेत. नाबार्डच्या पुढाकाराने राज्यातील सर्व ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये सीबीएस संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या सर्व ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे सर्व प्रकारच्या बँकिंग सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना संलग्न असलेल्या प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थाही तांत्रिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.

**शब्दांकन : काशीबाई थोरात,**
वरिष्ठ सहायक संचालक

**उपलब्ध जलसंपत्तीचे संरक्षण, संवर्धन व विकास आणि तिचे उपयुक्ततापूर्ण व फायदेशीर व्यवस्थापन म्हणजे जलसंधारण होय. पाण्याच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मांमुळे प्राणी जीवन, वनस्पती जीवन, मानवी जीवन आणि आधुनिक संस्कृती यात पाण्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. उपलब्ध पाण्याचे प्रमाण अचल असल्यामुळे वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे दरडोई प्रमाण सारखे घटत आहे. पाण्याचा पुरवठा अपुरा वाटत असल्यामुळे जगात शास्त्रशुद्ध पद्धतीनुसार पाण्याच्या व्यवस्थापनाची म्हणजे जलसंधारणाची आवश्यकता निर्माण झाली आहे. राज्य शासनाने जलसंधारणासाठी महत्त्वपूर्ण योजना आखल्या आहेत. त्या योजनांविषयी...**

# मृद् व जलसंधारण योजना

**वर्षा फडके-आंधळे**

मृद् संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनामार्फत महत्त्वाच्या विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजना पुढीलप्रमाणे :-

## जलसंधारण विभागातील विविध योजना

### अ. पाणलोट कार्यक्रमासाठी उपलब्ध क्षेत्र व उपचारित क्षेत्र

**गावे :-** १. एकूण गावांची संख्या : ४३,७२२
२. कोरडवाहू गावांची संख्या : ३५,७१७
३. पाणलोट कार्यक्रमासाठी निवडलेली गावे : २५,३३८

**क्षेत्र :-** १. एकूण भौगोलिक क्षेत्र : ३०७.५८ लाख हेक्टर
२. पाणलोट कार्यक्रमासाठी लायक क्षेत्र : २४१.०० लाख हेक्टर
३. आतापर्यंत उपचारित क्षेत्र : १८२.४७ लाख हेक्टर
४. शिल्लक क्षेत्र : ५८.५३ लाख हेक्टर

**पाणलोट :-** १. एकूण जीएसडीएचे मेगा पाणलोट : १,५३१
२. एकूण सूक्ष्म पाणलोट : ४४,१८५
३. कामासाठी निवडलेले सूक्ष्म पाणलोट : ४१,९६२
४. पूर्ण झालेले सूक्ष्म पाणलोट : ३८,१९५

### ब. पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाच्या विविध योजना

मृद् संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन मार्फत राज्यात खालीलप्रमाणे महत्त्वाच्या विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजना राबवण्यात येत आहे.

१) आदर्श गाव योजना २) एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम (गतिमान) ३) मृद संधारण उपाययोजनेद्वारे जमिनीचा विकास. ४) सिमेंटबांध ५) मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना.



### प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना – पाणलोट विकास घटक २.०

महाराष्ट्र राज्यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता केंद्र शासनाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता ४ जानेवारी २०२२ रोजीच्या सुकाणू समितीच्या पहिल्या बैठकीत ६१ प्रकल्प मंजूर झाले आहेत. १३ जानेवारी २०२२ रोजीच्या सुकाणू समितीच्या दुसऱ्या बैठकीत ८३ प्रकल्पांना मंजुरी प्राप्त झाली आहे. राज्याला एकूण १४४ प्राथमिक प्रकल्प अहवाल मंजूर झाले आहेत.

### पाणलोट विकास चळवळ

**योजनेची उद्दिष्टे**

- पाणलोट विकास कार्यक्रमांना विविध प्रसिद्धी माध्यमातून प्रसिद्धी देणे.
- ग्रामीण भागातील जनतेमध्ये जल, भूमी व इतर नैसर्गिक साधनसंपत्ती संवर्धनाबाबत आस्था निर्माण करणे.
- जलसंधारण कामांना अधिक गती देणे.
- पाणलोट विकासाच्या विविध टप्प्यांमध्ये जनजागृतीद्वारे लोकसहभाग घेणे.
- पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत निर्माण केलेल्या विविध स्रोतांचे जतन करण्यासाठी लोकजागृती निर्माण करणे.
- उपलब्ध भूपृष्ठावरील आणि भूगर्भातील पाण्याचा काटकसरीने वापर करून उत्पन्न आणि उत्पादन वाढवण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे.

### मृद् विकास संधारण उपाययोजनेद्वारे जमिनीचा विकास

**योजनेचे स्वरूप व कार्यपद्धती :**

राज्यातील अपूर्ण पाणलोट धडक स्वरूपात पूर्ण करण्याच्या उद्देशाने २००७-२००८ पासून गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम राबवण्यात येतो. जलसंधारण

विभागाच्या ३० नोव्हेंबर २००७ च्या शासन निर्णयानुसार ही योजना सुरू झाली आहे. त्यामध्ये ५०० ते १००० हेक्टर क्षेत्राचा व किमान ५० टक्के पूर्ण असलेले सूक्ष्म पाणलोट निवडून नियोजनबद्ध पद्धतीने एक वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्यात येतो.

**पाणलोटात घ्यावयाची कामे :**

**क्षेत्र उपचाराची कामे** : सलग समतल चर, ढाळीचे बांध, कंम्पार्टमेंट बंडींग, मजगी, शेततळे इत्यादी.

**नाला उपचाराची कामे** : माती नाला बांध, सिमेंट नाला बांध, वळण बंधारे इ.

कार्यक्रमाचा आढावा व संनियंत्रणासाठी आयुक्त (कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिति गठित असून, समितीच्या मार्गदर्शन व निर्णयानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात येते.

## मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना

मृद् व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या मर्यादितील पाझर तलाव, गाव तलाव, साठवण तलाव, सिंचन तलाव, साठवण बंधारे, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, माजी मालगुजारी तलाव, सिमेंट नाला बांध, वळवणीचे बंधारे व सहकारी तत्त्वावरील कालव्यावरील उपसा सिंचन योजना इत्यादी जलस्रोतांची विशेष दुरुस्ती करून सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्याकरिता मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना राबवण्यात येत आहे.

मृद् व जलसंधारण विभागांतर्गत असणाऱ्या जलस्रोतांची विशेष दुरुस्ती करून पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करणे, सिंचन क्षमता पुनर्स्थापित करणे व पिण्यासाठी संरक्षित सिंचनाची सोय करणे. तसेच विशेष दुरुस्तीनंतर पाणी वापर संस्था स्थापन करून त्यांच्याकडे देखभाल दुरुस्तीसाठी हस्तांतरित करणे हा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत ८,००० योजनांची विशेष दुरुस्ती करण्यात येणार असून हा कार्यक्रम २०२० ते २०२३ या कालावधीत राबवण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत मृद् व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीतील ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेमधील लघुसिंचन तलाव, साठवण तलाव, माजी मालगुजारी तलाव, गाव तलाव, पाझर तलाव, माती नालाबांध, सिमेंट नालाबांध, साठवण बंधारे, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, वळवणीचे बंधारे इत्यादी प्रकल्पांची विशेष दुरुस्तीची कामे करण्यात येऊन सिंचना क्षमता पुनर्स्थापित करण्यात येणार आहे.

## आदर्शगाव संकल्प व प्रकल्प योजना



लोकसहभागातून ग्रामविकास व त्यासाठी लोककार्यक्रमात शासनाचा सहभाग तसेच सत्तेचे विकेंद्रीकरण, गावांचा सर्वंकष व सर्वांगीण विकास या संकल्पनेतून सप्तसूत्रीची अंमलबजावणी (नसबंदी, नशाबंदी, कुऱ्हाडबंदी, चराईबंदी आणि श्रमदान लोटाबंदी व बोअरवेल बंदी) करण्याच्या अटीनुसार गाव, शिवार व लोक विकासाची कामे करण्यासाठी आदर्श गाव योजनेची सुरुवात राज्यात १९९२ला करण्यात आली. आदर्श गाव संकल्प व प्रकल्प योजना १९९४-९५ पासून राज्यस्तरीय योजना म्हणून राबवण्यात येत आहे. सन २०१० मध्ये नवीन शासन निर्णय तयार करण्यात आला. त्याच्या अधीन राहून १०० गावे आदर्श गाव योजनेमध्ये निवडून कार्य करण्याचे लक्षांक होते. मागील ३-४ वर्षांतील अनुभवाच्या आधारे त्यात सुधारणा करून आता १० मार्च २०१५च्या शासन निर्णयानुसार या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. गावाचा सामायिक विकासाचा आराखडा हा प्रामुख्याने दोन भागात विभागला जाणार आहे. गाभा विकास कामे (रु. १२,०००/- प्रति हे. भौगोलिक क्षेत्राप्रमाणे) आणि गाव विकास (मूलभूत विकास) कामे (गाभा विकास कामाच्या आराखड्याच्या एकूण रकमेच्या २५ टक्के रक्कम).

## नदी पुनर्जीवन कार्यक्रम

राज्यात जलयुक्त शिवार अभियान दिनांक ५ डिसेंबर २०१४च्या शासन निर्णयान्वये राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नदी/ओढा/नाला यांमधील गाळ काढणे, सरळीकरण व खोलीकरण करणे ही कामे लोकसहभागातून करून नदी/ओढा/नाला पुनर्जीवन करण्यास ज्या गावातील रहिवाशांनी पुढाकार घेऊन लोकवर्गणी/श्रमदानाद्वारे मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे किंवा देत आहेत, अशा गावांमध्ये नदी/ओढा/नाला पुनर्जीवन कार्यक्रमास प्रोत्साहन देण्यासाठी अभिसरणाच्या माध्यमातून कार्यक्रम राबवण्यास ८ डिसेंबर २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

## जलसमृद्धी व्याज अर्थसाहाय्य योजना

राज्यात जलयुक्त शिवार अभियान, जल व मृद्संधारणाची कामे करण्यासाठी यंत्रसामग्री उपलब्ध करण्याकरिता सुशिक्षित बेरोजगार तरुण, बेरोजगाराची सहकारी संस्था, नोंदणीकृत गट शेती, शेतकरी उत्पादन संस्था, विविध कार्यकारी संस्था यांना शासनाकडून मृद् व जलसंधारण विभाग, सहकार विभाग व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांच्या माध्यामातून

जलसमृद्धी यंत्रसामग्री (अर्थमूव्हर्स ) व्याज अर्थसाहाय्य योजना शासन निर्णय २ जानेवारी २०१८ नुसार सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेकरिता महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

## गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार

महाराष्ट्र हे भारतातील सर्वाधिक धरणे आणि जलसाठे असलेले राज्य आहे. गाळ साचल्यामुळे या धरणांची पाणी साठवण क्षमता वर्षानुवर्ष कमी होत चालली आहे. या धरणांमधील गाळ काढल्याने धरणांची पाणी साठवण क्षमता पूर्ववत होण्यास मदत होते आणि गाळ शेतजमिनीवर पसरल्याने जमिनीची सुपीकता वाढते. हाच विचार करून महाराष्ट्र शासनाने ६ मे २०१७ च्या शासन निर्णयान्वये 'गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार' योजना सुरू केली. गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजना सुरू झाल्यापासून राज्यभरातील जलसाठ्यांमधून सुमारे ७.१७ कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे ८५०४ धरणांची साठवण क्षमता वाढली आहे. काढण्यात आलेल्या गाळामुळे १२,५५९ गावांतील ६६,५४२ हून अधिक शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर सकारात्मक परिणाम झाला आहे. सार्वजनिक, खासगी संस्था आणि लोकसहभाग हे घटक या योजनेचे अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेचा कार्यकाळ मार्च २०२१ ला संपुष्टात आला होता. १३ डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्रिमंडळाने गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजना पुढील तीन वर्षांसाठी राबवण्यास मान्यता दिली असून, त्यानुसार ही योजना पुढील तीन वर्षे राबवण्याच्या अनुषंगाने १६ जानेवारी २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ

लघु पाटबंधारे योजनांची कामे गतिमान पद्धतीने पूर्ण करण्यासाठी २२ ऑगस्ट, २००० मध्ये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाची, छत्रपती संभाजीनगर येथे स्थापना करण्यात आली. जलसंधारण कामाचे प्रचलन, शिघ्र विकास आणि नियमन करणे तसेच याची व्याप्ती ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या विविध लघु सिंचन योजना असे असेल. लघु पाटबंधारे योजनांना प्रशासकीय मान्यता, सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, निविदा कार्यवाहीस मान्यता देणे, निधीचे नियोजन करणे, कामाच्या प्रगतीबाबत आढावा घेणे इत्यादी प्रमुख कामे याअंतर्गत करण्यात येतील.




## माजी मालगुजारी तलाव दुरुस्ती कार्यक्रम

विदर्भातील माजी मालगुजारी तलावांची सर्वंकष दुरुस्ती पुनरुज्जीवन करण्याचा कार्यक्रम २०१६-१७ पासून राबवण्यात येत आहे. त्याकरिता शासनाकडून २०१६-१७ मध्ये १२१ कोटी रुपये व २०१७-१८ मध्ये ३९.८८ कोटी रुपये व २०१८-१९ मध्ये ९.९६ कोटी रुपये असा एकूण १७०.८४ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत १९५५ कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली असून, १९५० कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी १९२५ कामे सुरू झालेली असून १७७३ कामे पूर्ण झालेली आहेत.

## जलयुक्त शिवार अभियान २.०

जलयुक्त शिवार अभियान २०१५ ते २०१९ या कालावधीत २२,५९३ गावांमध्ये मोहीम स्वरूपात राबवण्यात आले. यामध्ये २०,५४४ गावे जलपरिपूर्ण झाली आहेत. अभियानांतर्गत झालेल्या कामांमुळे जवळपास २७ लाख टी.सी.एम. क्षमतेचा पाणीसाठा निर्माण झाली असून सुमारे ३९ लाख हेक्टर शेतीसाठी संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. आता मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार जलयुक्त शिवार अभियान २.० राबवण्याबाबत ३ जानेवारी २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. जलयुक्त शिवार अभियान २.० विविध योजनांच्या अभिसरणातून सुमारे ५००० गावांमध्ये राबवण्यात येणार आहे. जलयुक्त शिवार अभियान टप्पा-१ तसेच इतर पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम न राबवलेल्या गावात व गाव निवडीच्या निकषानुसार पात्र ठरणाऱ्या गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियान २.० राबवण्यात येणार आहे. तसेच जलयुक्त शिवार अभियान टप्पा- १ व इतर पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबवलेल्या ज्या गावांमध्ये पाण्याची गरज असेल व अडवण्यास अपधाव शिल्लक असेल त्या गावांमध्ये पाणलोट विकासाची कामे करण्यात येणार आहेत. जलयुक्त शिवार अभियानसाठी २०२२-२३ साठी १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जलयुक्त शिवार अभियान २.० साठी पुरवणी मागणीद्वारे ३०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**महाराष्ट्रातील भूजल मत्स्यव्यवसाय क्षेत्राकरिता एकूण २,४९५ पाटबंधारे तलावाचे २,८०,७२४ हेक्टर व जिल्हा परिषदेचे २०,०१८ तलावाचे ६६,२४८ हेक्टर असे मिळून एकूण ३,४६,९७२ हेक्टर जलक्षेत्र उपलब्ध आहे. यापैकी २,४९५ तलाव/जलाशयांचे मासेमारी हक्क मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्रामध्ये भूजल क्षेत्रात अंदाजे ४.५० लाख लोक मत्स्यव्यवसायावर अवलंबून आहेत. मत्स्य व्यावसायिकांसाठी विभागाच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा थोडक्यात आढावा..**

# मत्स्यव्यवसायाला चालना

**वर्षा फडके-आंधळे**

भूजल क्षेत्रामध्ये एकूण २,७९२ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था तसेच एकूण २९ मत्स्यव्यवसाय सहकारी संघ कार्यरत आहेत. राज्यामध्ये एकूण निमखारे क्षेत्र हे ८०,००० हेक्टर इतके असून त्यापैकी १७,१२५ हे. क्षेत्र मत्स्यव्यवसायासाठी उपयुक्त आहे. निमखारे क्षेत्रात ३६० खासगी कोलंबी प्रकल्प असून, त्यातून अंदाजे ५,००० ते ६,००० मे. टन कोळंबीचे उत्पादन घेतले जाते.

राज्यातील सात जिल्ह्यांना सागरी किनारपट्टी लाभली आहे. सध्या तीन प्रमुख मासेमारी बंदरे असून तीन निर्माणाधीन, तर चार प्रस्तावित बंदरे आहेत. सध्या १७३ मासळी उतरवणारी केंद्रे असून ४५६ मच्छीमार गावे आहेत. सध्या जवळपास ३ लाख ६५ हजार मच्छीमार लोकसंख्या आहे. रापण जाळे, बॅग/डोल जाळे, गील जाळे, ट्रॉल जाळे, पर्सनीन जाळे या मासेमारीच्या पद्धती आहेत. सध्या एकूण २१,६१८ नोंदणीकृत मासेमारी नौका आहेत, तर १७,५८६ परवानाधारक मासेमारी नौका आहेत. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अधिनियम २०२१ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. मत्स्यव्यवसायासोबत आपले समुद्र किनारे पर्यावरण स्नेही असावे, याकरिता 'निर्मल सागर सुंदरम' अशी एक चळवळ सुरू करण्यात येणार आहे.

'मच्छीमार दिन' हा दरवर्षी २१ नोव्हेंबर रोजी असतो. या वर्षापासून हा दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा केला जाईल आणि मत्स्यव्यवसाय पर्यटनाला चालना दिली जाणार आहे. येत्या काळात मच्छीमारांच्या सोयीसाठी मिरकरवाडा, भाऊचा धक्का आणि ससून डॉक ही तीन बंदरे अधिक विकसित करण्यात येत आहे. मत्स्य उत्पादन विक्री करण्यासाठी मच्छीमार बांधवांना हक्काची बाजारपेठ आवश्यक असल्याने पालघर जिल्ह्यातील साटपाटी येथे सर्व सुविधायुक्त आदर्श मच्छी बाजारपेठ उभारली जाणार आहे. मत्स्यव्यवसाय हा रोजगाराभिमुख व्यवसाय आहे. मच्छीमार बांधव आपल्या जिवावर उदार होऊन मासेमारी करतात. त्यामुळे येणाऱ्या काळात या मच्छीमारांना आरोग्य सुविधेसह नुकसान झाल्यानंतर सानुग्रह अनुदान देणे, डिझेल परतावा देणे यांसारख्या गोष्टींना प्राधान्य देण्यात येणार आहे. जलप्रदूषणाचा मत्स्य उत्पादनावर होणारा परिणाम याचा अभ्यास करण्यासाठी समिती करण्यात आली आहे. मनरेगा आणि मत्स्यव्यवसाय विकास विभागाच्या योजनेचे अभिसरण करून सुविधा संपन्न कुटुंब मिशन राबवण्याबरोबर सर्वांगीण ग्रामसमृद्धी साध्य करण्यात येणार आहे.



## मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था

प्रत्यक्षात मासेमारी ही प्राथमिक मच्छीमार सहकारी संस्थांमार्फत केली जाते व राज्य सहकारी मच्छीमार संघ राज्यातील संस्था/संघामध्ये सुसूत्रता आणण्याचे काम करते. सद्यःस्थितीत राज्यामध्ये ३,२१८ प्राथमिक सहकारी संस्था असून ३,२६,५१५ सभासद कार्यरत आहेत. भूजल क्षेत्रात प्रामुख्याने जलाशय कार्यक्षेत्रातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना जलाशयाचे ठेके देण्यात येतात व त्यांची आर्थिक व सामाजिक उन्नती करणे हेच प्रमुख्य उद्दिष्ट आहे.

उपलब्ध जलक्षेत्रातून जास्तीत जास्त मासळीचे उत्पादन घेणे, उपलब्ध जलक्षेत्र मत्स्यव्यवसायाखाली आणून उत्पादनात वाढ करणे, पारंपरिक मच्छीमारांना सक्षम बनवण्यासाठी अद्ययावत व प्रगत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याबरोबरच मोफत विमा संरक्षण, तलाव ठेक्याने देणे, बंदिस्त पिंजरा प्रगत मत्स्यसंगोपनाद्वारे तलावातील मत्स्य उत्पादनात वाढ करणे, तसेच सागरी क्षेत्रातील मासेमारी नौकांवर वायरलेस, फिशफाइंडर व जीपीएस यंत्रणा बसवणे, अवैध मासेमारीवर कार्यवाही करणे, सागरी क्षेत्रातील मच्छीमारांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता जेट्टी व मच्छीमार बंदरे बांधून देणे, बर्फ कारखाने, शीतगृहे व मासळी प्रक्रिया उद्योग सुरू करणे, दुर्बल घटकांतील मच्छीमारांच्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या दृष्टीने नवीन कार्यक्रमाची आखणी करणे, तसेच जनजाती व अनुसूचित जातीसारख्या सामाजातील दुर्बल घटकातील व्यक्तींना मत्स्यव्यवसायात सामावून घेऊन उपजीविकेसाठी व्यवसाय उपलब्ध करून देणे इत्यादी कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवण्यात येत आहेत.

## मत्स्यबीज अवलंबन कमी

राज्यामध्ये सद्यःस्थितीत एकूण ३२ मत्स्यबीज उत्पादन केंद्रे, ३२ मत्स्यबीज संवर्धन केंद्रे, ०२ कोळंबी बीज उत्पादन केंद्रे व ०१ कोळंबी बीज संवर्धन केंद्र अशी एकूण ६७ केंद्रे आहेत. त्यापैकी ०३ मत्स्यबीज उत्पादन केंद्रे महाराष्ट्र फिशरिज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडे विना ठेका हस्तांतरित करण्यात आली आहेत. या सर्व मत्स्यबीज उत्पादन व संवर्धन केंद्रांमधून अंदाजे २५.२५ कोटी मत्स्यबोटुकली तयार होऊ शकते. सद्यःस्थितीमध्ये शासकीय/भाडेपट्टीने/खासगी मत्स्यबीज केंद्रांमधून अंदाजे ८.१० कोटी मत्स्यबोटुकलीची निर्मिती होत आहे. त्यामुळे राज्यामध्ये मत्स्यबीजाचा तुटवडा फार मोठ्या प्रमाणावर भासत आहे.

राज्याला आवश्यक असलेल्या मत्स्यबीजापैकी ७५ टक्के मत्स्यबीज बाहेरच्या राज्यातून आयात केले जाते. राज्यातील शासकीय मत्स्यबीज/कोळंबी बीज उत्पादन व संवर्धन केंद्र भाडेपट्टीने देण्याबाबत १६ डिसेंबर २०२२ रोजी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. यानुसार भाडेपट्टीने देण्याबाबत मान्य केलेले केंद्र हे १५ वर्षांकरिता भाडेपट्टीने देण्यात येणार आहे. या शासन निर्णयातील तरतुदीमुळे या केंद्रांच्या जमिनींचा वापर चांगल्या पद्धतीने करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यातील मत्स्यबीजाची मागणी स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येत आहेत. राज्यातील ज्या केंद्रांची उत्पादन क्षमता जास्त आहे, अशा निवडक हॅचरी विभागाकडे ठेवून इतर सर्व केंद्र भाडेतत्त्वावर दिल्यास केंद्राची भांडवली गुंतवणूक खासगी ठेकेदारांमार्फत होऊन केंद्राची उत्पादन क्षमता वाढेल.

राज्यातील कमी उत्पादनक्षम झालेली मत्स्यबीज केंद्रे पीपीपीद्वारे खासगी गुंतवणूक दारांमार्फत विकसित करण्यात येतील.

## मत्स्यबीज संवर्धन कार्यक्रम

राज्यातील काही निवडक केंद्रे व जलाशयांच्या नजीकच्या उपलब्ध जमिनीमध्ये मत्स्यबीज संवर्धन क्षेत्र निर्माण करून जास्तीत जास्त प्रमाणात मत्स्य प्रजाती (भारतीय प्रमुख कार्प, सायप्रिनस, तिलापिया, पंगॅशियस) मत्स्यबोटुकली निर्माण करणे आवश्यक आहे. याकरिता तलाव / जलाशय नजीकच्या यादृष्टीने शासनास पाटबंधारे विभागाच्या जमिनी दीर्घकालीन भाडेपट्टीने मिळाल्यास मत्स्यबीज संवर्धन कार्यक्रम राबवता येईल व तलावधारकांना संचयनाकरिता तलावांच्या जवळच मत्स्यबोटुकली उपलब्ध होणार आहे.

## हॅचरी तेथे प्रशिक्षण केंद्र

राज्यातील एकूण ४८ मत्स्यबीज केंद्रांमध्ये २१३.६७ हेक्टर वापराविना उपलब्ध क्षेत्र असल्याचे दिसून आले आहे. आरएएस, बायॉफ्लोक यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कमी पाण्यामध्ये मत्स्यबोटुकली उत्पादन घेणे, अविकसित क्षेत्राचा उपयोग शोभिवंत मत्स्य उत्पादन केंद्र संवर्धन तळी तयार करणे, प्रशिक्षण केंद्र व आवश्यक सुविधा उभारणे यामध्ये मुख्यतः हॅचरी तेथे प्रशिक्षण केंद्र योजना राबवल्यास प्रशिक्षण सुविधा अधिक सक्षम होईल.

## तांत्रिक अभ्यासक्रम/प्रशिक्षण

मत्स्यव्यवसाय विभागामध्ये बायॉफ्लोक, आरएएस, कॅज कल्चर यांसारख्या तांत्रिक बाबींसाठी कुशल तसेच सक्षम मनुष्यबळाची आवश्यकता आहे. या तांत्रिक अभ्यासक्रमामध्ये मत्स्यव्यवसाय विभागाशी संबंधित तांत्रिक अभ्यासक्रम सुरू केल्यास Biofloc/RAS/ Cage culture यांसारख्या तांत्रिक पद्धतींमध्ये उद्‌भवणाऱ्या समस्यांचे निराकरण तत्काळ होण्यास मदत होईल. त्यामुळे आयटीआयसारख्या तांत्रिक शैक्षणिक संस्थांमध्ये मत्स्यव्यवसाय विभागाशी संबंधित तांत्रिक अभ्यासक्रम सुरू करण्याचे प्रयत्न विभागामार्फत करण्यात येत आहे.

## मत्स्यव्यवसायास कृषीचा दर्जा

कृषी व मत्स्यव्यवसाय क्षेत्राची तुलना केल्यास अनेक साम्यस्थळे आढळतात. शेतीप्रमाणे मत्स्यपालन व्यवसायातदेखील सर्व कामे सम-समान आहेत. जसे, नांगरणी, बांध दुरुस्ती, झाडी-झुडपे काढणे, बी-बियाणे पेरणे/सोडणे, पाणी देणे/बदलणे, वेळोवेळी औषधी खत/खाद्यांचा वापर करणे, पीक काढणी, विक्री इ. कृषिपूरक व्यवसाय जसे पशुपालन व दुग्धव्यवसायाप्रमाणेच मत्स्यपालनही कृषिपूरक व्यवसाय आहे. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, शेळीपालन व त्याला लागणारे विविध निविष्ठा व अवजारे जसे बियाणे, ट्रॅक्टर, थ्रेशर, तिफण, पाभर, औत, इत्यादी करिता कृषी शेतकऱ्यांना लाभ मिळतो. त्याचप्रमाणे एअरेटर्स, एअरपंप, इत्यादी यंत्रांवर तसेच जाळ्यांवर मत्स्य शेतकऱ्यांना लाभ देता येईल. कारण सद्यःस्थितीत महाराष्ट्रात हजारो शेततळ्यांची निर्मिती झाली आहे. यातील काही शेततळ्यांमध्ये शेतकऱ्यांमार्फत मत्स्योत्पादन घेतले जाते.

## पिंजरा धोरणाद्वारे मत्स्य उत्पादन

राज्यात एकूण २,४९५ जलाशय/तलाव असून त्याचे एकूण क्षेत्रफळ २,८०,७२४ हेक्टर आहे. एकूण २४९५ जलाशयांपैकी निर्धारित खोली व जलक्षेत्रानुसार फक्त २२८ तलाव / जलाशय हे पिंजरा मत्स्यसंवर्धनाकरिता पात्र आहेत. या जलाशयांचे एकूण क्षेत्रफळ १,४३,१०४ हेक्टर आहे. त्यापैकी १% जलक्षेत्र १,४४५.४९ हेक्टर (१,४४,५४,९०० चौ.मी.) आहे. उपलब्ध जलक्षेत्रामध्ये २६ ऑगस्ट २०२१ च्या शासन निर्णयान्वये ६३० चौ.मी. जलक्षेत्रामध्ये १८ पिंजरे याप्रमाणे २२८ जलाशयांमध्ये एकूण ४,१२,९९७ पिंजरे उभारणी करणे शक्य आहे. प्रति पिंजरा प्रति वर्ष सरासरी २ मे.टन मत्स्य उत्पादन पकडल्यास एकूण ८,२५,९९४ मे. टन इतके मत्स्य उत्पादन शक्य आहे.

## पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धन

सद्यःस्थितीत राज्याचे सागरी मत्स्योत्पादन वाढवण्यासाठी उपलब्ध असलेले क्षेत्र व स्रोत यांचा वापर करून कॅप्चर फिशरीजद्वारे मत्स्योत्पादन वाढीसाठी प्रयत्न करण्यात येत आहे; परंतु यामध्ये काही मर्यादा आहेत; तसेच मागील काही वर्षांपासून अशा पद्धतीचे मत्स्योत्पादन स्थिरावलेले आहे. तरी सागरी क्षेत्रामध्ये तसेच त्या लगतच्या खाडी क्षेत्रात पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धन करण्यासाठी २४ जानेवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये

धोरण निश्चित करण्यात आले आहे.

### बेकायदेशीर मासेमारीबाबत

राज्याच्या जलधी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर, अनियमित आणि विना नोंदणी स्वरूपाची मासेमारी सुरू असून त्यास आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ मध्ये सुधारणा करून महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा) २०२१ अमलात आणले आहे. या सुधारित अधिनियमामध्ये अनधिकृत मासेमारी करणाऱ्यांविरुद्ध भरीव शास्तीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. अधिनियमातील भरीव शास्तीमुळे अनियंत्रित पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांना नियंत्रित करणे शक्य होणार असून याचा अप्रत्यक्षरीत्या फायदा पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांना होणार आहे. तसेच राज्याच्या जलधी क्षेत्रात पर्ससीन पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांचे शासन अधिसूचना १० ऑगस्ट २०२२ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. यानुसार पालघर जिल्ह्यातील झाईपासून ते रायगड जिल्ह्यातील मुरूडपर्यंतचे संपूर्ण जलधी क्षेत्र पर्ससीन पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांसाठी निषिद्ध करण्यात आले आहे, तर मुरुडपासून सिंधुदुर्गपर्यंतचे क्षेत्र टप्प्याटप्प्याने पर्ससीनधारकांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

### जिल्हा वार्षिक योजनेमध्ये सुधारणा

मासेमारी व्यवसायामध्ये प्रामुख्याने जाळी, होड्या, बिगर यांत्रिकी नौका आदींचा समावेश आहे.

## भूजल मत्स्यव्यवसाय

### तयार मासेमारी जाळी खरेदीवर अनुदान

या योजनेंतर्गत यापूर्वी प्रति सभासद पाच किलो जाळ्याच्या किमतीच्या ५० टक्के अनुदान देण्यात येत होते. ते आता प्रति सभासद २० किलो ग्रॅमपर्यंत वाढवण्यात आले असून जाळ्याच्या किमतीच्या कमाल मर्यादा प्रति किलोग्रॅम ८०० इतकी राहील.

### बिगर यांत्रिक नौका

यापूर्वी मासेमारी नौकेसाठी भूजल क्षेत्रासाठी रु. ३००० प्रति नौका इतके अनुदान देण्यात येत होते. भूजल क्षेत्रात लहान आकाराच्या होड्या वापरल्या जातात. त्याबाबतीत शासनाने बिगर यांत्रिक नौकेसाठी खालीलप्रमाणे अनुदान प्रस्तावित करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

| नौकेचा प्रकार | प्रकल्प किंमत (रु.) | अनुज्ञेय अनुदान |
|---|---|---|
| लाकडी नौका | ६०,०००/- | प्रकल्प किमतीच्या ५०% अथवा रु. ३०,०००/- (रुपये तीस हजार फक्त) यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान देय राहील. |
| पत्रा नौका | ३०,०००/- | प्रकल्प किमतीच्या ५०% अथवा रु. १५,०००/- (रुपये पंधरा हजार फक्त) यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान देय राहील. |
| फायबर नौका | १,२०,०००/- | प्रकल्प किमतीच्या ५०%अथवा रु. ६०,०००/- (रुपये साठ हजार फक्त) यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान देय राहील. |

## सागरी मत्स्यव्यवसाय

### तयार मासेमारी जाळी खरेदीवर अनुदान

सागरी क्षेत्रातील मासेमारी नौकांवर वापरण्यात येणाऱ्या नायलॉन व मोनोफिलामेंट तयार जाळी खरेदीवर खालीलप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील.

| बाब | अनुज्ञेय अनुदान |
|---|---|
| ३ टनावरील प्रत्येक मासेमारी नौकेस, प्रतिवर्ष २०० कि. ग्रॅ.पर्यंत | तयार जाळ्याच्या किमतीच्या ५० टक्के पेक्षा जास्त नाही इतके अनुदान देय राहील. जाळ्याच्या किमतीची कमाल मर्यादा प्रती कि.ग्रॅ. रु.८००/- इतकी राहील. |
| ३ टनाखालील प्रत्येक मासेमारी नौकेस, प्रतिवर्ष १०० कि. ग्रॅ.पर्यंत | |
| रांपण संघाच्या प्रत्येक सभासदाला रांपणीच्या तयार जाळयांवर प्रतिवर्षी ५० कि. ग्रॅ.पर्यंत. | |

### बिगर यांत्रिक नौका

या बाबतीत शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेले आहेत.

१. लहान मच्छीमारांना किंवा रांपणकारांना १० टनापर्यंतची, लाकडी/फायबर नौका, बांधणी/तयार नौका खरेदी करण्यासाठी सध्याच्या प्रचलित दराने रु. १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) पर्यंतच्या देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा वाढवून रुपये २,५०,०००/- ( रुपये दोन लाख पन्नास हजार फक्त) पर्यंत करण्यात येत आहे.

२. लहान मच्छीमारांना किंवा रांपणकारांना १० टनापर्यंतची, लाकडी/फायबर नौका, बांधणी/तयार नौका खरेदी करण्यासाठी प्रकल्प किंमत ५ लाख रुपयांपर्यंत खर्चाच्या ५० टक्के अथवा रु.२,५०,०००/- (रुपये दोन लाख पन्नास हजार फक्त) यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान अनुज्ञेय राहील.

### किसान क्रेडिट कार्ड

आकृतिबंध केंद्र शासनाने अर्थसंकल्प २०१८-१९ मध्ये किसान क्रेडिट कार्डद्वारे मच्छीमार व मत्स्यशेतकरी यांना खेळते भांडवल उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे व तशा मार्गदर्शक सूचना व कार्यन्वयन मानक प्रणाली केंद्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभाग व वित्त सेवा विभागामार्फत निर्गमित करण्यात आल्या आहेत.

विभागीय संपर्क अधिकारी

**राज्यातील बहुतांश लोकांचे जीवन शेतीशी निगडित असून शेती व शेतीपूरक व्यवसाय हे रोजगार व उपजीविकेचे महत्त्वाचे साधन आहे. राज्यातील शेतकरी स्वावलंबी व्हावा, यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन वाढवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी विविध कृषी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येत असलेल्या काही महत्त्वाच्या योजनांची थोडक्यात माहिती...**

# कृषी योजना...

**दीपक चव्हाण**

राज्यातील शेतकरी वर्गाला आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी राज्य शासन शेतकरी हाच विकासाचा केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या योजना राबवत आहे.

## मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे

शेतकऱ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे शेततळे खोदकामासाठी येणारा खर्च करणे शक्य होत नाही. यामुळे शासनाने २९ जून, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेचा विस्तार करून या योजनेत वैयक्तिक शेततळे या बाबीचा समावेश केलेला आहे.

**पात्रता निकष :** अर्जदार शेतकऱ्यांकडे स्वत:च्या नावावर किमान ०.६० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक, तर कोकण विभागासाठी क्षेत्राची अट ०.२० हेक्टर इतकी आहे. क्षेत्र धारणेस कमाल मर्यादा नाही. अर्जदार शेतकऱ्याची जमीन शेततळे खोदण्यास तांत्रिकदृष्ट्या योग्य असणे आवश्यक राहील. अर्जदार शेतकऱ्यांनी यापूर्वी मागेल त्याला शेततळे, सामूहिक शेततळे अथवा भात खाचरातील बोडी किंवा इतर कुठल्याही शासकीय योजनेतून शेततळे या घटकाकरिता शासनाच्या अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.

**अर्ज करण्याची कार्यपद्धती :** महा-डीबीटी पोर्टलचे https://mahadbtmahit.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज सादर करावा.

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग

सध्या कार्यरत असलेल्या आणि नवीन उद्योगांना लाभादायी असणारी अशी ही योजना आहे. बँक कर्जाशी निगडित अर्थसाहाय्य. संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन. पारंपरिक आणि स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देणारी ही योजना आहे. एकाच लाभार्थीस योजनेंतर्गत एकापेक्षा जास्त घटकांचा लाभ अनुज्ञेय.

**सामाईक पायाभूत सुविधा /मूल्य साखळी -** गट लाभार्थी यांना पात्र प्रकल्प किमतीच्या ३५ टक्के अनुदान (३ कोटी रुपयांपर्यंत). वैयक्तिक लाभार्थी भांडवली गुंतवणुकीकरिता पात्र प्रकल्प किमतीच्या ३५ टक्के अनुदान (१० लाख रुपयांपर्यंत). लाभार्थ्यांना मोफत प्रशिक्षण दिले जाते. स्वयंसाहाय्यता गटातील सदस्यांना बीजभांडवल रुपये ४० हजार. अधिक माहितीसाठी नजिकचे कृषी विभागाचे कार्यालय/ जिल्हा संसाधन व्यक्ती अथवा, www.pmfme.mofpi.gov.in, www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## ठिबक व तुषार सिंचन संचासाठी देय अनुदान

या योजनेंतर्गत सर्व पिकांसाठी अनुदान उपलब्ध. शेतकऱ्यांच्या आधार लिंक बँक खात्यात अनुदान थेट जमा होते. लाभाची मर्यादा ५ हेक्टरपर्यंत. अल्प व अत्यल्प भूधारक आणि बहू भूधारक अशा वर्गवारीत राष्ट्रीय कृषी विकास योजना 'प्रति थेंब अधिक पीक', मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना / डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना अंतर्गत हे अनुदान दिले जाते.

**अधिक माहितीसाठी -** नजीकचे कृषी विभागाचे कार्यालय.

## कृषी यांत्रिकीकरण योजना

सर्व खातेदार शेतकरी, शेतकरी गट, अन्न प्रक्रिया उत्पादक संस्था, सहकारी संस्था हे या योजनेसाठी अर्ज करू शकतात. यासाठी सातबारा आणि आठ-अ, आधारकार्ड छायांकित प्रत, आधार संलग्न बँक पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत आवश्यक आहे.

या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना ट्रॅक्टर पॉवर टिलर, स्वयंचलित यंत्र व अवजारे, ट्रॅक्टर व पॉवर टिलरचलित यंत्र व अवजारे, पीक संरक्षण साधने, मनुष्य व बैलचलित अवजारे, प्रक्रिया युनिटस, भाडे तत्त्वावर कृषी यंत्र व



अवजारे सेवा पुरवठा केंद्रांची उभारणी आदी बाबी समाविष्ट आहेत.

या योजनेसाठीची अनुदान मर्यादा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प, अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला यांच्यासाठी अनुदान मर्यादा ट्रॅक्टरसाठी १.२५ लाख, पॉवर टिलरसाठी ७५ हजार आणि इतर अवजारे यांच्यासाठी ५० टक्के किंवा मंजूर कमाल अनुदान यापैकी कमी असेल ते.

इतर लाभार्थी यांच्यासाठी ट्रॅक्टर १ लाख, पॉवर टिलर ६० हजार आणि इतर अवजारे यांच्यासाठी ४० टक्के किंवा मंजूर कमाल अनुदान मर्यादा यापैकी कमी असेल ते.

**अधिक माहितीसाठी -** नजीकचे कृषी विभागाचे कार्यालय.



## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – फळबाग लागवड

या योजनेंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, दारिद्र्यरेषेखालील इतर कुटुंबे, स्त्री कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे, दिव्यांग व्यक्ती कुटुंबप्रमुख असलेली कुटुंब, जमीन सुधारणाचे लाभार्थी, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण योजनेखालील लाभार्थी आणि वनहक्क कायद्यानुसार पात्र लाभार्थी यांना प्राधान्यक्रमानुसार वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर, शेताच्या बांधावर आणि पडीक जमिनीवर फळझाड आणि फूलपीक लागवड करणे.

यासाठी कमीत कमी ०.०५ हेक्टर ते जास्तीत जास्त २ हेक्टर प्रतिलाभार्थी क्षेत्र मर्यादा आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी जॉब कार्ड, जमिनीचा ७/१२ आणि ८-अ उतारा, आधार कार्ड, आधार कार्ड संलग्न बँक खात्याचा तपशील आवश्यक आहे.

**अधिक माहितीसाठी -** ग्रामपंचायत कार्यालय, कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, तालुका कृषी अधिकारी.

## पीकस्पर्धा

शेतकऱ्यांसाठी खरीप आणि रब्बी अशा दोन हंगामात ही पीकस्पर्धा घेतली जाते. खरीप हंगामासाठी मूग व उडीद पिकांसाठी ३१ जुलै, तर इतर पिकांसाठी ३१ ऑगस्ट हा अर्ज दाखल करण्याचा दिनांक आहे, तर रब्बी हंगामासाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज दाखल करता येतात.

खरीप हंगामासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या पिकांचा यात समावेश आहे, तर रब्बी हंगामासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई आणि जवस या पिकांचा समावेश आहे.

सर्वसाधारण आणि आदिवासी गटात तालुका, जिल्हा आणि राज्य पातळीवरील अशी बक्षिसे दिली जातात. तालुका पातळीवर ५ हजार, ३ हजार आणि २ हजार याप्रमाणे अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय बक्षिसे दिली जातात. जिल्हा पातळीवर अनुक्रमे १० हजार, ७ हजार आणि ५ हजार, तर राज्य पातळीवर अनुक्रमे ५० हजार, ४० हजार आणि ३० हजार अशी बक्षिसे दिली जातात.

**अधिक माहितीसाठी -** नजीकचे कृषी कार्यालय.

## राष्ट्रीय खाद्य तेल अभियानांतर्गत

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय गळीतधान्य आणि तेलताड अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत असून, यात २०२२-२३ पासून केंद्र शासनाचे राष्ट्रीय गळीतधान्य व तेलताड अभियान हे राष्ट्रीय खाद्यतेल अभियानामध्ये अंतर्भूत केले आहे. यामध्ये तीन प्रकारची अभियान राबवली जातात. १. गळीतधान्य पिके, २. वृक्षजन्य तेलबिया पिके, ३. गळीतधान्य.

गळीतधान्य पिकांच्या नवीन विकसित वाणांचा शेतकऱ्यांमध्ये प्रचार व प्रसार करणे, त्यासाठी विकसित तंत्रज्ञानावर आधारित प्रात्यक्षिकांचे आयोजन करून शेतीशाळेमार्फत केले जाते. गळीतधान्य पिकांखालील क्षेत्र वृद्धी व उत्पादकतेत वाढ करणे हा या अभियानाचा उद्देश आहे.

**लाभार्थी निवड -** वरील पीक घेणारे इच्छुक शेतकरी आणि शेतकरी उत्पादक गट यांची प्राधान्याने निवड करण्यात येते. निर्धारित लक्षांकापेक्षा अधिक अर्ज आल्यास सोडत पद्धतीने निवड केली जाते.

नोंदणीकृत गटातील शेतकऱ्यांचा स्वत:च्या नावे ७/१२ व ८-अ उतारा असणे आवश्यक आहे. प्रवर्गनिहाय निर्धारित प्रमाणानुसार सर्व प्रवर्गामध्ये किमान ३० टक्के लाभ महिला शेतकऱ्यांना आणि ५ टक्के लाभ दिव्यांग शेतकऱ्यांना दिला जातो. हे अभियान क्षेत्र विस्तार आणि उत्पादकता वाढ संकल्पनेवर राबवण्यात येते. समूह प्रात्यक्षिकांसाठी १० हेक्टरच्या एका गटात किमान १० शेतकरी समाविष्ट असावेत.

## परंपरागत कृषी विकास योजना

जमिनीची सुपीकता आणि जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढण्यासाठी सेंद्रिय खतांची आवश्यकता असते. सेंद्रिय खतांचा आणि कीटकनाशकांचा सलग तीन वर्षांत वापर केल्याने तसेच सेंद्रिय शेतीच्या रूपांतरणाच्या इतर बाबी अवलंबल्यास त्या रासायनिक स्वरूपाच्या शेतीचे सेंद्रिय शेतीमध्ये रूपांतर होऊन तयार होणारा कृषी माल हा रसायनमुक्त होऊ शकतो, हे या योजनेचे महत्त्व आहे.

ही योजना गट आधारित असून २० हेक्टर क्षेत्राचा एक गट असतो. योजने अंतर्गत निवड केलेल्या गटास / शेतकऱ्यांस तीन वर्ष लाभ देण्यात येतो. तीन वर्षांत एका गटास रुपये दहा लाख इतके अर्थसाहाय्य देण्यात येते. सेंद्रिय शेतीवर आधारित प्रशिक्षण व प्रात्यक्षिक घेणे, शेतकऱ्यांच्या शेतावर सेंद्रिय निविष्ठा तयार करणे, सेंद्रिय प्रमाणीकरण करणे, सेंद्रिय शेतमालाची विक्री व्यवस्था करणे, कमी खर्चाच्या तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढवणे ही या योजनेची वैशिष्ट्ये आहेत. **अधिक माहितीसाठी -** नजीकचे कृषी कार्यालय.

## पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप)

कीड रोगाच्या प्रादुर्भावामुळे पिकांचे नुकसान होऊन शेतकऱ्यांना आर्थिक संकटास सामोरे जावे लागते. शेतकऱ्यांना वेळेत कीड रोग नियंत्रणाच्या उपाययोजना करणे शक्य व्हावे, याकरिता कीड रोगांची प्रत्यक्ष शेतातील माहिती होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने माहिती व जलद तंत्रज्ञानाचा वापर करून राज्यातील प्रमुख पिकांवरील कीड रोगांचे शास्त्रोक्त पद्धतीने नियमितपणे सर्वेक्षण करून कीड रोगाच्या तीव्रतेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते.

प्रमुख पिकांच्या कीड रोगांचे सर्वेक्षण, सल्ला, व्यवस्थापन करणे, शेतकऱ्यांमध्ये कीड रोगाबाबत जागरूकता निर्माण करणे, आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांना अनुदानावर कीटकनाशकांचा पुरवठा करणे हा या योजनेचा उद्देश आहे. विशेषत: सोयाबीन, कापूस, भात, तूर, मका, ज्वारी, ऊस व हरभरा पिकांबाबत आणि सदर पिकांवरील प्रमुख किडी व रोगांबाबत सल्ला दिला जातो.

एम-किसान पोर्टलवर नोंदणीकृत सर्व शेतकरी, पीकसंरक्षण सल्ले एसएमएसद्वारे मिळण्याकरिता शेतकऱ्यांना एम-किसान पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

## कापूस विकास कार्यक्रम

१२व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागवण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आलेला आहे. कापूस आधारित पीक पद्धतीस चालना देणे. कापूस पिकात एकात्मिक कीड व्यवस्थापनास चालना देणे,



कापसाच्या सरळ वाणांची अतीघन लागवड पद्धतीचा अवलंब करून, अधिक लांब धाग्याच्या कापसाच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादनास चालना देणे ही या कार्यक्रमाची वैशिष्ट्ये आहेत.

**पात्रता निकष :** या योजनेंतर्गत जिल्ह्यातील संबंधित अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रमाणात लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गाच्या मंजूर कार्यक्रमापैकी पाच टक्के लाभ दिव्यांग प्रवर्गास देण्यात येतो. तसेच सर्व प्रवर्गातील लाभार्थींच्या ३० टक्के महिलांची निवड करण्यात येते. जिल्ह्यासाठी प्राप्त होणारा आर्थिक कार्यक्रम राबवताना प्रवर्गनिहाय असलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात कार्यक्रम राबवण्यात येतो. शेतकऱ्याचे स्वत:च्या नावे ७/१२ व ८-अ उतारा असणे बंधनकारक आहे. विहित प्रमाणानुसार अनु.जाती/जमाती प्रवर्गाचे लाभार्थी, ३० टक्के महिला व पाच टक्के दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो. अल्प/अत्यल्पभूधारक यांचा प्राधान्याने समावेश करण्यात येतो. शेतकऱ्याचे कापूस पिकाखालील क्षेत्र किमान १ एकर असणे बंधनकारक आहे.

**एकात्मिक पीक व्यवस्थापन आद्यरेषीय प्रात्यक्षिके :** यासाठी प्रतिहेक्टर ८ हजार रुपये इतके अर्थसाहाय्य आहे. आंतरपीक पद्धतीची आद्यरेषीय प्रात्यक्षिके (कापूस पिकात मूग, उडीद) यासाठी प्रतिहेक्टर ८ हजार रुपये इतके अर्थसाहाय्य आहे. कपाशीच्या सरळ वाणांच्या अतीघन लागवडीच्या चाचण्या यासाठी १० हजार रुपये प्रतिहेक्टर इतके अर्थसाहाय्य आहे. पीक संरक्षण औषधी व बायो एजंट्सचे वितरण : खर्चाच्या ५० टक्के, कमाल रुपये ५०० प्रतिहेक्टर इतके अर्थसाहाय्य देय आहे. आद्यरेषीय प्रात्यक्षिके (देशी आणि अती लांब धाग्याच्या कापसाचे बिजोत्पादन) : यासाठी प्रतिहेक्टर ९ हजार रुपये इतके अर्थसाहाय्य आहे.

**कॉटन श्रेडरचे वाटप :** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला यांच्यासाठी श्रेडर यंत्राच्या किमतीच्या ५० टक्के कमाल रुपये एक लाख प्रती युनिटच्या मर्यादेत, तर इतर लाभार्थ्यांसाठी श्रेडर यंत्राच्या किमतीच्या ४० टक्के कमाल रुपये ८० हजार प्रती युनिटच्या मर्यादेत अर्थसाहाय्य देय आहे.

**अधिक माहितीसाठी :** नजीकचे तालुका कृषी अधिकारी कार्यालय.

## प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरिता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना २४ फेब्रुवारी २०१९ रोजी सुरू केली. या योजनेंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबास (पती-पत्नी आणि त्यांची १८ वर्षांखालील मुले) रुपये २ हजार प्रती हप्ता याप्रमाणे तीन समान हप्त्यात रुपये ६ हजार प्रतिवर्षी लाभ देय आहे.

**योजनेचा उद्देश :** शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्यासाठी, कृषी निविष्ठा खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक मदत करणे व त्याद्वारे कृषी उत्पन्न वाढवणे.

**योजनेचे स्वरूप :** गावपातळीवर पात्र शेतकरी कुटुंबाचे निश्चितीकरण करून लाभार्थ्यांची यादी तयार करण्याचे काम तलाठी यांनी केले असून ग्रामसेवक व कृषी साहाय्यक यांची या कामासाठी मदत घेण्यात आलेली आहे. अंतिम लाभार्थी याद्या केंद्र शासनाच्या पीएम किसान पोर्टलवर अपलोड केल्या आहेत. केंद्र शासनाकडून प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेच्या राज्यस्तरावरील बँक खात्यात निधी जमा होतो व या बँक खात्यामधून लाभार्थीच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे निधी जमा होतो. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व ग्रामस्तरावर संनियंत्रण समित्या गठित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**लाभार्थी पात्रतेचे निकष :** ज्यांच्या नावे भूमी अभिलेखामध्ये वहितीलायक क्षेत्र आहे अशी सर्व शेतकरी कुटुंबे या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. (मात्र वरीलपैकी खालील व्यक्ती लाभ घेण्यासाठी पात्र असणार नाहीत. जमीन धारण करणारी संस्था, संवैधानिक पद धारण करणारी/केलेली आजी/माजी व्यक्ती, आजी/माजी मंत्री, खासदार, आमदार, महापालिकेचे महापौर व जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, केंद्र व राज्य शासनाचे सर्व कार्यरत व निवृत्त

अधिकारी/कर्मचारी, शासन अंगीकृत संस्था, स्वायत्त संस्थेतील व स्थानिक स्वराज्य संस्थेतील अधिकारी/कर्मचारी (चतुर्थ श्रेणी/ गट-ड वर्ग कर्मचारी वगळून). मागील वर्षात आयकर भरलेल्या व्यक्ती, निवृत्तिवेतनधारक व्यक्ती, यांचे मासिक निवृत्तिवेतन रुपये १० हजार किंवा त्यापेक्षा जास्त आहे. (चतुर्थश्रेणी/गट-ड वर्ग कर्मचारी वगळून). नोंदणीकृत व्यावसायिक डॉक्टर, वकील, अभियंता, सनदी लेखापाल (सी.ए.), वास्तुशास्त्रज्ञ (आर्किटेक्ट) इत्यादी क्षेत्रातील व्यक्ती.

**कार्यान्वयीन यंत्रणा :** महसूल, कृषी, ग्रामविकास विभाग.

**अर्ज करण्याची कार्यपद्धती :** केंद्र शासनाच्या https://pmkisan.gov.in/ संकेतस्थळावर जाऊन पोर्टलवर स्वत: किंवा सीएससी केंद्रामार्फत अर्ज करता येतो.

**आवश्यक कागदपत्रे :** मोबाईल क्रमांक, ७/१२ उतारा, ८-अ उतारा, आधार कार्ड व बँक खाते, पासबुक इत्यादी.

**मार्गदर्शक सूचना :** केंद्र शासनाच्या https:// pmkisan.gov.in/ या संकेतस्थळावर मार्गदर्शक सूचना उपलब्ध आहेत.

## बियाणे प्रक्रिया केंद्र व साठवणूक गोदामांची उभारणी

**योजना उद्दिष्ट :** विविध पिकांचे उत्पादन व उत्पादकता वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर प्रक्रियायुक्त उच्चप्रतीचे गुणवत्तापूर्ण व जास्त उत्पादन देणाऱ्या जातींचे प्रमाणित/सत्यप्रत, बियाणे कमी दरात उपलब्ध करून देणे.

**लाभार्थी पात्रतेचे निकष :**
१) ही योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत असून या योजनेंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर शेतकरी उत्पादक कंपनी, कृषी क्षेत्राशी संबंधित असलेल्या उपक्रमामध्ये कार्यरत असलेल्या राज्य शासन मान्यताप्राप्त संस्थांमार्फत ५०० मे.टन एवढ्या क्षमतेचे बियाणे प्रक्रिया व साठवण केंद्र उभारणी करावयाचे आहे.



२) उभारणी करण्यात यावयाचे बियाणे प्रक्रिया व साठवण केंद्र शासकीय अथवा ग्रामपंचायत मालकीच्या मान्यताप्राप्त जागेत अथवा शेतकरी उत्पादक कंपनीच्या/उपरोक्त इतर तत्सम शासनमान्य संस्थेच्या स्वत:च्या नावे असलेल्या जागेवर असावे.

**आवश्यक कागदपत्रे :** स्वतःची जमीन- २० गुंठे (कमीत कमी) (७/१२, ८ अ, खरेदी खत), ऑडिट रिपोर्ट, बियाणे विक्री परवाना पत्र, अधिकचा खर्च स्वतः देणार असे हमीपत्र, अनुदान कर्ज / स्वनिधी बचत खात्यावर जमा होणार असे हमीपत्र, इतर योजनेतून अनुदान घेतले नाही असे हमीपत्र.

**अनुदान स्वरूप :** १०० टक्के केंद्र पुरस्कृत

**क्षमता :** ५०० मेट्रिक टन क्षमतेचे बियाणे प्रक्रिया व साठवण केंद्र उभारणी करणे. गोडाऊन : ५०० मेट्रिक टन मशिनरी : १ TPH

**अर्थसाहाय्य :** एकूण रु. ६० लाख (जास्तीत जास्त) गोडाऊन बांधकाम : रु. ३६.६१ लाख

**मशिनरी खरेदीसाठी :** रु. २३.३९ लाख

एकूण रक्कम रू. ६० लाख किंवा प्रत्यक्ष उभारणीस येणारा खर्च यापैकी जे कमी असेल तितके अर्थसाहाय्य देय आहे.

## ग्रामबीजोत्पादन कार्यक्रम

**योजना उद्दिष्ट**

- शेतकऱ्यांकडील स्वत:च्या बियाण्यांची गुणवत्ता वाढवणे.
- गुणवत्तापूर्ण/प्रमाणित बियाण्यांची उपलब्धता वाढवून विविध पिकांच्या उत्पादन व उत्पादकतेमध्ये वाढ करणे.
- नवीन वाणाचा वापर वाढवणे व बियाणे बदल दरामध्ये वाढ करणे.

**लाभार्थी पात्रतेचे निकष :** प्रवर्गनिहाय प्राप्त अनुदानाच्या टक्केवारीच्या प्रमाणात शेतकऱ्यांची निवड करण्यात येते.

**अर्ज करण्याची कार्यपद्धती :** बीजोत्पादक शेतकऱ्यांची निवड जिल्हास्तरावर कृषी विभागाचे संबंधित अधिकारी व जिल्हा व्यवस्थापक महाबीज यांनी संयुक्तपणे समन्वयाने करावयाची आहे.

**आवश्यक कागदपत्रे :** शेतकऱ्याचे सातबारा उतारा (कमीत कमी एक एकर क्षेत्राकरिता अथवा धारण केलेले क्षेत्र या पेक्षा जे कमी असेल ते), आधारकार्ड.

**अनुदान स्वरूप :** या घटकामध्ये कृषी विभाग / महाबीजमार्फत निवड केलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना एक एकर क्षेत्र मर्यादेत कडधान्य व गळीतधान्य बियाण्यांकरिता ६० टक्के व तृणधान्य बियाण्यांकरिता ५० टक्के अनुदानित दराने स्रोत बियाणेपुरवठा करण्यात येतो. हंगामनिहाय, प्रवर्गनिहाय उपलब्ध असलेल्या निधीनुसार नमूद केलेल्या अनुसूचित जातीकरिता ३१ टक्के, अनुसूचित जमातीकरिता १७ टक्के व सर्वसाधारण प्रवर्गाकरिता ५२ टक्के याप्रमाणे निवड केलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना एक एकर क्षेत्र मर्यादेत खालीलप्रमाणे अनुदानित दराने स्रोत बियाणे पुरवठा करण्यात येतो.

## कृषी उन्नती योजना – एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान

**योजनेचा उद्देश**

- वैविध्यपूर्ण कृषी हवामान विभागानुसार प्रादेशिक अनुकूलता व गरजा लक्षात घेऊन त्या त्या प्रदेशातील फलोद्यान क्षेत्राचा संशोधन, तंत्रज्ञान, प्रसार, काढणीत्तोर तंत्रज्ञान, प्रक्रिया व पणन सुविधा यांच्या माध्यमातून समूह पद्धतीने सर्वांगीण विकास करणे.
- शेतकऱ्यांचे आर्थिक राहणीमान उंचावणे व आहाराविषयी पोषणमूल्य वाढवणे.
- अस्तित्वात असलेल्या फलोत्पादनविषयक विविध योजनांमध्ये समन्वयन साधून एकरूपता आणणे.
- पारंपरिक उत्पादन पद्धतीची आधुनिक शास्त्रीय ज्ञानाची सांगड घालून

तंत्रज्ञानाचा विकास व प्रसार आणि प्रचार करणे.

- कुशल आणि अकुशल विषेशतः बेरोजगार तरुणांकरिता रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देणे.

**पात्रता निकष :** शेतकऱ्यांकडे आधार कार्ड असावे. शेतकऱ्यांकडे ७/१२ प्रमाणपत्र आणि ८-अ प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. शेतकरी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील असेल तर जात प्रमाणपत्र आवश्यक आहे. शेतकरी / शेतकरी समूहाकडे फलोत्पादन पिके असणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांने शेततळे अस्तरीकरणासाठी अधिकृत ५०० मायक्रॉनची प्लास्टिक फिल्म वापरणे बंधनकारक राहील. सामूहिक शेततळे घटकाचा लाभ हा शेतकरी समूहासाठी आहे. समूहात २ किंवा अधिक शेतकरी असावेत. शेतकरी संयुक्त कुटुंबातील नसावेत. शेतकऱ्यांचे जमीन धारणेबाबतचे ७/१२ खाते उतारे स्वतंत्र असावेत.

शेततळ्यातील पाणी वापरण्यासाठी सुखम सिंचन पद्धतीचा वापर करणे बंधनकारक राहील.

पूर्वी केलेले शेततळे, नैसर्गिक खड्डा, दगड खाणी, विहीर इत्यादी जागी सामूहिक शेततळे/वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण मंजूर करण्यात येणार नाही.

**अनुदानाचे स्वरूप :** केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के शासनाकडून सर्वसाधारण, अनु.जाती व अनु.जमाती या प्रवर्गाप्रमाणे निधी प्राप्त होतो. त्यानुसार लाभार्थ्यास प्रकल्प खर्चाच्या ३५ ते ५० टक्के अनुदान मिळते.

https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/Login/Login या संकेतस्थळावर शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज करावा.

**आवश्यक कागदपत्रे :** ७/१२ प्रमाणपत्र, ८- अ प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र (आवश्यक असल्यास) खरेदी करण्याचे साधन / उपकरणांचे कोटेशन किंवा बिल.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना

राज्यात यापूर्वी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना कार्यान्वित होती. मात्र विमा कंपन्यांच्या असमाधानकारक अनुभवामुळे आता नवीन सानुग्रह योजना राज्य शासनाने मंजूर केली आहे.

**वैशिष्ट्ये :** पूर्वी राज्य शासन राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा विमा हप्ता विमा कंपन्यांकडे भरायचे आणि विमा कंपनी मग प्रस्ताव तपासून ते मान्य करायची. हा विलंब टाळण्यासाठी आणि अपघातग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ दिलासा देण्याच्या उद्देशाने आता प्रस्ताव मंजुरीचे अधिकारी तालुकास्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीला दिले आहेत. अपघात घडल्यानंतर ३० दिवसांच्या आत परिपूर्ण प्रस्ताव संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे. अपघातात आता बाळंतपणातील मृत्यूचादेखील समावेश करण्यात आला आहे. वारसाच्या खात्यात डीबीटीद्वारे रक्कम जमा होणार आहे.

**योजनेचे स्वरूप :** राज्यात शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, रस्ता/ रेल्वे अपघात, पाण्यात बुडून मृत्यू, जंतूनाशके हाताळताना अथवा अन्य कारणांमुळे विषबाधा, विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, वीज पडून मृत्यू, खून, उंचावरून पडून झालेला अपघात, सर्पदंश आणि विंचूदंश, नक्षलवाद्यांकडून झालेल्या हत्या, जनावरांच्या खाल्ल्यामुळे / चावण्यामुळे जखमी/मृत्यू, दंगल, अन्य कोणतेही अपघात तसेच अपघाताच्या व्याख्येनुसार कोणत्याही अनपेक्षित, आकस्मिक दुर्दैवी अपघातामुळे होणारे मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास या योजनेतून लाभ देण्यात येईल.

**योजनेंतर्गत मिळणारे लाभ खालीलप्रमाणे राहतील :** अपघाती मृत्यू, अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी होणे - रुपये दोन लाख, अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी होणे - रुपये एक लाख.

**लाभार्थी पात्रता :** राज्यातील १० ते ७५ वयोगटातील वहितीधारक खातेदार शेतकरी व शेतकऱ्यांच्या कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेला कोणताही एक सदस्य.

**अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :** सातबारा उतारा, मृत्यूचा दाखला, शेतकऱ्यांचे वारस म्हणून गावकामगार तलाठी यांच्याकडील गाव नमुना क्र. ६-क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद, शेतकऱ्यांच्या वयाची पडताळणीकरिता शाळा सोडल्याचा दाखला/ आधारकार्ड/ निवडणूक ओळखपत्र. ज्या कागदपत्राआधारे ओळख, वयाची खात्री होईल असे कोणतेही कागदपत्रे, प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, पोलीस पाटील माहिती अहवाल, अपघात स्वरूपानुसार अंतिम विमा प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे.

**अधिक माहितीसाठी :** आपल्या संबंधित नजीकचे तालुका कृषी अधिकारी कार्यालय.

## राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास

**योजनेचा उद्देश :** शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत शाश्वत वाढ करून नवीन उपजीविकेच्या साधनांची उपलब्धता करणे, त्याआधारे त्यांचे जीवनमान उंचावणे. निरनिराळ्या एकात्मिक शेती पद्धतींचा अवलंब करून दुष्काळ, पूर व हवामानातील अनपेक्षित बदलामुळे होणारे नुकसान टाळणे. अद्ययावत कृषी तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी उत्पादन वाढवणे व शाश्वत रोजगार उपलब्ध करणे. कोरडवाहू क्षेत्रातील कृषी उत्पादनातील जोखीम कमी करून शेतकऱ्यांचा कोरडवाहू शेतीबाबतचा आत्मविश्वास वाढवणे.



**योजनेची व्याप्ती :** राज्यातील सर्व जिल्हे.

**लाभार्थी पात्रता निकष :** अल्प व अत्यल्प भूधारक व महिला शेतकऱ्यांना प्राधान्य द्यावे. कोरडवाहू क्षेत्र विकास योजनेंतर्गत किमान ५०% निधी वर नमूद लाभधारकांवर खर्च करण्यात यावा.

प्रस्तावित निधीच्या १६% व ८% किंवा अनु.जाती / जमाती यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अनुक्रमे अनु.जाती व अनु. जमाती या प्रवर्गासाठी तरतूद करण्यात यावी. लाभार्थी हा सध्याच्या प्रचलित पीक पद्धतीमध्ये बदल करून एकात्मिक शेती पद्धतीतील बाबी राबवण्यास इच्छुक असला पाहीजे.

**अर्ज करण्याची कार्यपद्धती :** ही योजना समूह आधारित असल्याने निवड झालेल्या गावातील कृषी साहाय्यक यांचेशी संपर्क साधून अर्ज सादर करावा.

**अनुदान स्वरूप :** फळपीक आधारित शेती पद्धती - रु. २५ हजार प्रती हे., दुग्धोत्पादक पशुधन आधारित शेती पद्धती रु.४० हजार प्रती हे. इतर पशुधन आधारित शेती पद्धती - रु.२५ हजार प्रती हे. वनिकी आधारित शेती पद्धती - रु.१५ हजार प्रती हे. ग्रीन हाऊस रु. ४६८ प्रती चौ.मी., शेडनेट हाऊस- रु. ३५५ प्रती चौ.मी., मूरघास युनिट रु. १ लाख २५ हजार प्रती यूनिट., मधुमक्षिका पालन -रु.८०० प्रती कॉलनी. काढणी पश्चात तंत्रज्ञान रु.४ हजार प्रती चौ.मी. गांडूळ खत युनिट (कायमस्वरूपी)- रुपये ५० हजार प्रती युनिट, हिरवळीचे खत - रु. २ हजार प्रती हे.

**अधिक माहितीसाठी :** तालुका कृषी अधिकारी कार्यालय व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय.

## प्रधानमंत्री पीक विमा योजना

नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगासारख्या अकल्पित प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे, शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे. कृषी क्षेत्रासाठीच्या पत पुरवठ्यात सातत्य राखणे, जेणेकरून उत्पादनातील जोखमींपासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबरच अन्नसुरक्षा, पिकांचे विविधीकरण आणि कृषिक्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ हे हेतू साध्य होण्यास मदत होईल, ही या योजनेची वैशिष्ट्ये आहेत.



भागीदारी आणि भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी यांच्यासह सर्व शेतकऱ्यांसाठी ही योजना ऐच्छिक करण्यात आली असून योजनेत सहभागी व्हावयाचे नसल्यास सहभागी न होण्याबाबत घोषणापत्र योजनेतील सहभागी होण्याच्या अंतिम मुदतीच्या सात दिवस अगोदर कर्ज मंजूर केलेल्या बँकेत देणे आवश्यक आहे, म्हणजे बँक विमा हप्ता कपात करणार नाही.

**बिगर कर्जदार शेतकऱ्यांची नोंदणी :** बिगर कर्जदार शेतकरी आपल्या पिकांचा विमा जवळच्या वित्तीय संस्थेमार्फत घेऊ शकतात.

**नुकसान झाल्यास काय करावे :** स्थानिक आपत्ती व काढणीपश्चात या जोखीम अंतर्गत पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांनी विमा संरक्षण घेतलेल्या सर्व्हे नंबरनुसार बाधित पीक व बाधित क्षेत्राबाबत घटना घडल्यापासून ७२ तासाच्या आत विमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांक अथवा क्रॉप इन्शुरन्स पत्त्यावर कळवणे आवश्यक राहील.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडून आवश्यक बंधनकारक दस्तावेज :** आधारकार्ड प्रत, सातबारा उतारा, बँक खात्याचा तपशील आणि बँक पासबुकची प्रत, रद्द केलेला धनादेश, राज्य सरकार विहित पेरणी प्रमाणपत्र किंवा प्रस्तावित पिकाची पेरणी करण्याचा उद्दिष्टाचे स्वत:चे घोषणापत्र, योग्य भरलेले प्रस्ताव पत्र, अधिक माहितीसाठी जवळच्या बँक शाखा, कृषी कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा.

## भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना

राज्यात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना २०१८-१९ च्या खरीप हंगामापासून राबवण्यात येते. योजनेचे स्वरूप / घटक: लाभार्थीस १०० टक्के अनुदान देय आहे. योजनेचा लाभ कोकण विभागासाठी कमाल १० हेक्टर तर उर्वरित महाराष्ट्रासाठी कमाल ६ हेक्टर क्षेत्र मर्यादिपर्यंत अनुज्ञेय आहे. कोकण विभाग वगळता ठिबक सिंचन संच बसवणे बंधनकारक आहे. आंबा व पेरू या फळपिकांच्या घन लागवडीस मान्यता. संत्रा पिकाच्या इंडो इस्राईल पद्धतीने लागवडीस मान्यता.

**योजनेची व्याप्ती :** वैयक्तिक शेतकऱ्यांनाच लाभ घेता येईल. संस्थात्मक लाभार्थ्यांना लाभ घेता येणार नाही. शेतकऱ्यांचा स्वतःच्या नावे ७/१२ असणे आवश्यक आहे. जर ७/१२ उताऱ्यावर लाभार्थी संयुक्त खातेदार असेल, तर सर्व खातेदारांचे फळबाग लागवडीसाठी संमतीपत्र आवश्यक आहे. जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल, तर योजना राबवण्यासाठी कुळाचे संमतीपत्र आवश्यक आहे. परंपरागत वननिवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम २००६ नुसार वनपट्टेधारक शेतकरी योजनेत लाभ घेण्यासाठी पात्र आहेत.



**समाविष्ट फळपिके :** योजनेंतर्गत आंबा, काजू, पेरू, चिक्कू, डाळिंब, सीताफळ, कागदी लिंबू, नारळ, चिंच, अंजीर, आवळा, कोकम, फणस, जांभूळ, संत्रा, मोसंबी या १६ बहुवार्षिक फळपिकांची आवश्यकतेनुसार कलमे / रोपांद्वारे लागवड करण्यास मान्यता आहे.

## कृषी पुरस्कार

राज्यात दरवर्षी शेती व संलग्न क्षेत्रात अतिउल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना अथवा संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या वतीने खालील पुरस्कार दिले जातात.

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न**

**पुरस्कार - (संख्या १)** : कृषी क्षेत्रातील कृषी विस्तार, कृषी प्रक्रिया, निर्यात, कृषी उत्पादन, पीक फेरबदल, कृषी उत्पादनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी मध्ये अति उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राज्यातील कोणत्याही एका शेतकऱ्यास अथवा संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत सन्मानित करण्यात येते.

**वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार (संख्या ०८)** : कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विकास व फलोत्पादन, ग्रामीण विकास, ज्यामध्ये बायोगॅसचा वापर, शेतकऱ्यांचा विकास इत्यादी संलग्नक्षेत्रात अद्वितीय कार्य करणाऱ्यांना राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत दरवर्षी एकूण (०८) शेतकरी अथवा संस्थाना कृषिभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. रुपये ५० हजार रोख रक्कम, स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**जिजामाता कृषिभूषण पुरस्कार (संख्या ०८)** : राज्यातील शेतीक्षेत्राची सातत्याने होत असलेली प्रगती व या प्रगतीत, उत्पादन वाढीमध्ये महिलांचाही फार मोठा वाटा आहे व तो सातत्याने वाढत असून, शेती, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक चळवळीत महिला सातत्याने पुढे येत आहेत. शेतीविकासाच्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वाची बाब, तसेच शेतीक्षेत्रातील महिलांचा वाढता सहभाग लक्षात घेऊन त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव व्हावा व अशा महिलांच्या कार्याने प्रभावित होऊन इतर महिलांमध्ये जागृती निर्माण होण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत पुरस्काराची सुरुवात केली आहे. ५० हजार रुपये रोख रक्कम, स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार- (संख्या-८)** : सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सेंद्रिय निविष्ठा वापरण्यात प्रोत्साहन देऊन शेती करणाऱ्या तसेच उत्पादित सेंद्रिय मालाची विक्रीव्यवस्था करणे, या मुख्य हेतूने राज्यातील जे शेतकरी या संकल्पनेचा अवलंब करत आहेत, अशा शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येते. रुपये ५० हजार रोख रक्कम, स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार- (संख्या ०८)** : जे शेतकरी त्यांच्या कृषी ज्ञानाचा फायदा त्यांच्या परिसरातील इतर शेतकऱ्यांना देतील आणि शेती उत्पादन वाढवण्यास शेतकऱ्यांना मार्गदर्शन किंवा प्रोत्साहित करतील, तसेच इतर व्यक्ती / संस्था ज्या स्वतः शेती करत नाहीत किंवा ज्यांची स्वतःची शेती नाही; परंतु पत्रकारितेद्वारे किंवा इतर अन्य मार्गाने या क्षेत्रात बहुमोल कामगिरी करतात अशा



शेतकऱ्यांना / व्यक्तींना / संस्थांना, त्याचप्रमाणे कृषी क्षेत्राशी संलग्न घरगुती उद्योग (उदा. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मधुमक्षिकापालन, रेशीम उद्योग, गांडुळ शेती इत्यादीमधील) वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या व्यक्ती तसेच खेड्यांमधून परसबाग वृद्धिंगत करणाऱ्या महिला, कृषी विकास मंडळ ज्या गावात सक्रिय आहे, अशा शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येते. रुपये ३० हजार रोख रक्कम, स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**उद्यान पंडित पुरस्कार (संख्या-८)** : महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती, जमिनीची प्रत व हवामानातील विविधता यामुळे फलोत्पादनास मोठा वाव आहे. भाजीपाला पिके, फळ पिके, फूल पिके, मसाला पिके, औषधी व सुंगधी वनस्पती पिके यांपासून शेतकऱ्यांना मोठ्याप्रमाणात लाभ होत आहे. तसेच राज्यात फलोत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या पुरस्कारांने शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येते. रुपये २५ हजार रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**वसंतराव नाईक शेतिनिष्ठ शेतकरी पुरस्कार- (संख्या-४०)** : शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान, शेतीमध्ये सुधारित शेती अवजारांचा वापर, जमिनीच्या प्रतवारी प्रमाणे पिकांची लागवड, जमिनीचे सपाटीकरण, कंदुर पद्धतीने पेरणी, रासायनिक खतांचा सुयोग्य वापर, विहीर / नाला इत्यादीमधील पाणी अडवून शेतीतील नालाबडिंग इत्यादीद्वारे तसेच तुषार व ठिबक सिंचन पद्धतीद्वारे पाण्याचा सुयोग्य वापर, पीक संरक्षक औषधांची वेळेवर फवारणी, शेतीपूरक व्यवसाय, हलक्या व कोरडवाहू जमिनीत फळझाड, इत्यादींची लागवड करणे, स्वतःच्या कल्पनेने नवनवीन पद्धतीने पीक लागवड, शेतकऱ्यांना शेती मशागतीचा उपयोग करण्यास मार्गदर्शन करणे, राज्य शासनाच्या कृषी विभागाकडून आदिवासी गटासह एकूण ४० शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येते. रुपये ११ हजार रोख, पारितोषिक, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार - (संख्या-९)**: राज्यातील शेतीविषयक उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे व मोलाचे कार्य करणाऱ्या विभागातील सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमधील एका अतिउत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यास राज्य शासनाद्वारे सन्मानित करण्यात येते.

**युवा शेतकरी पुरस्कार - (संख्या-०८)** : वय वर्ष १८ ते ४० वयोगटातील शेतकऱ्यांसाठी हा पुरस्कार देण्यात येतो. रु. ३० हजार रोख रक्कम, पारितोषिक, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**राज्यात फलोत्पादनाच्या विविध योजना राबवल्या जातात. फळे, फुले, भाजीपाला पिके, मसाल्याची पिके या उद्यानविद्या पिकांची उत्पादकता तसेच त्यापासून मिळणारा मोबदला अधिक असल्याने या पिकांच्या लागवडीस विशेष प्रोत्साहन देण्यात येत आहे. फलोत्पादनात क्रांतिकारक बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने राज्य शासन अनेक योजना राबवत आहे. या योजनांची थोडक्यात माहिती...**

# फलोत्पादन क्षेत्राचा विकास

राजू धोत्रे

राज्य शासनामार्फत फलोत्पादन विभागाच्या विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त उत्पादन आणि नफा मिळावा, यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना राबवण्यात येत आहेत.

## कोकणासाठी काजू बोर्ड

सुमारे २०० कोटी रुपयांच्या भागभांडवलासह कोकणासाठी काजू बोर्डाची काजू बोंडूवर निर्मिती करण्यात आली आहे. साध्या काजू बोंडूपेक्षा प्रक्रिया केलेल्या काजू प्रक्रिया केंद्र बोंडूची किंमत सातपटीने अधिक आहे. उत्पन्नवाढीसाठी कोकणात काजू बोंडू प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. काजूच्या लागवडीपासून प्रक्रिया आणि विक्रीपर्यंत शेतकऱ्यांना साहाय्य करण्यासाठी 'काजू फळ विकास योजना' संपूर्ण कोकण, कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व आजरा या तालुक्यांत राबवण्यात येईल. आगामी पाच वर्षांत या योजनेकरिता १ हजार ३२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



## राष्ट्रीय कृषी विकास योजना

केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना २०२२-२३ पासून राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रती थेंब अधिक पीकअंतर्गत राबवली जाते. राज्य पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राबवणारे महाराष्ट्र प्रथम राज्य आहे. पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळवणे व सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्र वाढवणे, या उद्देशाने सूक्ष्म सिंचन योजना प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना या केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. २०२२-२३ पासून ही योजना राष्ट्रीय कृषी विकास योजना - 'प्रति थेंब अधिक पीक' या नावाने राबवण्यात येत आहे. या योजनेसाठी अर्थसाहाय्य म्हणून केंद्राचा व राज्याचा हिस्सा ६० : ४० असा आहे. ही योजना राज्यातील सर्व ३४ जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येते.

**अनुदान मर्यादा :** अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के व इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के.

**लाभक्षेत्र मर्यादा :** सूक्ष्म सिंचन संच घटकाचे आयुर्मान सात वर्षे निश्चित करण्यात आले आहे. ज्या लाभधारकाने पाच हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घेतला आहे, अशा लाभधारकास सात वर्षांनंतर पुन्हा सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घेता येईल.

**लाभार्थी पात्रता :** शेतकऱ्यांच्या नावे मालकी हक्काचा ७/१२ व ८-अ उतारा असावा. सूक्ष्म सिंचन घटकाचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्याकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध असावी.

## वनशेती उपअभियान

केंद्र शासनाच्या वतीने २०१७-१८ या वर्षापासून राष्ट्रीय शाश्वत अभियानांतर्गत वनशेती उपअभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. वातावरणातील बदलामुळे शेतीक्षेत्रावर होणारे दुष्परिणाम कमी करणे. शेती पिकांना पूरक म्हणून शेतावर वृक्ष लागवडीखालील क्षेत्र वाढवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

**स्वरूप :** दर्जेदार लागवड साहित्यासाठी रोपवाटिकांचा विकास करणे. परिधीय क्षेत्र व बांधावरील लागवड करणे. कमी घनतेची लागवड करणे, जास्त घनतेची लागवड करणे, वनशेती नमुन्याचे प्रात्यक्षिक करणे, मनुष्यबळ विकास व प्रशिक्षण आयोजित करणे. या योजनेमध्ये केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात राहील.

**लाभार्थी पात्रता निकष -**

- शासकीय तसेच खासगी रोपवाटिका
- संसद आदर्श ग्राम योजनेंतर्गत निवडलेले तसेच हागणदारीमुक्त गावांतील शेतकरी.
- ज्याच्या नावावर जमीन आहे असे शेतकरी.
- ज्या शेतकऱ्याकडे जमीन आरोग्य पत्रिका आहे.
- अनुसूचित जमाती / अनुसूचित जाती / अत्यल्पभूधारक / अल्पभूधारक / महिला शेतकऱ्यांना प्रथम प्राधान्य.

## भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना

राज्यात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत आंबा, काजू, पेरू, चिक्कू, डाळिंब, सीताफळ, कागदी लिंबू, नारळ, चिंच, अंजिर, आवळा, कोकम, फणस, जांभूळ, संत्रा, मोसंबी या १६ बहुवार्षिक फळपिकांची आवश्यकतेनुसार कलमे रोपांद्वारे लागवड करण्यास मान्यता आहे. तसेच आंबा व पेरू या फळपिकांच्या घन लागवडीस मान्यता आहे. कोकण विभाग वगळता ठिबक सिंचन संच बसवणे बंधनकारक आहे. संत्रा पिकाच्या इंडो इस्त्राईल पद्धतीने लागवडीस मान्यता.

**स्वरूप :** योजनेचा लाभ कोकण विभागासाठी कमाल १० हेक्टर, तर उर्वरित

महाराष्ट्रासाठी कमाल सहा हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत अनुज्ञेय आहे. लाभार्थीस १०० टक्के अनुदान देय आहे.

## हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र

महाराष्ट्रात हळद लागवडीपासून प्रक्रिया व विक्रीपर्यंत शेतकरी, प्रक्रियादार, निर्यातदार यांना येणाऱ्या अडचणींची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने हिंगोली जिल्ह्यात मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. राज्यातील हळद पिकाची उत्पादकता वाढवण्यासाठी मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्रासाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राची उद्दिष्टे -**

- हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना किफायतशीर, खात्रीशीर व व्यवहार्य तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे.
- हळद उत्पादक शेतकऱ्यांचा लागवड खर्च कमी करून उत्पन्नात वाढ करणे व त्यास आर्थिक स्थैर्य प्रदान करणे.
- हळद लागवडीच्या आदर्श पद्धती तयार करणे व त्याच्या प्रचारासाठी शेतकरी प्रशिक्षणाच्या सुविधा निर्माण करणे. शेतकरी प्रशिक्षण व विस्तार याद्वारे नवीन तंत्रज्ञानाचा प्रसार करणे.

## फलोत्पादन पिकावरील कीड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप)

आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, चिकू, काजू, भेंडी व टोमॅटो या पिकांवरील कीड, रोगांचे सर्वेक्षण करून त्याबाबत उपाययोजनेसाठी सल्ला देणे. या योजनेंतर्गत ३० जिल्हे समाविष्ट करण्यात आले आहेत.

**योजनेचे स्वरूप :** महाराष्ट्र राज्यामध्ये आंबा, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, चिकू, काजू, भेंडी व टोमॅटो ही मुख्य फळपिके लागवडीखाली आहेत. संशोधन केंद्र, कृषी विद्यापीठे यांच्या मदतीने सल्ले तयार करण्यात येत असून माहिती तंत्रज्ञानाद्वारे सदरची माहिती एस.एम.एस.द्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येते.

**प्रमुख घटक :** (अ) कीड रोग सर्वेक्षण,



सल्ला व व्यवस्थापन पद्धती, (आ) कीड रोग सर्वेक्षण व शेतकरी जागृती कार्यक्रम, (इ) आपत्कालीन परिस्थितीत पीक संरक्षण औषधांचा पुरवठा, (ई) आय टी सुविधा इत्यादी

२०२२-२३ करिता योजनेसाठी रक्कम २७८.६४ लाख रुपये इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यात एकूण ३० जिल्ह्यातील ६,५८,८३८ हेक्टर क्षेत्रावर हा कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. राज्यात ४१० शेतीशाळा तालुका स्तरावर राबविण्यात येणार आहेत.

## फलोत्पादन पीक संरक्षण योजना

फळपिके, भाजीपाला, फूलपीके, मसालेपिके, औषधी व सुगंधी वनस्पती या पिकांवरील कीड व रोग नियंत्रणासाठी औषधांचा (कीटकनाशके व बुरशीनाशके) ५० टक्के अनुदानावर पुरवठा करणे,

**योजनेचे स्वरूप :** पीक संरक्षण योजनेंतर्गत मंजूर होणारे अनुदान हे जिल्हा नियोजन मंडळामार्फत / राज्यस्तरावरून मंजूर करण्यात येते. हे मंजूर केलेल्या अनुदानाच्या अधीन राहून ५० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना पीक संरक्षण औषधांचा पुरवठा कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत करण्यात येतो. या योजनेंतर्गत लागणाऱ्या औषधांचा महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांच्यामार्फत पुरवठा करण्यात येतो. ही योजना सर्व फळझाडे, भाजीपाला, फूलपिके, मसाला पिके व औषधी व सुगंधी वनस्पती या पिकांवर उद्‌भवणाऱ्या किड / रोगाचे नियंत्रण करण्यासाठी राबवण्यात येते.

**योजना प्रमुख घटक :** या योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना औषधांचा पुरवठा करण्यात येतो. तसेच या योजनेंतर्गत सर्व प्रकारच्या शेतकऱ्यांना (सर्वसाधारण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इत्यादी) लाभ देण्यात येतो.

## राज्यातील फलट वादळ पिकांना भौगोलिक चिन्हांकन

भौगोलिक मानांकन प्राप्त कृषी व फलोत्पादन पिकांच्या अधिकृत वापरकर्त्यांची संख्या देशाच्या ८४ टक्के आहे. जी.आय रजिस्ट्री ऑफीस चेन्नई यांच्याकडे रायगड अलिबाग कांदा, पालघर- वाडा कोलम, नंदुरबार नंदुरबार आमचुर, नंदुरबार मिरची, लातूर- काष्टी कोथिंबीर, पानचिचोली चिंच, बोरसुरी डाळ, ठाणे (बदलापूर) बहाडोली जांभूळ यांना भौगोलिक मानांकन प्राप्त करून घेण्यासाठी एकूण दहा अर्ज सादर करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ योजना भौगोलिक चिन्हांकन प्राप्त उत्पादनाकरिता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्यामार्फत खालील योजना कार्यान्वित आहेत.

- जी.आय. मानांकन प्राप्त कृषी उत्पादनांच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अनुदान योजना - रु. ५०,०००/- प्रशिक्षण १ दिवस १०० शेतकरी.
- जी.आय. मानांकन नोंदणीकरिता शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता नोंदणी शुल्काकरिता अनुदान शासकीय नोंदणी शुल्काच्या ५० टक्के किंवा ८०० रुपये प्रति लाभार्थी.
- जी.आय मानांकन नोंदणी उत्पादनांची मूल्यसाखळी विकसनाकरिता अनुदान- (सुयोग्य पॅकिंग, लेबलिंग, ब्रँडिंग, बारकोड व वेबसाईट विकास इ.) येणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ३,००,०००/-
- कृषी पणन मंडळाच्या कृषिमाल महोत्सव उपक्रमात जी.आय. मानांकन उत्पादनांच्या स्टॉलकरिता अनुदान रु. ३,०००/ प्रति स्टॉल.

फलोत्पादन विभागांच्या विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त उत्पादन मिळावे यासाठी पाणी, खत, विमा अशा विविध प्रकारच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. शासकीय स्तरावरील यंत्रणा सतत कार्यरत राहून संशोधन आणि परीक्षणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन आणि सल्ला देत असतात.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**पशुसंवर्धनाच्या व्यवसायांना चालना देण्याचे धोरण स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी पर्वात सरकारने आरंभले आहे. शेतकरी, पशुपालकांसाठी काम करणारे हे शासन आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पात शाश्वत शेतीला आणि शेतीपूरक व्यवसायाला प्राधान्य देण्यात आले आहे.**

# शेतीपूरक व्यवसायाला प्राधान्य

**वर्षा फडके–आंधळे**

शेतकरी, पशुपालकांसाठी पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभागाच्या महत्त्वपूर्ण योजनांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे:

## राजे यशवंतराव होळकर महामेष योजना

राज्यात मेंढी पालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यस्तरीय योजनेंतर्गत महामंडळामार्फत राजे यशवंतराव होळकर महामेष योजना सन २०१७ पासून राज्यातील भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थींकरिता राबवण्यात येत आहे. या योजनेची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे:-

- राज्यातील भटकंती करणारे मेंढपाळ पारंपरिक पद्धतीने करत असलेल्या व्यवसायापासून त्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत निर्माण करून देणे व त्याद्वारे त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत करणे.
- राज्यामध्ये अर्धबंदिस्त / बंदिस्त मेंढीपालन व्यवसायास चालना देणे.
- मेंढीपालनाचा पारंपरिक व्यवसाय असणाऱ्या समाजातील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.
- दरडोई प्रति वर्षी प्रत्येक व्यक्तीच्या आहारामध्ये आवश्यक असणाऱ्या मासाच्या उपलब्धतेमध्ये वाढ करणे.
- राज्यामधील सातत्याने कमी होत असलेल्या मेंढ्यांच्या संख्येमध्ये वाढ करून, राज्याच्या कृषी व सलग्न क्षेत्रातील स्थूल उत्पन्नवाढीच्या दराचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत करणे.
- उच्च प्रतीच्या सुधारित नरमेंढ्यांद्वारे पारंपरित प्रजातीच्या मेंढ्यांची आनुवंशिकता सुधारणे.
- उन्हाळ्याच्या व टंचाईच्या कालावधीमध्ये चारा अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने, मेंढ्यांच्या वजनात घट होते. त्याचप्रमाणे मेंढपाळांची भटकंती वाढते, यासाठी स्थायी स्वरूपाच्या ठाणबंद पद्धतीने मेंढीपालन करण्यासाठी मेंढपाळांना आकर्षित करून त्यांना स्थैर्य निर्माण करून देणे.



## मुख्य घटक

- पायाभूत सोयी-सुविधेसह २० मेंढ्या + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप.
- सुधारित प्रजातीच्या नर मेंढ्यांचे ७५% अनुदानावर वाटप.
- मेंढीपालनासाठी पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप.
- मेंढीपालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप.
- कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचा मुरघास बनवण्याकरिता गासड्या बांधण्याचे तंत्र खरेदी करण्यासाठी ५०% अनुदानावर वाटप.
- पशुखाद्य कारखाने उभारण्यासाठी ५०% अनुदानावर वाटप.

या योजनेकरिता आजपर्यंत ५३.७८ कोटी इतकी तरतूद वितरित करण्यात आली असून सन २०२३-२४ या वर्षामध्ये २५ कोटी रुपये निधी अर्थसंकल्पित आहे.

## बाह्य फलन व भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान

महाराष्ट्रात देवणी, गवळाऊ, खिल्लार, लाल कंधारी या नोंदणीकृत गायींच्या जाती आहेत. या जातींशिवाय गीर, साहिवाल, थारपारकर यांसारख्या उच्च जनुकीय दर्जाच्या इतर भारतीय जातींच्या पशुधनाची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. झपाट्याने कमी होत असलेल्या या प्रजातींच्या संवर्धनासाठी तातडीने उपाययोजना करण्यासाठी MOET (Multiple Ovum Embryo Transfer) आणि OPU (Ovum Pick Up) IVF (In-Vitro-Fertilization) या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. सर्व गायी आणि म्हशी साधारणपणे आयुष्यभरात १० ते १२ वासरांना जन्म देतात; परंतु या तंत्रात वर्षभरात ५० वासरे आणि त्यांच्या आयुष्यात ५०० हून अधिक वासरे निर्माण करण्याची क्षमता आहे.

याद्वारे उच्च प्रजननक्षमता आणि आनुवंशिकता असलेल्या निवडक मादींचे प्रजनन करून उच्च क्षमता असलेल्या गायी आणि म्हशींची निर्मिती करण्यात येणार आहे. बाह्य फलन व भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा, वळु माता प्रक्षेत्र, ताथवडे, पुणे येथे २०१७-१८ साठी जिल्हा योजना योजनेंतर्गत स्थापन करण्यात आली आहे. यासाठी जिल्हा नियोजन समिती, पुणे, मार्फत एकूण रु. १.९८ कोटी रुपये अनुदान मिळाले आहे. तसेच, बाह्य फलन व भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूरअंतर्गत मार्च २०२१ पासून कार्यरत आहेत. आता बाह्य फलन व भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा ताथवडे, पुणे यांनी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर आणि डेअरी फार्मर्सच्या परस्पर सहकार्याने फिल्ड स्तरावर समान काम सुरू केले आहे. अलीकडेच पाच शेतकऱ्यांनी बाह्य फलन व भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा ताथवडे, पुणे यांच्याशी भ्रूण उत्पादन आणि त्यांच्या दारात हस्तांतरणासाठी परस्पर करार केला आहे.

### राज्यातील शेतकऱ्यांकडील गाई-म्हशींमध्ये कृत्रिम रेतन कार्यक्रमासाठी लिंग विनिश्चित केलेल्या वीर्यमात्रा वापर करून उच्च वंशावळीच्या कालवडी / पारड्यांची निर्मिती करणे :

महाराष्ट्र राज्यात ४ मार्च, २०१५ पासून संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायदा लागू करण्यात आलेला आहे. तसेच, शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान व यांत्रिकीकरण यामध्ये वाढ झाल्याने, शेतीकामाकरिता उपयोगी असलेल्या बैलांची आवश्यकता कमी झालेली आहे. या पार्श्वभूमीवर नर वासरांची पैदास न्यूनतम पातळीवर ठेवण्याच्या लिंग विनिश्चित वीर्यमात्रा या नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादित केलेल्या वीर्यमात्रांचा क्षेत्रीय स्तरावर गाई-म्हशींमध्ये कृत्रिम रेतन कार्यक्रमांतर्गत वापर केल्यास, त्यापासून जवळपास ९० टक्के मादी वासरांची निर्मिती करणे शक्य होणार आहे.

पशुधनाची आनुवांशिक सुधारणा करणे, दूध, अंडी, मांस व लोकरीचे उत्पादन वाढवणे, राज्यातील देशी शुद्ध जातीच्या जनावरांचे जतन, संवर्धन व या अनुषंगाने पशुसंगोपन, पशुपैदास, पशुवैद्यकीय सेवा शेतकऱ्यांच्या दारात उपलब्ध करून देणे, तसेच शेतकऱ्यांना अल्प दरात लिंग विनिश्चित वीर्यमात्रांचा पुरवठा करणे, उच्च उत्पादन क्षमता असलेल्या गाई व म्हशींची स्त्रीबीजे प्रयोगशाळेत फलित करून सर्वसाधारण गाई-म्हशींमध्ये स्त्रीभ्रूण प्रत्यारोपणाची सुविधा किफायतशीर दरात व शेतकऱ्यांच्या दारात उपलब्ध करून देणे अशी उद्दिष्टे विभागाने निर्धारित केलेली आहेत. पशुसंवर्धन व्यवसायाचे ग्रामीण भागामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. यातून निर्माण होणारी राष्ट्रीय संपत्ती तसेच निर्माण होणारा रोजगार याद्वारे शेतकरी / पशुपालकांचा आर्थिक स्तर उंचावणे हेदेखील विभागाचे उद्दिष्ट आहे.

## पशुसंवर्धन विभागाच्या प्रमुख योजना

### दुधाळ संकरित, देशी गायी/म्हशींचे गट वाटप

राज्याच्या दूध उत्पादनामध्ये वाढ करण्याबरोबरच ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांना अर्थाजनाचे व स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी लाभार्थ्यांना २ संकरित, देशी गायी, २ दुधाळ म्हशींचे गट वाटप करण्यात येतात. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थींना गटाच्या किमतीच्या ५० टक्के आणि अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थ्यांना गटाच्या किमतीच्या ७५ टक्के अनुदान देण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गातील व अनुसूचित जाती/जमातींच्या लाभार्थ्यांना अनुक्रमे १० व ५ टक्के एवढा निधी स्वत: उभारणे व उर्वरित रक्कम अनुक्रमे ४० व २० टक्के बँकेकडून कर्जरूपाने/स्वत: उपलब्ध करून घ्यावयाची आहे.

### ठाणबद्ध पद्धतीने शेळी मेंढी पालन

राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत अंशत: ठाणबद्ध पद्धतीने शेळी मेंढी पालनाद्वारे शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देणे हा उद्देश या योजनेचा आहे. या योजनेंतर्गत १० शेळ्या/मेंढ्या व १ बोकड/मेंढा यांचे गट वाटप करण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना गट किमतीच्या ५० टक्के आणि अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थ्यांना प्रकल्प किमतीच्या ७५ टक्के अनुदान देण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गातील व अनुसूचित जाती/जमातींच्या लाभार्थ्यांना अनुक्रमे १० व ५ टक्के एवढा निधी स्वत: उभारणे व उर्वरित रक्कम अनुक्रमे ४० व २० टक्के बँकेकडून कर्जरूपाने/स्वत: उपलब्ध करून घ्यावयाची आहे.

### कुक्कुटपालन व्यवसाय

राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत सर्वसाधारण/अनुसूचित जाती उपयोजना आदिवासी क्षेत्र उपयोजना/१००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुटपालन व्यवसाय सुरू करणे हा उद्देश या योजनेचा आहे. राज्यात कुक्कुट मांस उत्पादनास मोठा वाव आहे. ज्या जिल्ह्यामध्ये सध्या कुक्कुटपालन/कुक्कुट मांस उत्पादन करण्याचा व्यवसाय अद्यापही रुजलेला व वाढलेला नाही, तेथे १००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुटपालन व्यवसाय करण्यासाठी लाभार्थ्यांना कुक्कुट पक्षी गृह, विद्युतीकरण, खाद्य व पाण्याची भांडी या मूलभूत सुविधा उभारण्याकरिता सर्वसाधारण संवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के व अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना ७५ टक्के अर्थसाहाय्य करण्यात येते.

### मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना

पशुपालकांच्या दारापर्यंत पशुआरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात ३४९ फिरत्या पशुवैद्यकीय चिकित्सालयांची स्थापना करण्याची घोषणा केली होती. त्यास अनुसरून मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेंतर्गत राज्यातील ३४९ ग्रामीण तालुक्यांमध्ये स्थापन करावयाच्या फिरत्या पशुचिकित्सा पथकांपैकी प्रथम टप्प्यात ८१ तालुक्यांमध्ये नवीन ८१ फिरते पशुचिकित्सा पथके स्थापन करण्यास मान्यता दिली. उपलब्ध तरतुदीस अधीन राहून ७३ वाहने खरेदी करण्यात आलेली आहेत.

### राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम

राज्यात सन २०१९ च्या पशुगणनेनुसार एक वर्षाखालील वय असलेल्या गोवर्गीय कालवडी आणि म्हैसवर्गीय पारड्यांची संख्या २९.०७ लक्ष इतकी आहे. ब्रुसेल्ला रोग नियंत्रण कार्यक्रमाखाली ४ ते ८ महिने वयाच्या पारडी व कालवडींना ब्रुसेल्ला प्रतिबंधक लसमात्रा केंद्र शासनाकडून

पुरवठा करण्यात येणार असून २०२२-२३ मध्ये २९,०६,८४० लसमात्रांचा पुरवठा करण्यात आलेला आहे. १ जुलै, २०२२ पासून ब्रुसेल्ला प्रतिबंधक लसीकरण मोहीम वर्षभर राज्यात राबवण्यास सुरुवात झाली आहे. ब्रुसेल्ला प्रतिबंधक लसीकरण केलेल्या जनावरांची नोंद टॅगिंग करून इनाफ प्रणालीमध्ये करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येते आहे.

केंद्र शासनाने परिपत्रित केलेल्या मॉडेल ॲक्शन प्लॅन आराखड्यानुसार लसीच्या पुरवठ्याबरोबरच केंद्र शासनाकडून सिरिंजेस, निडल्स, गॉगल्स, गमबुट, पर्सनल प्रोटेक्शन किट इ. च्या खरेदीसाठी तसेच प्रसिद्धी आणि प्रचार कार्यक्रम राबवण्यासाठी आणि व्हॅक्सिनेटर्सच्या सेवा मोबदला तत्त्वावर उपलब्ध करून घेण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## पशुस्वास्थ्य व रोग नियंत्रण समूहगट योजना

पशुस्वास्थ्य व रोग नियंत्रण समूहगट योजनेंतर्गत (अ) गंभीर पशुरोग नियंत्रण कार्यक्रम, (आ) फिरती पशुचिकित्सा पथकांची स्थापना व बळकटीकरण व (इ) ॲस्कॅड (Assistance to States for Control of Animal Diseases, ASCAD) या तीन योजना राबवण्यात येणार आहेत.

(अ) गंभीर पशुरोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत पीपीआर निर्मूलन (PPR-EP) व क्लासिकल स्वाईन फिव्हर कंट्रोल प्रोग्राम (CSF-CP) या उपयोजना राबवण्यात येणार आहेत. या योजनांची अंमलबजावणी १०० टक्के केंद्र पुरस्कृत तत्त्वावर करण्याच्या केंद्र शासनाच्या सूचना आहेत.

(आ) फिरती पशुचिकित्सा पथकांची स्थापना व बळकटीकरणांतर्गत प्रति एक लक्ष पशुधनामागे एक फिरते पथकाची स्थापना करण्याच्या केंद्र शासनाच्या सूचना आहेत. त्यानुसार चारचाकी वाहने खरेदी करण्याकरिता १०० टक्के केंद्र हिस्सा निधी उपलब्ध होणार असून प्रथम टप्प्यात ८० वाहने खरेदीसाठी निधी राज्यास प्राप्त आहे. तसेच, पथक कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक आवर्ती खर्चासाठी ६० टक्के केंद्र हिस्सा निधी प्राप्त होणार आहे.

(इ) ॲस्कॅड ही केंद्र साहाय्यित योजना महाराष्ट्र राज्यात २००४-०५ पासून राबवण्यात येत असून २०२१-२२ मध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ॲस्कॅड पशुस्वास्थ्य व रोग नियंत्रण कार्यक्रम या समूहगट योजनेत अंतर्भूत करण्यात आली आहे. ॲस्कॅडअंतर्गत खालीलप्रमाणे नमूद उपयोजनांसमोर दर्शवलेल्या केंद्र हिस्सा व राज्य हिश्शानुसार या उपयोजनांची अंमलबजावणी करण्यात येते.

१) आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या रोगाचे लसीकरण (६०:४०)
२) प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजित करणे (१००:००)
३) सर्वेक्षण, संनियंत्रण व पूर्व अंदाज बांधणे (६०:४०)
४) माहिती व जनसंपर्क मेळावे आयोजित करणे (१००:००)
५) विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा यांचे बळकटीकरण (६०:४०)
६) अचानक उद्‌भवणारे तसेच विदेशी आजारांचा प्रतिबंध करणे (६०:४०, ५०:५०)

या योजनेतील आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या रोगाचे लसीकरण (६०:४०) अंतर्गत मोठ्या जनावरांतील घटसर्प व फऱ्या, थायलेरियासिस, लम्पी चर्म रोग, रेबीज इ. तसेच शेळ्या मेंढ्यांमधील आंत्रविषार, शीप पॉक्स आणि कुक्कुट पक्षातील राणीखेत, देवी, इ. या आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांत या विविध रोगांचे प्रतिबंधक लसीकरण केले जाते. प्रतिबंधात्मक लसीकरण जनावरांतील रोगप्रादुर्भावांमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

## केंद्रपुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियान

राष्ट्रीय पशुधन अभियानाच्या सुधारित योजनेचा उद्देश रोजगार निर्मिती, उद्योजकता विकास, प्रति पशुची उत्पादकता वाढवणे आणि अशाप्रकारे विकास कार्यक्रमांतर्गत एका छत्राखाली मांस, बकरीचे दूध, लोकर, अंडी उत्पादन वाढवणे, वैरणीची उपलब्धता वाढवणे, प्रति पशुधन उत्पादनक्षमतेत वाढ करणे, पशुधनाच्या वंशावळीत सुधारणा करणे, नावीन्यपूर्ण उपक्रमांस प्रोत्साहन देणे असा आहे. राष्ट्रीय पशुधन अभियान योजनेची संकल्पना म्हणजे असंघटित क्षेत्रामध्ये होणाऱ्या उत्पादनांसाठी विक्रीकरिता आणि त्यांना चांगल्या दर्जाचा कच्चा माल उपलब्ध होण्याकरिता संघटित क्षेत्राशी जोडून उद्योजकता विकास साधणे, ही आहे.

या योजनेचा उद्देश रोजगार निर्मिती, उद्योजकता विकास, प्रति पशुधनाच्या वंशावळीत सुधारणा करणे, पशुची उत्पादकता वाढवणे आहे. कुक्कुट, शेळी मेंढी व वराह पालनातून प्रजाती विकासाद्वारे उद्योजकता विकास तसेच पशुखाद्य व वैरण उद्योजकता विकास यासाठी ऑनलाइन पोर्टल https://www.nlm.udyamimitra.in वर अर्ज करू शकतात.



**कुक्कुटपालन** :- १००० अंड्यांवरील कुक्कुट पक्ष्यांचे संगोपन. अनुदान अधिकतम रु. २५ लाख.

**शेळी-मेंढीपालन** :- शेळी-मेंढीचे युनिट १०० मादी + ५ नर ते ५०० मादी + २५ नर. अनुदान १० लक्ष ते रु. ५० लाख.

**वराहपालन** :- युनिट ५० मादी + ५ नर ते १०० मादी + १० नर. अनुदान रु. १५ लाख ते रु. ३० लाख.

**पशुखाद्य व वैरण** :- मुरघासबेल, वैरणीच्या विटा आणि टी.एम.आर. निर्मितीकरिता अनुदान रु. ५० लाख.

**पात्र संस्था** :- व्यक्तीगत /FPO/FCOs / SHG /JLG /कलम ८ अंतर्गत नोंदणी असलेल्या कंपन्या.

विभागीय संपर्क अधिकारी

राज्यात अचानक येणारी चक्रीवादळे, पूर, गारपीट, अतिवृष्टी यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी व वित्तहानी होऊन समाजाचे आणि पर्यायाने राज्याचे मोठे नुकसान होत असते. अशा नैसर्गिक संकटाचा सामना करत असताना राज्याचा आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन विभाग मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली खंबीरपणे आपली जबाबदारी पार पाडत आहे. अशा आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्यांना तत्काळ मदत पोहोचवण्याचे काम राज्य शासन करत आहे.

# शेतकऱ्यांना भक्कम साथ

**संध्या गरवारे-खंडारे**

राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एसडीआरएफ) साठी केंद्र सरकारने निकष आणि दरांमध्ये सुधारणा केल्या असून, त्या सुधारणा स्वीकृत करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या सुधारणा २०२५-२६ पर्यंत असतील. तसेच या निर्णयांची अंमलबजावणी १ नोव्हेंबर २०२२ पासून होणार आहे.

### मदतीचे सुधारित दर (कंसात जुने दर)

- मृतांच्या कुटुंबीयांना - ४ लाख रुपये (बदल नाही), ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास - ७४ हजार रुपये (५९ हजार १००)
- ६० टक्क्यांपेक्षा अधिक अपंगत्व आल्यास - २.५० लाख रुपये (२ लाख)
- जखमी व्यक्ती इस्पितळात एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी - १६ हजार रुपये (१२ हजार ७००)
- एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी - ५ हजार ४०० (४ हजार ३००)
- दोन दिवसांपेक्षा अधिक कालावधीकरिता क्षेत्र/घर पाण्यात बुडालेले असल्यास/घरे पूर्णतः वाहून गेली असल्यास.
- पूर्णतः क्षतिग्रस्त झाल्यास प्रति कुटुंब - २ हजार ५०० (बदल नाही).
- सामानाच्या नुकसानीकरिता प्रति कुटुंब - २ हजार ५०० (बदल नाही).
- पूर्णतः नष्ट झालेल्या पक्क्या/कच्च्या घरांसाठी सखल भागात - १ लाख २० हजार रुपये (९५ हजार १००).
- दुर्गम भागातील घरांसाठी - १ लाख ३० हजार (१ लाख १ हजार ९००).
- अंशतः पडझड पक्क्या घरांसाठी - ६ हजार ५०० (५ हजार २००).
- अंशतः पडझड कच्च्या घरांसाठी - ४ हजार रुपये (३ हजार २००).
- झोपडीसाठी - ८ हजार रुपये (४ हजार १००).
- मृत दुधाळ जनावरांसाठी - ३७ हजार ५०० ( ३० हजार), ओढकाम जनावरांसाठी - ३२ हजार रुपये (२५ हजार).
- वासरू, गाढव, खेचर आदीसाठी - २० हजार रुपये (१६ हजार रुपये).
- मेंढी, बकरी, डुक्कर यासाठी - ४ हजार रुपये (३ हजार).
- कुक्कुटपालन - १०० रुपये प्रति कोंबडी, दहा हजार रुपयांपर्यंत (५० रुपये प्रति कोंबडी, ५ हजार रुपयांपर्यंत).
- शेती जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी - ८ हजार ५०० रुपये, २ हेक्टर मर्यादेत (६ हजार ८००).
- आश्वासित सिंचनाखालील पिकांसाठी - १७ हजार रुपये प्रति हेक्टरी (१३ हजार ५००).
- बहुवार्षिक पिकांसाठी - २२ हजार ५०० रुपये (१८ हजार).
- शेतजमिनीच्या नुकसानीसाठी - १८ हजार रुपये प्रति हेक्टरी (१२ हजार २०० रुपये).
- दरड कोसळून किंवा जमीन खरडून झालेल्या नुकसानीसाठी - ४७ हजार रुपये, प्रति हेक्टरी (३७ हजार ५००).



- मत्स्यव्यवसाय - बोटींच्या अंशतः दुरुस्तीसाठी - ६ हजार रुपये (४ हजार १००).
- अंशतः बाधित जाळ्यांच्या दुरुस्तीसाठी - ३ हजार रुपये (२ हजार १००).
- पूर्णतः नष्ट बोटीकरिता - १५ हजार रुपये (९ हजार ६००).
- पूर्णतः नष्ट जाळ्यांसाठी - ४ हजार रुपये (२ हजार ६०० रुपये).

  अशा प्रकारे सुधारित दर राज्य शासनाने लागू केले आहेत.

## राज्य आपत्ती प्रतिसाद निधीपेक्षा वाढीव दर

लातूर, उस्मानाबाद व बीड जिल्ह्यांमध्ये शंखी गोगलगायींमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यानुसार बाधित शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीपेक्षा वाढीव दराने म्हणजेच ९८ कोटी ५८ लाख रुपये इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

## अतिवृष्टी नुकसानभरपाई

अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे बाधित शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दुप्पट दराने मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. आपत्तीमध्ये शेतीपिकांच्या व इतर मालमत्तेच्या झालेल्या नुकसानाकरिता ७,३११.८० रुपये इतक्या रुपयांचा निधी वितरित केला आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे गावाचे, वाडीचे, तांड्याचे स्थलांतरण करून पुनर्वसन तसेच बाधितांना गावठाण उपलब्ध करून देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

## १,९९,४८६ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे पूर्ण

मार्च महिन्यात म्हणजेच ४ ते ८ मार्च आणि १६ ते १९ मार्च या दरम्यान राज्यात मोठ्या प्रमाणात अवकाळी गारपीटसह पाऊस झाला. ऐन काढणीच्या अवस्थेत असलेल्या पिकांसाठी हा अवकाळी पाऊस आणि गारपीट मोठी घातक ठरली. त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. मार्चअखेर एकूण १ लाख ९९ हजार ४८६ क्षेत्रांचे सर्व पंचनामे पूर्ण करण्यात आलेले आहेत. उर्वरित जिल्ह्याचे पंचनामे पूर्ण झाल्यानंतर तत्काळ निधी वितरणाला मंजुरी देण्यात येणार आहे.

## सततचा पाऊस आता नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित

राज्यात गेल्या दोन वर्षांत झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेली पिके पाण्यात वाहून गेली. गेल्या महिन्यातही झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे पुन्हा अतोनात नुकसान झाले. अवकाळी पावसामुळे होणारे नुकसान हे आता नैसर्गिक आपत्ती म्हणून निश्चित करण्यासंदर्भातील महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

## सामान्यकृत वनस्पती निर्देशांक फरक

१५ जुलै ते १५ ऑक्टोबर या कालावधीत सलग पाच दिवस किमान १० मि.मी. पाऊस झाल्यास आणि त्याच कालावधीत मागील १० वर्षाच्या (दुष्काळ वर्ष वगळून) सरासरीच्या तुलनेत ५० टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झाल्यास पावसाचा पहिला ट्रीगर लागू होतो. ट्रीगर लागू झाल्याच्या १५ दिवसांपर्यंत सामान्यकृत वनस्पती निर्देशांक (एनडीव्हीआय) निकष तपासण्यात येतात. १५ जुलै ते १५ ऑक्टोबर या कालावधीत खरीप पिकांचे 'सामान्यकृत वनस्पती निर्देशांक फरक (एनडीव्हीआय)' जर ०.५ पेक्षा कमी आल्यास, पावसाचा दुसरा ट्रीगर लागू राहील. तथापि ज्या तारखेला पावसाची सुरुवात झाली त्या दिवसाचा एनडीव्हीआय हा १५व्या दिवसाच्या एनडीव्हीआयपेक्षा जास्त असणे आवश्यक असते. पावसाचा दुसरा ट्रीगर लागू झालेल्या बाधित क्षेत्राचे सर्वेक्षण करून पंचनामे करण्यात येतात. ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्यास मदत देण्यात येते. त्याचप्रमाणे, जून ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीतील सततच्या पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी मदत देण्याबाबत शासनास प्राप्त झालेल्या सर्व प्रलंबित प्रस्तावांकरिता वरील निकष वापरून पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सुधारित दराने मदत देण्याचा मंत्रिमंडळात निर्णय घेण्यात आला आहे.

यापुढे राज्य शासनाने घोषित केलेल्या अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीकरिता २४ तासामध्ये ६५ मि.मी. पेक्षा जास्त पाऊस हा निकष कायम ठेवून याबरोबरच सततच्या पावसाकरिता निश्चित करण्यात येणाऱ्या दुसऱ्या ट्रीगरमधील सामान्यकृत वनस्पती निर्देशांक (एनडीव्हीआय) हा अतिरिक्त निकष शेती पिकांच्या नुकसानाकरिता लागू करण्यात येणार आहे. दुष्काळाव्यतिरिक्त इतर सर्व नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठीदेखील हा निकष लागू राहील.

## महसूल मंडळामध्ये नोंदी नसलेल्या गावांचेही होणार पंचनामे

अतिवृष्टी ही राज्य शासनाने घोषित केलेली आपत्ती असून महसूल मंडळामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या स्वयंचलित हवामान केंद्रामध्ये २४ तासात ६५ मि.मी. पेक्षा जास्त पाऊस झाल्यास मंडळातील सर्व गावांमध्ये शेतीपिकांच्या नुकसानीचे पंचनामे केले जातात.

शेतीपिकांचे नुकसान ३३ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास जेवढ्या क्षेत्राचे नुकसान झाले आहे, तेवढ्या क्षेत्राकरिता विहित दराने निविष्ठा अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना मदत देण्यात येते. मात्र, महसूली मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद नसतानाही मंडळातील गावांमध्ये अतिवृष्टी होऊ शकते आणि त्यामुळे शेतीपिकांचे नुकसान होऊ शकते. तसेच काही गावांमध्ये सलग काही दिवस सतत पाऊस पडत असल्यामुळेदेखील शेतीपिकांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे नोंदी नसलेल्या गावांतील शेतीपिकांचे पंचनामे करून तत्काळ शेतकऱ्यांना मदत मिळवून देणे शक्य होणार आहे.

## नुकसानीची मदत थेट होणार वितरित

नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची मदत पारदर्शीपद्धतीने शेतकऱ्यांना तत्काळ मिळावी, याकरिता निधी संगणकीय प्रणालीमधून आधार क्रमांकाद्वारे त्यांच्या बँक खात्यात थेट वितरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

**विदर्भातील शेतीविषयक समस्यांचे मूळ अनेक बाबींमध्ये आहे. शेतीशी निगडित अनेक आघाड्यांवर पुरेसे काम न झाल्याने सध्या शेतीच्या क्षेत्रात काहीसे अरिष्ट भेडसावत आहे. हे लक्षात घेऊन राज्यातील विद्यमान सरकारने 'शाश्वत शेती समृद्ध शेतकरी' हा निर्धार कृतीत आणण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ठोस पावले उचलली आहेत. राज्याच्या कृषीक्षेत्रासाठी भरीव आणि ठोस अशा उपायांचा निर्धार सरकारने विविध तरतुदींच्या माध्यमातून यंदा केला आहे. त्याचा विदर्भाला फायदा होईल; परंतु त्यासोबत विदर्भासाठी म्हणून विशेष उपाययोजना जाणीवपूर्वक करण्यात आल्या आहेत.**

# विदर्भाच्या कृषी विकासाला **नवसंजीवनी !**

**पल्लवी धारव**

विदर्भातील बहुतांश भागातील अर्थव्यवस्थेचा शेती हा कणा आहे. या पार्श्वभूमीवर शेती विकासासाठी होणारे प्रयत्न एकूणच विदर्भाच्या विकासासाठी पायाभूत ठरतील, हे निश्चित आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी संबंधित विभागांना तब्बल ३० हजार कोटींच्या निधीचा लाभ होणार आहे. त्यामध्ये विदर्भ अग्रस्थानी आहे.

## प्रथम अमृतपर्वात ऐतिहासिक तरतूद

यंदाच्या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे राज्याच्या सर्वांगीण विकासाला परिपूर्णत्व देणाऱ्या पाच अमृतातील त्याची समर्पक आणि औचित्यपूर्ण अशी विभागणी! या अर्थसंकल्पातील प्रथम अमृत हे 'शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी' या शीर्षकाचे असून त्या माध्यमातून राज्यातील कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाचा निर्धार व्यक्त करण्यात आलेला आहे. या अंतर्गत अर्थसंकल्पात कृषिसह संबंधित विभागांसाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. त्यात कृषी विभागासाठी ३ हजार ३३९ कोटी रुपये, मदत-पुनर्वसन विभाग ५८४ कोटी रुपये, सहकार व पणन विभाग ११०६ कोटी रुपये, फलोत्पादन विभाग ६४८ कोटी रुपये, अन्न व नागरी पुरवठा विभाग ४८१ कोटी रुपये, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय विभाग ५०८ कोटी रुपये, जलसंपदा, लाभक्षेत्र विकास, खारभूमी विभाग १५ हजार ६६ कोटी रुपये, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ३ हजार ५४५ कोटी रुपये आणि मृद् व जलसंधारण



विभाग ३ हजार ८८६ कोटी रुपये अशा पद्धतीने शेतीशी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष संबंधित असलेल्या या प्रथम अमृतपर्वात एकूण २९ हजार १६३ कोटी रुपयांची ऐतिहासिक तरतूद करण्यात आली आहे.

## विदर्भाला फायदा

नमो शेतकरी महासन्मान निधी, एक रुपयात पीक विमा, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत प्रोत्साहनपर लाभ, महाकृषी विकास योजना, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, मागेल त्याला शेततळे योजनेचा विस्तार, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना, नैसर्गिक सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत, ई-पंचनामा, संत तुकडोजी महाराज शेतकरी भवन अशा काही योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी संपूर्ण राज्यात कार्यवाही केली जाणार आहे. या साऱ्या योजनांचा विदर्भाला फायदा होणारच आहे.

## नमो शेतकरी महासन्मान निधी योजना

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राज्य शासन १ कोटी १५ लाख कुटुंबांसाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबवणार आहे. अर्थसंकल्पात या योजनेसाठी ६ हजार ९०० कोटी रुपये प्रस्तावित असून प्रतिवर्ष प्रति शेतकरी ६ हजार राज्य सरकार व ६ हजार रुपये केंद्र सरकारकडून, असा १२ हजार रुपयांचा सन्माननिधी शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ विदर्भाला मोठ्या प्रमाणावर होणार आहे. विविध कारणांमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना ही रक्कम दैनंदिन गरजा भागवण्यासाठी साहाय्यभूत ठरणार आहे. विदर्भात छोट्या शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. या शेतकऱ्यांना सन्माननिधी खरोखरच महत्त्वाचा ठरेल.

## शेतकऱ्यांना दिलासा

विदर्भ आणि मराठवाड्यातील आपत्तीग्रस्त १४ शेतकरी जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांना थेट रोख रकमेचे हस्तांतरण करण्यात येणार आहे. याचा विदर्भातील जिल्ह्यांना लाभ होईल. या निर्णयांतर्गत १४ जिल्ह्यांतील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना आता अन्नधान्याऐवजी रोख रक्कम त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल. प्रति व्यक्ती प्रति वर्ष १८०० रुपये इतकी ही रक्कम असेल. या मदतीमुळे शेतकऱ्यांना निश्चितच दिलासा मिळणार आहे.

## प्रोत्साहनपर रक्कम

पूर्व विदर्भात धान उत्पादक शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. धान विक्रीवर प्रति क्विंटल

बोनस देण्याची पद्धत प्रचलित आहे. आता नवीन योजनेद्वारे धानाची विक्री न तपासता सातबारा नोंदीवरील लागवडीच्या क्षेत्रप्रमाणात उत्पादक शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२२-२३ साठी डीबीटीद्वारे दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रतिहेक्टरी १५,००० रुपये प्रोत्साहनपर रक्कम प्रदान करण्यात येणार आहे. विशेषतः भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्याचा मोठ्या प्रमाणावर लाभ होऊ शकेल.

यासोबतच विदर्भ व मराठवाड्यातील ११ जिल्ह्यांमध्ये दुग्धविकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्यासाठी यंदाच्या आर्थिक वर्षात १६० कोटी रुपये राखून ठेवण्यात आले आहेत. शेतीला पूरक व्यवसायाची जोड दिल्याशिवाय शेतकरी खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर होणार नाही, हे लक्षात घेऊन एक उत्तम जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसायाचा विकास करण्यात या निर्णयाची मोलाची मदत होणार आहे. विशेषतः अल्पभूधारक शेतकऱ्यांनी कृषिपूरक उद्योगांची कास धरावी, यासाठी शासन विविध आघाड्यांवर सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.

## नागपुरात कृषी सुविधा केंद्र

नागपुरमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करणार असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रसार हा त्याचा उद्देश आहे. या केंद्रासाठी २२८ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. या केंद्राच्या माध्यमातून कृषी विकास चालना देणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांना परिचय करून देण्यात येणार आहे. पारंपरिक पद्धतीने शेती करणारे शेतकरी नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्या विकासाचा मार्ग चोखाळू शकतील. विदर्भातीलच नव्हे तर राज्यातील शेती आजही काही प्रमाणात तांत्रिकदृष्ट्या उभारण्याची गरज आहे. ती लक्षात घेऊन या केंद्राच्या माध्यमातून कृषिपयोगी तंत्रज्ञानाचा प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणावर होऊ शकेल.

## विदर्भात संत्राप्रक्रिया केंद्र

नागपूर जिल्ह्यातील नागपूर, काटोल, कळमेश्वर, अमरावती जिल्ह्यात मोर्शी, बुलडाणा जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रासाठी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. फळपिकांवर प्रक्रिया उद्योग उभारल्याशिवाय फलोत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक शाश्वती मिळणार नाही, हे लक्षात घेऊन या केंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. विदर्भात संत्रा या महत्त्वाच्या फळपिकावर आधारित उद्योग उभारावेत, अशी अनेक वर्षांपासूनची अपेक्षा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात ती पूर्ण होण्याच्या दृष्टीने दमदार पाऊल टाकले गेले आहे.

## शेतकऱ्यांसाठी ट्रान्सफॉर्मर योजना

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत हेक्टरी ७५,००० रुपये वार्षिक भाडेपट्टा भरणार असून दिवसा वीजपुरवठ्यासाठी ३ वर्षांत ३० टक्के कृषी वीजवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात येणार आहे. याचा राज्यातील ९ कोटी ५० लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. प्रधानमंत्री कुसुम योजनेतून १ कोटी ५० लाख सौर कृषिपंप वाटप व प्रलंबित ८६,०७३ कृषिपंप अर्जदारांना तत्काळ वीजजोडणी देण्यात येणार आहे. उपसा जलसिंचन योजनेतील शेतकऱ्यांसाठी वीजदर सवलतीची मुदत आता मार्च २०२४ पर्यंत करण्यात आली आहे. या निर्णयाचाही विदर्भातील शेतकऱ्यांना लाभ होणार आहे.

अनेक महत्त्वपूर्ण कृषीविषयक निर्णयांतून शेतकऱ्यांचे जीवनमान उन्नत करण्याचा सरकारचा निर्धार यंदाच्या अर्थसंकल्पातून व्यक्त झालेला आहेच. मात्र शेतीशी संबंधित अनेक विभागांसाठीही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांपुढील अनेक अडचणी दूर होणार आहेत. शेतकऱ्यांना अखंडित आणि नियमित वीजपुरवठा व्हावा, यासाठीही सरकारने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.

## सिंचन विकासाला गती

शेती विकासाला सिंचन विकासाचा समृद्ध बॅकअप मिळाल्याशिवाय शेतकऱ्यांचे परावलंबित्व संपणार नाही. त्यामुळे विदर्भातील महत्त्वाच्या सिंचन प्रकल्पांच्या विकासावर सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. पूर्व आणि पश्चिम विदर्भ अशा दोन्ही भागात सिंचन विकासाला गती देण्याचा प्रयत्न कृतीत साकारलेला आहे. वैनगंगा खोऱ्यातील वाहून जाणारे पाणी वैनगंगा-नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलडाणा, वाशिम जिल्ह्यांना पुरवण्यात येणार आहे. पश्चिम विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या तापी महापुनर्भरण प्रकल्पाच्या मंजुरीसाठी राज्य शासन केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार आहे.

काही कारणाने प्रलंबित असलेले सिंचनाचे विविध प्रकल्प पूर्ण करण्यात येणार असून गेल्या ८ महिन्यांत २७ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. २६८ पैकी ३९ प्रकल्प या वर्षी पूर्ण करण्यात येणार असून, यंदा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतील ६ प्रकल्प, तर बळीराजा जलसंजीवनी योजनेतील २४ प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहेत.

गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प हा खऱ्या अर्थाने विदर्भाची भाग्यरेषा ठरू शकणारा प्रकल्प आहे. प्रदीर्घ काळ रखडलेल्या या प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी सरकारने पावले उचलली आहेत. पूर्व विदर्भाच्या विकासात गेम चेंजर ठरू शकणारा हा प्रकल्प वर्षभरात पूर्ण करण्याचा सरकारचा निर्धार आहे. त्यासाठी या वर्षी १५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, जून २०२४ पर्यंत या प्रकल्पातील उर्वरित कामे पूर्ण करण्याचे नियोजन या अर्थसंकल्पात करण्यात आले आहे. नागपूर, भंडारा आणि चंद्रपूर या तीन जिल्ह्यांत या प्रकल्पाची व्याप्ती असून जवळपास पूर्णत्वाकडे त्याचे काम आले आहे.

## जलयुक्त शिवार २.०

या वर्षीच्या अर्थसंकल्पात जलयुक्त शिवार योजनेचा दुसरा टप्पा सुरू करण्यात येणार असून सुरुवातीला ५,००० गावांमध्ये ही योजना राबवण्याचे नियोजन आहे. 'गाळमुक्त धरण - गाळयुक्त शिवार' योजनेस ३ वर्ष मुदतवाढ देण्यात आली आहे. मोठ्या प्रकल्पांपेक्षा जलयुक्त शिवारसारखी अत्यंत उपयुक्त योजना शेती विकास घडवण्यात महत्त्वाची ठरू शकेल, हे लक्षात आल्याने त्याबाबत प्रभावी नियोजन करण्यात आले आहे.

सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क, नागपूर

बदलत्या हवामानामुळे नैसर्गिक आपत्तीला शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम उभे असते. राज्य शासन शेती व शेतीपूरक व्यवसायाला नेहमी चालना देते. शेतकऱ्यांना शेतीतून शाश्वत उत्पन्न मिळण्यासाठी कृषी आणि कृषीशी निगडित असणाऱ्या विविध विभागांच्या वतीने अनेक योजना राबवल्या जातात. राज्यातील शेतकऱ्यांच्या कष्टाला शासकीय योजनांची साथ लाभत आहे. या योजनांचा लाभ घेऊन शेतकऱ्यांनी आपले जीवन सुखकर बनवले आहे. राज्यातील अशा लाभार्थींच्या निवडक यशकथा...

# समृद्ध शेतीकडे वाटचाल

## स्ट्रॉबेरीचे उत्पादन

स्ट्रॉबेरीच्या उत्तम वाढीसाठी पाण्याचा उत्तम निचरा असणारी, हलकी, मध्यम काळी, वालुकामय, गाळाची जमीन असावी लागते. या पिकासाठी थंड हवामान चांगले मानवते आणि असेच वातावरण डिसेंबर-जानेवरीत गडचिरोली जिल्ह्यात असते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गडचिरोलीचे पालकमंत्री असताना त्यांनी दुबार व नगदी पीक घेण्यासाठी वारंवार सूचना केल्या होत्या. त्यांनी जिल्ह्यातील सीताफळ,



जांभुळ, आंबा तसेच इतर फळांच्या बाबतीत लागवडीखालील क्षेत्र वाढवण्यासाठी सूचना केल्या होत्या. त्यांनी स्ट्रॉबेरीबद्दल वारंवार महाबळेश्वर, सातारा येथे जाऊन शेतकऱ्यांना उत्पादनाबद्दल माहिती देण्याच्या सूचनाही केल्या होत्या. त्यांना गडचिरोलीत स्ट्रॉबेरी, काजू व ड्रॅगन फळ लागवड व्हावी, असे नेहमी वाटते. त्यातूनच जिल्हाधिकारी संजय मीणा यांनी नावीन्यपूर्ण योजनेतून स्ट्रॉबेरी प्रकल्प राबवण्याचे ठरवले. यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बसवराज मास्तोळी यांनी व त्यांच्या चमूने नियोजन करून नावीन्यपूर्ण प्रकल्प यशस्वी केला.

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण २०२२ अंतर्गत नावीन्यपूर्ण योजना स्ट्रॉबेरी लागवड व उत्पादन प्रकल्प आखला गेला. २०२१-२२ व २०२२-२३ नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत स्ट्रॉबेरी लागवड व उत्पादन प्रकल्प ९० टक्के अनुदानावर प्रत्यक्ष राबवला.

प्रति प्रकल्प क्षेत्र ५ ते १० आर, प्रति प्रकल्प खर्च रुपये १,२०,५०० इतका होता. प्रति प्रकल्प ९० टक्के अनुदान रुपये १,०८,४५०/- व लाभार्थी हिस्सा रु. १२,०५०/- इतका होता. मंजूर अनुदान रु. ५०.०० लाख होते. स्ट्रॉबेरी लागवड तालुके गडचिरोली, चामोर्शी, मुलचेरा, आरमोरी, वडसा व भामरागड ठरवण्यात आले. गडचिरोली तालुक्यात ७ लाभार्थ्यांनी ०.५५ हेक्टर क्षेत्रावर लागवड केली. चामोर्शी तालुक्यात ७ लाभार्थींनी १.९० हेक्टर क्षेत्रावर लागवड केली. मुलचेरा तालुक्यात १६ लाभार्थ्यांनी ०.८० हेक्टर क्षेत्रावर लागवड केली. आरमोरी तालुक्यात ५ लाभार्थ्यांनी ०.४० हेक्टर क्षेत्रावर लागवड केली. वडसा तालुक्यात १७ लाभार्थ्यांनी ०.६० हेक्टर क्षेत्रावर लागवड केली व भामरागड तालुक्यात एका लाभार्थीने ०.०५ हेक्टर क्षेत्रावर लागवड केली, असे मिळून जिल्ह्यात ६० लाभार्थ्यांनी ४.३० हेक्टर क्षेत्रावर स्ट्रॉबेरीचे पीक घेतले.

कृषी विभागाने मला दोन हजार स्ट्रॉबेरी झाडांची रोपे दिली. कृषी विभागाने दिलेल्या सूचनांनुसार शेतीची मशागत करून लागवड केली. अजूनही स्ट्रॉबेरीची विक्री सुरू आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे विक्री करण्यासाठी मला बाहेर जावे लागले नाही. अशी प्रतिक्रिया मुलचेरा, गडचिरोली येथील लाभार्थी सुशांत अधिकारी यांनी दिली.

**– सचिन अडसूळ,**
जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली

## योजनेचा लाभ अन् रोजगारही

धुळे जिल्ह्यातील तापी नदीकाठावरील दोन्ही बाजूची जमीन अत्यंत सुपीक आहे. काळी आणि कसदार असलेल्या या जमिनीत मागील काही वर्षांत समाधानकारक पाऊस झाल्याने शिंदखेडा तालुक्यातील गोराणे परिसरात पारंपरिक पिकांबरोबरच गहू, मका, सोयाबीन आदी पिकांचे क्षेत्र वाढले आहे. मात्र या पिकांच्या कापणी, मळणीसाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत होती. त्यावर गोराणे येथील शेतकरी बाबूराव पांडुरंग कदम यांनी कृषी विभागाच्या अनुदान योजनेचा लाभ घेत रोजगारही शोधला आहे.

पिकांची मळणी म्हणजे पारंपरिक बैलांची पायत किंवा थ्रेशरचा वापर आला. त्यातही गव्हाची मळणी म्हणजे वेळ आणि मनुष्यबळाचा अधिक वापर. त्यानंतर कृषी क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञानाची भर पडत गेली आणि त्यानंतर आले आधुनिक हार्वेस्टर. त्याचा वापर हरियाणा आणि पंजाब या गहू पिकवणाऱ्या राज्यात जास्त होतो. ते आपल्याकडे आल्यावर मळणीची कामे सुरू होतात. तोपर्यंत परिसरातील शेतकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागत होती.

श्री. कदम यांना कृषी विभागाच्या साहाय्यक यांनी राज्य शासनाच्या कृषी



यांत्रिकीकरण उपअभियान योजनेची माहिती दिली. त्यासाठी करावयाच्या कार्यवाहीची माहिती देत त्यांच्याकडून अर्ज भरून घेतला. राज्य शासनाच्या कृषी यांत्रिकीकरण उपभियान योजनेंतर्गत २०२२-२०२३ मध्ये महाडीबीटीच्या माध्यमातून कृषी विभागाकडे स्वयंचलित हार्वेस्टरकरिता ऑनलाइन अर्ज दाखल केला. हे यंत्र एकच वेळेस कापणी, मळणी आणि चारा कुट्टी तयार करण्याचे काम करते. त्यानुसार श्री. कदम यांना हार्वेस्टरसाठी अनुदान मिळाले. त्यांनी २३ लाख रुपये किमतीचे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असे १४ फूट कटर बार हार्वेस्टर खरेदी केले. त्यावर त्यांना ८ लाख रुपयांचे अनुदान मिळाले. हे यंत्र कमी कालावधीत जास्त क्षेत्रातील कापणी आणि मळणीची कामे करते. त्यामुळे मनुष्यबळ, वेळ आणि पैशांची बचत होऊन शेतमाल वेळेत शेतकऱ्याला उपलब्ध होतो.

**– विलास बोडके,**
जिल्हा माहिती अधिकारी, धुळे

## गगनभरारी...

स्पर्धेच्या युगात कल्पकतेला विशेष महत्त्व आहे. त्यानुसार प्रत्येक गोष्टीत नावीन्य शोधणे हा मानवी स्वभाव आहे. हिंगोली येथील उच्च शिक्षण घेतलेल्या मंगेश प्रकाश पाटील या तरुण युवकाने कल्पकतेचे रूपांतर व्यवसायामध्ये केले आहे. त्यांनी आपल्या मित्रांना सोबत घेऊन १० लोकांची त्रिलोकेश या नावाने फार्मर प्रोड्युसर कंपनी स्थापन केली.

सहा ते सात महिन्यांपूर्वी कृषी विभागातील 'आत्मा'चे प्रकल्प संचालक युवराज शहारे यांच्याकडून माहिती मिळताच त्यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेंतर्गत धान्य प्रक्रिया युनिट (स्वच्छता व प्रतवारी युनिट) स्थापन करण्याचे ठरवले. शेतकऱ्यांचा व आपला फायदा झाला पाहिजे, यासाठी धान्य स्वच्छता व प्रतवारी युनिट स्थापन करण्याचा निर्णय घेतला. यासाठी कंपनीच्या एका सदस्याची १२०० स्क्वेअर फुटाची जागा भाड्याने घेतली. तसेच सर्व सदस्यांनी मिळून पैशाची जुळवाजुळव करून राजकोट येथून धान्य स्वच्छता व प्रतवारी मशीन आणली. धान्य स्वच्छता व प्रतवारी मशीनची एका तासाला १५ क्विंटल धान्याची स्वच्छता व प्रतवारी करण्याची क्षमता आहे. संपूर्ण मशिनरी युनिट व बांधकामासाठी जवळपास २० लाख रुपये खर्च करण्यात आला, यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेतून ६० टक्के म्हणजेच १२ लाख रुपयांचे अनुदान मिळाले आहे.

पहिल्या वर्षी कमी प्रतिसाद मिळाला. हळूहळू सोयाबीन, हरभरा, गहू या बियाणांची स्वच्छता करून मोफत बीज प्रक्रिया करून दिली. लोकांना चांगल्या प्रतीचा गहू, ज्वारी उपलब्ध व्हावे, यासाठी हिंगोलीपासून जवळच असलेल्या जवळा बाजार येथून सहा ते सात हजार क्विंटल गव्हाची खरेदी केली. या गव्हाची स्वच्छता व प्रतवारी करून पॅकिंग करून विक्री करण्यास सुरुवात केली. सध्या त्रिलोकेश फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या प्रत्येक सदस्यांनी आपापल्या शेतात प्रत्येकी पाच एकर गव्हाची लागवड केली. कंपनीच्या सर्व सदस्यांना फायदा व्हावा, यासाठी सदस्यांचा गहू बाजारभावापेक्षा २०० रुपये जास्तीचे दर देऊन खरेदी करण्यात येत आहे. तसेच काही सदस्यांनी सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या गव्हाला पुणे येथे मागणी असून, हा गहू ३५०० रुपये क्विंटल दराने पाठवण्यात येणार आहे. शेतकरी ते ग्राहक थेट विक्री होत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळत आहे.



या मशीनद्वारे दिवसाला ६० ते ८० क्विंटल धान्याची स्वच्छता व प्रतवारी करण्यात येत आहे. या मशीनवर काम करण्यासाठी चार कामगार आहेत. त्यांना सर्वांना प्रत्येकी १० हजार रुपये याप्रमाणे दरमहा पगार दिला जातो. सोयाबीन, हरभरा, गहू ब्रीडर शेडपासून बियाणे निर्मिती चालू आहे. धान्याची स्वच्छता व प्रतवारी करून शिल्लक राहिलेल्या चुऱ्यापासून पीठ व कोंबड्यांसाठी भरडधान्य तयार करण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले.

**– चंद्रकांत कारभारी,**
माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली.

## केवळ ३० गुंठे शेतात लाखाचे उत्पन्न

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुका हा डोंगराळ; परंतु निसर्गरम्य तालुका म्हणून ओळखला जातो. येथील बहुतांश शेतकरी अल्पभूधारक आहेत. कृषी विभाग व आत्मा विभागाच्या सहकार्याने या भागात विविध योजना राबवून शेतीचा आणि शेतकऱ्यांचा विकास होत आहे. पन्हाळा तालुक्यातील हरपवडे येथे भाऊसाहेब फुंडकर यांनी शेतात फळबाग लागवड योजनेचा लाभ घेऊन काजू व आंबा लागवड केली. २०१८-१९ मध्ये त्यांनी केवळ २० गुंठ्यात वेंगुर्ला ७ काजू लागवड, तर आणखी २० गुंठ्यात देवगड हापूस आंबा लागवड केली. काजू लागवड करणे, मशागत, रोपे खरेदी, ठिबक सिंचन यासाठी त्यांना २५ हजार रुपयांचा खर्च आला, तर आंबा रोपांची खरेदी, लागवड, मशागत, भरणी या कामांसाठी ३० हजार रुपये खर्च आला. यात त्यांना साधारण ३५ ते ४० टक्के लाभ कृषी विभागाकडून मिळाला. याबरोबरच कृषी विभागाच्या महाराष्ट्र राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेतून पॉवर ट्रेलरसाठी ८५ हजार रुपयांचे अनुदान मिळाले. त्यामुळे शेतीशी संबंधित बरीचशी कामे सोपी झाली.

श्री. फुंडकर यांना केवळ तीन ते चार वर्षात काजू बियांचे भरघोस उत्पादन होऊ

लागले आहे. सध्या पहिलेच पीक असल्यामुळे सुरुवातीलाच एका रोपापासून प्रतिवर्षी पाच ते सात किलो काजू बियांचे उत्पादन होत आहे. या वर्षी एका रोपापासून २ हजार ५०० ते ३ हजार रुपयांचे म्हणजेच २० गुंठ्यात साधारण ५० रोपांपासून ३५ हजारांचे उत्पन्न मिळाले. याशिवाय १० गुंठे शेतात त्यांनी भाजीपाला लागवड केली. वांगी व कोबी मुख्य पिकांमध्ये फ्लॉवर, हिरवी मिरची, गाजर, मुळा, भेंडी यासह झेंडू, पोकळा, कोथिंबीर, राजगिरा, मेथी अशा झिगझॅग पद्धतीने आंतरपीक भाजीपाला लागवड केली. यातून १० गुंठ्यात सहा महिन्यात ७० हजार रुपयांचा फायदा झाला. या शेतीत केलेल्या ठिबक सिंचनासाठीही प्रधानमंत्री



कृषी सिंचन योजनेतून ५५ टक्के अनुदान मिळाले. यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती बदलण्यास मदत झाली. कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवण्यात येत असून याचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यायला हवा, असे आवाहन त्यांनी अन्य शेतकऱ्यांना केले आहे.

**– वृषाली पाटील,** माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर

## शेतकऱ्यांसाठी संजीवनी

कृषी विभागाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत शेडनेट हाऊस उभारणी प्रकल्प वैयक्तिक लाभाचा घटक आहे. हा प्रकल्प शेतीला बळकटीकरण देत असून शेतकऱ्यांसाठी संजीवनी ठरत असल्याची भावना कमल निंबाजी माळी (कळमसरा, ता. पाचोरा, जि. जळगाव) यांनी व्यक्त केली आहे.

मोजे कळमसरा हे पाचोरा-जामनेर रस्त्यावरून साधारणतः ५ ते ६ किमी आत असलेले गाव आहे. मौजे कळमसरा गावाचे जवळपास २५५१.५९ हेक्टर भौगोलिक क्षेत्र असून, या क्षेत्रापैकी १९७७.३२ हेक्टर निव्वळ पेरणी क्षेत्र आहे. त्यात १९७१.३२ हेक्टर क्षेत्र हे बागायती क्षेत्र आहे. कमल निंबाजी माळी यांच्या कुटुंबाने पारंपरिक शेतीमधून काहीतरी नवीन करावे, या उद्देशाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत शेडनेट हाऊस उभारणीबाबत माहिती प्राप्त करून घेतली. लगेच ०.४० आर क्षेत्रावर शेडनेट उभारणीकरिता ऑनलाइन अर्ज दाखल केला. पूर्वसंमती प्राप्त झाल्यावर लगेच त्यांनी शेडनेट हाऊसची उभारणी सुरू केली. माळी यांचे चिरंजीव आनंदा माळी यांनी हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटर, तळेगाव दाभाडे येथे शेडनेट उभारणी व लागवड व्यवस्थापन या विषयाची पूर्ण माहिती घेऊन पीक घेण्यास सुरुवात केली.

या शेडनेट हाऊस उभारणीसाठी त्यांना एकूण रुपये २१ लाख १३ हजार इतका खर्च आला. त्यापैकी श्रीमती माळी यांना प्रकल्पाकडून आधार लिंक खात्यावर डिबीटी ऑनलाइन प्रणालीद्वारे रुपये १८ लाख १९ हजार ४८१ इतके अनुदान प्राप्त होणार आहे.

या कुटुंबाने शेततळ्याच्या बाजूला १ हेक्टर ५५ आर क्षेत्रफळात बाग लागवड केली. मोसंबी या पिकाची जुलै २०२१ मध्ये ४५० रोपांची लागवड केली असून माहे नोव्हेंबर २०२२ अखेर म्हणजेच साधारणतः दीड वर्षात पिकाची वाढ ५ फुटांपर्यंत झाल्याचे दिसून येत आहे. जोपर्यंत मोसंबी पिकाचे उत्पादन येण्यास सुरुवात होते तोपावेतो शेतीचे अर्थकारण सुरू राहण्याच्या अनुषंगाने माळी कुटुंबाने पपईच्या रोपांची लागवड केली असून माहे डिसेंबर २०२२ च्या पहिल्या आठवड्यापासून उत्पादन निघण्यास सुरुवात झाली आहे.



पहिल्या तोडीनंतर दर १५ दिवसांनी पपईचे उत्पादन मिळाले. साधारणतः पपईचे एक झाड हे १ क्विंटलपर्यंतचे उत्पादन देते. सद्य:स्थितीला प्रतिकिलो १० ते १५ रुपये दर मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

**– विलास बोडके,**
जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव

## नवनवीन प्रयोगातून साधली प्रगती

हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील खंदारबन येथील शेतकरी गंगाधर साधू हे शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करत असतात. त्यामुळे श्री. साधू यांनी काळाची गरज ओळखून त्यांच्या पाच ते सहा एकर शेतीवर मनरेगा अंतर्गत फळपीक लागवड या योजनेतून करवंदाची लागवड केली आहे. याच करवंदाच्या फळापासून पानावर लावलेली गुलाबी चेरी तयार होते. या पिकाला मागणी आणि दर चांगला आहे. या पिकाला फारसे पाणी लागत नाही. फारशी फवारणी व खताचा सुद्धा खर्च नाही. याचे एकरी पाच ते सहा टन उत्पन्न मिळते. यापासून दोन ते अडीच लाखाचे उत्पन्न श्री. साधू यांना मिळते.

या करवंदाची लागवड एका रांगेत चार फुटाच्या अंतरावर व दोन ओळीतील अंतर २० फूट याप्रमाणे ५०० रोपांची लागवड केली आहे. या करवंदाच्या झाडाला तीन वर्षांपासून फळे लागण्यास सुरुवात होते व उत्पन्न सुरू होते. तीन वर्षांपासून ते पुढील ३० वर्षांपर्यंत हमखास उत्पन्न मिळते. याची तोडणी ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये होते. या करवंदासाठी जळगाव, मुक्ताईनगर,

गुजरात, दिल्ली येथील कंपन्या शेतातूनच माल खरेदी करून घेऊन जातात. तसेच त्यामध्ये आंतरपीक म्हणून सीताफळाची लागवड केली आहे. तसेच त्यांनी हळूहळू करवंदाची रोपवाटिका तयार केली आहे. त्यांनी २० ते २५ रुपये याप्रमाणे शेतकऱ्यांना रोपे उपलब्ध करून देतात.

श्री. साधू यांनी त्यांच्या शेतात विहीर घेतली आहे. तसेच त्यांनी शेती उत्पादनामध्ये शाश्वतता आणण्यासाठी तसेच दुष्काळावर मात करण्यासाठी शेततळे उपयुक्त असल्याने राज्यातील



पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचनाची उपलब्धता वाढवणे; तसेच संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी 'मागेल त्याला शेततळे' योजनेतून त्यांच्या शेतात शेततळे घेतले आहे.

कृषी विभागाच्या 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना' योजनेतून दोन वर्षांपूर्वी श्री.साधू यांनी ठिबक सिंचन संच व मोटार घेतली आहे. त्यांच्या शेतात उपलब्ध असलेल्या विहीर व शेततळ्याच्या माध्यमातून ठिबक सिंचनाद्वारे ते पिकाला पाणी देतात. त्यामुळे पिकाला आवश्यक तेवढेच पाणी मिळत असल्यामुळे पाण्याचीही बचत होत आहे. श्री. साधू यांना कृषी विभागाचेही वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असल्याचे ते सांगतात.

श्री. साधू आपल्या शेतात गांडूळ खत व कंपोस्ट खत तयार करून शेतातील पिकांना देतात. त्यामुळे त्यांचे उत्पन्नही चांगले होते. एक प्रयोगशील शेतकरी म्हणून त्यांची परिसरात ओळख आहे. श्री. साधू त्यांच्याकडे असलेल्या चार गाई, एक वळू, एक म्हैस व एक बैलजोडी यांचे गोमुत्र जमा करून ते पिकांना देतात, असे वेगवेगळे प्रयोग श्री. साधू यांनी त्यांच्या शेतात केले आहेत. त्यामुळे एक प्रयोगशील शेतकरी म्हणून हिंगोली येथे २५ ते २८ मार्च, २०२३ या कालावधीत आयोजित जिल्हास्तरीय कृषी महोत्सवात पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन त्यांना गौरवण्यात आले आहे.

**– चंद्रकांत कारभारी,**
माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली

## नाचणी अन्नप्रक्रिया उद्योग

पौष्टिक तृणधान्ये आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. त्यातही नाचणीचे आहारातील महत्त्व लाभदायी आहे. लहान बालकांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांसाठी नाचणीचे गुणधर्म पोषक आहेत. यामुळेच राज्यासह देशात आणि परदेशातही नाचणीला मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. ही मागणी लक्षात घेऊन राघवेंद्र हरीष व्हटकर यांनी चंदगड तालुक्यातील नागनवाडी येथे 'हरिलक्ष्मी एंटरप्रायझेस अन्नप्रक्रिया उद्योग' नावाने नाचणी प्रक्रिया उद्योगाला सुरुवात केली. २०२१-२२ मध्ये या उद्योगासाठी ७८ लाखांची आधुनिक यंत्रसामग्री खरेदी केली. यासाठी शासनाकडून २४ लाख रुपयांचे अनुदान मिळाले. सध्या ७ ते ८ कोटींच्या वार्षिक उलाढालीतून साधारण १५ ते २० लाख रुपये नफा ते दरवर्षी मिळवत आहेत. राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने मिळालेल्या मदतीमुळे श्री. व्हटकर यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत झाली.

राघवेंद्र व्हटकर हे जिल्ह्यातील नाचणी उत्पादक शेतकऱ्यांकडून कच्चा माल (करडा नाचणी) खरेदी करून साठवणूक करतात. नंतर या नाचणीवर प्रक्रिया करून घेतात. सुरुवातीला खडा, माती, काड्या, कचरा वेगळा करून नाचणी स्वच्छ केली जाते. यानंतर नाचणीला पॉलिश करून नाचणीवर असणारा कोंड्याचा थर वेगळा काढला जातो. यानंतर नाचणीची आकारानुसार बारिक, मोठी अशी वर्गवारी केली जाते. यानंतर ग्राहकांच्या म्हणजेच बाजारपेठेच्या मागणी नुसार त्या-त्या ब्रँडनुसार पॅकेजिंग केले जाते. हरिलक्ष्मी पॅकेट बंद नाचणी राज्य आणि देशात पाठवण्याबरोबरच परदेशातही मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. हरिलक्ष्मी एंटरप्रायझेस अन्नप्रक्रिया उद्योगाच्या नाचणीला राज्यभरात १ हजार ६०० टनाची, तर परराज्यातून ८०० टनाची मागणी आहे. उत्तम प्रतीची नाचणी असल्यामुळे देशासह विदेशातूनही त्यांच्या ब्रँडची साधारण ४०० टन नाचणीची निर्यात वर्षभरात केली जाते. नाचणीला चांगली मागणी आहे. वर्षभरात तब्बल ४०० टनाची नाचणी केवळ परदेशात निर्यात केली जाते. सध्या वर्षाला २ हजार ८०० टन नाचणी आहे. यातून वर्षाला तब्बल ७ ते ७.५ कोटींची उलाढाल होत असून वर्षभरात



१५ ते २० लाख रुपये नफा होत आहे. शेती उत्पादित मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत मुख्यमंत्री अन्नप्रक्रिया कृषी योजनेसह विविध योजनांतून भरघोस अनुदान मिळत आहे.

**– वृषाली पाटील,** माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर

## धानातून धनाकडे...

शासकीय योजनेचा लाभ घेऊन स्वत:च्या नावीन्यपूर्ण संकल्पनेतून पारंपरिक शेतीचा कायापालट करू शकतो हे सिद्ध केले आहे चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा तालुक्यातील चेक हत्तीबोडी येथील युवा शेतकऱ्याने! विशेष म्हणजे शासकीय



योजनेतून मिळालेल्या शेततळ्यात स्व:खर्चाने मत्स्यबीज सोडून मत्स्य उत्पादन, त्याची विक्री, या शेततळ्यातून शेतीला सिंचन आणि शेततळ्याच्याच बांधावर फळबाग लागवड असा उपक्रम या तरुणाने राबवला आहे.

पोंभुर्णा तालुक्यातील डोंगरहळदी (तुकूम) येथील रहिवासी असलेल्या प्रवीण बुधाजी सोमनकर या तरुणाची चेक हत्तीबोडी येथे साडेसात एकर शेती आहे. पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या प्रवीणला केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) भरतीने हुलकावणी दिली. त्यानंतर तो थेट शेतीकडे वळला. कृषी विभागाच्या 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत २५ बाय २० बाय ३ मीटर शेततळ्यासाठी २०१७ मध्ये त्याला ५० हजार रुपयांचे अनुदान मिळाले.

यातून शेततळे पूर्ण करून त्यात प्रवीणने स्व:खर्चाने मत्स्यबीज सोडण्याचा निर्णय घेतला. यात ग्रासकर्प, सिरपन, रोहू, कटला या माशांच्या प्रजातींचा समावेश आहे. दरवर्षी जुलैमध्ये शेततळ्यात मत्स्यबीज सोडले जाते. अर्धा ते पाऊण किलोचे मासे झाले की, प्रवीण त्याची विक्री करतो.

शेततळे आणि मत्स्यव्यवसाय एवढ्यावर न थांबता प्रवीणने महात्मा गांधी महाराष्ट्र रोजगार हमी योजनेतून शेततळ्याच्या बांधावर आणि शेतात फळबाग लागवड केली आहे. त्यासाठी त्याला कृषी विभागाकडून अनुदान प्राप्त झाले असून आजघडीला त्याच्या शेतात आंब्याची दशहरी, लंगडा, हापूस, केशर या प्रजातींची ६० झाडे, पेरू, सीताफळ आणि फणसाची प्रत्येकी १० झाडे आहेत. एवढेच नाही तर शेततळ्याच्या एका बाजूला त्याने निलगिरीसुद्धा लावली आहे. कृषी विभागाने शेतात सिंचनाकरिता प्रवीणला महाडीबीटी योजनेंतर्गत पाणबुडी मोटर आणि पाईप २० हजार रुपयांच्या अनुदानावर उपलब्ध करून दिले आहे. शेततळे आणि बोअरच्या माध्यमातून शेतात सिंचन होत असल्यामुळे धानासोबतच भाजीपाला आदी पिके तो घेत आहे. गतवर्षी प्रवीणला २ लाखांचे उत्पन्न झाले. फळबाग उत्पनातून प्रत्यक्ष आंबे निघाल्यावर त्याचे उत्पन्न नक्कीच दुप्पट होईल, असेही प्रवीण सोमनकर याने सांगितले.

पारंपरिक शेतीला फाटा देऊन शेततळे, मत्स्य उत्पादन, फळबाग लागवड आणि सिंचनातून खऱ्या अर्थाने प्रवीणने समृद्धी साधली असून तो 'धानातून धनाकडे' वळल्याचे चित्र आहे.

**– राजेश येसनकर,**
जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर

## डाळ मिल व्यवसायातून आर्थिक उत्पन्न

शेतकरी कुटुंबातील रूपाली सत्यवान जाधव या कर्नवडी ता. खंडाळा जि. सातारा येथील अल्पभूधारक शेतकरी आहेत. त्या दुर्गम डोंगराळ भागात आपली शेती करत होत्या. त्यांना कृषी विभागाच्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची माहिती मिळाली. त्यांनी कृषी विभागाकडे डाळ मिल व्यवसायासाठी १० लाख कर्जाचा प्रस्ताव सादर केला व तो मंजूरही झाला. श्रीमती जाधव यांनी डाळ मिल उद्योग नैसर्गिक पद्धतीने सुरू केला असून त्यांच्या डाळीला मोठी मागणी आहे. त्यांची आर्थिक उत्पन्न चांगल्या पद्धतीने मिळत असून त्या यशस्वी उद्योजिका आहेत.

श्रीमती जाधव यांना डाळ मिलसाठी कृषी विभागाच्या यांत्रिकीकरण योजनेतून ९७ हजार २०० रुपयांचे अनुदान तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या व्याज परतावा योजनेचाही लाभ मिळाला आहे. आत्ता प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेतून १० लाखाचे कर्ज मिळाले आहे. या घेतलेल्या कर्जावर ३ लाख ८५ हजारांचे अनुदान मिळाले आहे. त्याचबरोबर उद्योग उभारणीसाठी पती सत्यवान व मुलगा पृथ्वीराज यांचेही सहकार्य लाभले.

प्रथम प्रोसेसिंगसाठी सुरू केलेल्या व्यवसाय मार्केटिंगकडे वळू लागला. फक्त तेल व पाणी वापरून केलेल्या केमिकल विरहित डाळींना सातारा व पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. उद्योग उभारणीसाठी उमेद अभियानाचीही मोलाची साथ मिळाली. त्यांनी दिलेल्या आत्मविश्वासामुळे महिला असूनही



उद्योजिका म्हणून जिल्ह्यात चांगली ओळख निर्माण करण्यात यश मिळाले आहे. डाळीसाठी लागणारा कच्चा माल (कडधान्ये) लातूर, लोणंद, शिरवळ येथून घेतला जातो. तसेच तेलासाठी शेंगा, करडई फलटण जि. सातारा व बारामती जि. पुणे येथून घेतला जातो. उत्पादित केलेल्या शेंगदाणा, करडई, सूर्यफूल तेलाला चांगली मागणी वाढत आहेत.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याबरोबर कृषी विभागाच्या मदतीने आज मी यशस्वी उद्योजिका झाली आहे. जिल्ह्यात हजारो महिला बचतगट आहेत. या बचतगटांनी लोणचे, पापड इतर छोट्या व्यवसायातून बाहेर पडले पाहिजे. बाजारपेठेच्या मागणीनुसार कृषी उत्पादित केलेल्या मालावर प्रक्रिया करून एक यशस्वी उद्योजिका व्हावे, असेही श्रीमती जाधव आत्मविश्वासाने सांगतात.

**– दत्तात्रय कोकरे,**
जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

## आदिवासींच्या शेतात मोगऱ्याचा सुगंध

शासनाच्या योजनांचा लाभ देऊन शेतकऱ्यांच्या जीवनात सुगंध फुलवण्याचे काम ठाणे जिल्हा कृषी कार्यालयाने केले आहे. भिवंडी तालुक्यातील वापे या आदिवासीबहुल गावात २०२२ मध्ये कृषी विभागाच्या माध्यमातून महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात मोगरा लागवड केली गेली आहे.



ठाणे हा नैसर्गिक वरदान लाभलेला जिल्हा असून भात हे मुख्य पीक म्हणून घेतले जाते; परंतु गेल्या ४-५ वर्षांपासून बदललेल्या हवामानामुळे व अवेळी पडणाऱ्या पावसामुळे खरीप हंगामातील भात हे पीकसुद्धा शेतकऱ्याच्या हाताला मिळेनासे झाले होते. भिवंडी तालुक्यातील कृषी विभागाचे कृषी साहाय्यक विवेक दोंदे यांनी पुढाकार घेऊन वापे गावातील आदिवासी शेतकऱ्यांना एकत्रित करून फुलशेतीचे महत्त्व पटवून दिले आणि वर्षभर येणारे मोगरा हे फुलपीक घेण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला गावातील २० महिला व पुरुष शेतकऱ्यांनी प्रतिसाद दिला. त्यांच्या या कामाला कृषी विभागाने रोजगार हमी योजनेची जोड दिली.

गावातील २० शेतकऱ्यांनी पावसाळा सुरू झाल्यानंतर जून महिन्यामध्ये एकूण २० हजार मोगरा रोपांची लागवड केली. साधारणतः प्रत्येक शेतकऱ्याने १० गुंठ्यांत १ हजार मोगरा रोपांची लागवड केली आहे. या पिकाची पूर्ण वाढ होण्यास एक वर्षाचा कालावधी लागला. यासाठी कृषी विभागाकडून रोजगार हमी योजनेंतर्गत प्रति १० गुंठ्यास २६,७४० रुपये इतके अनुदान शेतकऱ्यास देण्यात आले. लागवडीस जवळपास वर्ष होत आले असून मोगऱ्याचे उत्पन्न येण्यास सुरुवात झाली आहे. झाडाची वाढ मर्यादित असल्याने सुरुवातीला १० गुंठ्यांत जवळपास दीड ते दोन किलो फुलकळी मिळण्यास सुरुवात झाली आहे. फुलांची विक्री गावातच होते. व्यापारी फुले येऊन घेऊन जात असल्याने शेतकऱ्यांच्या प्रवास खर्चात बचत झाली.

नोव्हेंबर ते फेब्रुवारीमध्ये १५०० रुपये किलोप्रमाणे दर मिळत होता. सध्या बाजारात आवक वाढल्याने किमान २०० रुपये प्रति किलोप्रमाणे दर मिळत असून महिन्याकाठी १२ ते १४ हजार रुपये कुटुंबाला मिळत आहेत. जसजशी झाडांची वाढ होत राहील, तसतसे पुढे १० गुंठ्यात १० ते १२ किलो उत्पन्न सुरू होईल.

या पूर्वी गावातील महिला व पुरुष शेतकरी हे मोलमजुरीसाठी इतरत्र जात होते. मात्र आता फुलशेती सुरू केल्यामुळे शेतकरी वर्षभर आपल्याच शेतात काम करून चांगले उत्पन्न मिळवत असून त्याची दुसरीकडे मोलमजुरी करून होणारे कष्ट कमी झाले आहेत.

मोगरा पिकातील बंगलोरी ही जात वर्षभर फूल देणारी असून आम्ही त्याची निवड करून लागवड केली आहे. साधारणतः एक वर्षानंतर हे पीक उत्पन्न देण्यास सुरुवात करते. मोगरा हे पीक संजीवनी देऊन जाणारे पीक असून गावातील शेतकऱ्यांची मोलमजुरीत होणारी ससेहोलपट कमी झाली याचे समाधान शेतकऱ्यांनी व्यक्त केले.

**संकलन – जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे**

## कृषी स्वावलंबन योजनेमुळे जीवन सुखमयी

सातारा तालुक्यातील नांदगाव येथील युवा शेतकरी शुभम संपत गायकवाड यांना तालुका कृषी अधिकारी जे. बी. बहिरट यांच्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेची माहिती मिळाली व त्यांनी या योजनेचा लाभ घेतला. या योजनेमुळे त्यांचे संपूर्ण जीवनमान बदलून गेले. ग्रामपंचायत नांदगाव येथे पंचायत



समिती, सातारा येथील कृषी अधिकारी यांनी अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना लाभार्थी निवड सभेमध्ये कृषी अधिकाऱ्यांनी योजनेची सविस्तर माहिती दिली. त्यामध्ये नवीन सिंचन विहीर खोदाईसाठी २ लाख ५० हजार, जुनी विहिर दुरुस्तीसाठी ५० हजार, इनवेल बोअरिंगसाठी २० हजार, पंपसंच खरेदीसाठी २१ हजार, वीज जोडणी आकार १० हजार व सूक्ष्म संचासाठी ९०

टक्क्यांपर्यंत अनुदान असल्याची व कागदपत्रांची माहिती दिली.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून ऑनलाइन अर्ज सादर केला. या योजनेंतर्गत नवीन विहीर खोदाईचा कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर विहीर खोदाई काम सुरू केले व अवघ्या ७ फुटावर पाणी लागले ते बघून माझे कुटुंबीय आनंदी झाले. विहीर खोदाई व रिंग बांधकाम एका महिन्यात पूर्ण केले. विहीर खोदाई व बांधकाम याचे एकूण २ लाख ५० हजार माझ्या बँक खात्यावर जमा झाले. विहिर पूर्ण झाल्यानंतर मला उर्वरित घटकामध्ये सोलार पंप ३ एचपी या घटकाचा लाभ मिळाला, असे एकत्रित मला रक्कम २ लाख ५८ हजार २८० इतके अनुदान माझ्या बँक खात्यावर जमा झाले.

सिंचन सुविधेच्या उपलब्धतेमुळे कांदा व भाजीपाला नगदी पिके घेऊ लागलो आहे. मी खूप समाधानी असून भविष्यात ऊस व आले ही पिके घेणार आहे. माझ्या शेतीच्या उत्पन्नामध्ये वाढ झालेली असून खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेच्या नावाप्रमाणे स्वावलंबी झालो,' असेही ठाम विश्वासाने युवा शेतकरी शुभम गायकवाड यांनी सांगितले.

**– दत्तात्रय कोकरे,**
जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

## कृषी सिंचनाने उत्पादनात वाढ

शेतीला जलसिंचन करणे हे शेतकऱ्यांसमोरील मोठे काम असते. पारंपरिक पद्धतीने शेतीला पाणी दिल्यास इंधन, वेळ आणि पाण्याचा अपव्यय होतो. यासाठी केंद्र आणि राज्य शासनामार्फत शेतीमध्ये सिंचनाच्या आधुनिक पद्धतीचा वापर व्हावा, यासाठी ठिबक सिंचन आणि तुषार सिंचन योजना राबवण्यात येते.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत राबवण्यात येणाऱ्या ठिबक सिंचन योजनेचा लाभ अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यातील चिंचरगव्हाण येथील गणेश साहेबराव गांगडे या शेतकऱ्यांनी घेतला. श्री गांगडे यांनी सहा एकर शेतीसाठी ठिबक सिंचन योजनेचा लाभ घेतला. यासाठी त्यांना २९ हजार ३०८ रुपयांचे अनुदान मिळाले. पूर्वी त्यांना संत्री, मोसंबी आणि कपाशी पीकातून अडीच लाखांपर्यंत उत्पादन व्हायचे. ठिबक सिंचनाचा लाभ घेतल्यापासून उत्पादन वाढून ते तीन लाखांपर्यंत गेले. हा फायदा झाल्यापासून ते इतर शेतकऱ्यांनाही यासाठी प्रोत्साहित करत आहेत.



अमरावती जिल्ह्यातील चांदुररेल्वे तालुक्यातील मांजरखेड कसबा येथील श्रीराम प्रल्हादराव होले या शेतकऱ्याने अडीच एकर शेतीसाठी ठिबक सिंचन योजनेचा लाभ घेतला. यासाठी त्यांना ५१ हजार ७२८ रुपयांचे अनुदान मिळाले. यातून त्यांनी संत्री आणि कपाशीच्या पिकासाठी ठिबक सिंचन सुरू केले. पूर्वी त्यांच्या पिकाचे मूल्य ५८ हजार ४०० रुपये होते. ठिबक सिंचनामुळे पिकाचे मूल्य १ लाख ९ हजार ५०० रुपये एवढे झाले. शिवाय ठिबक सिंचनाद्वारे कीटकनाशक औषधे झाडांना दिली. यामुळे खतांवर होणारा वेगळा खर्चही वाचला.

**– अपर्णा यावलकर,** माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती

## वनराई बंधाऱ्यावर भाजीपाल्याचे मळे

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील मौजे वापे हे सुमारे ५० ते ६० आदिवासी शेतकऱ्यांचे गाव. या गावात उदरनिर्वाहाचे मुख्यतः साधन म्हणजे शेती होय. गावात दुबंडा नावाची ही छोटी नदी वाहते. अगदीच छोट्या असलेल्या या नदीचे पाणी नोव्हेंबर-डिसेंबर अखेर ओसरते. पाणी ओसरले की या आदिवासी बांधवांना रब्बीच्या पीकावरही पाणी सोडावे लागते. त्यामुळे या नदीवर बंधारा असावा, अशी या शेतकऱ्यांची मागणी होती.

शेतकऱ्यांची ही मागणी भिवंडी तालुक्यातील कृषी विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नोव्हेंबरमध्ये श्रमदानाने वनराई बंधारा बांधून पूर्ण केली. तालुका कृषी अधिकारी गणेश बांबळे, अंबाडीचे कृषी अधिकारी आर. डी. शिरसाट यांच्या अधिनस्थ असलेल्या सर्व क्षेत्रीय कर्मचारी, कृषी साहाय्यक व कृषी पर्यवेक्षक अंबाडी व अनगाव यांनी श्रमदानातून वापे दुंबडा नदीवर स्वतः श्रमदान करून वनराई बंधारा बांधला. या वनराई बंधाऱ्याची लांबी सुमारे २५ मीटर असून उंची १ मीटर आहे. पाणी साठवण्यासाठीची लांबी सुमारे २०५ मीटर असून, त्यात जवळपास ४.५ ते ५ हजार घनमीटर पाणीसाठा निर्माण झाला आहे.

या वनराई बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांना मार्च अखेरपर्यंत रब्बीचे पीक घेता आल्याने त्यांच्या हाताला काम मिळण्याबरोबरच पीकातून मिळणाऱ्या उत्पन्नाचाही आधार झाली आहे. बंधाऱ्यामुळे साचलेल्या पाणीसाठ्यावर सुमारे १५ एकर क्षेत्रावर विविध प्रकारच्या भाजीपाल्याची लागवड



करण्यात आली आहे. त्यापासून आजपर्यंत भाजीपाला लागवड करणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला भाजीपाला विक्रीतून प्रती महिना सुमारे १५-२० हजार रुपये उत्पन्न मिळाल्याचे लाभार्थी आदिवासी शेतकरी बांधवांनी सांगितले. या बंधाऱ्यांमुळे मिरची, भेंडी या भाजीपाल्याबरोबरच मोगरा फुलाला व आंबा पिकाला सुद्धा सिंचनाची सोय झाली. तसेच वन्य प्राण्यांची सुद्धा

पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होऊन नैसर्गिक समतोल राखण्यास मदत झाली आहे.

वापे गावच्या आदिवासी, अल्पभूधारक शेतकऱ्यांना रब्बी हंगामात मार्चअखेरपर्यंत शेतीसाठी पाणी उपलब्ध झाले असून त्यामुळे रब्बी पीक त्यांच्या हातात पडून त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली असल्याचे समाधान भिवंडी कृषी पर्यवेक्षक विवेक दोंदे यांनी व्यक्त केले.

संकलन – जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे

## ममता ब्राह्मणकर बनल्या आत्मनिर्भर

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव तालुक्यातील बोरकन्हार येथील ममता पवन ब्राह्मणकर स्वावलंबन लोक संचालित साधन केंद्र आमगावअंतर्गत आभा महिला बचतगट बोरकन्हारच्या सदस्या आहेत. बचतगटाच्या व संयुक्त दायित्व गटाच्या माध्यमातून बँक कर्ज घेऊन त्यांनी दुग्धव्यवसाय सुरू केला. दुधविक्री व्यवसाय अधिक चांगल्याप्रकारे चालू लागला म्हणून त्यांनी लोकसंचालित साधन केंद्राचे मार्गदर्शन घेऊन हरिओम डेअरी तालुक्याच्या ठिकाणी उघडली. त्यानंतर त्यांना सहयोगीच्या माध्यमातून प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेची माहिती मिळाली.



आत्मनिर्भर भारत मोहिमेंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग ही योजना कृषी विभागामार्फत संपूर्ण राज्यभर राबवली जात आहे. या योजनेंतर्गत भांडवली गुंतवणूक, सामाईक पायाभूत सुविधा, इन्क्युबेशन सेंटर, स्वयंसाहाय्यता गटाच्या सदस्यांना बीज भांडवल, मार्केटिंग व ब्रॅन्डिंग इत्यादी घटकांकरिता अर्थसाहाय्य देण्यात येते. वैयक्तिक सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना प्रकल्प किमतीच्या ३५ टक्के / जास्तीत जास्त १० लाख रुपये, तर सामाईक पायाभूत सुविधा / मूल्यसाखळी, इन्क्युबेशन केंद्र / मूल्यसाखळी या घटकांसाठी प्रकल्प किमतीच्या ३५ टक्के / जास्तीत जास्त ३ कोटी रुपये अर्थसाहाय्य देय आहे.

या योजनेचा लाभ घेऊन त्यांनी दुधापासून निर्माण होणारे विविध दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याच्या मशीन विकत घेतल्या (पनीर, तूप इत्यादी). आज त्यांच्याकडे ६०० ते ८०० लिटर दूध येते. दुधापासून त्या वेगवेगळे पदार्थ तयार करून विक्री करतात. त्यामुळे त्यांचा आर्थिक स्रोत उंचावलेला असून त्या आता आत्मनिर्भर झाल्या आहेत. त्यांच्या कामाचे कौतुक जिल्ह्यात सगळीकडे केले जात आहे. यासाठी त्यांना कृषी विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन मिळाले.

**– के. के. गजभिये,** उपसंपादक,
जिल्हा माहिती कार्यालय, गोंदिया

## रोपवाटिकेतून आर्थिक प्रगती

नागपूर जिल्ह्यामध्ये संत्रा, कापूस व सोयाबीन ही प्रमुख पिके घेतली जातात. नैसर्गिक संकटामुळे शेती करणे जिकिरीचे ठरत असताना नरखेड तालुक्यातील मौजा पिंपळदरा येथील हरिभाऊ लक्ष्मण खुजे यांनी पारंपरिक शेती पद्धतीला आधुनिकतेची जोड देण्यासाठी शेतीपूरक व्यवसाय सुरू केला. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर रोपवाटिका योजनेंतर्गत त्यांनी आपल्या तीन एकर शेतामध्ये रोपवाटिका सुरू केली.

शासनाच्या कल्याणकारी योजनेतून त्यांनी शेतामध्ये शेडनेट उभा करून गुरू गजानन रोपवाटिका तयार केली. श्री. खुजे यांनी प्रचलित पद्धतीने शेडनेट न उभारता तीन एकर शेतीमध्ये पॉलिटनेल तयार केले. या रोपवाटिकेमध्ये शेडनेटच्या माध्यमातून त्यांनी भाजीपाला रोपांचे उत्पादन व विक्री सुरू केली. यामुळे परिसरातील भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचा भाजीपाला रोपे उपलब्ध झाली.



शेडनेट व पॉलिटनेल तयार करताना त्यांना तालुका कृषी विभागातील अधिकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या रोपवाटिकेमुळे श्री. खुजे यांना उत्पादन व विक्रीतून दरवर्षी चार लाख रुपयांचा आर्थिक फायदा होतो. कृषी विभागांतर्गत आयोजित चर्चासत्रामध्ये त्यांना कृषी विभागातील विविध योजनांची माहिती मिळाली. कृषी विभागातील कृषी सहायक व्ही.एस. ठाकरे व कृषी पर्यवेक्षक ओ.व्ही. गहूकर, यांनी त्यांना मोलाचे मार्गदर्शन करून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर रोपवाटिका योजनेची माहिती दिली. माहिती मिळताच कृषी विभागाकडे अर्ज करून प्रशिक्षण घेतले आणि दोन महिन्यांत शेडनेट आणि पॉलिटनेल उभारणी करून रोपे तयार करून विक्री सुरू केली.

वांगी ५० हजार, टमाटर १० हजार, मिरची ३ लाख, कोबी ३५ हजार, टरबूज १ लाख, खरबूज १० हजार, तसेच झेंडू १० हजार अशा प्रकारे रोपे तयार करून विक्री करत असून याप्रमाणे दरवर्षी ३ लाख रुपयांचा नफा होत असल्याचे श्री. खुजे यांनी सांगितले.

**– श्वेता पोटुडे–राऊत,**
माहिती अधिकारी, नागपूर

## प्रगतिशील महिला शेतकरी मेघा देशमुख

परभणीपासून अवघ्या १५ किलोमीटर अंतरावरील झरी गावच्या मूळ असलेल्या मेघा देशमुख यांनी प्रयोगशील शेतकरी म्हणून नावलौकिक मिळवला आहे. त्यांची पूर्वपरिस्थिती फार बिकट होती. पतीची २१ वर्षांपूर्वीच साथ सुटल्यामुळे घरची आणि उत्पन्नाची सर्व जबाबदारी ही मेघा देशमुख यांच्यावर येऊन पडली. घरी ३८ एकर शेतजमीन पण पाणी नाही. त्या वेळी करायचे काय हाच प्रश्न त्यांच्यासमोर उभा होता. पण सर्व विचाराअंती मेघताई यांनी निर्धाराने शेती करायची ठरवून त्यांनी

प्रयत्न सुरू केले. चार वर्षांपूर्वी जमीन, वातावरण, पाण्याची कमतरता पिकांचा अनुभव बाजाराची मागणी आदी सर्व बाबींचा नीट अभ्यास करून तसेच येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ शास्त्रज्ञाच्या मार्गदर्शनानुसार काळ्या खडकाळ आणि चौपण (पाणी धरणाऱ्या) जमिनीच्या आठ एकर क्षेत्रावर त्यांनी पेरुची, तर आठ एकरवर लिंबोणी आणि नऊ एकरवर सीताफळाची लागवड केली. सोबतच उर्वरित १३ एकरावर सोयाबीन, हरभरा, ज्वारी, भुईमूग अशी आंतरपिकेदेखील त्यांनी घ्यायला सुरुवात केली.



मराठवाड्यात पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्याने त्या दरवर्षी पावसाळ्यात विहिरीचे पुनर्भरण करून घेतात. ज्यामुळे त्यांच्या विहिरीची पाणी पातळी वाढण्यास मदत होते. या उपाययोजनेद्वारे उपलब्ध झालेले पाणी पाटा न देता सूक्ष्म सिंचन पद्धतीने आणि ठिबकद्वारेच ते फळबाग जगवण्याचे काम करतात. त्यानंतर शेतीकामासाठी मजुरांची मोठी समस्या असल्याने कृषी यांत्रिकीकरणावर त्यांनी भर दिला आहे. मशागतीची कामे, बागेची छाटणी असे मेहनती काम त्या करतात.

माझ्या शेतीमध्ये शेतीसाठी पाण्याची खूप कमतरता होती. शेतातील विहिरीचे पावसाळ्यात पुर्नभरण करून घेतली. त्यानंतर ड्रिपींगद्वारे संपूर्ण फळबागेला पाणी पुरवले. कृषी क्षेत्राशी निगडित असलेले जोडव्यवसायदेखील आपण करायला पाहिजे. तसेच शेतकऱ्याने हार न मानता, आलेल्या परिस्थितीत निसर्गाशी सामना करायला शिकले पाहिजे. मला सांगायला आनंद वाटतो की, जेव्हा मी हे सुरू केले त्या वर्षी मला ६० टन पेरूचे उत्पादन झाले आणि त्यानंतरच्या वर्षात या उत्पन्नात वाढ होत गेल्याचे मेघा देशमुख यांनी सांगितले.

कृषी विभागाच्या आत्मा योजनेंतर्गत मेघा देशमुख यांनी इंदिरा महिला स्वयंसाहाय्यता शेतकरी बचतगटाची उभारणी करत महिलांना रोजगार उपलब्ध करून त्या महिलांना सक्षम करण्याचे काम करत आहेत. या बचतगटाच्या माध्यमातून पोकराअंतर्गत त्यांनी धान्याची साठवणूक करण्याकरिता गोडाऊन उभारणीकरिता ६० टक्के अनुदानावर ६० लाखाचे कर्ज मिळवून गोडाऊनची उभारणी केली. या माध्यमातून बचतगटातील महिलांना रोजगार मिळण्यास तसेच त्यांची आर्थिक उन्नती होण्यास मदत झाली. श्रीमती देशमुख यांच्या कार्याची दखल घेत, अनेक पुरस्कारांनी मेघा देशमुख यांना गौरवण्यात आले आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र शासनाचा जिजामाता कृषी भूषण पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

**संकलन – जिल्हा माहिती कार्यालय, परभणी**

## करिअरला लसणाची फोडणी !

स्वयंपाकघरात स्वादिष्ट जेवणासाठी लसणाची फोडणी ही तृप्तीची ढेकर द्यायला भाग पाडते; परंतु या लसूण पाकळ्या सोलून त्यावरील साल काढणे हे अत्यंत जिकिरीचे, कंटाळवाणे आणि वेळखाऊ काम असते. नेमके हेच हेरून यालाच महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचतगटाच्या प्रांजली प्रमोद सुभेदार यांनी करिअर बनवले आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेतून लसूण सोलून देणे, पेस्ट बनवून देण्याचा उद्योग त्यांनी सुरु केला आहे.



सावंतवाडी येथे तुळजाई एंटरप्राईजेस या नावाने लसूण प्रक्रिया उद्योग सुरू केला आहे. श्रीमती सुभेदार यांच्या पुतण्याचे हॉटेल होते. या हॉटेलसाठी त्यांना बाहेरून लसूण आणावा लागत असे आणि अगदी तोही सोलण्यासाठी पैसे द्यावे लागायचे. याच वेळी हाच उद्योग आपण सुरू केला, तर बचतगटातील महिलांनाही रोजगार मिळेल, शिवाय आपल्यालाही स्वयंरोजगार उपलब्ध होईल, ही संकल्पना त्यांच्या मनात चमकून गेली.



गुजरात, मुंबई येथून उद्योगासाठी आवश्यक असणारे लसूण गड्डे मागवून ऑक्टोबर २०२२ पासून त्यांनी हा उद्योग सुरू केला. त्यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामग्री घेण्यासाठी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेतून जिल्हा सिंधुदुर्ग बँकेतून साडे सहा लाखाचे कर्ज घेतले. यामध्ये ३५ टक्के अनुदान मिळाले. या यंत्रांच्या माध्यमातून लसूण गड्ड्याच्या पाकळ्या वेगळ्या करणे, त्याची प्रतवारी करणे, पाकळ्यांवरील साल काढणे ही कामे केली जातात. यानंतर बचतगटातील आठ महिलांकडून पाकळ्यांची साफसफाई केली जाते. यासाठी महिलांना मजुरी दिली जाते. हा सोललेला लसूण तसेच लसणाची पेस्ट मागणीनुसार गोवा, सिंधुदुर्गमधील हॉटेलसाठी पुरवले जाते. या व्यवसायाला खूप चांगली मागणी असून. चांगले अर्थार्जन होत आहे.

**– प्रशांत सातपुते,**
जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग

## रेशीम शेतीचे गाव

जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रेशीम शेती वरदान ठरत आहे. या जिल्ह्याच्या भोकरदन तालुक्यातील वालसा डावरगाव येथील एक नव्हे, तर सुमारे ३२ शेतकरी रेशीम शेती करून भरघोस उत्पन्न घेत आहेत. जिल्ह्यात वालसा डावरगाव या गावाने रेशीम शेतीचे गाव म्हणून नवी ओळख निर्माण केली आहे.

या गावात शेतीबरोबरच दुग्धव्यवसायावर लोकांचा भर आहे. मूग, उडीद, मका, सोयाबीन, गहू, ज्वारी, हरभरा ही पिके प्रामुख्याने घेतली जातात. मात्र बदलत्या हवामानामुळे भेडसावणाऱ्या नैसर्गिक आपत्तीने शेतीतून जेमतेम उत्पन्न प्राप्त होते. या परिस्थितीवर मात करण्यासाठी गावातील काही शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळण्याचा निश्चिय केला. त्यांनी रेशीम विकास कार्यालयाला भेट देऊन संपूर्ण माहिती जाणून घेतली.

वालसा डावरगाव येथील बबन माधवराव साबळे यांच्याकडे ३.५० एकर शेती आहे. पारंपरिक पिकातून त्यांना फारसे उत्पादन मिळत नव्हते. शेतकऱ्यांसाठी रेशीम शेती खरोखरच वरदान आहे. प्रारंभी आम्ही सहा शेतकऱ्यांनी मिळून एक गट तयार केला आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रेशीम शेती करण्याचा निर्णय घेतला. रेशीम कार्यालयाकडून सखोल माहिती घेतली. आम्हाला एकरी १ लाख ८४ हजार ३७० रुपये अकुशलसाठी व १ लाख १० हजार ७८० रुपये कुशलसाठी असे एकूण २ लाख ९५ हजार १५० रुपये इतके अनुदान एकरी ३ वर्षांसाठी मंजूर केले. पहिल्या वर्षी केवळ दोन वेळा कोष उत्पादन घेण्यात आले. पहिल्या वेळी ३५ किलो, तर दुसऱ्या वेळी १०० किलो असे एकूण १३५ किलो कोष उत्पादन घेण्यात आले. त्यातून ६५ हजार रुपये उत्पन्न मिळाले. दुसऱ्या वर्षी ४५० किलो कोष उत्पादनातून २ लाख २५ हजार रुपये, तर तिसऱ्या वर्षी ८०० किलो कोषातून ५ लाख ६० हजार रुपये इतके उत्पन्न मिळाले. प्रत्येक वेळी कोष उत्पादन घेण्यासाठी साधारणतः ७ ते १० हजार रुपये इतका खर्च येतो.



रेशीम शेतीचा हा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वालसा डावरगावात शासनाच्या योजनेच्या माध्यमातून सुमारे ३२ शेतकरी जोमाने रेशीम शेती करत आहेत.

**– प्रमोद धोंगडे,**
जिल्हा माहिती अधिकारी, जालना

## काजू उत्पादनात यशस्वी वाटचाल

नोकरीच्या पाठीमागे लागून आपला गाव सोडून स्थलांतरित होणाऱ्या युवकांची संख्या आता रोडावत चालली आहे. नोकरी करण्यापेक्षा आपल्या गावातच आपण व्यवसाय सुरू करून इतरांना रोजगार देऊया, या विचारातून वेंगुर्ले तालुक्यातील मोचेमाड येथील किशोर ऊर्फ विश्राम सीताराम गावडे या युवकाने शिवमाऊली ग्रोच्या माध्यमातून काजू प्रक्रिया उद्योग उभारला. विविध फ्लेव्हरचे काजू उत्पादन करत त्याने यशस्वी वाटचाल सुरू ठेवली आहे.

अवघ्या एक लाखाच्या भांडवलात छोट्या प्रमाणात काजू प्रक्रिया उद्योगाची सुरुवात केली. मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत १ कोटी ७० लाख ४५ हजार रुपयांच्या प्रकल्प खर्चाचा प्रस्ताव विस्तारीकरणासाठी सादर केला. चालू वर्षी २० व २० लाखांचे दोन हप्ते मंजूर करण्यात आले आहेत.

ग्राहकांची चवदार मागणी आणि बदलत्या बाजाराचा कानोसा घेत विश्रामने ग्रीन चिली, रेड चिली, गार्लिक, शेजवान, ब्लॅक पेपर, पाणीपुरी, टोमॅटो, रोस्टेड इम, सॉल्टेड पकोडा अशा फ्लेव्हर्डचे प्रक्रिया काजू उत्पादन सुरू केले आहे. हे विविध प्रकार ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहेत. गोवा, मुंबई आणि स्थानिक बाजारपेठेत याची विक्री होते. या प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक कामगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. दररोज १२०० किलो काजूवर प्रक्रिया करण्यात येते. काजूची टरफले तेल काढण्यासाठी कारखान्याला योग्य दरात दिली जातात. यासाठी लागणारा काजू थेट शेतकऱ्यांकडून व काही प्रमाणात व्यापाऱ्यांकडून खरेदी केला जातो.

असाच प्रक्रिया उद्योग कुडाळ येथील एम.आय.डी.सी.मध्ये मे.जी.एच. कॅश्यूच्या माध्यमातून गायत्री गुरुप्रसाद गोलम यांनी उभारला आहे. मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजनेंतर्गंत १ कोटी १८ लाख ४० हजार रुपये खर्चाचा प्रकल्प सादर केला. यासाठी अनुदानाचा पहिला व दुसरा १२



लाख रुपये मंजूर करण्यात आले. दररोज ५०० किलो काजूवर प्रक्रिया करण्यात येते. या माध्यमातून ३० कामगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. मुंबई, पुणे, लोणावळा, नागपूर, राजस्थान, सुरत येथील बाजारात विक्री करतात.

**– रणजीत पवार,**
उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, सिंधुदुर्ग

### खाद्य तंत्रज्ञ ते सरबत उत्पादक

वाढत्या उन्हाळ्यात थंडगार सरबताचा गोडवा मानवाला आल्हाददायक बनवतो. कोकणच्या निसर्गरम्य भूमीत पिकणाऱ्या रानमेव्याचा नैसर्गिक गोडवा जर सरबतातून मिळाला तर... हाच विचार घेऊन 'द रियल टेस्ट ऑफ कोकण' ही ओळख घेऊन फूड टेक्निशियन असणाऱ्या संगीता श्याम माळकर रा. वेतोरे ता. वेंगुर्ले यांनी 'गोडवा' या नावाने सरबत निर्मितीचा उद्योग सुरू केला आहे.

श्रीमती माळकर या पूर्वी ठाण्यामध्ये राहत होत्या. त्यावेळी त्या इतर उत्पादनाच्या मार्केटिंग करत होत्या. फूड टेक्नोलॉजिचा त्यांनी यामध्ये डिप्लोमाही केला आहे. त्यानंतर त्यांनी स्वत:च्या कोकणातील मूळ गावी येऊन कुडाळ एम.आय.डी.सी.मध्ये 'वत्सला एंटरप्राईजेस' नावाने सरबत निर्मितीचा प्रकल्प सुरू केला. भाऊ परेश वरवडेकर यांनी सद्य:स्थितीत या प्रकल्पाचा विस्तार करण्यासाठी 'मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत' चालू वर्षी १ कोटी ७ लाख ५० हजार प्रकल्प खर्चाचा प्रस्ताव सादर केला. यासाठी त्यांना दोन हप्त्यांचे मिळून २० लाख ४० हजार रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे.



सध्या 'गोडवा' या नावाने आंबा, कोकम, अननस, फणस, जांभूळ, ऑरेंज, करवंद, कैरी, आवळा या सरबतांबरोबरच पल्प, घावण, आंबोळी, कुळीथ पिठांबरोबर फणसपोळी, फणसवडी, आंबापोळी, आंबावडी, कोकणी मसाला, सांडगी, मिर्ची, जाम अशी जवळपास ३५ प्रकारची उत्पादने तयार केली जातात. नैसर्गिक स्वाद ग्राहकाला मिळण्यासाठी थेट स्थानिक शेतकऱ्यांकडून फळांची खरेदी केली जाते. या प्रकल्पामध्ये महिला व पुरुष अशा २० जणांना रोजगार उपलब्ध झाला आहे. ग्राहकांच्या आरोग्याची काळजी घेत काही उत्पादनांमध्ये साखरेऐवजी गुळाचा वापर करण्यात आला आहे.

या उत्पादनाची विक्री मुंबई, गुजरात, बेंगलोर, तेलंगणा, नागपूर व स्थानिक बाजारपेठांमध्ये केली जाते. भविष्यातही या उत्पादनांची निर्यात करण्यासाठी आमचा प्रयत्न राहील, असे श्रीमती माळकर व श्री. वरवडेकर यांनी सांगितले.

**– रणजीत पवार,**
उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, सिंधुदुर्ग

### काजू प्रक्रियेतून स्वयंपूर्ण

महिला आर्थिक विकास महामंडळ, माहेर लोकसंचालित साधन केंद्र, सावंतवाडीद्वारे संचालित सातार्डा, घोगळवाडी येथील यशस्वी स्वयंसाहाय्यता महिला बचतगटाने काजू प्रक्रिया उद्योग सुरू करून महिलांची आर्थिक बाजू स्वयंपूर्ण केली आहे.

महिला बचतगट म्हटले की, आपसूकच लोणची पापड, मसाले ही उत्पादने डोळ्यासमोर येतात; परंतु याला फाटा देत यशस्वी स्वयंसाहाय्यता महिला बचतगटाने काजू प्रक्रिया उद्योग यशस्वी केला आहे. काजू बी खरेदीपासून त्याच्या विविध प्रतवारीनुसार विक्रीतून आर्थिक उत्पन्न मिळवत आहे. शिवाय काजूच्या राहिलेल्या तुकड्यांमधून काजू मोदक, बर्फी, लाडू, खारे काजू, मसाला काजू अशा उत्पादनांनीही बाजारपेठ मिळवली आहे. याबाबत राजश्री पारितपते यांनी माहिती दिली. त्या म्हणाल्या, माविम अंतर्गत महिला बचतगट स्थापन झाला. या बचतगटात १० महिला असून, सेंट्रल बँकेकडून २ लक्ष ४० हजार रुपयांचे कर्ज घेतले. या कर्जातून सुरुवातीला २ ते ३ वर्ष आम्ही काजू प्रक्रिया व्यवसाय सुरू केला; परंतु त्यामधील मार्केटिंगची बाजू हाताळण्यासाठी सीएमआरसीचे सहकार्य आणि मार्गदर्शन घेतले.



सध्या अन्य महिला बचतगटातील शेतकरी महिलांकडून आम्ही काजू बी खरेदी करतो. बाजारभावापेक्षा एखादा रुपया जास्तीचा देत अशा काजू बीवर प्रक्रिया करून स्वयंचलित कटरवर कट करतो. आतील काजूगर ड्रायरवर वाळवण्यात येतो. त्यानंतर त्याची प्रतवारी करण्यात येते. या प्रतवारीनुसार त्याचा दर ठरतो. असा तयार काजू आकर्षक वेष्टनामधून घाऊक तसेच किरकोळ स्वरूपात विक्री केला जातो. ही प्रक्रिया करत असताना काही प्रमाणात काजू कणी आणि तुकड्याच्या स्वरूपात काजू तयार होतो. यापासून मोदक, बर्फी, लाडू असे पदार्थ बनवण्यात येत आहेत. या पदार्थांनाही बाजारपेठेत चांगली मागणी असल्याने गटाला आर्थिक उत्पन्न मिळत आहे. काजू प्रक्रिया उद्योगात काम करणाऱ्या महिलांनाही चांगला रोजगार दिला जातो.

सुरुवातीला घरातील पुरुष मंडळींकडून पैसे घ्यावे लागायचे; परंतु सद्य:स्थितीत काजू प्रक्रिया उद्योगाने आम्हा महिलांना आर्थिक उत्पन्न देऊन स्वयंपूर्ण बनवले आहे.

**– प्रशांत सातपुते,**
जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग

**आज महिलाही शेतात महत्त्वाच्या भूमिका बजावताना दिसत आहेत. शेतीतील रोजगारातही त्यांचा वाटा मोलाचा ठरत आहे. शेतातील महिलांचा सहभाग वाढणे खरेच सकारात्मक म्हणावे लागेल. कारण यामुळे कोणी प्रगतिशील शेतकरी म्हणून पुढे येईल, तर कोणी रोजगाराच्या नव्या संधी शोधत येईल, तर काहींना शेतीपासून नवीन रोजगार मिळेल. महिलांचा शेतीतील सहभाग वाढतोय, मात्र जगण्याचा तिचा दैनंदिन संघर्ष कमी करण्यासाठी राज्य सरकारी योजनांमध्ये प्राधान्यक्रम ठरवून त्याची अंमलबजावणी सकारात्मकरीत्या दाखवली तरच या अन्नपूर्णांचे सबलीकरण होईल.**

# सन्मान शेतीतील 'ती'चा

**मीनल जोगळेकर**

शेतातील नांगर स्वतःच्या खांद्यावर मोठ्या कष्टपूर्वक ओढून नेणाऱ्या एका स्त्रीच्या छायाचित्राने सुमारे सात दशकांपूर्वी साऱ्यांचेच लक्ष वेधून घेतले होते. हे छायाचित्र होते, १९५७ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मदर इंडिया' या चित्रपटाच्या प्रसिद्धीचे. पतिनिधनानंतर कुटुंब आणि शेतीची जबाबदारी प्रामाणिकपणे निभावणाऱ्या आदर्शवादी आणि कणखर स्त्रीच्या, या चित्रपटातील वास्तववादी चित्रणाने चित्रपटाला प्रचंड यश मिळालेच आणि ऑस्कर नामांकन मिळवणारा हा पहिला भारतीय चित्रपट ठरला. शेतीच्या कामांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने शारीरिक कष्ट उपसत आपल्या देशातील शेतकरी कुटुंबातील स्त्री, वर्षानुवर्षे हे चित्र यथार्थ ठरवत असली, तरी परंपरेने तिला दुय्यम श्रेय दिले होते. मात्र शेतीतील स्त्रीच्या श्रमांची, शेती व अन्न उत्पादनातील तिच्या योगदानाची स्वतंत्र दखल आज समाज घेऊ लागला आहे.

## महिला : शेतीचा कणा

महिलांची कृषी क्षेत्रामध्ये महत्त्वाची भूमिका आहे. शेतीमधील नियमित - प्रासंगिक - कष्टाची - किचकट - वेळखाऊ अशी सर्वच प्रकारची कामे त्या करतात. शेतीतील हंगामपूर्व मशागतीपासून धान्य घरात येईपर्यंत, धान्य साठवणूक, वाळवणी, शेतीपूरक पशुधनाची काळजी घेणे, त्यांचे गोठे साफ करणे, दूध काढणे, त्यांना चारा व पाणी देणे, कोंबड्या-शेळ्या-मेंढ्या पाळणे, त्यांची निगा राखणे, त्यांच्यापासून मिळणाऱ्या उत्पादनांतून घरातील गरज भागविणे व अधिकच्या उत्पादनाची विक्री करून त्यातून चार पैसे गाठीला बांधणे, सामाजिक वनीकरण, मत्स्यपालन यांसारखी अनेकानेक कामे महिला वर्षानुवर्षे करतात. ज्यांच्याकडे स्वतःची शेती नाही अशा कुटुंबांमधील महिला इतरांच्या शेतात मजुरी करून कुटुंबाला हातभार लावतात. महिला या अन्नधान्याच्या प्राथमिक उत्पादक आहेत, जैवविविधतेच्या संरक्षक आहेत, एकप्रकारे शेतीचा कणा आहेत.

## शेतीत महिलांचा सहभाग

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात २६.३१ कोटी शेतकरी असून त्यामध्ये २२.७१ कोटी पुरुष आणि ३.६० कोटी





महिला आहेत. त्याचबरोबर देशात एकूण १४.४३ कोटी शेतमजूर असून त्यामध्ये ८.२७ कोटी पुरुष आणि ६.१६ कोटी महिला आहेत. २००१ ते २०११ या कालावधीत महिला शेतकऱ्यांची संख्या कमी झाली असली तरी शेती करणारी, शेतमालाच्या व्यापारविषयीचा निर्णय घेणारी, शेतमजुरी करणारी अशा वेगवेगळ्या भूमिका पेलणाऱ्या महिलांची संख्या वाढत आहे. ग्रामीण भागांतून मोठ्या प्रमाणात पुरुष शहरी भागांत स्थलांतर करत असल्यामुळे घरातील महिलेकडे शेतीची जबाबदारी येत असते. काही ठिकाणी शेतकरी नवऱ्याच्या मृत्यूनंतर कुटुंबाच्या आणि समाजाच्या विरोधाला तोंड देत, अपुऱ्या संसाधनांच्या मदतीने आज कितीतरी एकट्या महिला शेती करत आहेत. कृषी क्षेत्र आज महिलांचे क्षेत्र होत चालले आहे. महिलांना कृषी योजनांचा लाभ प्राधान्याने देण्याचे धोरण शासनानेही अंगीकारले आहे.

## शेतजमिनीची मालकी आणि महिला

'ज्याच्या नावावर सातबारा, तो शेतकरी', या महसुली नियमामुळे शेतीमध्ये कष्ट करूनही महिलांना शेतकरी म्हणून मान्यता आणि लाभ मिळण्यास अडचणी येत असत.

**१५ ऑक्टोबर हा दिवस 'राष्ट्रीय महिला शेतकरी दिन' म्हणून साजरा करण्यात येत असून, शेतीतील महिलांचे योगदान यानिमित्त अधोरेखित करण्यात येते.**

जमिनीच्या वारसा हक्कासंदर्भात महिलांना कायदेशीर हक्क असले तरीही, सामाजिक आणि सांस्कृतिक रीतीभातींमुळे बहुतांश महिलांना जमिनीची मालकी नाकारली जात असे. हे लक्षात घेऊन, 'शेतकरी' म्हणून दर्जा मिळण्यासाठी शेतजमिनीवर महिलांची नावे असावीत, हा द्रष्टा निर्णय घेणारे महाराष्ट्र देशात पहिले राज्य आहे.

१५ सप्टेंबर १९९२ला महसूल आणि वन विभागाने याबाबत परिपत्रक काढले होते. एखाद्या पुरुषाला स्वखुशीने आपल्या जमिनीच्या कागदपत्रांमध्ये पत्नीच्या नावाची नोंद सह-हिस्सेदार म्हणून करायची असेल, तर त्याने विनंती केल्यास तशी नोंद फेरफार उताऱ्यात केली जाते.

जमिनीवर महिलांची मालकी असेल, तर त्या महिलांची आर्थिक व सामाजिक सुरक्षा उत्तम राहते. जमिनीचे हक्क महिलांना कुटुंबात पत मिळवून देतात आणि त्या महिलेची समाजातील प्रतिष्ठा वाढते. जमिनीवरील स्वत:च्या मालकीमुळे स्त्रियांच्या हातात वाटाघाटी करण्याचे बळ येते.

## शाश्वत विकासात योगदान

शेती सुलभपणे करण्यासाठी संसाधने, सिंचन आणि कर्ज यांचा पुरवठा, मालाची स्थानिक पातळीवर हमीभावाने खरेदी, मालाला बाजारपेठ, शाश्वत शेतीला प्रोत्साहन, संस्थात्मक सुरक्षितता, संसाधनांवर अधिकार आणि शेती व्यवस्थापनातील निर्णयप्रक्रियेमध्ये सहभाग यांसारख्या मुख्य गरजा लक्षात घेऊन, शेती व्यवसायाला आणि महिलांच्या विकासाला पूरक अशा शासकीय योजना आखल्या जात आहेत.

कष्टाने नांगर ओढणारी, आत्मविश्वासाने ट्रॅक्टर चालवणारी अशी महिला शेतकऱ्यांची आश्वासक वाटचाल कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या शाश्वत विकासातील महिलांचे योगदान अधोरेखित करणारी आहे, हे नक्की.

वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)

**राज्य शासनाच्या वतीने विविध योजनांचा शुभारंभ करण्यात येत असून, या योजनांबरोबर नवीन प्रकल्प, रेल्वे उड्डाणपूल, इमारतींचे लोकार्पण करण्यात येत आहे. याच पद्धतीने राज्यात विविध प्रकल्पांसाठी सामंजस्य करार होत आहेत. मंत्रिमंडळातील सर्व सदस्य त्या-त्या विभागाच्या बैठका घेऊन अधिकाऱ्यांना सूचना, निर्देश देऊन सर्वसामान्य नागरिकांच्या कामाला प्राधान्य देण्याचे काम करत आहेत.**

# पाऊल पडते पुढे

## सर्वांगीण ग्रामसमृद्धी योजनेचा शुभारंभ

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही ग्रामीण भागाला समृद्ध करणारी योजना असून, खऱ्या अर्थाने ते विकासाचे इंजिन आहे. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्याचे काम होईल. त्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) आणि विविध विभागांच्या योजनांचे अभिसरण करून सुविधासंपन्न कुटुंब मिशन राबवणे आणि सर्वांगीण ग्रामसमृद्धी योजनेचा शुभारंभ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे राज्यपाल श्री. बैस यांच्या हस्ते झाला. त्या वेळी आयोजित 'झेप अभिमानाची-स्वाभिमानाची -जगण्याची' कार्यक्रमात राज्यपाल श्री. बैस बोलत होते.

या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे, आमदार ॲड. आशिष जयस्वाल, आमदार महेंद्र दळवी, रोहयो आणि इतर बहुजन कल्याण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव नंदकुमार, 'मनरेगा' आयुक्त शांतनू गोयल व्यासपीठावर उपस्थित होते.



सर्वांगीण ग्रामसमृद्धी योजनेचा शुभारंभ करताना राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आदी.

## कर्तृत्ववान महिलांचा सत्कार

सामाजिक कार्य, राजकारण, प्रशासन, खेळासह प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांबरोबरीने कार्य करत आहेत. त्यामुळे स्त्री शक्ती पुरुषांपेक्षा किंचितही मागे नाही. सर्वच क्षेत्रात महिला अग्रेसर आहेत. या महिलांचा आम्हाला अभिमान असून महिलांच्या सबळीकरणासाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त राज्य शासनाचा पर्यटन विभाग आणि इंडियन ऑइलच्या संयुक्त विद्यमाने गेट वे ऑफ इंडिया येथे महाराष्ट्रातील कर्तृत्ववान महिलांच्या जीवनावर आधारित विशेष मल्टी मीडिया प्रकाश आणि ध्वनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायूमंत्री हरदीपसिंह पुरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, पर्यटन, कौशल्य विकास, महिला आणि बालविकासमंत्री मंगल प्रभात लोढा, जी२० महिला विभागाच्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा, इंडियन ऑईलचे अध्यक्ष श्रीकांत वैद्य, विपणन संचालक व्ही. सतीशकुमार, महिला व बालविकास विभागाच्या प्रधान सचिव आय. एस. कुंदन, मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, संचालक डॉ.बी. एन. पाटील, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू उज्ज्वला चक्रदेव, सामाजिक कार्यकर्त्या अमृता फडणवीस आदी उपस्थित होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

## प्रकल्पांना अर्थसाहाय्य करण्याबाबत चर्चा

मुंबई तसेच महाराष्ट्रात येणाऱ्या काळात अनेक मोठे विकास प्रकल्प सुरू होत आहेत, जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी-जायका यांनी यासाठी अर्थसाहाय्य करावे, अशी विनंती मुख्यमंत्री एकनाथ

शिंदे यांनी केली. वर्षा येथे जायकाचे अध्यक्ष डॉ. तनाका अखिको, मुख्य प्रतिनिधी साईतो मित्सुनोरी आणि शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन विविध विकास प्रकल्पांबाबत चर्चा केली. राज्य शासनाला जायकाचे सहकार्य राहील, अशी ग्वाही दिली. जायकाच्या शिष्टमंडळात ताकूया ओत्सूका, मसनोरी सकामोटो, अनुराग सिन्हा आदींचा समावेश होता. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे (एमएमआरडीए) राधेश्याम महानगर आयुक्त एसव्हीआर श्रीनिवासन, मंत्रालयातील वॉर रूमचे महासंचालक राधेशाम मोपलवार, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजकुमार देवरा आदींची उपस्थिती होती.

## लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे स्मारक व पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण

लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी अठरापगड जातींसाठी काम केले. आपल्या कामामुळे ते लोकनेते या बिरुदाचे मुकुटमणी होते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

नांदूरशिंगोटे, ता. सिन्नर, जि.नाशिक येथे लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे स्मारक व पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या उपस्थितीत आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी पालकमंत्री दादाजी भुसे, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारतीताई पवार, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार प्रीतम मुंडे, खासदार हेमंत गोडसे, माजी मंत्री छगनराव भुजबळ, बाळासाहेब थोरात, पंकजाताई मुंडे, आमदार नरेंद्र दराडे, किशोर दराडे, माणिकराव कोकाटे, देवयानी फरांदे, मोनिका राजळे, सुहास कांदे, हिरामण खोसकर, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अमिषा मित्तल, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शीतल सांगळे, माजी आमदार प्रकाश वाजे, उदय सांगळे, हेमंत धात्रक आदी उपस्थित होते.

## 'महापशुधन एक्सपो २०२३'चा समारोप

'शेतकरी केंद्रबिंदू ठेवून शासन काम करत आहे. अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासन वाऱ्यावर सोडणार नाही,' अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिर्डी येथील महापशुधन प्रदर्शन समारोप कार्यक्रमात दिली. 'श्रीसाईबाबांच्या पावन स्पर्शाने पुनित झालेल्या शिर्डीमध्ये 'थीम पार्क' उभे करण्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. नगरविकास विभागाच्या माध्यमातून यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल,' असे मुख्यमंत्र्यांनी आश्वस्त केले.



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

राज्य शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या वतीने शिर्डी येथे आयोजित तीन दिवसीय 'महापशुधन एक्सपो २०२३'चा समारोप व बक्षिस वितरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकासमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, ग्रामविकास व पंचायतराज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीश महाजन, खासदार सदाशिवराव लोखंडे, खासदार डॉ. सुजय विखे, आमदार सर्वश्री जयकुमार गोरे, बबनराव पाचपुते, राहुल कूल, मोनिका राजळे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले, 'महानंदा'चे चेअरमन राजेश परजणे, पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव जगदीश प्रसाद गुप्ता आदी उपस्थित होते.

## मुंबादेवी परिसराचा पुनर्विकास

श्री काशी विश्वनाथ मंदिराच्या धर्तीवर मुंबादेवी मंदिर परिसराचा पुनर्विकास करणार आहे. त्यासाठी मुंबादेवी मंदिर विकास प्राधिकरणाची स्थापना करण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

काळबादेवी येथील मुंबादेवीचे दर्शन घेऊन या परिसराची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या वेळी विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार सदा सरवणकर, माजी मंत्री डॉ. दीपक सावंत, माजी मंत्री राज के. पुरोहित व माजी नगरसेवक आकाश पुरोहित, अतिरिक्त महापालिका आयुक्त पी. वेलारासु आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना सुलभपणे कर्ज द्यावे

शेतकऱ्यांना सहजपणे पीक कर्ज मिळावे, बँकांनी सिबिल स्कोअरचे निकष त्यांना लावू नयेत, शेतकरी, कष्टकरी, सहकार यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन प्रयत्न करत असून बँकांनी देखील या दृष्टीने या क्षेत्रासाठी पतपुरवठा धोरण आखावे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

नाबार्डतर्फे सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित स्टेट क्रेडिट सेमिनारमध्ये ते बोलत होते. या वेळी नाबार्डच्या २०२३-२४च्या स्टेट फोकस पेपरचे प्रकाशनही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या स्टेट फोकस पेपरमध्ये विविध प्राधान्य क्षेत्रांसाठी ६ लाख ३४ हजार ०५८ कोटी रुपयांच्या क्रेडिट क्षमतेचा आराखडा देण्यात आला आहे. २०२१-२२ या कालावधीच्या तुलनेत या आराखड्यात ४७ टक्के वाढ झाल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले.

या वेळी सहकारमंत्री अतुल सावे, कृषिमंत्री अब्दुल सत्तार, आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत, कृषी, सहकार, पणन विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच प्रमुख बँकर्सदेखील उपस्थित होते.

## रस्ते सुरक्षा परिषदेची बैठक

रस्ते अपघात रोखण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी कठोर उपाययोजना

# नुकसानग्रस्त शेतीची पाहणी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील बिजोटे, आखतवाडे, निताणे; धाराशिव तालुक्यातील वाडी बामणी आणि अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील वनकुटे गावातील अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे नुकसान झालेल्या शेतीची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला.

नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील बिजोटे, आखतवाडे, निताणे या गावामध्ये बिगरमोसमी पाऊस, वादळी वारा व गारपिटीमुळे बाधित झालेल्या पिकांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाहणी केली. या वेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद



धाराशिव तालुक्यातील अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे.

साधून झालेल्या नुकसानाची माहिती घेतली. नुकसानाचे तातडीने पंचनामे करुन अहवाल तत्काळ शासनास सादर करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून मंत्रिमंडळात मदतीबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी देऊन या वेळी शेतकऱ्यांना धीर दिला.

या वेळी पालकमंत्री दादाजी भुसे, बागलाणचे आमदार दिलीप बोरसे, जिल्हाधिकारी गंगाथरन् डी., मालेगावच्या अपर जिल्हाधिकारी माया पाटोळे, बागलाणचे प्रांत बबन काकडे, तहसीलदार जितेंद्र इंगळे, गटविकास अधिकारी पी.एस.कोल्हे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक सोनवणे, नितानेचे सरपंच अशोक देवरे उपस्थित होते.

धाराशिव तालुक्यातील वाडी बामणी येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला. येथील बाबासाहेब उंबरदंड आणि साधना उंबरदंड या शेतकरी दाम्पत्याच्या कलिंगड आणि ड्रॅगन फ्रूट बागेच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी पालकमंत्री तथा सार्वजनिक आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, आमदार राणा जगजितसिंह पाटील, माजी खासदार रवी गायकवाड, विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर, छत्रपती संभाजी नगरचे विशेष पोलिस महानिरीक्षक के. एम. एम. प्रसन्ना, जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी तुळजापूर तालुक्यातील मोर्डा येथील सीताबाई उत्तम सुरवसे आणि उत्तम सुरवसे या शेतकरी दाम्पत्याच्या द्राक्ष बागेची पाहणी केली. दोन एकर क्षेत्रावरील द्राक्ष बाग वादळी पावसाने भुईसपाट झाली आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सुरवसे दाम्पत्याची आपुलकीने विचारपूस केली. त्यांना धीर दिला. राज्य शासन आपल्या पाठीशी ठामपणे उभे असल्याची ग्वाही दिली. सुरवसे यांच्या भुईसपाट झालेल्या द्राक्ष बागेत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नुकसानाची पाहणी केली.

अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील वनकुटे गावात नुकतेच वादळी वारा, गारपिटीसह झालेल्या ढगफुटीसदृश पावसाने झालेल्या नुकसानाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाहणी केली. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, यासाठी युद्धपातळीवर पंचनामे करून एका आठवड्यात शेतकऱ्यांच्या खात्यात आर्थिक मदत वितरित करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी उपस्थित शेतकऱ्यांना दिली.

या वेळी मुख्यमंत्र्यांनी वनकुटे गावातील शेतकरी व ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी जाणून घेत पडझड झालेल्या घरांची तातपुरत्या स्वरूपात उभारणी करण्याचे आदेश दिले. वनकुटेमधील पडझड झालेल्या २२ कुटुंबाना शबरी घरकुल योजनेमधून तत्काळ पक्की घरकुले उपलब्ध करून देण्याच्या सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी दिल्या.

पावसाने वनकुटे गावातील घरांची पडझड झाली आहे . कांदा, कलिंगड, टोमॅटो, उन्हाळी भुईमूग या पिकांसह मका, घास ही चारा पिके जमीनदोस्त झाली. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी गावाजवळील हिरामण बन्सी बर्डे, कचरू विठ्ठल वाघ यांच्या पडझड झालेल्या घरांची पाहणी केली. त्यांच्याशी आस्थेवाईकपणे संवाद साधला. त्यानंतर शेतकरी बबनराव रामभाऊ काळे, भागा पायगुडे, बबन मुसळे व बाबाजी मुसळे यांच्या शेतीमधील कांदा, मिरची यासह डाळींब, संत्रा, आंबे, या फळपिकांच्या नुकसानाची मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी पाहणी करून झालेल्या नुकसानाची माहिती जाणून घेतली.

या वेळी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार डॉ. सुजय विखे-पाटील, खासदार सदाशिव लोखंडे, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर आदी उपस्थित होते.

करण्याची आवश्यकता असून हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

सह्याद्री अतिथिगृह येथे राज्य रस्ते सुरक्षा परिषदेची १२वी बैठक झाली. या वेळी सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, सार्वजनिक आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये, परिवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी व सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## मुंबईतील एमयुटीपी प्रकल्पांसाठी सहकार्य

मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट्स (एमयुटीपी) हे मुंबई महागनर (एमएमआर) क्षेत्रातील नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. या प्रकल्पांसाठी राज्य सरकार पूर्ण सहकार्य करेल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. हे प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावेत, यासाठी राज्य शासनाच्या संबंधित सर्व यंत्रणांनी भू-संपादन, पुनर्वसन यांसह आर्थिक सहभागाच्या अनुषंगाने प्राधान्याने कार्यवाही करावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिले.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी हे सर्व प्रकल्प कालबद्ध पद्धतीने पूर्ण व्हावेत, यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देशित करून एमएमआरडीएसह अन्य यंत्रणांच्या वित्तीय तसेच करार आदी बाबींवर वेळेत कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन (एमआरव्हिसी) च्यावतीने मुंबईत सुरू असलेल्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांबाबत (अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्टस - एमयुटीपी) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथिगृह येथे सादरीकरण करण्यात आले.

या वेळी मुख्य सचिव मनु कूमार श्रीवास्तव, नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वन विभागाचे प्रधान सचिव वेणु गोपाल रेड्डी, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा जन्मदिवस 'स्वातंत्र्यवीर गौरव दिन' म्हणून साजरा

स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांचा २८ मे हा जन्मदिवस राज्य शासनामार्फत 'स्वातंत्र्यवीर गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. यासंदर्भात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांच्या प्रचार-प्रसारासाठी विविध कार्यक्रम, उपक्रम स्वातंत्र्यवीर गौरव दिनी आयोजित करण्यात येणार आहेत.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी, राष्ट्र उन्नतीसाठी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे महत्त्वाचे योगदान आहे. वीर सावरकरांनी अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला.

महाराष्ट्राच्या राजकीय घडामोडींमध्ये वीर सावरकरांनी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराष्ट्रातील आदर्श महापुरुष म्हणून ते आजही आदरणीय आहेत. त्यांच्या अतुलनीय योगदानाला आदरांजली अर्पण करण्यासाठी आणि तरुणपिढीला त्यांच्या देशभक्ती, धैर्य आणि प्रगतिशील विचारांना पुढे न्यायचे असेल, तर स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जन्मदिवस साजरा करणे आवश्यक आहे, असे मंत्री सामंत यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

महाराष्ट्रातील जनतेच्या भावनांचा विचार करून स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन करण्यासाठी २८ मे हा त्यांचा जन्मदिवस राज्य शासनाने 'स्वातंत्र्यवीर गौरव दिन' म्हणून साजरा करावा, अशी मागणी उद्योगमंत्री सामंत यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे केली होती. त्यानुसार या वर्षापासून २८ मे हा दिवस 'स्वातंत्र्यवीर गौरव दिन' साजरा केला जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली आहे.

## बार्टीच्या विद्यार्थ्यांना फेलोशिप मंजूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) वतीने देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत ८६१ विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. बार्टी, सारथी, टीआरटीआय, महाज्योती या संस्थांच्या वतीने पीएच.डी.साठी दिल्या जाणाऱ्या फेलोशिपकरिता एक सर्वंकष समान धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिले.

या मागणीसंदर्भात विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. या वेळी सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे आणि शिष्टमंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते. या वेळी ८६१ विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्याची मागणी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी मान्य केली. त्याचे स्वागत करतानाच विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. यापुढे फेलोशिपसाठी प्रवेश परीक्षा घेण्यात यावी, असा मुद्दाही या वेळी विद्यार्थ्यांनी मांडला.

## लाभार्थींशी संवाद

'आनंदाचा शिधा' उपक्रम सर्वसामान्यांच्या आयुष्यात आनंद देणारा ठरेल. हे काम खरे तर खूप मोठे असून हा उपक्रम राबवताना सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

वर्षा निवासस्थान येथे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभार्थींशी संवाद साधण्यासाठी उपस्थित कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या वेळी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री रवींद्र चव्हाण, अन्न नागरी पुरवठा विभागाचे सचिव विजय वाघमारे, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा कान्हूराज बगाटे, विभागाचे अधिकारी, राज्यातील सर्व जिल्ह्यांतील निवडक ५० लाभार्थी जिल्हाधिकारी कार्यालयातील एनआयसीच्या दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

या वेळी प्रातिनिधिक स्वरूपात

## ट्रूनॅट मशिनचे लोकार्पण

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत राज्यातील आदिवासीबहुल जिल्ह्यांसाठी १०० ट्रूनॅट मशिनचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, आरोग्य विभागाचे सचिव नवीन सोना, आयुक्त धीरजकुमार, सहसंचालक डॉ. सुनिता गोलाईत, उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे महाराष्ट्राचे कार्यकारी संचालक अर्निबन घोष, महाव्यवस्थापक गौतम दत्ता आदी उपस्थित होते.



इंडियन ऑईलच्या माध्यमातून सीएसआर निधीतून हे १०० ट्रूनॅट मशिन आरोग्य विभागाला उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याद्वारे क्षयरोग निदान लवकरात लवकर करण्यासाठी या मशिनचा उपयोग होते. राज्याला क्षयरोगमुक्त करण्याच्या मोहिमेसाठी या मशिनमुळे मोठे बळ मिळाल्याचे सांगत राज्याला क्षयरोगमुक्त करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी केले.

राज्यातील गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, नागपूर, ठाणे, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, पालघर, अमरावती, गोंदिया, यवतमाळ, रायगड, पुणे, अहमदनगर, नांदेड या जिल्ह्यातील आदिवासीबहुल भागात या मशिनच्या माध्यमातून क्षयरोग निदानासाठी वापर करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्या हस्ते आनंदाचा शिधा संचाचे वितरण ही लाभार्थ्यांना या वेळी करण्यात आले.

## रेल्वे उड्डाणपुलांचे लोकार्पण

'महारेलमार्फत राज्यात येत्या वर्षभरात १०० रेल्वे उड्डाणपूल उभारले जाणार असून पुढील पाच वर्षांत राज्यातील रेल्वेचा प्रवास हा फाटकमुक्त होईल,' अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. यासोबतच महारेलच्या माध्यमातूनच राज्यातील बसस्थानकेही विमानतळाप्रमाणे बांधून अद्ययावत करण्यात येतील व त्याची सुरुवात नागपूर बसस्थानकापासून करण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली. विदर्भातील रेल्वे उड्डाणपुलांच्या लोकार्पण आणि भूमिपूजन कार्यक्रमास दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून मुख्यमंत्री उपस्थित होते.

महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनतर्फे (महारेल) अजनी येथील पुलासह विदर्भातील नवीन सहा रेल्वे उड्डाणपूलांचे भूमिपूजन व सहा उड्डाणपुलाचे लोकार्पण केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. खासदार कृपाल तुमाने, जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष मुक्ता कोकड्डे, आमदार प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, मोहन मते, आशिष जयस्वाल, राजू पारवे, टेकचंद सावरकर आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

## 'समावेश-मेकिंग मुंबई इनक्ल्युझिव्ह मोहिमे'चा शुभारंभ

राज्य शासन, मुंबई महानगरपालिका व प्रोजेक्ट मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'समावेश-मेकिंग मुंबई इनक्ल्युझिव्ह मोहिमे'चा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. या वेळी दिव्यांगांना व्हिलचेअरचे वितरण करण्यात आले. तसेच त्यांच्या बास्केट बॉलचा विशेष सामनाही या वेळी ठेवण्यात आला.

कार्यक्रमास शालेय शिक्षणमंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, महिला व बालविकासमंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, राज्य उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, सहकार मंत्री अतुल सावे, मुंबई महानगरपालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव अभय महाजन, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रोजेक्ट मुंबई उपक्रमाचे संस्थापक शिशिर जोशी यांच्यासह संबंधित अधिकारी, मान्यवर उपस्थित होते.

## 'मुंबई मेटाव्हर्स' प्रकल्पाचे सादरीकरण

मुंबई बदलत असून 'मुंबई मेटाव्हर्स'चा उपक्रम नागरिकांना बदलत्या मुंबईचे

विलोभनीय दर्शन घडवेल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथिगृह येथे 'मुंबई मेटाव्हर्स' प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. या वेळी पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त इक्बाल सिंह चहल, अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, प्रधान सचिव सौरव विजय, 'एमएम आरडीए'चे महानगर आयुक्त एसव्हीआर श्रीनिवास, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी तसेच मुंबई मेटाव्हर्स'चे सदस्य उपस्थित होते. मुंबईतील विविध विकास प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ते दृश्य स्वरूपात कसे असतील, त्यांचा एकत्रित परिणाम कसा असेल, याबाबतचे सादरीकरण या वेळी करण्यात आले.

## आयएफसीसोबतचा भागीदारी करार

जीडीपीनुसार महाराष्ट्र हे देशातील सर्वांत मोठे राज्य आहे. देशाच्या उत्पादनात सर्वाधिक योगदान राज्य देते. २०२९ पर्यंत महाराष्ट्र ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याकडे वाटचाल करत आहे. जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी आयएफसी (इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन) सोबतची भागीदारी उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांनी केले.

राज्यातील पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीचा वेग वाढवण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने जागतिक बँक समूहाचा सदस्य असलेल्या आयएफसी (इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन) सोबत करार केल्यानंतर ते बोलत होते. या वेळी आयएफसीचे प्रादेशिक उपाध्यक्ष (आशिया आणि पॅसिफिक) रिकार्डो पुलिटी उपस्थित होते.

तीन प्रमुख क्षेत्रांतील सहकार्यासाठी हा करार करण्यात आला असून, त्यात सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) प्रकल्पांद्वारे खासगी भांडवलाची उभारणी, मालमत्तांचा सुयोग्य वापर आणि महानगरांच्या विकासासाठी निधीची उभारणी इत्यादींचा समावेश आहे. या माध्यमातून ऊर्जा, पारेषण आणि वितरण, रस्ते, विमानतळ, शहरी वाहतूक, औद्योगिक पार्क यांसारख्या क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी बदल होणार आहेत. ही व्यापक भागीदारी महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षणाला बळकटी देण्यासाठी आणि राज्यभरात दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्यसेवा पोहोचण्यासाठीसुद्धा उपयुक्त ठरेल.

## गोसीखुर्द प्रकल्पात जलपर्यटन

राज्यातील जलसंपदा प्रकल्पांच्या परिसरात पर्यटन विकासासाठी संधी असून या संधी विकसित करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. याचाच भाग म्हणून भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पात जल पर्यटन विकास करण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबवण्यात येईल, असे जलसंपदामंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



**देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्यात भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पात जल पर्यटन विकासाबाबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. त्या वेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

या कार्यक्रमास पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार नरेंद्र भोंडेकर, जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेंद्र मोहिते, पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील, पर्यटन विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालक श्रद्धा जोशी उपस्थित होत्या.

## नागपुरात ई-ग्रंथालयाचे लोकार्पण

नागपूर महानगरपालिकेमार्फत महाल येथील चिटणवीसपुरा ग्रंथालयाचे थाटात लोकार्पण होत असताना ज्यांना खरोखर गरज आहे, अशा गरीब गरजू विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाची संधी येथून मिळावी, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

नागपूर महानगरपालिकेमार्फत चिटणवीसपुरा येथील राजश्री छत्रपती शाहू महाराज ई-ग्रंथालयाचे केंद्रीय परिवहन महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते लोकार्पण झाले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री बोलत होते. केंद्रीय परिवहन महामार्गमंत्री नितीन गडकरी, आमदार प्रवीण दटके, विकास कुंभारे, मोहन मते, महानगरपालिकेचे आयुक्त राधाकृष्णन बी. अतिरिक्त आयुक्त अजय गुल्हाने आदी या वेळी उपस्थित होते.

## रेडी रेकनरच्या दरात वाढ नाही

वार्षिक बाजारमूल्य दर म्हणजेच रेडी रेकनरचे दर प्रत्येक वर्षी १ एप्रिल रोजी जाहीर करण्यात येतात. त्यानुसार स्थावर व जगंम मालमत्तेचे सरासरी दर निश्चित करण्यात येतात. या वर्षी क्रेडाई, विकासक व इतर सामान्य नागरिकांकडून जमीन व इमारत या मिळकतींच्या दरांमध्ये कोणतीही वाढ करण्यात येऊ नये, अशी विनंती राज्य शासनास करण्यात येत होती. या निवेदनांचा सकारात्मक विचार करून रेडी रेकनरच्या दरात कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी सांगितले.



**राधाकृष्ण विखे-पाटील**
मंत्री, महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास

येत्या आर्थिक वर्षात म्हणजेच २०२३-२४ च्या वार्षिक दर विवरणपत्र दरात कोणताही बदल न करता ते मागील वर्षाप्रमाणेच कायम ठेवण्यात आले आहेत. रेडी रेकनरचे दर स्थिर ठेवल्यामुळे मालमत्ता खरेदी व विक्री करणाऱ्या दोघांनाही फायदा होतो. सामान्य नागरिकांना घर खरेदी करण्यास प्रोत्साहन मिळते. तसेच बांधकाम व्यावसायिक, घरकुल विकासक, रिअल इस्टेटमध्ये काम करणारे मध्यस्थ, वकिल व सल्लागार आणि स्थावर मालमत्ताधारकांच्या व्यवसायात उत्साहाचे वातावरण निर्माण होऊन खरेदी-विक्रीस चालना मिळते. त्यामुळे एकूणच अर्थव्यवस्थेला चालना मिळते. या बाबी विचारात घेऊन शासनाने २०२३-२४ च्या रेडी रेकनरच्या दरात कोणतीही वाढ केली नसल्याचे श्री. विखे-पाटील यांनी सांगितले.

## कोतवालांच्या मानधनात वाढ

राज्यातील कोतवालांच्या मानधन वाढीला वित्त विभागाची मान्यता मिळाली आहे. कोतवालांचे मानधन आता ७ हजार ५०० वरून १५ हजार रुपये होणार असल्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ९ मार्च २०२३ रोजी राज्याचा २०२३-२४ चा अर्थसंकल्पात कोतवालांच्या मानधनवाढीबाबत केलेल्या घोषणेप्रमाणे कोतवालांच्या मानधनवाढीच्या सादर केलेल्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने १७ मार्च २०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्यानुसार सध्या सेवा कालावधीनुसार कोतवालांना मिळत असलेले मानधन ७ हजार ५०० रुपयावरून १५ हजार करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व १२ हजार ७९३ कोतवालांना यापुढे दरमहा सरसकट १५ हजार इतके मानधन लागू करण्यात आले आहे. १५ हजार रुपये इतके मानधन १ एप्रिल २०२३ पासून अनुज्ञेय असणार आहे.

## कुक्कुटपालन समन्वय समितीची बैठक

कुक्कुटपालन व्यवसायात वृद्धी व्हावी, तो शेतकरी हिताचा व्हावा या दृष्टीने आणि महाराष्ट्र अंडी समन्वय समितीची (एमईसीसी) स्थापना करण्याच्या अनुषंगाने सर्वंकष विचार करून अहवाल सादर करावा. त्याचा सकारात्मक विचार करून राज्य शासन धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसायमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.

मंत्री श्री. विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कुक्कुटपालन समन्वय समितीची आढावा बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती, त्या वेळी ते बोलत होते. या बैठकीस विभागाचे प्रधान सचिव जे.पी गुप्ता, आयुक्त सचींद्र प्रताप सिंह यांच्यासह कुक्कुटपालन शेतकरी आणि संबंधित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## पशुवैद्यकीय महाविद्यालयाला जागा

उत्तर महाराष्ट्रात शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय नसल्याने पशुपालकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अहमदनगर जिल्ह्यात शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय झाल्यास याचा लाभ पशुपालकांना होणार असून, त्यानुसार अहमदनगरमध्ये उभारण्यात येणाऱ्या शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयाला सावळीविहीर येथील कृषी विज्ञान केंद्राची ७५ एकर जागा देण्यास मान्यता देण्यात आली.

मंत्रालयात पशुसंवर्धन, दुग्धविकास मंत्री श्री.विखे-पाटील यांनी याबाबत बैठक घेतली. दूरदृश्यप्रणालीद्वारे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी कृषी विज्ञान केंद्राची जागा देण्यास मान्यता दिली. बैठकीला पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे प्रधान सचिव जे.पी. गुप्ता, पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग, दुग्धविकास आयुक्त डॉ. श्रीकांत शिरपूरकर, अहमदनगरचे जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, सहसचिव माणिक गुट्टू आदी उपस्थित होते.

## बाधित मच्छीमारांसाठी नुकसानभरपाई

राज्यातील विविध बांधकाम प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने धोरण निश्चित केले आहे. या धोरणास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून, त्यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. यामध्ये मच्छीमारांच्या नुकसानीसाठी सहा श्रेणी ठरवण्यात आल्या असून, त्यानुसार मच्छीमारांना २५ हजार ते ६ लाखांपर्यंत नुकसानभरपाई मिळणार असून भरपाई देताना कुटुंब हा एक घटक विचारत घेऊन एकरकमी व एकदा देण्यात येईल, अशी माहिति सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.



**सुधीर मुनगंटीवार**
मंत्री, वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय

मच्छीमारांना देण्यात येणारी नुकसान भरपाई रकमेच्या ६ श्रेणी निश्चित करण्यात आल्या असून त्या पुढीलप्रमाणे मासेमारी क्षेत्र कायमचे नष्ट झाले असल्यास - ६ लाख रुपये, प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रापासून ५०० मीटर त्रिज्येतील क्षेत्रामधील मासेमारीवर परिणाम झाल्यास-४ लाख रुपये, हाताने मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांचे झालेले नुकसान - २ लाख रुपये, दैनंदिन मासेमारीस निर्माण होणारी अडचण, मासेमारी क्षेत्रापर्यंत पोहोचण्यास येणारा वाढीव खर्च इ.- १ लाख रुपये, प्रकल्प बांधकामावेळी पाण्यामध्ये आलेली गढूळता यामुळे मासेमारीवर झालेला तात्पुरता प्रभाव ५० हजार रुपये; तसेच बार्जेसमुळे मासेमारी नौका व जाळे यांचे नुकसान - २५ हजार रुपये मच्छीमारांना नुकसानभरपाई देण्यात येणार आहे.

## मच्छीमार बांधवांना दिलासा

सागरी व भूजल क्षेत्रातील मच्छीमार बांधवांनंतर आता गोड्या पाण्यातील तलाव

किंवा जलाशयात मासेमारी करणाऱ्या मच्छीमार बांधवांनादेखील मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. २०२०-२१ या कोरोना काळातील नुकसान लक्षात घेऊन तलाव ठेका माफ करण्याचा शासनाचा आदेश नुकताच निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयामुळे मासेमारी करणाऱ्या बांधवांसाठी दिलासा मिळेल, असा विश्वास मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.

मच्छीमार बांधवांना आर्थिकदृष्ट्या बळ देण्यासाठी राज्य शासन संपूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे असून त्यांच्या अडचणींचा संवेदनशीलपणे विचार करून सहकार्य करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. मागील पावसाळी अधिवेशनात मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भात आश्वासन दिले होते; त्याची पूर्तता या निर्णयामुळे झाली आहे.

## मत्स्यसंवर्धनासाठी 'सीबा' करार

महाराष्ट्रामध्ये निमखाऱ्या पाण्यातील मत्स्यसंवर्धनाच्या दृष्टीने तसेच मत्स्यव्यवसाय क्षेत्रात रोजगार आणि उद्योग वाढीसाठी केलेला 'सीबा'करार मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास वन, मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

विधान भवन येथे मत्स्यव्यवसाय विभाग आणि सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ ब्रॅकिश वॉटर ॲक्वाकल्चर (सीबा) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. या वेळी मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव अतुल पाटणे आणि सीबा चेन्नईचे संचालक कुलदीप कुमार, वैज्ञानिक पंकज पाटील हे उपस्थित होते.

## व्याघ्र प्रकल्पाच्या धर्तीवर हत्ती प्रकल्प

राज्यात वाघांसोबतच वन्य हत्तींची संख्यादेखील वाढत असून त्यांचा वावर नियंत्रित करून संवर्धन करण्यात येणार आहे. व्याघ्र प्रकल्पाच्या धर्तीवर राज्यात हत्ती प्रकल्प सुरू करण्यासंदर्भात केंद्र सरकारशी तातडीने पत्रव्यवहार करण्याच्या सूचना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. या वेळी राज्यातील वन्य हत्ती नियंत्रणासाठी हत्ती संवादकाची मदत घेण्याचाही मनोदय त्यांनी व्यक्त केला.

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी परिसरात वन्यजिवांच्या वाढत्या उपद्रवासंदर्भात चर्चा करण्यासाठी सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत वनमंत्री सुधीर मुनगंटीवार बोलत होते. या वेळी आमदार प्रकाश आबिटकर, वन विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, वनबलप्रमुख वाय. एल.पी.राव, प्रधान मुख्यवनसंरक्षक महिप गुप्ता, गुरुप्रसाद आदी अधिकारी उपस्थित होते.

## स्वयं-गती अभ्यासक्रमाचा शुभारंभ

पर्यावरणपूरक जीवनशैलीसह विकासाचा समतोल राखण्यासाठी तरुणांना जलसंधारण तसेच पर्यावरणपूरक जीवनशैलीवर संशोधन करण्याची आणि सामाजिक कार्याची संधी उपलब्ध करून देऊन, पर्यावरण हा विषय चळवळ म्हणून तो लोकाभिमुख बनवणे, काळाची गरज आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.



**चंद्रकांत पाटील**
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे 'हवामान आणि पर्यावरण' या विषयामध्ये तरुणांचा सहभाग वाढवण्यासाठी 'अर्थ अवर'च्या निमित्ताने महा यूथ फॉर क्लायमेट ॲक्शन (एमवायसी - मायका) प्लॅटफॉर्मद्वारे 'युथ लीडरशिप फॉर क्लायमेट ॲक्शन' या ऑनलाइन स्वयं-गती अभ्यासक्रमाचा शुभारंभ उच्च व तंत्रशिक्षणमंत्री श्री. पाटील यांनी ऑनलाइन पद्धतीने केला. या वेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उच्च शिक्षण विभागाचे सचिव शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण विभागाचे सचिव डॉ. विनोद मोहितकर, युनिसेफचे युसूफ कबीर, पर्यावरण तज्ज्ञ संस्कृती मेनन, विधिमंडळाचे माजी प्रधान सचिव अनंत कळसे यांच्यासह विद्यार्थी व प्राचार्य उपस्थित होते.

सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (सीईई) इंडिया आणि अक्कॉर्डम पुणे यांच्या तांत्रिक साहाय्याने उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि युनिसेफ महाराष्ट्र यांनी एकत्र येऊन या अभ्यासक्रमाची रचना केली आहे.

या ऑनलाइन अभ्यासक्रमामध्ये पाच युनिट्स असून त्यापैकी दोन हवामान बदल आणि जल व्यवस्थापन हे दोन अनिवार्य आहेत. ऊर्जा व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि जैवविविधता संवर्धन हे इतर तीन युनिट्स वैकल्पिक आहेत. या अभ्यासक्रमामध्ये लिखित साहित्य, चित्रे, प्रश्नमंजुषा, समस्या व उपाय, व्हिडिओ आणि संदर्भ लिंक तसेच पर्यावरणाशी संबंधित कौशल्य आणि नोकरीच्या संधी आदी माहिती उपलब्ध आहे. हा अभ्यासक्रम विनामूल्य असून इंग्रजी आणि मराठी भाषांमध्ये पूर्ण करता येईल. महाराष्ट्रातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील तरुण या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात. यशस्वी उमेदवारांना अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर प्रमाणपत्र मिळेल. हा अभ्यासक्रम https://www.mahayouthnet.in वर उपलब्ध आहे.

## सारथीमार्फत सर्वंकष समान धोरण

मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती आणि सुविधा देण्यासाठी शासन सकारात्मक आहे. बार्टी, टीआरटीआय, महाज्योतीच्या धर्तीवरच सारथीमार्फत सवलती आणि सुविधा देण्यासाठी सर्वंकष समान धोरण तयार करण्याचे निर्देश उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण आणि सुविधांसाठी गठित केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक सह्याद्री

## मध्यवर्ती टपाल केंद्राचे उद्घाटन

शासकीय कारभार जलदगतीने व पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी मंत्रालयात मध्यवर्ती टपाल केंद्र उभारण्यात आले असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.



या केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर, सहकार, इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यासह विधानसभा सदस्य आणि मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या महासंचालक जयश्री भोज आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यभरातील सामान्य नागरिक त्यांची निवेदने व टपाल घेऊन मंत्रालयात येत असतात, तसेच क्षेत्रीय कार्यालयांतील कर्मचाऱ्यांद्वारे टपाल प्राप्त होत असते. त्याचा जलद गतीने बटवारा होऊन पुढील कार्यवाहीसाठी त्या-त्या विभागांकडे ते टपाल पोहोचण्यासाठी मंत्रालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर मध्यवर्ती टपाल केंद्र उभारण्यात आले आहे.

अतिथिगृह, मुंबई येथे झाली. या वेळी ग्रामविकास व वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री रवींद्र चव्हाण, राज्य उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई, उद्योगमंत्री उदय सामंत, आमदार योगेश कदम, आमदार प्रवीण दरेकर, आमदार भरत गोगावले, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र पाटील, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव सुमंत भांगे, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश मोहिते, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था (सारथी) व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे उपस्थित होते.

## 'महालक्ष्मी सरस'चे उद्घाटन

'महालक्ष्मी सरस' ही बचतगटांच्या उत्पादित वस्तूंना मोठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची एक सुवर्णसंधी आहे. मुंबई आणि नवी मुंबईच्या जनतेने महालक्ष्मी सरसला भेट देऊन बचतगटांच्या उत्पादित वस्तूंची खरेदी करावी, असे आवाहन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री गिरीश महाजन यांनी केले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नवी मुंबईतील वाशी एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित केलेल्या महालक्ष्मी सरस प्रदर्शन-२०२३ च्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

या सोहळ्याप्रसंगी ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेशकुमार मीना, एकात्मिक महिला बालविकास आयुक्त रुबल अगरवाल, ग्रामीण गृहनिर्माणचे संचालक राजाराम दिघे, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे (उमेद) मुख्य कार्यकारी अधिकारी परमेश्वर राऊत आदी उपस्थित होते.

## स्तनाच्या कर्करोगावरील उपचार मोफत

देशात प्रत्येक वर्षी स्तनाच्या कर्करोगाने ९० हजार महिलांचा मृत्यू होतो. दर सहा मिनिटाला एक मृत्यू, अशी या रोगाची चिंताजनक आकडेवारी आहे. स्तनाच्या कर्करोगावरील सर्व उपचार राज्य शासन मोफत करणार असल्याची घोषणा जागतिक महिला दिनी वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी केली. कोणत्याही रुग्णालयात महिलांना स्तन कर्करोगाच्या तपासासाठी



**गिरीश महाजन**
मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज,
वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण

नोंदणी शुल्क (केस पेपर) माफ करणार असल्याचेही श्री. महाजन यांनी सांगितले.

जागतिक महिला दिनी कामा व आलब्लेस रुग्णालय येथे स्तनाच्या कर्क रोगाबाबत जनजागृती आणि उपचार अभियानाच्या शुभारंभाप्रसंगी आयोजित कार्यक्रमात मंत्री श्री. महाजन बोलत होते. या वेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त राजीव निवतकर, वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक दिलीप म्हैसेकर, सहसंचालक अजय चंदनवाले, रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. तुषार पालवे आदी उपस्थित होते.

## थायरॉईड जनजागृती व उपचार अभियानाचा शुभारंभ

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्यामार्फत थायरॉईड जनजागृती व उपचार अभियान राज्यभरात राबवण्यात येणार आहे. जळगावच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या थायरॉईड ओपीडीचे वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या वेळी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे सहसंचालक डॉ. अजय चंदनवाले, आमदार राजू भोळे, जळगाव वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर, उपअधिष्ठाता डॉ. मारोती पोटे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय गायकवाड आदी उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागांतर्गत रुग्णसेवेसाठी व विविध रोगांच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी विविध अभियान सुरू केले आहेत. राज्यात ३० मार्च २०२३ पासून मिशन थायरॉईड अभियान राबवण्यात येणार आहे.

## महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाची उल्लेखनीय कामगिरी

कार्गो हाताळणीमध्ये महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने मागील वर्षीच्या तुलनेत जवळपास ३७ टक्के इतकी लक्षणीय वाढ करत उल्लेखनीय आणि विक्रमी कामगिरी केली आहे. २०२२-२३ मध्ये ७१ दशलक्ष टनांहून अधिक मालाची हाताळणी केली असून मागील वर्षी ५२ दशलक्ष टन मालाची हाताळणी झाली होती. याशिवाय प्रवासी जलवाहतुकीत बोर्डाने प्रभावी कामगिरी केली आहे. सागरी उद्योगातील उत्कृष्टतेसाठी बोर्डाची वचनबद्धताच यातून दिसून येते, अशा शब्दात बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे यांनी विभागाचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे यश हे राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारे आहे, कारण सागरी उद्योग व्यापार आणि वाणिज्य सुलभ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. कार्गो हाताळणीतील वाढीमुळे रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतील. ज्यामुळे राज्याच्या वाढीला हातभार लागेल. उद्योगाच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी त्यांच्या सुविधा आणि सेवा वाढवण्याच्या योजनांसह येत्या काही वर्षात



**दादाजी भुसे**
मंत्री, बंदरे आणि खनिकर्म

आणखी विस्तार आणि वाढीचा विचार सुरू आहे. उत्कृष्टतेसाठी वचनबद्धतेसह, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड सागरी क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी योग्य स्थितीत असल्याचे मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले.

## औषध व वैद्यकीय उपकरणे खरेदी

औषध व वैद्यकीय उपकरणे खरेदीची प्रक्रिया विहित कालावधीमध्ये पूर्ण करण्याबाबतचा बृहत् आराखडा निश्चित करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड यांनी दिले आहेत.

मंत्री श्री. राठोड यांच्या अध्यक्षतेखाली हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ अंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या खरेदी कक्षामार्फत करण्यात येणाऱ्या औषध व वैद्यकीय उपकरणे खरेदीबाबत आढावा बैठक झाली. खरेदी कक्षाकडून करण्यात येणारी खरेदी कार्यपद्धत तसेच खरेदी



**संजय राठोड**
मंत्री, अन्न व औषध प्रशासन

कक्षाकडे खरेदीच्या अनुषंगाने प्रलंबित असलेली प्रकरणे व त्यामागची कारणे तसेच खरेदी कक्षाला निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विविध स्तरावर येणाऱ्या अडचणी मंत्री श्री. राठोड यांनी जाणून घेतल्या.

## कामगारांच्या किमान वेतनाबाबत लवकरच निर्णय

कामगार संघटनांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून कामगारांना न्याय देण्यासाठी नवीन किमान वेतनाबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल. असंघटित कामगारांची नोंदणी आणि विभागातील रिक्त पदांची भरती करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणार असल्याचे कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथिगृह येथे २५ कामगार संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि



**डॉ. सुरेश खाडे**
मंत्री, कामगार

प्रतिनिधींमार्फत कामगारांच्या समस्या जाणून घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विधानपरिषद सदस्य भाई जगताप, सचिन अहिर, प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, अपर कामगार आयुक्त शिरीन लोखंडे, आयुक्त सतीश देशमुख, कामगार नेते नरेंद्र पाटील, राज्य अध्यक्ष डॉ. डी. एल. कराड यांच्यासह अधिकारी आणि संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

सफाई कामगार, आरोग्य खात्याचे कामगार, माथाडी कामगार, घरकामगार, विडी कामगार, विक्रेते, रिक्षाचालक, यंत्रकामगार, ऊसतोड कामगार, स्थलांतरित कामगार, कंत्राटी कामगार यांच्या संघटनेच्या प्रतिनिधींनी कामगारांच्या समस्या मांडल्या.

## रिथ्विक प्रोजेक्ट्ससोबत सामंजस्य करार

रिथ्विक प्रोजेक्ट्स प्रा.लि. व महाराष्ट्र शासन यांच्यात आज ८१६० कोटींचा सामंजस्य करार करण्यात आला. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या करारावर स्वाक्षरी करण्यात आली. कोल्हापूर जिल्ह्यातील आवंडी, लतागाव या ठिकाणी हा प्रकल्प होणार असून त्याद्वारे सुमारे पाच हजार जणांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे.



**उदय सामंत**
मंत्री, उद्योग

या वेळी उद्योग विभागाचे सचिव हर्षदीप कांबळे, विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, कंपनीचे कार्यकारी संचालक सी. एम. राजेश, संचालक के. एस. प्रसाद आदी उपस्थित होते.

## महामार्गाच्या कामाबाबत आढावा

मुंबई-गोवा महामार्गावरील इंदापूर ते झाराप मार्गावरील रस्त्याची कामे युद्धपातळीवर पूर्ण करून पावसाळ्यापूर्वी किमान दोन पदरी रस्ता पूर्णपणे तयार करावा. यामध्ये रायगडमधील पळस्पे ते इंदापूर, रत्नागिरीमधील अरवली ते वाकेड व कशेडी घाटातील प्रलंबित रस्त्यांचा समावेश असून ही सर्व रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिले आहेत.



**रवींद्र चव्हाण**
मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

नवी मुंबई येथील कोकण भवनमधील राष्ट्रीय महामार्ग कार्यालयात मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाच्या प्रगतीबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मंत्री श्री. चव्हाण बोलत होते.

यावेळी राष्ट्रीय महामार्गाचे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

गुहागर चिपळूण कराड रस्त्याच्या चिपळूण तालुक्यातील पिंपळी-बुद्रुक ते कुंभार्ली घाटमाथा (हेळवाक) या एकूण २१ कि.मी. भागाचे दुपदरीकरण करून उन्नतीकरण करण्याचा प्रस्ताव मंजूर करणे, आणि हे काम चालू वर्षाच्या वार्षिक आराखड्यामध्ये समाविष्ट करून रस्त्याची कामे मार्गी लावण्याच्या सूचना मंत्री चव्हाण यांनी मुख्य अभियंता, रस्ते परिवहन मंत्रालय व मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग यांना दिल्या.


## नुकसानाचे युद्धपातळीवर पंचनामे

अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे राज्यातील काही जिल्ह्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, यात धुळे जिल्हाही आहे. जिल्ह्यातील एकही नुकसानग्रस्त शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही, तसेच येत्या दोन दिवसांत युद्धपातळीवर पंचनामे पूर्ण करून शेतकऱ्यांना पिकनिहाय योग्य भरपाईची घोषणा अधिवेशन काळातच दोन्ही सभागृहात केली जाईल, असा विश्वास कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी शेतकऱ्यांना दिला.

धुळे तालुक्यातील आनंदखेडे, साक्री तालुक्यातील काळटेक, सिरबेन, शिंदखेडा तालुक्यातील बेटावर या गारपीटग्रस्त व अवकाळीग्रस्त भागातील नुकसानग्रस्त शेतांची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा देताना कृषी मंत्री श्री. सत्तार बोलत होते. या वेळी आमदार मंजुळाताई गावित, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस. डी. मालपुरे, तहसीलदार गायत्री सैंदाणे, सतीश महाले यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांशी संवाद

राज्यात १५ ते २० मार्च दरम्यान झालेल्या गारपीट आणि अतिवृष्टीमुळे शेतपिकांचे आणि फळपिकांचे मोठ्या



**अब्दुल सत्तार**
मंत्री, कृषी

प्रमाणात नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी नाशिकहून आलेल्या शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाशी विधानभवनातील समिती कक्षात संवाद

साधला. राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून नुकसानग्रस्तांना लवकरात लवकर मदत करण्याची भूमिका असल्याचे सांगितले.

या बैठकीला महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, सहकार विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव अनुपकुमार, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कृषी आयुक्त सुनील चव्हाण यांच्यासह कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळात द्राक्ष बागायतदार संघाचे प्रतिनिधी म्हणून भाऊलाल तांबडे, प्रकाश पाटील, कैलास भोसले, प्रकाश शिंदे, चंदू पगार उपस्थित होते.

## मका उत्पादक शेतकऱ्यांना सक्षम करणार

मक्याच्या लागवडीपासून ते विक्रीपर्यंतची प्रक्रिया सुरळीत झाल्यास मका उत्पादक शेतकऱ्यांना लाभ होईल आणि ते सक्षम होतील. यासाठी राज्यशासन कटिबद्ध असून या विषयाशी निगडित उद्योजक साखळीला सर्वतोपरी मदत करण्याची राज्य शासनाची भूमिका आहे, असे प्रतिपादन कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी केले.

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (फिकी)च्या पुढाकाराने आणि येस बँकेच्या सहकार्याने 'मका समिट २०२३'चे आयोजन मंडी हाऊस, नवी दिल्ली येथील फिकीच्या सभागृहात करण्यात आले. त्या वेळी मंत्री. श्री. सत्तार बोलत होते. या सत्रात केंद्रीय कृषी विभागाचे सचिव मनोज अहुजा, फिकीचे टी. आर. केशवन यांच्यासह अन्य मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

## भाषा सल्लागार समितीची बैठक

मराठी भाषेचे संवर्धन व्हावे, भाषेचा शिक्षणात, शासकीय कामकाजात अधिकाधिक वापर व्हावा यासाठी मराठी भाषेचे सर्वंकष धोरण लवकरच जाहीर करणार असल्याची माहिती, मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

मराठी भाषा धोरणाबाबत चर्चा करण्यासाठी भाषा सल्लागार समितीची बैठक मुंबईत आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी ते बोलत होते. या बैठकीस मराठी भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, सदस्य सयाजी शिंदे, अनंत देशपांडे, डॉ. प्रकाश परब, डॉ. पृथ्वीराज तौर, पी. विठ्ठल, प्रकाश होळकर,



**दीपक केसरकर**
मंत्री, शालेय शिक्षण, मराठी भाषा

जयंत येलुलकर, डॉ. राजीव यशवंते, डॉ. वंदना महाजन, डॉ. अनुपमा उजागरे, जयश्री देसाई आदी सदस्य; तसेच भाषा संचालक विजया डोणीकर, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सचिव डॉ. शामकांत देवरे आदी, तर श्रीपाद जोशी, डॉ. गणेश चंदनशिवे, पं. विद्यासागर, मिलिंद जोशी, रमेश वरखेडे, अनुराधा मोहनी आदी सदस्य ऑनलाइन उपस्थित होते.

## अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन

राज्य शासनाने अर्धवेळ पदावरील ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन (रूपांतरण) करण्याचा निर्णय घेतला असून याचा लाभ १,२७६ अर्धवेळ ग्रंथपालांना होईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यातील सर्व अर्धवेळ ग्रंथपालांची अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन करण्याची बाब अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. नवीन आकृतिबंधानुसार अर्धवेळ ग्रंथपालपद हे मृत संवर्ग करण्यात आले असून या पदावरील कार्यरत कर्मचाऱ्यांचे सेवा ज्येष्ठतेनुसार पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

## नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत कौशल्य प्रशिक्षण

राज्यात 'नव भारत साक्षरता कार्यक्रमा'ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विविध विभाग आणि स्वयंसेवकाचे सहकार्य घ्यावे. त्याचप्रमाणे निरक्षरांना साक्षर करण्याबरोबरच त्यांच्या जीवनाला नवीन दिशा मिळण्यासाठी कौशल्य प्रशिक्षणही द्यावे, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिले.

केंद्र शासन पुरस्कृत 'नव भारत साक्षरता कार्यक्रम' हा २०२३ ते २०२७ या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत राज्य साक्षरता अभियान प्राधिकरणाच्या सदस्यांसमवेत मंत्रालयात झालेल्या बैठकीत शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, शालेय शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, माहिती महासंचालक जयश्री भोज, शालेय शिक्षण विभागाचे सहसचिव इम्तियाज काझी, शालेय शिक्षण संचालक (योजना) महेश पालकर, शालेय शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी, संचालक (माध्यमिक) कृष्णकुमार पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## मद्याच्या अवैध वाहतुकीवर कारवाई

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध मद्यनिर्मिती व बेकायदेशीर विक्री रोखण्यासाठी कारवाई करण्यात येते. अवैध मद्याची वाहतूक रोखण्यासाठी गृह व उत्पादन शुल्क विभागाच्या संयुक्त कारवाईचा आढावा दर तीन महिन्यांनी घेणार असून ही संयुक्त कारवाई



**शंभूराज देसाई**
मंत्री, राज्य उत्पादन शुल्क

वाढवण्याच्या सूचना उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई यांनी दिल्या.

मंत्रालयात मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत अवैध मद्य विक्रीवरील कारवाई व उपाययोजना याबाबत आढावा घेण्यात आला. या बैठकीस गृह व राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी उपस्थित होते.

अवैध मद्य विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगारांविरुद्ध हद्दपारी, एम.पी.डी.ए. कायद्यांतर्गत सक्त कारवाई करण्यात यावी. सर्व बाबी तपासून बनावट मद्यनिर्मिती आणि अवैध दारूविक्री यांवर आळा घालण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ट्रॅकिंग आणि ट्रेसिंग यंत्रणा आगामी काळात विभागामार्फत राबवण्यात येणार आहे.

ज्या ठिकाणी अवैध मद्यनिर्मिती होत असेल तेथील अधिकाऱ्यास याबाबत जबाबदार धरण्याबरोबरच कायद्याचा जरब बसवणारी कारवाई करण्याचे निर्देश मंत्री श्री. देसाई यांनी या वेळी दिल्या.

## पर्यटनाबरोबर रोजगाराला चालना

राज्य शासनाच्या पर्यटन विभागामार्फत भारतीय पर्यटक व्यावसायिक संघटनेचे देशातील सर्वात मोठे पर्यटनविषयक अधिवेशन छत्रपती संभाजीनगर येथे २९ सप्टेंबरपासून तीन दिवसांसाठी होत आहे. पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्य शासनाचे पर्यटन संचालनालय भारतीय पर्यटक व्यावसायिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने एक कोटी रुपयांच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे, अशी माहिती पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

मंत्रालयातील दालनात पर्यटन विभाग व भारतीय पर्यटक व्यावसायिक संघटना यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. या वेळी पर्यटनमंत्री श्री. लोढा, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, अध्यक्ष राजीव मेहरा, उपाध्यक्ष रवी गोसाई, औरंगाबाद टुरिझम डेव्हलपमेंट फाऊंडेशनचे अध्यक्ष जसवंत सिंग, नागरी विमान वाहतूक समिती आणि जनसंपर्क समितीचे अध्यक्ष सुनीत कोठारी या वेळी उपस्थित होते.

## भिक्षेकरी पुनर्वसन व स्वावलंबन वसुधा प्रकल्पाचे उद्घाटन

वसुधा प्रकल्पाच्या माध्यमातून भिक्षेकरी पुनर्वसन व स्वावलंबनाच्या उद्देशाने वर्तुळाकार अर्थव्यवस्थेवर आधारित गोशाळा व इतर समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात येत असून याचा पहिला प्रकल्प अहमदनगर जिल्ह्यात श्रीगोंदा येथे सुरू होत आहे. यामुळे भिक्षेकरी समाजबांधवांचे



**मंगल प्रभात लोढा**
मंत्री, पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, महिला व बालविकास

जीवनमान सुधारण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, यापुढेही असे प्रकल्प राज्यभर सुरू करण्याचा मानसही महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केला. विधिमंडळ दालनात आयोजित ऑनलाइन उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

राज्यशासनाच्या महिला व बालविकास विभाग व महिला आर्थिक विकास महामंडळ, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने वसुधा प्रकल्प अर्थात भिक्षेकरी पुनर्वसन व स्वावलंबनाच्या उद्देशाने वर्तुळाकार अर्थव्यवस्थेवर आधारित गोशाळा व इतर समाजपयोगी उपक्रमांचा ऑनलाइन उद्घाटन सोहळा पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते झाला

या वेळी महिला व बालविकास विभागाच्या सचिव आय. ए. कुंदन, आयुक्त आर. विमला, अहमदनगर जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, महिला आर्थिक विकास मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक डॉ. इंदू जाखड, जिल्हापरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा नियोजन अधिकारी निलेश भदाणे आदी मान्यवर आणि श्रीगोंदा तालुक्यातील बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

## सामाजिक संस्थांशी सामंजस्य करार

लोकसहभागातून अंगणवाडी दत्तक घेण्यासाठी अनेक सामाजिक संस्था पुढे येत आहेत. अंगणवाड्यांचा विकास होण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. राज्यातील विविध दहा सामाजिक संस्थांच्या माध्यमातून ७५० अंगणवाड्या दत्तक देत आहोत. अंगणवाडी दत्तक धोरणांतर्गत ऑक्टोबर २०२२ पासून विविध सामाजिक संस्थांनी आतापर्यंत ३६६८ अंगणवाड्या दत्तक घेतलेल्या आहेत. त्यामुळे राज्यात एकूण ४४१८ अंगणवाड्यांचा विकास होण्यास सामाजिक संस्थाचे सहकार्य मिळत असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित सामंजस्य कराराप्रसंगी मंत्री श्री. लोढा बोलत होते. या वेळी एकात्मिक बालविकासच्या आयुक्त रूबल अग्रवाल, उपआयुक्त विजय क्षीरसागर, दालमिया फाऊंडेशन, भागीरथी फाऊंडेशन, कॉरबेट फाऊंडेशन, युनायटेड वे ऑफ हैद्राबाद, आर. एस. एस. जनकल्याण समिती, होप फॉर दि चिल्ड्रन, युनायटेड वे दिल्ली, रोटरी डिस्ट्रिक्ट, के कॉर्प फाऊंडेशन, यार्दी फाऊंडेशन यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**टीम लोकराज्य**

राज्य मंत्रिमंडळाच्या २६ फेब्रुवारी आणि ५, १९ एप्रिल २०२३ रोजीच्या बैठकीत मदत व पुनर्वसन, वैद्यकीय शिक्षण, महसूल, नगरविकास, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, ऊर्जा, उच्च व तंत्रशिक्षण, सामान्य प्रशासन, सहकार, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य, ग्रामविकास, महिला व बालविकास, विधि व न्याय, मराठी भाषा आदी विभागांचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...




# मंत्रिमंडळात ठरले !

## एसडीआरएफच्या दरांमध्ये सुधारणा

राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एसडीआरएफ) साठी केंद्र सरकारने निकष आणि दरांमध्ये सुधारणा केल्या असून, त्या सुधारणा स्वीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या सुधारणा २०२५-२६ पर्यंत असतील. तसेच या निर्णयांची अंमलबजावणी १ नोव्हेंबर २०२२ पासून होणार आहे. मदतीचे सुधारित दर पुढीलप्रमाणे (कंसात जुने दर) :

मृतांच्या कुटुंबीयांना - ४ लाख रुपये (बदल नाही). ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास - ७४ हजार रुपये (५९ हजार १००). ६० टक्क्यांपेक्षा अधिक अपंगत्व आल्यास - २.५० लाख रुपये (२ लाख). जखमी व्यक्ती इस्पितळात एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी - १६ हजार रुपये (१२ हजार ७००), एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी - ५ हजार ४०० (४ हजार ३००).

दोन दिवसांपेक्षा अधिक कालावधीकरिता क्षेत्र/घर पाण्यात बुडालेले असल्यास/घरे पूर्णतः वाहून गेली असल्यास/ पूर्णतः क्षतिग्रस्त झाल्यास प्रति कुटुंब - २ हजार ५०० (बदल नाही). सामानाच्या नुकसानीकरिता प्रति कुटुंब - २ हजार ५०० (बदल नाही).

पूर्णतः नष्ट झालेल्या पक्क्या/कच्च्या घरांसाठी सखल भागात - १ लाख २० हजार रुपये (९५ हजार १००). दुर्गम भागातील घरांसाठी - १ लाख ३० हजार (१ लाख १ हजार ९००). अंशतः पडझड पक्क्या घरांसाठी - ६ हजार ५०० (५ हजार २००). अंशतः पडझड कच्च्या घरांसाठी - ४ हजार रुपये (३ हजार २००). झोपडीसाठी - ८ हजार रुपये (४ हजार १००).

मृत दुधाळ जनावरांसाठी - ३७ हजार ५०० ( ३० हजार), ओढकाम जनावरांसाठी - ३२ हजार रुपये (२५ हजार). वासरू, गाढव, खेचर आदींसाठी - २० हजार रुपये



(१६ हजार रुपये). मेंढी, बकरी, डुक्कर यासाठी - ४ हजार रुपये (३ हजार). कुक्कुटपालन - १०० रुपये प्रति कोंबडी, दहा हजार रुपयांपर्यंत (५० रुपये प्रति कोंबडी, ५ हजार रुपयांपर्यंत).

शेती जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी - ८ हजार ५०० रुपये, २ हेक्टर मर्यादेत (६ हजार ८००). आश्वासित सिंचनाखालील पिकांसाठी - १७ हजार रुपये प्रति हेक्टरी (१३ हजार ५००). बहुवार्षिक पिकांसाठी - २२ हजार ५०० रुपये (१८ हजार).

शेतजमिनीच्या नुकसानीसाठी - १८ हजार रुपये प्रति हेक्टरी (१२ हजार २०० रुपये). दरड कोसळून किंवा जमीन खरडून झालेल्या नुकसानीसाठी - ४७ हजार रुपये, प्रति हेक्टरी. (३७ हजार ५००)

मत्स्यव्यवसाय - बोटींच्या अंशतः दुरुस्तीसाठी - ६ हजार रुपये (४ हजार १००). अंशतः बाधित जाळ्यांच्या दुरुस्तीसाठी - ३ हजार रुपये ( २ हजार १००). पूर्णतः नष्ट बोटीकरिता - १५ हजार रुपये (९ हजार ६००). पूर्णतः नष्ट जाळ्यांसाठी - ४ हजार रुपये (२ हजार ६०० रुपये).

## इमारतीसाठी प्रशासकीय मान्यता

विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ झाल्यामुळे जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयाच्या बांधकामासाठी ७११ कोटी १७ लाख ५६ हजार रुपयांच्या सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. जळगाव येथे ६५० खाटांचे रुग्णालय व १५० विद्यार्थी क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यात येत आहे.




## सततचा पाऊस : 'नैसर्गिक आपत्ती'

सततचा पाऊस ही राज्य शासनामार्फत नैसर्गिक आपत्ती घोषित करून शेती पिकांच्या नुकसानाकरिता मदत देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आता शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल.

'अतिवृष्टी' ही राज्य शासनाने घोषित केलेली आपत्ती असून, महसूल मंडळामध्ये

उपलब्ध करून देण्यात आलेल्या स्वयंचलित हवामान केंद्रामध्ये २४ तासांत ६५ मि.मी. पेक्षा जास्त पाऊस झाल्यास मंडळातील सर्व गावांमध्ये शेती पिकांच्या नुकसानाचे पंचनामे केले जातात. शेती पिकांचे नुकसान ३३ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास जेवढ्या क्षेत्राचे नुकसान झाले आहे, तेवढ्या क्षेत्राकरिता विहित दराने निविष्ठा अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना मदत देण्यात येते. मात्र, महसुली मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद नसतानाही मंडळातील गावांमध्ये अतिवृष्टी होऊ शकते आणि त्यामुळे शेती पिकांचे नुकसान होऊ शकते. तसेच काही



गावांमध्ये सलग काही दिवस सतत पाऊस पडत असल्यामुळेदेखील शेती पिकांचे नुकसान होऊ शकते. अशा प्रकरणी शेतकऱ्यांना मदत देणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीच्या २९ नोव्हेंबर २०२२ रोजी आयोजित बैठकीत, सततच्या पावसाची सध्या कोणतीही परिभाषा नसल्याने आणि ती निश्चित करणे आवश्यक असल्याने, शेती पिकांचे नुकसान झालेल्या योग्य शेतकऱ्यांना मदत मिळण्याकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावाकरिता योग्य निकष निश्चित करण्यासाठी कृषी विभागाने समिती नियुक्ती करावी, असा निर्णय झाला होता. त्यानुसार सततच्या पावसामुळे शेती पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळण्याकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावाकरिता योग्य निकष निश्चित करून शासनास शिफारशी करण्याकरिता कृषी व पदुम विभागाच्या २१ डिसेंबर २०२२ रोजीच्या शासन आदेशाद्वारे मा. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती.

या समितीने सततच्या पावसासाठी निकष निश्चित करण्याबाबत तयार केलेल्या अहवालात शेती पिकांच्या नुकसानाकरिता विहित दराने मदत देण्याकरिता सततच्या पावसासाठी काही निकष सुचवले होते. हा अहवाल मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठेवण्यात आला.

१५ जुलै ते १५ ऑक्टोबर या कालावधीत महसूल मंडळामध्ये सलग पाच दिवसांच्या कालावधीत प्रत्येक दिवशी किमान १० मि.मी. पाऊस झाल्यास; आणि त्याच महसूल मंडळात या कालावधीत मागील १० वर्षांच्या (दुष्काळी वर्ष वगळून) सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत ५० टक्के (दीडपट) किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस झाल्यास, सततच्या पावसाचा पहिला ट्रीगर लागू राहील.

अशा महसूल मंडळामध्ये पहिला ट्रीगर लागू झाल्याच्या दिनांकापासून १५व्या दिवसापर्यंत सामान्यकृत वनस्पती निर्देशांक (एनडीव्हीआय) निकष पुढीलप्रमाणे तपासण्यात येतील. १५ जुलै ते १५ ऑक्टोबर या कालावधीत खरीप पिकांचे सामान्यकृत वनस्पती निर्देशांक फरक (एनडीव्हीआय) जर ०.५ किंवा त्यापेक्षा कमी आल्यास, सततच्या पावसाचा दुसरा ट्रीगर लागू राहील. तथापि ज्या तारखेला सतत पावसाची सुरुवात झाली, त्या दिवसाचा एनडीव्हीआय हा १५व्या दिवसाच्या एनडीव्हीआयपेक्षा जास्तच असायला पाहिजे.

सततच्या पावसाचा दुसरा ट्रीगर लागू झालेल्या महसूल मंडळातील बाधित क्षेत्राचे सर्वेक्षण करून पंचनामा करण्यात येईल आणि ३३ टक्क्यांपेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झाले असल्यास मदत देण्यात येईल. त्याचप्रमाणे जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीतील सततच्या पावसामुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानासाठी मदत देण्याबाबत शासनास प्राप्त झालेल्या सर्व प्रलंबित प्रस्तावांकरिता वरील निकष वापरून पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सुधारित दराने मदत देण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे.

यापुढे राज्य शासनामार्फत घोषित करण्यात आलेल्या अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीकरितादेखील २४ तासांमध्ये ६५ मि.मी.पेक्षा जास्त पाऊस हा निकष कायम ठेवून याबरोबरच सततच्या पावसाकरिता निश्चित करण्यात येणाऱ्या दुसऱ्या ट्रीगरमधील सामान्यकृत वनस्पती निर्देशांक (एनडीव्हीआय) हा अतिरिक्त निकष शेती पिकांच्या नुकसानाकरिता लागू करण्यात येणार आहे. दुष्काळाव्यतिरिक्त इतर सर्व नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानासाठीदेखील हा निकष लागू राहील.

## नवे रेती धोरण

राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने रेती मिळण्यासाठी तसेच अनधिकृत रेती उत्खननाला आळा घालण्यासाठी नवे सर्वंकष सुधारित रेती धोरण तयार करण्यात आले असून, या धोरणास मान्यता देण्यात आली.



या धोरणानुसार प्रायोगिक तत्त्वावर एक वर्षासाठी सर्व नागरिकांना प्रति ब्रास ६०० रुपये (रुपये १३३ प्रति मेट्रिक टन) वाळू विक्रीचा दर निश्चित करण्यात आलेला आहे. यात स्वामित्व धनाची रक्कम माफ करण्यात येईल. याशिवाय जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी व वाहतूक परवाना सेवा शुल्क इ. खर्चदेखील आकारण्यात येतील. वाळूचे उत्खनन, उत्खननानंतर वाळूची डेपोपर्यंत वाहतूक, डेपोची निर्मिती आणि व्यवस्थापन यासाठी एक निविदा प्रक्रिया राबवण्यात येईल. यातून वाळू किंवा रेती उत्खनन करण्यात येईल. ही रेती शासनाच्या डेपोमध्ये नेली जाईल व तिथून या रेतीची विक्री करण्यात येईल.

नदी पात्रातील वाळू गटाचे निरीक्षण

करण्याची कार्यवाही तहसीलदारांच्या अध्यक्षतेखालील तांत्रिक समिती करेल. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय वाळू संनियंत्रण समिती स्थापन करण्यात येईल. ही समिती वाळूगट निश्चित करून, त्या गटासाठी ऑनलाइन ई-निविदा पद्धती जाहीर करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीला शिफारस करेल. जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतील आणि या समितीत मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त, अपर जिल्हाधिकारी, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभाग तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी, भू-विज्ञान व खनिकर्म विभाग, भूजल सर्वेक्षण तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी असतील. ही समिती वाळू डेपोमध्ये वाळूसाठा उपलब्ध करून घेण्यासाठी वाळूगट निश्चित करतील. तसेच राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाच्या निर्देशांचे पालन होईल, याची दक्षता घेईल.

## भाडेपट्टीच्या नूतनीकरणास मंजुरी

मुंबईतील फोर्ट परिसरातील भारतीय नौदलास दिलेल्या सेलर इन्स्टिट्युट 'सागर' या संस्थेस भाडेपट्ट्याने दिलेल्या शासकीय मिळकतीचे नाममात्र दराने नूतनीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली.



या संस्थेस फोर्ट महसूल विभागातील भूकर क्र. २/४ क्षेत्र ७४१३.१७ चौ.मी. या भाडेपट्ट्याने दिलेल्या शासकीय मिळकतीचे नाममात्र एक रुपया दराने भाडेपट्टा नूतनीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली. पुढील ३० वर्षांच्या कालावधीसाठी हा भाडेपट्टा राहील.

## नागपूर मेट्रो रेल टप्पा- २

नागपूर शहरातील मेट्रो रेल टप्पा- २ प्रकल्पास सुधारित मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे नागपूरमध्ये ४३.८० किमी अंतराची मार्गिका उभारण्यात येईल.



या प्रकल्पाकरिता ६,७०८ कोटी रुपयांचा सुधारित खर्च येईल. यामध्ये मार्गिका क्रमांक १-ए मिहान ते एमआयडीसी ईएसआर (१८.६५ कि.मी.). मार्गिका क्रमांक २- ए ऑटोमेटिव्ह चौक ते कन्हान नदी (१३ कि.मी.). मार्गिका क्रमांक ३ ए लोकमान्य नगर ते हिंगणा (६.६५कि.मी.). मार्गिका क्रमांक ३-ए - प्रजापती नगर ते ट्रान्सपोर्ट नगर (५.५० कि.मी.) असे मेट्रो मार्ग असतील. जानेवारी २०१४ मध्ये नागपूर मेट्रो रेल्वे टप्पा एक प्रकल्प राबवण्यास सुरुवात झाली होती. यामध्ये ४०.०२ कि.मी. लांबीचा मेट्रो मार्ग आणि ३२ स्थानके उभारण्यात आली. या टप्प्याचे लोकार्पण ११ डिसेंबर २०२२ रोजी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

## कचऱ्यापासून ऊर्जा निर्मितीचा प्रकल्प

मुंबईतील गोवंडी येथील देवनार डम्पिंग ग्राऊंडच्या जमिनीवरील आरक्षणात फेरबदल करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे या जमिनीवर प्रस्तावित असलेल्या कचऱ्यापासून ऊर्जा निर्मितीचा प्रकल्प मार्गी लागणार आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ बृहन्मुंबई विकास योजना-२०३४ मधील न.भू.क्र.१ (भाग), मौ. देवनार, देवनार डम्पिंग ग्राऊंड, गोवंडी, मुंबई या जमिनीवरील महापालिका शाळा, इतर शिक्षण, खेळाचे मैदान, विद्यार्थी वसतिगृह व उद्यान/बगिचा ही आरक्षणे वगळून भूखंड भरणी स्थळाचे नामनिर्देशानसह उद्यान, बगिच्यांचे आरक्षण दाखवणाऱ्या फेरबदलास मान्यता देण्यात आली. या ठिकाणच्या खेळाच्या मैदानावरील साधारणतः ३१ हजार २०० चौ.मीटर क्षेत्राचे आरक्षण वगळण्यात आले आहे.

## १४ नव्या पदांना मान्यता

अतिविशेषोपचार विषयातील पदव्युत्तर पदवी विद्यार्थी संख्येत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. याकरिता अध्यापकीय पदांची युनिटनिहाय पुनर्रचना करून सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक संवर्गातील १४ पदे नव्याने निर्माण करण्यात येतील. सध्या या संवर्गात १३८ पदे मंजूर आहेत आणि संस्थानिहाय कमाल विद्यार्थी संख्या १३७ आहे. या निर्णयामुळे मंजूर विद्यार्थी पदसंख्या १३७ वरून २०९ इतकी




होणार आहे. ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सर ज. जी. समूह रुग्णालय, बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर या संस्थांमध्ये ही पदे निर्माण करण्यात येतील.

## महावितरणला कर्जासाठी शासन हमी

थकीत देणी देण्यासाठी २९ हजार २३० कोटी रुपये इतक्या रकमेचे कर्ज घेण्यास महावितरण कंपनीला शासन हमी देण्यास मान्यता देण्यात आली.

विलंब अदायगी अधिभार व संबंधित बाबी नियम २०२२ अंतर्गत महावितरण कंपनीस कर्ज घेण्यासाठी ही शासन हमी

देण्यात आली आहे.



महावितरण कंपनीकडे महानिर्मिती व महापारेषण कंपन्यांची थकीत देणी २९ हजार २३० कोटी इतकी असून, यामध्ये मुद्दल १७ हजार २५२ कोटी आणि व्याज ११ हजार ९७८ कोटी इतके आहे. महावितरण कंपनीने विविध वित्तीय संस्थांकडून स्पर्धात्मक व्याजदर मागवून कमीत कमी व्याजदर असलेला प्रस्ताव स्वीकारावा या अटीवर ही शासन हमी देण्यात आली आहे.

## अकृषी विद्यापीठातील पदांना वेतन आयोग

अकृषी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील संचालक, सहायक संचालक व प्रकल्प अधिकारी या शिक्षक समकक्ष पदांना सहावा व सातव्या वेतन आयोगाची वेतन संरचना लागू करण्यास मान्यता देण्यात आली. या पदांना सहावा व सातवा वेतन आयोग लागू केल्यामुळे ५ कोटी ९० लाख दहा हजार रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

## ‘परीस स्पर्श’ योजना

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा वाढवण्याच्या दृष्टीने नॅक, एनबीए मूल्यांकनासाठी महाविद्यालयांना मार्गदर्शन करण्याकरिता ‘परीस स्पर्श’ योजना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यात सध्या ३ हजार ३४६ महाविद्यालयांपैकी १ हजार ३६८ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन झाले आहे. सद्य:स्थितीत १ हजार ९७८ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन झालेले नाही. तसेच ७०४ तंत्रशिक्षण महाविद्यालयांचे एनबीए मूल्यांकन झालेले नाही. या संदर्भात मुंबई विद्यापीठामध्ये आयोजित एका कार्यशाळेमध्ये महाविद्यालयांना मूल्यांकनासाठी मार्गदर्शनाची गरज असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. त्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या परामर्ष (PARAMARSH) योजनेच्या धर्तीवर राज्याकडून ‘परीस स्पर्श’ योजना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेचा कालावधी तीन वर्षांचा राहील. यासाठी राज्य सल्लागार समिती, विद्यापीठस्तरीय समिती आणि जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात येईल. या समित्यांमार्फत मार्गदर्शक संस्थांची निवड करण्यात येईल. या योजनेसाठी येणाऱ्या १३ कोटी ५० लाख रुपये खर्चासदेखील मान्यता देण्यात आली.

## दिव्यांगांना पदोन्नती आरक्षण धोरण

राज्यात केंद्राप्रमाणे दिव्यांग पदोन्नती आरक्षण लागू करण्याचा त्याचप्रमाणे दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी चार टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र शासनाच्या १७ मे २०२२ च्या आदेशाप्रमाणे राज्यात दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-ड ते गट-अ च्या निम्नस्तरापर्यंत पदोन्नती आरक्षण लागू करण्यात येईल.

दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-ड मधून गट-ड मधील, गट-ड मधून गट-क मधील, गट-क मधून गट-क मधील, गट-क मधून गट-ब मधील, गट-ब मधून गट-ब मधील तसेच गट-ब मधून गट-अ मधील निम्नस्तरापर्यंत चार टक्के आरक्षण देण्यात येईल. रिक्त पद असल्यास चार टक्के पदे दिव्यांगांसाठी आरक्षित ठेवण्यात येतील.

अपंगत्वाच्या वेगवेगळ्या प्रकारनिहाय एकूण आरक्षण चार टक्के राहील. ज्या संवर्गात सरळ सेवेने नियुक्तीचे प्रमाण ७५ टक्क्यांपेक्षा जास्त नसेल अशाच संवर्गात दिव्यांगांना पदोन्नतीत आरक्षण राहील. या संदर्भातील अन्य सर्व शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना

शेती पंपांना दिवसा अखंडित आणि भरवशाचा वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचा दुसरा टप्पा राबवण्याचा त्याचप्रमाणे वर्ष २०२५ पर्यंत ३० टक्के वाहिन्यांना सौर ऊर्जेचा पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला. याचा लाभ राज्यातील ४५ लाख कृषी वीज ग्राहकांना होईल.

वीज खरेदी करारानुसार वीज बिलाची रक्कम देण्यासाठी ७०० कोटी रुपयांचा स्वतंत्र रिव्हॉल्विंग फंडदेखील स्थापन करण्यात येईल. चालू वर्षासाठी याकरिता १०० कोटी रुपये इतका निधी, हरित ऊर्जा निधीमधून खर्च करण्यात येईल.

या अभियानात वीज वाहिनीसाठीची जमीन अकृषी करण्याची गरज राहणार नाही. तसेच अशा जमिनीवरील सौर ऊर्जा प्रकल्पांना ३० वर्षांपर्यंत सर्व कर व शुल्कांतून सूट देण्यात येईल. कृषी वीज वाहिनी योजनेसाठीची जमीन नाममात्र एक रुपया वार्षिक भाडेपट्ट्याने देण्यास, यापूर्वीच मान्यता देण्यात आली आहे. या जमिनीचे नोंदणी व मुद्रांक विभागाने ठरवलेल्या किमतीच्या सहा टक्के दरानुसार किंवा प्रतिवर्षी १ लाख २५ हजार प्रति हेक्टर यापेक्षा जी रक्कम जास्त असेल, त्या दराने वार्षिक भाडेपट्टा दर निश्चित करण्यात येईल.

२०२३ ते २४ आणि २०२८ ते २९ या कालावधीसाठी एकूण ७०० कोटी रुपयांच्या निधीस आणि त्यापैकी २०२३-२४ साठी २५ कोटी रुपये इतक्या निधीस हरित ऊर्जा निधीमधून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली.

## सहकारी संस्था अधिनियमात सुधारणा

पुनरूज्जीवित किंवा पुनर्रचित साखर कारखाना, सूतगिरणीच्या कामकाजासाठी तात्पुरती समिती नेमण्यासाठी सहकारी संस्था अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सध्या अवसायनात सहकारी साखर कारखाने व सूतगिरण्यांचे पुनरूज्जीवन किंवा पुनर्रचना केल्यावर नियमित संचालक मंडळाची निवडणूक होईपर्यंत या संस्थेचे कामकाज करण्यासाठी तात्पुरती समिती नियुक्त करण्याची कुठलीही तरतूद नव्हती. त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ व कलम १०१ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. संस्था सभासदांकडून थकबाकीची



रक्कम वसूल करण्यासाठी मोठा कालावधी लागतो. त्यामुळे अधिनियमातील वैयक्तिक सदस्य यामधून वैयक्तिक हा शब्ददेखील वगळण्यात येणार आहे.

## महाप्रित उपकंपनीमार्फत प्रकल्पांची कामे

महात्मा फुले नवीनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) उपकंपनीमार्फत विविध प्रकल्पांची कामे करून मागास, वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा निर्णय घेण्यात आला.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची १९७८ मध्ये स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत विविध अनुदान, बीज भांडवल, कर्ज योजना राबवण्यात येतात. मात्र अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने या महामंडळाला अधिक प्रोत्साहन देणे गरजेचे होते. त्यादृष्टीने महात्मा फुले नवीनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) या उपकंपनीची स्थापना २०२१ मध्ये करण्यात आली.

या उपकंपनीमार्फत सध्याचे आधुनिक तंत्रज्ञान उपयोगात आणून विविध नवीन योजना राबवण्यात येत आहेत. यामध्ये अक्षय ऊर्जा आणि इलेक्ट्रिक चार्जिंग केंद्र, कृषि प्रक्रिया मूल्यसाखळी आणि जैव इंधन आणि पायाभूत सुविधा प्रकल्प, डेटा सेंटर, परवडणारी घरे, ऊर्जा कार्यक्षमता, महिला उद्योजकता, पर्यावरण आणि हवामान बदल, आरोग्य व जैवविज्ञान, कार्पोरेट समुदाय विकास असे प्रकल्प राबवण्यात येत आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार व महसूल उपलब्ध होऊन दुर्बल घटकांच्या जीवनमानात सुधारणा होईल.

## विद्यापीठांच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी

राज्यातील अकृषी विद्यापीठामधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

थकबाकीची रक्कम २०२१-२२ या वित्तीय वर्षापासून पुढील पाच वर्षांत पाच समान हप्त्यांमध्ये दरवर्षी १ जुलै रोजी देण्यात येईल. त्यानुसार २०२१-२२ व २०२२-२३ मधील दोन वर्षी द्याव्या लागणाऱ्या रक्कमेचे हप्ते व २०२३-२४ हप्ता एकत्रितपणे १ जुलै २०२३ रोजी देण्यात येतील. थकबाकीची रक्कम देण्यासाठी ९०० कोटी रुपये इतका खर्च होणार आहे.

## पॅरामेडिकल टेक्नॉलॉजीच्या आंतरवासितांना विद्यावेतन

राज्यातील बी.एस्सी. पॅरामेडिकल टेक्नॉलॉजीच्या आंतरवासिता विद्यार्थ्यांना आता दरमहा ८,००० रुपये विद्यावेतन मिळणार आहे. याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. या निर्णयाचा लाभ ५११ आंतरवासितांना होईल.



महानगरपालिकेंतर्गत वैद्यकीय महाविद्यालयांतील बी.एस्सी. (पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी) या अभ्यासक्रमांच्या आंतरवासिता विद्यार्थ्यांना दरमाह आठ हजार रुपये इतके विद्यावेतन त्या-त्या महानगरपालिकांमार्फत देण्यास मान्यता देण्यात आली.

## महिलांना नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची आवश्यकता नाही

खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित पदावरील निवडीकरिता तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांना नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट शिथिल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्राध्यापकपदावरील भरती प्रक्रियेदरम्यान अराखीव (महिला) या पदावर गुणवत्ता क्र.३ वरील महिला उमेदवाराची नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र नसल्यामुळे निवड न करता गुणवत्ता क्र. ६ वरील उमेदवाराची निवड करण्यात आली. या पदाकरिता सहयोगी प्राध्यापक पदावरील तीन वर्षांचा अनुभव अशी अर्हता निश्चित करण्यात आलेली होती. या पदाचे वेतन विचारात घेता सध्याच्या नॉन-क्रिमिलेअर मर्यादेपेक्षा अधिक होत असले तरी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्राप्त उमेदवारांना या खुल्या गटातील महिला आरक्षित पदावर निवड होऊन त्याचा लाभ होत होता.

हा लाभ सर्व प्रवर्गातील महिला उमेदवारांना होणे आवश्यक असल्याने त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. त्यानुसार आता खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित पदावरील निवडीकरिता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांना नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

## जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या राखीव जागांकरिता नामनिर्देशन पत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. आता ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, अध्यक्ष आणि सभापतीपदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत भरता येतील.

या जागांवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांना नामनिर्देशन पत्रासोबतच जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागते. नामनिर्देशन प्रमाणपत्राअभावी निवडणूक लढवण्यापासून वंचित राहू नये म्हणून जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास काही कालावधी मिळावा म्हणून हा निर्णय घेण्यात आला.

## वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयासह पदांना मान्यता



पुणे जिल्ह्यातील दौंड येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) हे न्यायालय स्थापन करण्यास व त्याकरिता पदे भरण्यास मान्यता देण्यात आली. या न्यायालयासाठी १६ नियमित पदे व ४ पदांच्या सेवा बाह्य यंत्रणेद्वारे घेण्यात येतील.

## कौटुंबिक न्यायालयासह पदांना मान्यता

अमरावती येथे अतिरिक्त कौटुंबिक

न्यायालय स्थापन करण्यास व आवश्यक ती पदे भरण्यास मान्यता देण्यात आली. या कौटुंबिक न्यायालयासाठी नऊ नियमित पदे व ३ पदांच्या सेवा बाह्य यंत्रणेकडून उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### मराठी भाषा भवनच्या आराखड्यास मान्यता

मुंबईतील मराठी भाषा भवनाच्या कामास गती देण्यासाठी या भवनाच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली. या वेळी मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी या प्रस्तावित भवनाच्या सुधारित आराखड्याचे सादरीकरण केले.

### निवासी मालमत्तांची कर सवलत कायम

पुणे महानगरपालिका हद्दीतील निवासी मालमत्तांना दिलेली मालमत्ता कराची सवलत कायम ठेवण्याचा तसेच दुरुस्ती व देखभालीपोटीच्या फरकाची रक्कम वसूल न करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे निवासी मिळकतींना देण्यात आलेली ४० टक्के सवलत कायम राहील. तसेच देखभाल दुरुस्तीपोटी देण्यात आलेली ५ टक्के रक्कमदेखील वसूल करण्यात येणार नाही. घरमालक स्वतः राहत असल्यास, वाजवी भाडे ६० टक्के धरून देण्यात येणारी ४० टक्के सवलत ही १९७० सालापासून देण्यात येत असून ती कायम राहील.



### साखर कारखान्यांना मार्जिन मनी लोन मंजुरीसाठी मंत्रिमंडळ उपसमिती

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत खेळत्या भांडवलासाठी मार्जिन मनी लोन मंजूर करण्यासाठी सहकारमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

आतापर्यंत प्राप्त प्रस्ताव तांत्रिक व वित्तीय तपासणीकरिता साखर आयुक्त यांच्याकडे पाठवण्याचा निर्णयही घेण्यात आला. या प्रस्तावांना अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीच्या मर्यादेपर्यंतच मंजुरी देण्यात येईल.

खेळत्या भांडवलासाठी सहकारी साखर कारखान्यांना मार्जिन मनी लोन मंजूर करण्यासंदर्भात प्रस्तावावर बैठकीत सर्वंकष विचार करण्यात आला. चर्चेअंती याबाबत निकष ठरवण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात आले.

हे निर्णय पुढीलप्रमाणे - यापूर्वी ज्या सहकारी साखर कारखान्यांनी राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून उभारणीसाठी कर्ज घेतले आहे व त्याची परतफेड केली नाही अशा कारखान्यांना खेळते भांडवली कर्जासाठी अपात्र ठरवावे. यापूर्वी ज्या सहकारी साखर कारखान्यांनी राष्ट्रीय सहकार विकास निगममार्फत मार्जिन मनी / खेळते भांडवली कर्ज घेतले आहे व त्याची परतफेड केली नाही अशा कारखान्यांना देखील अपात्र ठरवण्यात यावे. जे सहकारी साखर कारखाने राज्य शासनामार्फत किंवा बँकेमार्फत खासगी कंपन्यांकडून भाडेतत्त्वावर चालवले जात आहेत अशा कारखान्यांना राज्य शासनामार्फत कर्ज उभारणी करण्यासाठी मान्यता देऊ नये.

राष्ट्रीय सहकार विकास निगमने थेट कर्जासाठी असमर्थता दर्शवल्यास अशा सहकारी साखर कारखान्यांचे प्रस्ताव राज्य शासनास प्राप्त होतात. या सर्व कारखान्यांना FACR (Fixed Asset Coverage Ratio) नुसार जी उपलब्ध कर्ज मर्यादा शिल्लक आहे त्या मर्यादेतच राज्य शासनाने राष्ट्रीय सहकार विकास निगमकडे शिफारस करावी व अशी शिफारस करताना किमान २५० रुपये प्रतिक्विंटल (साखर विक्रीवर) टॅगिंगद्वारे वसुली देणे सक्तीचे राहील अशी अट राहील.

हे कर्ज व त्यावरील संपूर्ण व्याजाच्या परतफेडीकरिता संपूर्ण संचालक मंडळ वैयक्तिक आणि सामूहिकरीत्या जबाबदार राहतील. याबाबत संबंधित संचालकांनी कर्ज वितरणापूर्वी बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. कर्जाची थकबाकी निर्माण झाल्यास एक महिन्याच्या आत कारखान्याचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात यावे व शासकीय प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्यात यावे. कारखान्यावर साखर आयुक्तालयाने निर्माण केलेल्या कार्यकारी संचालकांच्या पॅनेलवरील कार्यकारी संचालक नेमणूक करणे बंधनकारक राहील. शासकीय येणे बाकीच्या परतफेडीसाठी २५ रुपये प्रतिक्विंटल टॅगिंग करून भरणा करणे बंधनकारक राहील.

### रस्ते विकास महामंडळाला कर्ज उभारण्यास मान्यता

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी आवश्यक असणारा निधी आरईसी लिमिटेड मार्फत उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात आली.



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला यापूर्वीच विरार ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी निधी उभारण्याची मान्यता दिली होती. त्या अनुषंगाने महामंडळाला आरईसी लिमिटेडकडून १७ हजार ५०० कोटी रुपयांचे मुदत कर्ज उभारण्यास मान्यता देण्यात दिली.

या कर्जास व देय व्याजासाठी संपूर्ण शासन हमी आवश्यक असेल. हे कर्ज व त्यावरील व्याजाच्या परतफेडीचे दायित्व शासनाचे असेल. शासनाकडून या रकमेची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल तसेच वेळोवेळी महामंडळास हा निधी अनुदान म्हणून देण्यात येईल.

**– टीम लोकराज्य**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २७ फेब्रुवारी ते २५ मार्च २०२३ या काळात मुंबईत पार पडले. जवळपास महिनाभर चाललेल्या या अधिवेशनात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. मा. राज्यपाल महोदयांचे अभिभाषण आणि उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या विकासावर आधारित 'विकासाचे पंचामृत' मांडले. विशेष म्हणजे या अधिवेशनात अनेक प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात आला. विधानसभेच्या इतिहासात पहिल्यांदाच इतक्या लक्षवेधी सूचना घेण्यात आल्याने विधानसभेत लक्षवेधी सूचना या विशेष लक्षवेधी ठरल्या.**

# विधानसभा कामकाज


प्रथेप्रमाणे विधानसभेच्या कामकाजाची सुरुवात वंदे मातरम्ने झाली आणि त्यानंतर पहिल्यांदाच महाराष्ट्राच्या *'जय जय महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा'* या महाराष्ट्र गीताने अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात झाली. महाराष्ट्राने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीदिनापासून *'जय जय महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा'* हे महाराष्ट्र गीत स्वीकारले आहे.

## तालिका अध्यक्ष

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी तालिका अध्यक्षांची निवड केली. विधानसभा सदस्य योगेश सागर, संजय शिरसाट, सुनील भुसारा, सुभाष धोटे यांनी तालिका अध्यक्ष म्हणून अर्थसंकल्पीय अधिवेशनात कामकाज पाहिले.

## दिवंगत माजी सदस्यांना श्रद्धांजली

विधानसभेचे माजी आणि निकटच्या कालावधीत दिवंगत झालेल्या सदस्यांना विधानसभेत मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाला सभागृहाने संमती दिली. लक्ष्मण पांडुरंग जगताप, विद्यमान विधानसभा सदस्य, मोरेश्वर विठ्ठलराव टेमुर्डे, माजी विधानसभा उपाध्यक्ष, केशवराव शंकरराव धोंडगे, माजी लोकसभा सदस्य व माजी वि.स.स., डॉ. देवीसिंह रामसिंह शेखावत, सदाशिवराव शंकरराव माळी, उत्तमराव केशवराव पटवारी-भालेराव, सूर्यकांत देसाई यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडण्यात आला.



## मा. राज्यपाल महोदयांचे अभिभाषण

राज्य विधानमंडळाच्या २०२३ या वर्षातील महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी २७ फेब्रुवारी २०२३ रोजी आपले अभिभाषण सादर केले. आपल्या अभिभाषणात राज्यपाल महोदयांनी महाराष्ट्राने आतापर्यंत राज्याचे हित समोर ठेवून घेतलेले निर्णय, योजना यांची माहिती दिली. महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी, सन्माननीय सदस्य कामकाजात सहभाग घेतील व या प्रस्तावांवर आपली अभ्यासपूर्ण मते मांडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## पंचामृतवर आधारित अर्थसंकल्प

उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ९ मार्च रोजी राज्याचा २०२३-२४चा अर्थसंकल्प डिजिटल पद्धतीने सादर केला. अमृत काळातील पहिला असा पंचामृत विकासावर आधारित असलेला अर्थसंकल्प मांडला. २०२३-२४ या वर्षाचा ५ लाख ४७ हजार ४५० कोटींचा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत, तर मंत्री दीपक केसरकर यांनी विधान परिषदेत सादर केला.

## महिला विधानसभा सदस्यांनी मांडल्या लक्षवेधी सूचना

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विधानसभा कामकाजात त्यादिवशी जास्तीत जास्त महिला विधानसभा सदस्यांनी लक्षवेधी सूचना मांडल्या. विशेष म्हणजे आपल्या

सूचना मांडण्यासाठी त्यांना विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी पुरेसा वेळ आणि संधी दिली. याशिवाय विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि महिलांना सर्व क्षेत्रात समान संधी आणि सन्मानाचे स्थान मिळावे, यासाठीचा प्रस्ताव मांडला.

### सदस्यांची उपस्थिती

विधानसभेत प्रत्यक्षात १६५ तास ५० मिनिटे कामकाज झाले. रोजचे सरासरी कामकाज ९ तास १० मिनिटे झाले. या अधिवेशनात सन्माननीय सदस्यांची जास्तीत जास्त उपस्थिती ९४.७१ टक्के होती, तर एकूण सरासरी सदस्यांची उपस्थिती ८०.८९% होती. विशेष म्हणजे या अधिवेशनात ७ हजार ९८१ तारांकित प्रश्न प्राप्त झाले होते. त्यापैकी ५०६ स्वीकृत करण्यात आले होते आणि ५ प्रश्नांना विधानसभेत उत्तर देण्यात आले. या वेळी विशेष ठरल्या त्या लक्षवेधी सूचना. कारण २ हजार ५५६ लक्षवेधी सूचना या वेळी प्राप्त झाल्या होत्या, त्यापैकी ५३५ स्वीकृत होऊन १४५ लक्षवेधी सूचनांवर अधिवेशनादरम्यान चर्चा झाली. या वेळी एकूण पुनर्स्थापित आणि संमत अशी १७ शासकीय विधेयके मांडण्यात आली.

### नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत

मार्च महिन्यातील सुरुवातीला राज्यातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टी, सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे बरेच नुकसान झाले. या शेतकऱ्यांच्या पिकांचे किती नुकसान झाले, याबाबत तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. राज्यात अवकाळी पावसामुळे आठ जिल्ह्यांत सुमारे १३ हजार ७२९ हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी प्रस्ताव तातडीने मागवण्यात आले असून त्यांना तत्काळ मदत देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

कांदा उत्पादकांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे असून नाफेडकडून कांदा खरेदी सुरू झाली आहे. शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना निकषापेक्षा जास्त मदतही केली आहे. नाफेडला अतिरिक्त कांदा खरेदी करण्याची विनंती केली होती, त्याप्रमाणे खरेदी सुरू झाली आहे. २.३८ लाख मेट्रिक टन कांदा आत्तापर्यंत खरेदी झाला असून जिथे खरेदी केंद्र बंद असेल तिथे सुरू करण्यात येईल. कांदा निर्यातीवर देखील बंदी नाही. कांदा उत्पादक शेतकऱ्यांनासुद्धा आवश्यकतेनुसार मदत जाहीर करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत सांगितले. राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ३५० रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे.

### सीमा भागातील नागरिकांना योजना

सीमावर्ती बांधवांवर कर्नाटक सरकारकडून अन्याय होऊ नये, अशी शासनाची भूमिका आहे. सर्वोच्च न्यायालयात हा प्रश्न प्रलंबित असून सर्वोच्च न्यायालयात आपली बाजू मांडण्यासाठी

## महत्त्वाचे

- पुणे येथील भिडे वाड्यात सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक करण्यास शासनाचे सर्वोच्च प्राधान्य; लवकरच मालक, विकासक व भाडेकरू यांच्यासमवेत बैठक घेण्यात येणार.
- जलयुक्त शिवार अभियान टप्पा-दोन सुरू करण्यात येणार.
- गडचिरोलीतील वनपट्टेधारक शेतकऱ्यांना नोंदणीसाठी मुदतवाढ.
- अंगणवाडी सेविकांच्या मानधनात २० टक्के, तर मदतनीस यांच्या मानधनात १० टक्के वाढ करण्याचा निर्णय.
- आरोग्य सेवा-सुविधांच्या बळकटीकरणासाठी रिक्त पदे भरणार.
- पतसंस्थांमधील गैरव्यवहार रोखण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापणार.
- लिक्विड ओरल उत्पादक कंपन्यांच्या तपासणीसाठी विशेष मोहीम.
- म्हाडाच्या उपकरप्राप्त इमारतीस पूर्वीप्रमाणेच सेवा शुल्क आकारणार.
- १०० आदिवासी विद्यार्थ्यांना पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी संशोधन अधिछात्रवृत्ती.
- शासकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या स्थानिक औषध खरेदीची मर्यादा आता १० टक्क्यांवरून ३० टक्के.
- २ जुलै २०१२ पासून राबवण्यात येणारी महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेची उत्पन्न मर्यादा दीड लाखांवरून पाच लाख रुपये.
- परळी येथील वैजनाथ ज्योतिर्लिंग स्थळांच्या सर्वांगीण विकास व संवर्धनासाठी लवकरच बैठक.
- राज्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत येणारे रस्ते सिमेंटचे करण्यात येणार.
- महसूल विभागाच्या ताब्यातील वनक्षेत्रासंदर्भात मार्ग काढण्यासाठी महसूल विभागाबरोबर संयुक्त बैठक लवकरच घेणार.
- आरे कॉलनीच्या विकासासाठी सर्वंकष आराखडा लवकरच तयार करणार.
- राज्यातील ३४ किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांकरिता जन-सुविधा केंद्राची उभारणी करणार.
- मुंबई वडाळा येथील बीपीटीतील जागेवर कर्करोग उपचार रुग्णालय उभारणीच्या बाबतीत नगर विकास विभाग, महानगरपालिका व सार्वजनिक आरोग्य विभागाची संयुक्त बैठक घेणार.
- केंद्र सरकारने तीर्थस्थळांच्या विकास व संवर्धनासाठी 'प्रसाद' योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत परळी वैजनाथ ज्योतिर्लिंगाचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्रीय पर्यटन मंत्रालयास सादर करणार.
- हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या स्मारकाचा अंतिम आराखडा दोन महिन्यात करणार.
- आदिवासींना जमिनींचा मोबदला देताना होणारी फसवणूक टाळण्यासाठी कँम्प घेऊन वितरण.
- स्वाधार योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १८४ कोटींची तरतूद.
- झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पामध्ये शासनाला सकारात्मक सूचना मिळाव्यात आणि येणाऱ्या अडचणींवर मार्ग काढता यावा, यासाठी विधिमंडळातील दोन्ही सभागृहांतील निवडक सदस्यांची समिती गठित करणार.

तज्ज्ञ वकिलांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. राज्य शासनाच्या वतीने सीमावर्ती भागातील संस्थांना देण्यात येणारा मुख्यमंत्री धर्मादाय निधी पुन्हा एकदा द्यायला सुरुवात केली आहे. सीमावर्ती भागातील शाळा आणि संस्थांना अनुदान, महात्मा फुले आरोग्यदायी योजनेचा लाभ सीमावर्ती भागातील नागरिकांना लागू करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. तसेच सीमालढ्यातील स्वातंत्र्यसैनिकांचे निवृत्तिवेतन १० हजारांहून २० हजारांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### विकासाला गती

राज्यात पुढील दोन वर्षांत महत्त्वपूर्ण पायाभूत प्रकल्प मार्गी लागणार असून त्यामुळे राज्याचे वेगळे चित्र देशापुढे उभे करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. या सर्व दर्जेदार पायाभूत सुविधांच्या माध्यमातून महाराष्ट्राची वेगळी ओळख निर्माण होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत सांगितले.

समृद्धी महामार्ग, मुंबई मेट्रो, एमटीएचएल, कोस्टल रोड, आपला दवाखाना यांसारख्या लोकोपयोगी प्रकल्पांच्या माध्यमातून विकासाला गती देण्याचे काम सुरू आहे. मुंबईकरांसाठी शहराचा विकासात्मक बदल करण्यात येत आहे. मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्वच उद्यानांमध्ये पुरेशी स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सोय, विद्युत दिवे, सुरक्षा याबाबत विकास आराखडा (डीपीआर) तयार करण्याचे महापालिका आयुक्तांना निर्देश दिले असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत सांगितले.

### सीसीटीएनएस राबवणारे पहिले राज्य

विविध प्रकारच्या गुन्ह्यांच्या तपासामधील गुन्हे प्रकटीकरण, गुन्ह्यांचे पर्यवेक्षण, गुन्हे प्रतिबंध करणे याकरिता सुरू केलेल्या ‘क्राईम ॲण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क ॲण्ड सिस्टिम्स’ (सीसीटीएनएस) राबवणारे देशातील महाराष्ट्र पहिले राज्य आहे. याची अधिक व्याप्ती वाढवून आता दुसरा टप्पा हाती घेण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

## लवकरच पुढील धोरणे आणण्यात येणार...

### कुष्ठरोग निर्मूलन व पुनर्वसनाबाबत धोरण

राज्यातील कुष्ठरोग निर्मूलनासाठी विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. कुष्ठरुग्णांच्या अडचणी समजून घेऊन त्यांच्यासाठी रोजगार निर्मिती, त्यांचे पुनर्वसन यासंदर्भात समिती गठित करण्यात येणार आहे. समितीच्या अहवालानुसार सर्वंकष धोरण तयार करण्यात येणार आहे.

### गौण खनिज धोरण आणि वाळू धोरण

राज्यातील गौण खनिजांचे अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्याकरिता लवकरच गौण खनिज धोरण आणि वाळू धोरण जाहीर करण्यात येणार आहे. राज्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाळू उपशाला आळा घालण्यासाठी शासनामार्फत वेळोवेळी उपाययोजना करण्यात येत असतात; परंतु असे असतानाही राज्यात नियमबाह्य उत्खनन होत असेल आणि त्यांच्यावर कारवाई होत नसेल, तर संबंधित यंत्रणेतील अधिकारी-कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन कारवाई करण्यात येणार आहे.

### नवीन माहिती तंत्रज्ञान धोरण

राज्य शासनाने पहिले माहिती तंत्रज्ञान धोरण १९९८ मध्ये आणले होते. त्यानंतर वेळोवेळी या धोरणात बदल करून नवीन धोरण आणण्यात आले. नवीन माहिती तंत्रज्ञान धोरण आणण्यात येणार आहे. नवीन माहिती तंत्रज्ञान धोरणामध्ये रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील, याचा विचार करण्यात आला आहे.

### सर्वसमावेशक महिला धोरण

महाराष्ट्रात महिलांना मानाचे स्थान आहे. देशाच्या विकासात महाराष्ट्राचे मोलाचे योगदान आहे. त्याचप्रमाणे राज्याच्या विकासात महिलांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे. राज्यातील महिलांना विविध क्षेत्रात अधिकाधिक संधी निर्माण करून देणारे सर्वसमावेशक महिला धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे.

### वयोमर्यादेत शिथिलता

शासनसेवेत सरळसेवेने भरतीसाठी कमाल वयोमर्यादेत ३१ डिसेंबर २०२३ पर्यंतच्या जाहिरातींकरिता दोन वर्षांची शिथिलता देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे सरळसेवेने शासकीय सेवेत येऊ इच्छिणाऱ्या गट-अ, ब, क व ड (वर्ग १-४) या पदांसाठीच्या उमेदवारांना मोठा दिलासा

### शेतकऱ्यांसाठी...

- शेतकऱ्यांच्या शेतीला दळणवळणासाठी रस्त्याच्या अडचणी निर्माण होतात. त्यासाठी गाव नकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले गाडीवाट, रस्ते, पाणंद, शेत रस्ते, शिवार रस्ते, शेतावर जाण्या-येण्याचे रस्ते खुले करण्यासाठी विशेष अभियान राबवणार.
- राज्यात दुधात होणारी भेसळ रोखण्यासाठी जिल्हानिहाय दूध तपासणी प्रयोगशाळा तयार करणार.
- खत खरेदी करताना पीओएस मशीनमधील जातीचा उल्लेख वगळण्याबाबत केंद्र शासनाला विनंती करणार.
- शेतकऱ्यांना कमी दरात वीज उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने अनेक प्रकल्प प्रस्तावित केले असून, सन २०२५ पर्यंत ५० टक्के सौर ऊर्जा फिडर प्रकल्पाचे काम करण्याचे उद्दिष्ट.
- ट्रान्सफॉर्मर्स तत्काळ बदलण्यासाठी निरंतर वीज योजना सुरू करणार.
- राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना आधारभूत किमतीव्यतिरिक्त प्रति हेक्टरी १५ हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम.
- पशुधनाचे मोफत लसीकरण करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असून लम्पी आजाराच्या औषध उपचारांसाठीचा १०० टक्के खर्च राज्य सरकारने केला आहे.

मिळणार आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या औचित्याने शासनाने ७५ हजार पदांची भरती प्रक्रिया सुरू केली आहे. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत शासनसेवेत सरळसेवेने नियुक्ती देण्यासाठी प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींसाठी विहित केलेली कमाल वयोमर्यादा ओलांडणाऱ्या उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेत दोन वर्षांची शिथिलता देण्यात येणार आहे. कमाल वयोमर्यादेत दोन वर्षांनी शिथिलता म्हणजेच जर खुल्या प्रवर्गासाठी विहित केलेली कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे असेल तर ती ४० वर्षे ग्राह्य धरली जाईल व मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे असेल तर ती ४५ वर्षे ग्राह्य धरली जाईल.

### मालोजी राजे यांच्या गढीसंवर्धनासाठी निधी

छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांच्या पराक्रमी इतिहासाला उजाळा देण्यासाठी पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील जुनी कचेरी म्हणजेच मालोजी राजे यांच्या गढीसंवर्धनासाठी पर्यटन विभागातर्फे दोन कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल. या ऐतिहासिक स्थळाला पर्यटन स्थळ घोषित करण्यात येईल, असे पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी विधानसभेत सांगितले.

### शिवराज्याभिषेक उत्साहात साजरा करणार

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्यास पुढील वर्षी ३५० वर्षे पूर्ण होत आहेत, त्यासाठी राज्यात विविध कार्यक्रमांसाठी ३५० कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवशकानुसार शिवराज्याभिषेकाचे हे ३५०वे वर्ष आहे. २ ते ९ जून २०२३ या कालावधीमध्ये शिवराज्याभिषेक महोत्सव आयोजित करण्यात येणार असून हा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत सांगितले.

जवळपास महिनाभर चाललेल्या या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्नोत्तरे, तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, विशेष प्रस्ताव, शासकीय आणि अशासकीय विधेयके मांडली गेली. याशिवाय मा. राज्यपालांचे अभिभाषण, राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल आणि राज्याचा या वर्षीचा अर्थसंकल्प, पुरवणी, मागण्या यांवर चर्चा झाली. या सर्व कामकाजात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीवस यांच्यासह विरोधी पक्षनेते अजित पवार, विधानसभेचे सदस्य या सर्वांनी सहभाग घेतला. या अधिवेशन कालावधीत विरोधी पक्ष नेत्यांसह सर्वच विधानसभा सदस्यांचा चांगला सहभाग होता. विधानसभेचे अधिवेशन संस्थगित होत असताना विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी विधानसभेतील अधिकारी आणि कर्मचारी, तसेच प्रशासनातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी, पोलीस यंत्रणा यांचे आभार मानले.

**– वर्षा फडके–आंधळे, काशीबाई थोरात** (वरिष्ठ सहायक संचालक);
**राजू धोत्रे, शैलजा पाटील** (सहायक संचालक)

## महत्त्वाचे

- राज्यातील विशेषत: मुंबईतील हवाप्रदूषण नियंत्रणासाठी कृतिआराखडा तयार.
- सर्वांना परवडणाऱ्या व उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात, हे राज्य शासनाचे उद्दिष्ट असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणार.
- राज्यात आगामी काळात महाविद्यालयांना शासनाची परवानगी देताना काही निकष ठरवण्यात येत आहेत. अल्पसंख्याक, मुलींसाठीचे, डोंगराळ वस्तीत आणि आदिवासी भागात महाविद्यालयाबाबतचे निकष निश्चित करणार.
- मच्छीमारांना १२० हॉर्स पॉवरपर्यंतच्या बोटींना डिझेल परतावा दिला जाणार.
- विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित आणि महाविद्यालयाच्या प्रशासनिक बाबींवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेऊन सहायक प्राध्यापक, प्राचार्य, शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथपाल ही पदे भरण्यास वित्त विभागाने मान्यता.
- राज्यातील शासकीय महाविद्यालये/ संस्था, अशासकीय अनुदानित महाविद्यालये तसेच अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन व कला महाविद्यालयांमधील तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या मानधनात वाढ.
- आतापर्यंत फक्त व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक होते, येणाऱ्या काळात अव्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठीही जात प्रमाणपत्र पडताळणी अनिवार्य करण्यात येणार.
- शिक्षण आणि नोकरीसाठी आरक्षण मागणाऱ्या संबंधित उमेदवारांना जातीचे दाखले आवश्यक असतात. हे दाखले वेळेत देण्यासाठी नियम करणार.
- खासगी शाळांमधील शुल्क ठरवण्यासंदर्भात तज्ज्ञांची समिती नियुक्त करणार.
- आदिवासी संस्कृतीचे जतन करण्यासाठी आदिवासी सांस्कृतिक संग्रहालयाची स्थापना करणार.
- अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतूक रोखण्यासाठी ट्रॅक आणि ट्रेसिंग कार्यप्रणाली आणणार.
- मुंबईतील गिरणी कामगारांना हक्काचे घर देण्यासाठी शासन कटिबद्ध.
- सध्या जिल्हास्तरावर स्वाधार योजना राबवण्यात येत असून आगामी काळात ही योजना तालुकास्तरावर राबवणार.
- केमिकलमिश्रित हळदीच्या वापराला आळा घालण्यासाठी उपाययोजना करणार.
- अनेक वृद्ध व्यक्तींच्या बोटांचे ठसे पुसट येत असल्याने आधार प्रमाणिकरण करताना समस्या निर्माण होतात. आता अशा लाभार्थींसाठी 'कार्ड नॉमिनी' सुविधा सुरू.
- कोल्हापूर चित्रनगरीत मालिका तसेच चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी अद्ययावत सोयीसुविधा निर्माण करण्याबरोबरच येत्या काळात चित्रनगरीचा कायापालट करणार.

**राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन नुकतेच मुंबईत झाले. २०२३-२४ साठीच्या आर्थिक तरतुदींना मान्यता देण्याबरोबरच जनहिताच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर या अधिवेशनात प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना, औचित्याचे मुद्दे, नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा, नियम २६० अन्वये प्रस्ताव, अर्धा तास चर्चा, अंतिम आठवडा प्रस्ताव आदी संसदीय आयुधांच्या माध्यमातून चर्चा करण्यात आली. शासनाच्या वतीने त्यावर सकारात्मक उत्तरेही देण्यात आली.**

# विधानपरिषद कामकाज

राज्यपालांचे अभिभाषण ही बाब संसदीय लोकशाही व्यवस्थेतील अतिशय पवित्र बाब आहे.

संविधानाच्या तरतुदीनुसार प्रत्येक वेळी नवीन विधानसभा अस्तित्वात आल्यानंतरच्या पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीस तसेच दरवर्षी पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीस विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांना उद्देशून राज्यपालांचे अभिभाषण होते. या अभिभाषणात राज्यपाल महोदय अधिवेशन बोलवण्याची कारणे आणि पुढील वर्षभरात शासनाकडून हाती घेण्यात येणारे कार्यक्रम यासंबंधीचा आढावा घेतला जातो.

विधिमंडळाचे या वर्षातील पहिले अधिवेशन असल्याने अधिवेशनाची सुरुवात राज्यपाल रमेश बैस यांच्या अभिभाषणाने झाली. अर्थव्यवस्थेला गती, युवकांना नोकऱ्या, शेतकरी कर्जमुक्ती, आपला दवाखाना योजना, रोजगार मेळावे, पायाभूत सुविधांची निर्मिती यांसह अनेक योजनांना राज्यात गती देण्यात येत आहे, असे त्यांनी विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात झालेल्या अभिभाषणात सांगितले.

## 'वंदे मातरम्'ने सुरुवात

अधिवेशनात विधानपरिषदेच्या कामकाजाची सुरुवात 'वंदे मातरम्'ने सुरू झाले. याबरोबरच 'जय जय महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्यगीतही गायले गेले.




## दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधानसभा सदस्य व माजी विधानपरिषद सदस्य लक्ष्मण जगताप, माजी विधान परिषद सदस्य जयप्रकाश छाजेड व सुमंत गायकवाड यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला. उपस्थित सदस्यांनीही दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहिली.

## तालिका सभापतींची नेमणूक

अधिवेशनासाठी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी निरंजन डावखरे, नरेंद्र दराडे, अनिकेत तटकरे, जयंत आसगावकर यांची तालिका सभापती म्हणून नेमणूक जाहीर केली.

## आर्थिक पाहणी अहवाल सादर

'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२-२३' चा अहवाल उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजनमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केला. या पाहणीच्या पूर्वानुमानानुसार राज्याच्या अर्थव्यवस्थेत ६.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. तर, देशाच्या अर्थव्यवस्थेत सात टक्के वाढ अपेक्षित आहे. सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्नात राज्याचा सरासरी हिस्सा सर्वाधिक म्हणजे १४ टक्के इतका आहे.

## पंचसूत्री अर्थसंकल्प

राज्याचा २०२३-२४ या वर्षाचा ५ लाख ४७ हजार ४५० कोटींचा अर्थसंकल्प मंत्री दीपक केसरकर यांनी विधानपरिषदेत सादर केला. यानुसार महसुली जमा ४ लाख ४९ हजार ५२२ कोटी, तर महसुली खर्च ४ लाख ६५ हजार ६४५ कोटी आहे. महसूली तूट १६ हजार ११२ कोटी, तर राजकोषीय तूट ९५ हजार ५०० कोटी ८० लाख रुपये इतकी आहे.

देशाच्या अमृतकाळातील पंचामृतावर आधारित अर्थसंकल्पात 'शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी' या घटकासाठी २९ हजार

१६३ कोटी; महिला, आदिवासी, मागासवर्ग, ओबीसींसह सर्व समाजघटकांच्या सर्वसमावेशक विकासासाठी ४३ हजार ३६ कोटी; भरीव भांडवली गुंतवणुकीतून पायाभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी ५३ हजार ५८ कोटी ५५ लाख; रोजगार निर्मिती, सक्षम, कुशल- रोजगारक्षम युवा यासाठी ११ हजार ६५८ कोटी, तर पर्यावरणपूरक विकास या घटकासाठी १३ हजार ४३७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर

शाश्वत शेती, सर्वसमावेशक विकास, गुंतवणूक आणि पायाभूत सुविधांचा विकास, रोजगार निर्मिती आणि पर्यावरणपूरक विकास या पाच तत्त्वांवर आधारित असलेला राज्याचा २०२३-२४चा हा अर्थसंकल्प आहे. समाजातील प्रत्येक घटकाला दिलासा देणारा सर्वसमावेशक अर्थसंकल्प आहे. याअनुषंगाने झालेल्या चर्चेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह ३३ सदस्यांनी सहभाग घेतला होता.

### जलसंधारण आणि जलसिंचन योजना

राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांच्या आभाराचा ठराव मांडला. संरक्षित सिंचनासाठी जलयुक्त शिवार टप्पा-२ आणि जलसंधारणाच्या योजना प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचे सांगून सर्व घटकांच्या विकासासाठी राज्य शासन सकारात्मक असल्याचे ते म्हणाले. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह ३० सदस्यांनी याअनुषंगाने झालेल्या चर्चेत सहभाग घेतला होता.

### अल्पकालीन चर्चा नियम ९७

निकडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा करण्याची सूचना या अल्पकालीन नियम ९७ अन्वये दिली जाते. यामध्ये जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करण्याबाबत मार्ग काढण्यासाठी शासन सकारात्मक असून संबंधित सर्व संघटनांसोबत चर्चा करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नियम ९७ अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना सांगितले.

‘मराठवाडा अमुचा मान, मराठवाडा अमुचा सन्मान, मराठवाडा अमुचा अभिमान, उत्साहाने साजरा करू मराठवाडा मुक्ती संग्राम’ असे सांगून हा सर्वांचा कार्यक्रम आहे, तो सर्वांना सोबत घेऊन साजरा करणार असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी नियम ९७ अन्वये यासंदर्भातील अल्पकालीन चर्चा उपस्थित केली होती.

### नियम २६० अन्वये प्रस्ताव

गेल्या काही दिवसांत राज्याच्या विविध भागांमध्ये अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतीक्षेत्र बाधित झाले आहे. यामुळे

### योजना व निर्णय

- मराठी चित्रपटांना प्रोत्साहन आणि अर्थसाहाय्य मिळावे यासाठी अर्ज केल्यानंतर तीन महिन्यातच नियमानुसार अनुदान अदा करण्यात येणार आहे. यासाठी मराठी चित्रपट अनुदान समिती पुनर्गठित करण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.
- अपर जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी संवर्गातील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया येत्या तीन महिन्यांत सुरू करणार असल्याची माहिती महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.
- अवैध उत्खननाबाबत धोरणात्मक निर्णय घेणार असल्याची माहिती महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.
- राज्यात एकूण ४१ कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.
- गोसीखुर्द प्रकल्पात पाणीसाठा निर्माण झाल्यामुळे कालवे व वितरण प्रणालीची कामे २०२४ पर्यंत पूर्ण करणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.
- सफाई कामगारांच्या कल्याणाकरिता लाड-पागे समितीच्या शिफारशींचा शासन निर्णय नुकताच निर्गमित करण्यात आला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात येणाऱ्या राज्यसेवा परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्यात येणार आहेत. या निर्णयाची अंमलबजावणी २०२५ पासून होणार आहे. अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.
- लोककलावंतांच्या समस्यांबाबत सर्वंकष निर्णय घेण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अहवालातील निष्कर्ष तपासून प्रत्येक जिल्ह्यात पारंपरिक कला आणि कलावंत यांची तर्कावर आधारित संख्या विचारात घेऊन मानधन देण्यात येणार असल्याचे सांस्कृतिक माहिती कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.
- पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याबाबत आणि मानधन वाढवण्यासंदर्भात शासकीय समितीची बैठक घेणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.
- सरदार सरोवर प्रकल्पामुळे बाधित झालेल्या ग्रामस्थांच्या पुनर्वसनासाठी वसवलेल्या देवमोगरा गावाला पाणीपुरवठा करण्याकरिता बांधण्यात आलेल्या आमलीबारी धरणाचे काम कालमर्यादेत पूर्ण केले जाणार आहे.
- आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतीचा पोषण आहार पुरवण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी सांगितले.
- राज्यातील गौण खनिजांचे अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्याकरिता गौण खनिज आणि वाळू धोरण जाहीर करणार असल्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.
- शालेय पोषण आहार योजनेंतर्गत महिला बचतगटांना त्यांच्या कामाचे पैसे वेळेत मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर केल्या जातील, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

झालेल्या नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू आहेत. शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी नियम २६० अन्वये प्रश्न उपस्थित केला होता.

## अंतिम आठवडा प्रस्ताव (नियम २५९)

अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा घडवून आणण्यासाठी एक दिवस दिला जातो. या दिवशी प्रस्ताव चर्चेला ठेवले जातात. त्याप्रमाणे पुढील प्रस्तावावर मा.सभापतींच्या परवानगीने चर्चा झालेल्या बाबी :-

## राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे

राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे हा राज्य शासनाचा प्राधान्याचा विषय आहे. पोलीस दलाचे आधुनिकीकरण आणि सक्षमीकरणाबरोबच पोलीस दलाला लोकाभिमुख करण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. राज्य शासन सामान्य माणसाच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवण्याबरोबरच मुंबईसह महाराष्ट्राच्या विकासासाठी काम करीत असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. कायदा व सुव्यवस्थेसह शासन करीत असलेल्या विकास कामांचा आढावा या वेळी सादर केला.

## अभिनंदनाचा ठराव

ऑस्कर पारितोषिक सोहळ्यात आरआरआर या चित्रपटातील 'नाटू नाटू' या गीतास तसेच 'एलिफंट व्हिस्परर' या माहितीपटास पुरस्कार मिळाल्याबद्दल उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला. सभागृहातील सर्व सदस्यांनी या ठरावाचे समर्थन केले.

## समाधी स्थळाचा विकास आराखडा

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचे पुणे जिल्ह्यातील बलिदान स्थळ मौजे तुळापूर ता. हवेली व समाधी स्थळ स्मारक वढू (बु.) शिरूर येथील विकास आराखड्याच्या नावामध्ये अंशतः बदल करण्यात आला असून सुधारित नाव 'स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ मौजे तुळापूर, तालुका हवेली व समाधी स्थळ स्मारक वढू (बु.), शिरूर, जि.पुणे विकास आराखडा असे निश्चित करण्यात आले असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

## राज्य सरकारी कर्मचारी संप

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतल्याच्या निर्णयाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वागत केले. कर्मचाऱ्यांच्या मागणीबाबत राज्य शासन पूर्णतः सकारात्मक असून याकरिता स्थापन करण्यात आलेल्या समितीचा अहवाल लवकरात लवकर प्राप्त करून त्यावर उचित निर्णय घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी जाहीर केले.

## मराठा आरक्षण आणि प्रकल्पग्रस्त

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी पुरेपूर आणि प्रामाणिकपणे प्रयत्न केले जातील. केंद्राच्या मदतीने पूर्ण ताकदीने न्यायालयीन लढा लढला जाईल. वकिलांची टास्क फोर्स आणि संबंधित सर्वांना एकत्र घेऊन बैठक घेतली जाईल. त्या बैठकीला मी स्वतः उपस्थित राहीन, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाज आरक्षणासंदर्भात उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर दिली.

प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबरोबरच रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्य विकास, उद्योग आदी माध्यमातून त्यांना उन्नतीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सर्वंकष धोरण तयार करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

## महिला दिनानिमित्त

महिलांना विविध क्षेत्रात अधिकाधिक संधी निर्माण करून देणारे सर्वसमावेशक महिला धोरण तयार करण्याचे काम सुरू असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. जागतिक महिला दिनानिमित्त उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आधुनिक महिला धोरण तयार करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला.

## लक्षवेधी सूचना

- तातडीच्या व महत्त्वाच्या सार्वजनिक बाबीकडे संबंधित मंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी जी सूचना दिली जाते, तिला 'लक्षवेधी सूचना' म्हणतात.
- केंद्र शासनाच्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा सुरू असून केंद्र शासनाला जमिनीचा मोबदला तसेच पर्यायी जागेसंदर्भात पुनर्विचार करण्याबाबत विनंती करण्यात आली असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.
- शेती व्यवसाय करताना नैसर्गिक अपघातग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांसाठी राबवली जाणारी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना यापुढे शासनामार्फत राबवण्याचा विचार असल्याचे कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितले.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० राज्यात येत्या शैक्षणिक वर्षापासून राबवण्यात येणार आहे. यासाठी अभ्यासक्रम आराखडा अंतिम करण्यासाठी प्रक्रिया सुरू असल्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.
- पंढरपूर तीर्थक्षेत्र कॉरिडॉरबाबत जनतेच्या सूचना, हरकती यांचा विचार करून या प्रारूप विकास आराखड्यास अंतिम मान्यता देण्यात येईल, असे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.
- अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व पात्र संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती मिळावी, या मागणीसंदर्भात सर्व बाबी तपासून लवकरच धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल, असे मंत्री संजय राठोड यांनी सांगितले.
- बेरोजगारीची समस्या सोडवण्यासाठी कौशल्य विकास विभागामार्फत विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात

येत असल्याचे कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

- नागपूर येथे १०० खाटांचे कॅन्सर रुग्णालय उभारण्याचे काम आता वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत करण्यात येत असून लवकरच बांधकाम पूर्ण करण्यात येईल, असे वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.
- जलजीवन मिशनअंतर्गत ३८ हजार गावांमध्ये प्रत्येक कुटुंबाला प्रत्येक घरात वैयक्तिक नळजोडणीद्वारे दरडोई ५५ लिटर पाणीपुरवठ्याच्या योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. यापैकी २२ हजार गावांमध्ये कामे सुरू असल्याची माहिती पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.
- राज्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजना पुन्हा सुरू करण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.
- एप्रिल अखेर ३० हजार पदांची भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच आधारजोडणीचे काम पूर्ण झाल्यानंतर आवश्यकता भासल्यास नवीन शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी घेण्यात येईल असे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.
- वाढत्या धर्मांतर व आंतरधर्मीय विवाहाच्या घटनांबाबत वेगवेगळ्या राज्यांनी केलेल्या विशेष कायद्याचा अभ्यास करून राज्यात योग्य तो निर्णय घेण्याबाबत राज्य शासन विचाराधीन असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## सदस्यांची उपस्थिती

विधानपरिषदेत एकूण १८ बैठकांमध्ये प्रत्यक्षात १२५ तास २० मिनिटे कामकाज झाले. रोजचे सरासरी कामकाज ६ तास ५७ मिनिट होते. सदस्यांची जास्तीत जास्त उपस्थिती ९१.२२ टक्के होती, तर सरासरी उपस्थिती ८०.६० टक्के होती.

## शासकीय विधेयके

विधेयकाचे शासकीय व अशासकीय असे दोन प्रकार असतात. शासनाने पुरस्कृत केलेले विधेयक हे शासकीय समजले जाते. दुसऱ्या कोणत्याही सदस्याने पुरस्कृत केलेले ते अशासकीय होय. विधेयकाच्या मसुद्यामध्ये त्यांची कारणे, उद्देश, संक्षिप्त दिला जातो. विधेयकाचे सर्वसाधारण विधेयक, धनविषयक विधेयक, (मनी बिल) वित्तविषयक विधेयक (फायनान्शियल बिल) असे प्रकार असतात. प्रत्येक विधेयकाचे तीन वेळा वाचन केले जाते. विधेयक मांडल्यानंतर त्याचा उद्देश व कारणे शासन राजपत्रात प्रसिद्ध केली जातात.

**– ब्रिजकिशोर झंवर,**
(विभागीय संपर्क अधिकारी)

## योजना व निर्णय

- प्राथमिक शाळांनी वीज देयक भरण्यासाठी पुरेशा निधीची तरतूद केली आहे, या शाळांची वीज तोडली जाणार नाही याबाबत वीज वितरण मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांसोबत सविस्तर चर्चा झाली असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.
- दुर्गम आणि अतिदुर्गम भागात वैद्यकीय सुविधा पुरवण्यासाठी राज्यात नव्याने १२ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये उभारण्यात येत असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.
- सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधांबाबत आलेल्या तक्रारींची दखल घेऊन शासकीय वसतिगृहांची तत्काळ तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री संजय राठोड यांनी दिली.
- जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अधिसंख्य पदावर नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या रिक्त झालेल्या जागा लवकरच भरण्यात येतील, अशी माहिती मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.
- प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप-२०२२ मधील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विमा कंपन्यांच्या माध्यमातून नुकसानभरपाई रकमेचे ३१ मे, २०२३ पर्यंत वाटप करण्यात येईल. याबाबत कार्यवाही करण्यास कसूर करणाऱ्या विमा कंपन्यांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली.
- बोगस खते, बियाणे आणि कीटकनाशके यांची विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध आणि विक्रेत्यांविरुद्ध कडक कार्यवाही करणार असल्याचे कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितले.
- डोंगरी तालुक्यांचा डोंगरी विभाग विकास कार्यक्रमात समावेश करण्याबाबत मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.
- राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.
- मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी कार्यवाही सुरू असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली.
- बनावट औषध विक्रीवर नियंत्रण आणण्यासाठी येत्या काळात उत्पादक-विक्रेते-ग्राहक अशी संगणक प्रणाली विकसित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री संजय राठोड यांनी दिली.
- महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनांची पडताळणी करून या योजनेत मनोविकाराच्या अन्य आजारांसहित आवश्यक असणाऱ्या आजारांचा समावेश केला जाईल, अशी माहिती आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी दिली.

# आशाताई भोसले यांना २०२१चा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान



'गेल्या आठ दशकांपासून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या मंगेशकर कुटुंबीयांनी गायन आणि संगीताच्या माध्यमातून कला क्षेत्राची सेवा बजावली आहे. या कुटुंबातील एक घटक असलेल्या आशा भोसले यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान करताना आनंद होत आहे. आशाताई भोसले या महाराष्ट्राची शान आहेत,' असे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे गेट वे ऑफ इंडियाच्या प्रांगणात ख्यातनाम गायिका आशा भोसले यांना सन २०२१चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. शाल, सन्मानचिन्ह, मानपत्र आणि २५ लाख रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या वेळी विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, ख्यातनाम क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, मुख्य सचिव मनु कूमार श्रीवास्तव, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे आदी उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना गायिका श्रीमती भोसले म्हणाल्या की, 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार स्वीकारताना आज माहेरी आल्यासारखे वाटत आहे. वडील दीनानाथ मंगेशकर, माई मंगेशकर, दीदी लता मंगेशकर यांच्या आशीर्वादाने येथपर्यंतचा प्रवास झाला आहे. गाण्यांनी माझे जीवन समृद्ध केले असून, या वाटचालीत संगीतकार आणि सहगायकांना विसरू शकत नाही. तसेच सर्व प्रकारचे संगीत आपण ऐकले पाहिजे,' असेही त्यांनी सांगितले. तसेच या वेळी अभिनेते सुमीत राघवन यांनी त्यांची छोटेखानी मुलाखत घेतली. प्रारंभी गायिका आशाताई भोसले यांच्या जीवनावर आधारित ध्वनिचित्रफित दाखवण्यात आली.

'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान सोहळ्यानिमित्त गायिका आशा भोसले यांच्या गीतांवर आधारित 'आवाज चांदण्याचे' हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यात आशा भोसले यांनी गायलेली विविध गीते सादर करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.



# महामानवाला विनम्र अभिवादन...

## ● भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेष ●

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि स्वतंत्र भारताचे पहिले न्यायमंत्री होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षितांच्या उत्थानाकरिता आणि भारतातील मागासवर्गाच्या प्रगतीकरिता आपल्या संपूर्ण जीवनाचा त्याग केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उपेक्षितांचे उद्धारकर्ते म्हणून प्रसिद्ध आहेत. आज समाजात उपेक्षितांना जे स्थान आहे, त्याचे संपूर्ण श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त 'लोकराज्य'च्या या अंकात विशेष विभाग समाविष्ट करण्यात आला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाश्चात्त्य देशात उच्च शिक्षण घेऊन जगापुढे एक आदर्श निर्माण केला. 'सिम्बॉल ऑफ नॉलेज' म्हणून जगाने त्यांचा गौरव केला. लंडन विद्यापीठाने 'दि प्रॉब्लेम ऑफ द रूपी' या ग्रंथाला मान्यता देऊन डी.एस्सी. पदवी समारंभपूर्वक बहाल केली. त्या ऐतिहासिक प्रसंगाला ११ मार्च २०२३ रोजी १०० वर्षे पूर्ण झाली.**

# भारतीय चलनाच्या उत्क्रांतीची मीमांसा

**मिलिंद मानकर**

ज्ञानसूर्य, युगप्रवर्तक, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक बुद्धिमान आणि सामर्थ्यशाली पुरुष होते. पाश्चात्त्य देशातील नामांकित विद्यापीठातून त्यांनी ज्ञान संपादनासाठी अहोरात्र कठोर साधना केली. लंडनच्या वाचनालयात १८-१८ तास बसून अभ्यास करत. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र, निर्बंधशास्त्र, इतिहास यांचा संभार त्यांनी पाठीशी बांधला. अखंड उद्योगशीलता, अढळ निर्धार, दुर्दम्य आशावाद यांचा विजय झाला. 'तपसा प्राप्यते यश' तपस्या केल्याने यश मिळते हे पुन्हा सिद्ध झाले.

एम.ए., पीएच.डी. (अमेरिका), एम.एस्सी., डी.एस्सी या पदव्यांनी ते अलंकृत झाले.

प्रतापसिंह महाराजांना लिहिलेल्या पत्रात बाबासाहेब म्हणतात, 'आज मला जे स्थान प्राप्त झाले आहे ते केवळ महाराजांनी मदत केल्यामुळे. मला घडवण्यासाठी माझे पालकत्व स्वीकारले. ते माझ्या जीवनाचे शिल्पकार आहेत.'

### अर्थशास्त्रावरील मुख्य ग्रंथ

'दि प्रॉब्लेम ऑफ द रूपी' या अर्थशास्त्राच्या विषयावर बाबासाहेबांचा प्रबंध आहे. या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे की, मुद्रा समस्येच्या अंतिम निर्णयात, कशा प्रकारे ब्रिटिश सरकारने भारतीय रुपयाच्या किमतीला पाऊंडसोबत जोडून आपला जास्तीत-जास्त फायदा होण्याचा मार्ग निवडला. त्यांच्या या हेराफेरीनेच भारतीय नागरिकांना गंभीर आर्थिक समस्येत लोटले गेले. ब्रिटिश शासकांच्या या निर्णयामुळे, भारतीय धन ब्रिटिश खजिन्याच्या दिशेने निरंतर वळवले गेले. अशा अनेक प्रकारे भारतातली संपत्ती ब्रिटिश सरकारच्या व ब्रिटिश जनतेच्या फायद्यात जात राहिली.

प्रबंधातील कडक, बोचरी विधाने, विचारसरणी पाहून विद्यापीठातील वातावरण गरम झाले होते. प्रा. हेरॉल्ड लास्की यांनाही निबंधातील विचार ज्वलज्जहाल वाटले. सेलिग्मन, सिडने वेब, एडविन कॅनन आदी थोर अर्थतज्ज्ञांनी सिनेटला मार्गदर्शक सूचना केल्या.




प्रबंध इंग्रज राज्यकर्त्यांच्या विरोधात असल्याने प्रबंध अमान्य करून बाबासाहेबांना अनुत्तीर्ण करावे, असे तज्ज्ञांनी ठरवले. मौखिक परीक्षेला सुरुवात झाली. परीक्षकांनी धोरणाविषयी, सिद्धांताविषयी, चिकित्सा पद्धतीविषयी विचारले असता ते अपयशी ठरले. बाबासाहेबांनी त्यांच्याच डिक्शनरीतील शब्दांचे अर्थ दाखवले. शेवटी त्यांचा पूर्णपणे नाइलाज झाला. तडजोडीची बोलणी सुरू केली. आपल्या अचूक संशोधनाबद्दल कुठलीही तडजोड करायला डॉ. आंबेडकर तयार नव्हते. अखेरीस डॉ. आंबेडकरांनीच परीक्षकांना प्रतिप्रश्न केला, 'माझ्या प्रबंधातील कोणता मुद्दा चुकीचा आहे हे मला दाखवून द्या' या प्रश्नाचे उत्तर मात्र परीक्षकांना देता आले नाही. त्या वेळी रागाने डॉ. आंबेडकर म्हणाले, 'तुम्ही मला पदवी दिली नाही तरी चालेल. मी हा प्रबंध हिंदुस्थानात प्रसिद्ध करीन आणि मग जगाची खात्री पटेल की, माझी मते शास्त्रीय आणि बरोबर आहेत.' १९२३ साली 'लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स ॲण्ड पॉलिटिकल सायन्स' विद्यापीठाने दि प्रॉब्लेम ऑफ द रूपी : इट्स ओरिजिन ॲण्ड इट्स सोल्यूशन' या प्रबंधाला मान्यता दिली. डॉ. आंबेडकरांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी मोठ्या सन्मानाने बहाल केली. अर्थशास्त्राची पदवी घेणारे बाबासाहेब एकमेव भारतीय ठरले. ग्रंथाची प्रस्तावना एडविन कॅनन यांनी लिहिली. आपल्या शिष्याच्या विचारातील नि बुद्धिवादातील चालना देणाऱ्या नावीन्याविषयी त्या विषयातील अर्थशास्त्रज्ञाने शिष्याची पाठ थोपटली.

### बाबासाहेब आणि राजर्षी शाहू महाराजांचे ऋणानुबंध

काही कारणास्तव राजर्षी शाहू महाराज नागपूरच्या परिषदेला हजर

राहू शकत नव्हते. म्हणून नागपूरच्या अस्पृश्य कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांना विनंती केली, तुम्ही एकदा महाराजांना विनंती करून पाहा. त्यांच्या सांगण्यावरून बाबासाहेबांनी ११ मे १९२० रोजी शाहू महाराजांना पत्र पाठवले आणि म्हणाले, 'तुमची मुलगी ताईसाहेब आजारी असल्यामुळे आपण येऊ शकत नाही; परंतु माझा मुलगा यशवंत हा गेली कित्येक वर्षे आजारी आहे. अद्यापही त्याच्या प्रकृतीत सुधारणा नाही. हा झाला आपला कौटुंबिक प्रश्न. परंतु गेली शेकडो वर्षे आमचा अस्पृश्य समाज आजारी आहे. त्याच्याकडे कुणी पाहावे?' डॉ. बाबासाहेब त्यांच्यासमोर



निर्वाणीचा मुद्दा मांडतात. 'लंडन विद्यापीठाने मला पदवी दिली नाही तरी चालेल, परंतु त्या प्रबंधात मी बदल करणार नाही.' बाबासाहेब शाहू महाराजांना खूप नम्र होऊन सांगतात. 'आम्ही (अस्पृश्य) तुमची लेकरे आहोत.' या दोन्ही प्रसंगातील फरक आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. विद्यापीठाचा प्रसंग वैयक्तिक होता. व्यक्तिगत नुकसान झाले तरी चालेल, पण तुम्ही या अस्पृश्य समाजाच्या भल्यासाठी या. बाबासाहेबांच्या या स्वभावाचे वेगळेपण लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

## दर्जेदार ग्रंथाची निर्मिती

'दि प्रॉब्लेम ऑफ द रूपी' (डी. एस्सी.) आणि 'इव्हॉल्युशन ऑफ प्रॉव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' (पीएच.डी.) हे बाबासाहेबांचे दोन्ही ग्रंथ लंडनमधील पी. एस. किंग ॲण्ड सन्स, लिमिटेड या प्रकाशन संस्थेने प्रसिद्ध केले. यावरून ते ग्रंथ किती दर्जेदार आहेत हे सहज लक्षात येते. आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार व दुर्मीळ ग्रंथाचे सहायक रमेश शिंदे रा. गोरेगाव मुंबई यांच्याकडे 'दि प्रॉब्लेम ऑफ द रूपी' या प्रकाशित ग्रंथाची पहिली मूळ प्रत आजही त्यांच्या निवासस्थानी पाहावयास मिळते. १९५६ साली शिंदे यांनी मुंबईच्या रस्त्यावरून ३०९ पानांचा हा दर्जेदार ग्रंथ अवघ्या १० रुपयांना खरेदी केला होता.

आज अस्पृश्य समाजाची जी प्रगती किंवा तो समाज जागरूक दिसतो आहे याचे श्रेय फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते. त्यामध्ये कुणीही वाटेकरी होऊ शकत नाही. ते केवळ उच्च शिक्षण परदेशात मिळाल्यामुळे घडू शकले.

अस्पृश्यांना उपदेश करताना बाबासाहेब म्हणतात. 'तुम्ही शिक्षण घेतले पाहिजे. स्वच्छ राहिले पाहिजे. मृत मांस भक्षण करू नका. कुणाचीही लाचारी पत्करू नका, असा अस्मिता निर्माण करणारा संदेश देशातील एकमेव महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर देऊ शकतात. मृतवत आणि लाचारीचे जीवन जगणारा हा समाज बाबासाहेबांच्या शिकवणुकीने आज ताठ उभा आहे. तो कधीही वाकणार नाही किंवा लाचार होणार नाही हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे.

## जागतिक कीर्तीचा ग्रंथ

आज आपण सातत्याने जागतिक अर्थव्यवस्था, तिचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम, आयात-निर्यात धोरण, पतधोरण, रिझर्व्ह बँकेचे धोरण, रुपयाचे डॉलरच्या तुलनेत असलेले मूल्य याबद्दल बोलतो. या विषयांबद्दल नेहमी चिंता व्यक्त होते. विशेषत: रुपया या भारतीय चलनाचे जगातील स्थान आणि त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम हा विषय नेहमीच चर्चिला जातो. या विषयावरील बाबासाहेबांचे पुस्तक 'दि प्रॉब्लेम ऑफ द रूपी' आजही जागतिक कीर्तीचे असून त्यातील चिंतन, त्यांनी सुचवलेले उपाय आजही लागू पडतात. ग्रंथातील मुद्दे त्यांनी हिल्टन यंग कमिशनसमोर मांडले होते, तसेच भारतीय 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'ची स्थापना करतानादेखील घेण्यात आले होते. अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने अगदी प्रवेशद्वाराजवळच बाबासाहेबांचा पुतळा उभारून त्यावर 'सिम्बॉल ऑफ नॉलेज' असे नाव कोरले. तसेच लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स विद्यापीठाने १४ एप्रिल १९९४ रोजी अर्धकृती पुतळा आणि ग्रेज इन कोर्ट लंडनने अलीकडेच सुरेख छायाचित्र लावून बाबासाहेबांच्या अथांग ज्ञानसागराला जणू मानाचा मुजरा केला आहे.

केंद्र सरकारने केलेल्या नोटबंदीच्या निर्णयानंतर 'दि प्रॉब्लेम ऑफ द रूपी' हा ग्रंथ जनतेने मोठ्या प्रमाणात खरेदी करून त्याचे वाचन केले.

**(लेखक हे ज्येष्ठ स्तंभलेखक आहेत.)**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिभेतून निघालेली आर्थिक क्रांतिसूत्रे राष्ट्र आणि मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी लाभलेला सूर्यप्रकाश आहे. ही आर्थिक क्रांतिसूत्रे आजच्या काळाजी गरज आहे.**

# अर्थक्रांतीची शाश्वत सूत्रे

**डॉ. अनिल सूर्या**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अष्टपैलू हे व्यक्तिमत्त्व लाभलेले प्रज्ञापुरुष होते. अर्थशास्त्रावर त्यांनी लिहिलेल्या तीन महाग्रंथांवरून डॉ. आंबेडकरांनी 'अर्थशास्त्र' या नावास मोठे केले आहे.

त्यांच्या या तीन शोधग्रंथांतून त्यांनी आर्थिक विषयाच्या प्रत्येक पैलूवर खोल आणि विस्तारपूर्वक अभ्यास केला हे जाणवते. या ग्रंथात अर्थकारणाचे डॉ. आंबेडकरांनी केलेले विवेचन हे त्यांच्या प्रज्ञेची साक्ष आहे, अर्थशास्त्राच्या परिपूर्ण ज्ञानाची साक्ष आहे.

### अ) Administration and Finance of the East India Company (ईस्ट इंडिया कंपनी प्रशासन आणि अर्थसूत्र)

डॉ. आंबेडकरांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात एम.ए.च्या पदवीसाठी अवघ्या २४ व्या वर्षी वरील शोधनिबंध लिहिला. या ग्रंथाच्या माध्यामातून अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी पहिले पाऊल रोवले. हे १९१५चे पहिले पाऊल अर्थक्रांतीतील महत्त्वाचे पाऊल होते. ४२ पृष्ठांच्या शोधनिबंधातून सर्वांगास स्पर्श करून न्यायबुद्धीने ईस्ट इंडिया कंपनीवर डॉ. आंबेडकर चिडतात. ही त्यांची चीड त्यांचे भारतभूमीवर असलेल्या प्रेमाची आणि मायभूमीच्या स्वाभिमानाची साक्ष होय.

व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले. या व्यापारी ते राज्यकर्तेपर्यंतच्या प्रवासात इंग्रजांनी भारतीयांचे केलेले शोषण आणि अल्पसे फायदे या दोन्ही मुद्यांची सांगोपाग चिकित्सा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली आहे. १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त होऊन ब्रिटिश सरकारची भारतावर अंमलबजावणी होण्यास सुरुवात झाली. सामान्य शेतकरी शेतसाऱ्याच्या वसुलीमुळे त्रस्त झाला. इतर भारतीयांवरही वेगवेगळे कर लावल्याने ब्रिटिशांची अर्थनीती भारतीयांवर अन्याय करणारी होती हे आणि ब्रिटिशांचा गैरवाजवी फायदा करणारी होती, अशी मते बाबासाहेब निर्भीडपणे मांडतात.

विद्यापीठे, पश्चिमात्य शिक्षणाची ओळख, न्यायालयीन व प्रशासकीय स्वरूपाच्या आधुनिक संस्थांची उभारणी आणि इतर सुधारणेबद्दल डॉ. आंबेडकर ब्रिटिशांचे आभारही मानतात; पण आर्थिक नीतीच्या बाबतीत ते स्पष्ट आणि निर्भीड बोलतात-भारताने इंग्लंडला अमाप दिले आहे आणि इंग्लंडकडून भारताला अक्षरशः काहीही मिळालेले नाही ही दोन्ही विधाने आश्चर्यकारक वाटतील, पण आर्थिक दृष्टिकोनातून पाहिले तर त्यातील सत्यता निर्विवाद आहे.

### ब) The Evolution of Provincial Finance in British India (ब्रिटिश भारतामधील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती)

इ.स.१८३३ ते १९२१ या कालखंडातील ब्रिटिश भारतातील केंद्र शासन व घटक राज्ये यांच्यातील पद्धतशीर संशोधन म्हणजे डॉ. आंबेडकरांचा 'भारताचा राष्ट्रीय नफा :



एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास' हा शोधप्रबंध होय. हा शोधप्रबंध प्रा.सेलिग्मन यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. साठी कोलंबिया विद्यापीठास डॉ. आंबेडकरांनी १९१६ मध्ये सादर केला. हा शोधप्रबंध १९२५ मध्ये 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती' या नावाने प्रकाशित करण्यात आला. या ग्रंथाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पीएच.डी. तर मिळवून दिलीच, पण सार्वजनिक वित्ताच्या क्षेत्रात त्यांना प्रथमांक मिळवून दिला. अशा प्रकारचा एका भारतीयाने लिहिलेला आगळावेगळा; पण वास्तव सांगणारा हा पहिलाच वित्तग्रंथ होय.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अभ्यासपूर्वक या शोधप्रबंधातून काढलेले काही रोखठोक आणि खरे निष्कर्षात्मक मुद्दे पुढीलप्रमाणे :

The problem of the Rupee, It's Origin and it's Solution (रुपयाचा प्रश्न, त्यांचे मूळ आणि समाधान) डॉ. आंबेडकरांचा आर्थिक क्षेत्रातील हा तिसरा महाग्रंथ आहे. अशा प्रकारचा जगातला पहिलाच ग्रंथ म्हणून जगविख्यात विद्वानांनी ग्वाही दिली आहे. या शोधग्रंथाचे मार्गदर्शक एडविन कॅन्स हे स्वत: ख्यातनाम अर्थतज्ज्ञ होते; पण डॉ. आंबेडकर गुरुपेक्षा जास्त दूरदृष्टीचे आणि व्यापक दृष्टीचे अर्थतज्ज्ञ होते. प्रा. एडविन कॅन्स थेअरी खोटी ठरली आहे. प्रा. कॅन्सचे प्रतिपादन भारताच्या बाबतीत चुकीचे ठरले आहे. त्याउलट डॉ. आंबेडकरांचा इशारा भविष्यवाणीसारखा ठरला आहे. यावरून गुरुपेक्षा शिष्य मोठा याचे दर्शन होते. प्रा. एडविन कॅन्स म्हणतात, ''भारतीय रुपयाचा प्रश्न' या शोधप्रबंधातील आंबेडकरांचे काही मुद्दे थेट प्रश्नाला स्पर्श करणारे आहेत. त्यांचे या विषयावरील विचार मला जरी मान्य नसतील तरी त्या विचारांमध्ये उल्लेखनीय टवटवीतपणा आहे.' आज एडविन कॅन्स जिवंत असते, तर डॉ.आंबेडकरांशी निश्चित सहमत झाले असते, कारण त्यांची थिअरी खोटी ठरली आहे. डॉ.आंबेडकरांची थिअरी दीपस्तंभासारखी आजही सत्याचा प्रकाश देत आहे.

- भारतातील प्रादेशिक वित्ताची सुरुवात. ब) भारतातील प्रादेशिक वित्ताची वाढ. आणि क) भारतातील प्रादेशिक वित्ताची सुरुवात आणि वाढीवरील यंत्रणा, वरील मुद्यांचा जगात पहिल्यांदाच डॉ. आंबेडकरांनी घेतलेला परामर्श म्हणजे हा शोधप्रबंध होय.
- डॉ. आंबेडकरांच्या मते पैसा उभारणे आणि खर्च करणे या तात्कालिक गोष्टींच्या पलीकडे आर्थिक जबाबदारी स्वीकारणाऱ्यांनी पाहायला शिकले पाहिजे.
- भारतात शेतसाऱ्याचे प्रमाण शेतकऱ्यांना न पेलणारे होते. त्यांच्यावर सक्ती होत असे. त्यामुळे शेतीचा विकास खुंटला.
- जकात दोन्ही प्रकारे वसूल केला जाई. देशांतर्गत तसेच परदेशी व्यापार व्यवहारातून त्यामुळे एका बाजूस व्यापाराचा कोंडमारा झाला, तर दुसऱ्या बाजूस उद्योगांची मुस्कटदाबी झाली. हा अनिष्ट परिणाम जकातीमुळे झाला.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात - करपद्धती ही एक क्रूर चेष्टा होती. कारण समाजरूपी शरीराच्या ज्या भागात दाट रक्त असते तेथे सुरी चालवली जात नव्हती, तर जो भाग गरिबी आणि दुर्बलतेच्या यातना सोसत होता. नेमका तेथेच घाव बसत होता.
- इ.स. १८०९ ते १८५७ या वर्षांमधील खर्चाचे पृथ:करण करून या गरीब देशाच्या उत्पन्नापैकी ५२ ते ८० टक्के खर्च युद्धसेवांवर; पण शिक्षणासाठी, लोकोपयोगी कामासाठी, रेल्वे, जहाज, सिंचनासाठी, कालवे इत्यादी बाबींवर खर्च करण्यासाठी तरतूद नाही.
- प्रांतांना दिलासा देण्यासाठी आयकर चालू ठेवणे न्याय्य झाले असते; परंतु भारत सरकारच्या वित्त मंत्रालयातून न्याय यापूर्वीच हद्दपार झाला होता.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'ब्रिटिश भारतामधील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती' या जगप्रसिद्धी ग्रंथातून वरीलप्रमाणे अनेक मुद्दे काढता येतील, हा ग्रंथ म्हणजे १८३३ ते १९२१ या प्रदीर्घ काळातील ब्रिटिशांच्या आर्थिक, राजकीय आणि काही प्रमाणात सामाजिकही बारीकसारीक या सर्व गोष्टींचा परामर्श आहे. 'रुपयाचा प्रश्न त्याचे मूळ आणि समाधान' हा प्रबंध लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये डॉक्टर ऑफ सायन्स या पदवीसाठी लिहिला गेला होता.

१९२१ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संशोधनाचे कार्य हातावेगळे केले आणि १९२३ साली प्रथम प्रसिद्ध झाले. नंतर १९४७ साली पुन्हा दुसरी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली. चलनपद्धती, ग्राम अर्थव्यवस्था, वस्तूंची अदलाबदल करून व्यवहार चालवण्यापासून ते सोने-चांदी या धातूंचे चलन आणि आजचे कागदी चलन खात्यापर्यंत सांगोपांग, जिज्ञासू प्रवृत्तीने अभ्यास करून या शोधग्रंथात अचूक व विस्तृत मांडणी डॉ. आंबेडकरांनी केली आहे.

डॉ. आंबेडकर सांगतात, ब्रिटिशपूर्व राजवटीपूर्वी मोगल साम्राज्याच्या आर्थिक व्यवस्थेचा पाया अकबराने घातला. त्या काळापासून भारतात प्रामुख्याने चलन म्हणून सोने, चांदी किंवा धातूंचा वापर होत असे. तसेच ब्रिटिशपूर्व राजवटीत नोकरांना आणि सैनिकांनाही वस्तूस्वरूपाने पगार मिळत असे. ब्रिटिशांनी त्याऐवजी रोख पैसे देण्यात सुरुवात केली. त्यामुळे लोकांकडून कर असो वा इतर रोख पैशाच्या स्वरूपातच स्वीकारावे लागत असे. डॉ. आंबेडकरांचे तर्कनिष्ठ आणि दृढ मत होते की, जोपर्यंत रुपयाच्या सामान्य क्रयशक्तीमध्ये स्थिरता येत नाही, तोपर्यंत हे चलन स्थिर होणे शक्य नाही आणि प्रामुख्याने हीच बाब विनिमय प्रमापामुळे शक्य होत नव्हती. या व्यवस्थेमुळे रोगाच्या मूळ कारणांचा शोध घेण्याऐवजी फक्त लक्षणेच विचारात घेऊन उपाय केला जात होता. डॉ. आंबेडकरांनी हे सुचवलेले विचार मूलगामी आहेत.

(लोकराज्य एप्रिल २०१६ मधून पुनर्मुद्रित)

**२०व्या शतकातील असामान्य, अतुलनीय, बुद्धिजीवी व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. ज्यांनी जग आकलनाचा दूरदर्शीपणा बुद्धीच्या सामर्थ्यावर मिळविला होता. सुप्रसिद्ध मार्क्सवादी अर्थशास्त्रज्ञ पाल बरण यांनी हुशार आणि बुद्धिजीवीमध्ये फरक केला आहे. आणि तो फरक म्हणजे हुशार माणसे त्यांची हुशारी स्वत:करिता, स्वत:च्या भल्याकरिता उपयोगात आणतात, तर बुद्धिजीवी आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यावर परिस्थितीचे सुयोग्य विश्लेषण करून समाज बदल घडवून आणतात.**

# कृषिविषयक विचार

**डॉ. त्रिलोक हजारे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाल बरणच्या व्याख्येप्रमाणे सर्वोत्तम बुद्धिजीवींमध्ये मोडतात. Antonio Gramsci म्हणतात की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मूलत: बुद्धिजीवी व्यक्तिमत्त्वाचे एक असामान्य उदाहरण होय. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्येक पैलू पूर्णत: समाजाचे न्याय्यहक्क जोपासणारा आहे.

डॉ. आंबेडकरांचे कृषिविषयक विचार देशाला आणि शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे आहेत. शेतकऱ्यांच्या समस्यांवरील उपाय त्यांनी Small Holdings in India and Their Remedies and Stats and Minorities मधून व्यक्त केले आहेत.

डॉ. आंबेडकरांची मुख्य कल्पना अशी होती की, स्वतंत्र भारतात ग्रामजीवनाचा स्तर उंचावण्यासाठी शासन जे जे प्रयत्न करील, त्याचा पाया सामाजिक न्याय हाच असला पाहिजे. म्हणून औद्योगिकीकरण आणि शेती यांचे अतूट नाते असले पाहिजे. शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या लाभासाठी निर्माण करणे आवश्यक आहे. विकास कार्यक्रमातून मिळणाऱ्या लाभांची न्याय्य तत्त्वावर समान वाटणी आणि आजवर जे वंचित म्हणून जगत आले त्यांना अग्रहक्क देण्याची गरज त्यांनी वारंवार प्रतिपादन केलेली आहे. डॉ. आंबेडकरांचा भर स्वावलंबनावर होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटिश सरकारला परखडपणे बजावले की, 'भारतावरील कर्जाचा बोजा काही अंशी तरी शिरावर घ्यावा.' आपल्या विश्लेषणात बाबासाहेब म्हणतात, '१९५८च्या कायद्यापासून लाभ होईल तो इंग्लंडच्या खिशात आणि कर्जाचा डोंगर भारताच्या डोक्यावर.' डॉ. आंबेडकराचे हे विश्लेषण त्यांच्या प्रखर राष्ट्रीय बाण्याचे प्रतीक होते.



## दामोदर नदी प्रकल्प

१९४४ मध्ये बंगाल सरकारने स्थापन केलेल्या दामोदर नदी पूर चौकशी कमेटी समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारत सरकारचे मजूर प्रतिनिधी म्हणून केलेले भाषण शेतकऱ्यांना हितावह ठरले. दामोदर नदीच्या पुरामुळे हजारो लोकांचे प्राण जात आणि लाखो रुपयांचे नुकसान होत असे. दामोदर नदीला पूर येऊ नये, त्या पाण्याचा उपयोग शेती, विद्युत आणि वाहतुकीसाठी करता यावा म्हणून दामोदर नदी प्रकल्पाला मान्यता मिळवण्याची शिफारस केली. जलमार्ग आणि रेलमार्ग यात काहीच फरक नाही या सत्याची आपण पुरेपूर दखल घेतली नाही आणि जर का रेलमार्ग हा राज्यानुसार विभागला जाऊ शकत नाही, तर जलमार्ग सुद्धा कोणत्याही हालतीत राज्या-राज्यांमध्ये विभागला जाऊ शकत नाही. याच्या उलट आपण आपल्या घटनेला जलमार्ग व रेलमार्ग यात फरक करण्याचा हक्क दिला आहे. ज्यामुळे रेलमार्ग तर केंद्रीय समजले जातात. पण जलमार्ग हे राज्याचे समजले जातात आणि या चुकीचे खूप सारे वाईट परिणाम दिसून येतात. उदाहरणदाखल जर एखाद्या राज्याला विद्युत निर्मिती करायची आहे आणि त्यासाठी त्याला पाण्याची गरज आहे; पण ते पाणी ते राज्य वापरू शकत नाही. कारण जेथे बांध घातला आणि पाणी अडवले असे ठिकाण दुसऱ्या राज्यात आहे व ते राज्य कृषिप्रधान आहे. त्या राज्याला विद्युत निर्मिती करण्यात कोणताच रस नाही किंवा त्या प्रकल्पासाठी तेवढा पैसा नाही आणि त्यामुळे दुसऱ्या गरज असलेल्या राज्याला हे राज्य ते ठिकाण वापरू देत नाही. आपण कितीही तक्रार केली तरी ते राज्य असे अ-मित्रत्वाचे धोरण अवलंबू शकते आणि Provincial autonomy च्या नावाखाली त्याला न्यायिक ठरवू शकते.

म्हणून रेलमार्ग व जलमार्ग यात कुठलीही तफावत ठेवू नये. कृषिप्रधान देशात पाणी आणि विद्युत याचा पुरवठा व समतोल असेल, तर ग्रामीण भारत संपन्न होईल. शिफारस करताना कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली गेली. सर्वांना समान हक्काचा सल्ला देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक होते हे सिद्ध होते.

## वतनदारी आणि शेतकरी

१८७४च्या वतन ॲक्टमध्ये कोणतीही वतनी मालमिळकत असल्यास ती व वशंपरंपरेचा हुद्दा व त्यासंबंधीचे हक्क व अधिकार हे मिळून वतन होते, अशी वतन या शब्दाची व्याख्या करण्यात आली आहे. वतन या शब्दांमध्ये दोन गोष्टींचा समावेश होतो, १) वंशपरंपरेचा हुद्दा २) वतनी मालमिळकत (जमीन).

पूर्वीच्या काळी दर गावास वंशपरंपरेच्या हुद्देदारांची संख्या २४ असे, त्यापैकी बारा जणांना बलुतेदार व बाकी बारा जणांना अलुतेदार असे संबोधण्यात येत होते. पेशवाईत या संख्येत खूप वाढ झाली होती. इंग्रज सरकारचा अंमल सुरू झाला, तेव्हा या बेसुमार वाढलेल्या वतनपद्धतीत काटछाट करण्याचा विचार ठरला व त्याप्रमाणे या अलुत्या-बलुत्यांचे तीन वर्ग करण्यात आले. १) सरकार-आवश्यक वतनी गावकामगार, २) रयत-आवश्यक वतनी गावकामगार व ३) सरकार व रयत यास अनावश्यक असे वतनी गावकामगार, यापैकी दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्गातील वतनदार, जे सरकारला आवश्यक नाहीत अशांना कामाच्या तगाद्यापासून मुक्त करण्यात आले. जेणेकरून त्यांची स्थिती आणि गावातील रयतेची स्थिती सारखीच झाली व त्यामुळे त्यांना वतन ॲक्ट लागू करण्यात आलेला नाही.

वतनदाराची कामे निश्चित नाहीत. कोणताही नोकर झाला तरी त्याने करावयाची कामे निश्चित असावयास पाहिजे होती, विशेषतः उपेक्षितांच्या वतनासंबंधी ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, उपेक्षितांची कामे मुळीच निश्चित झालेली नव्हती. इतकेच नव्हे, तर ती मुद्दाम होऊन सरकारने अनिश्चित ठेवली होती. १८७४चा वतन ॲक्ट जेव्हा पास करण्यात आला. तेव्हा त्यांच्या १८, ६९ व ८३ या कलमांवर वादविवाद चालू असताना काही लोकांनी उपेक्षितांची कामे ठरावीक करण्याच्या दृष्टीने त्या कलमांत फेरफार करण्यात यावा, अशी सूचना त्या वेळी कायदे



कौन्सिलात आणली होती; परंतु सरकारने आपल्याला उपेक्षितांसारखे काही सांगकामे व हरकामे नोकर पाहिजेत, म्हणून ती सूचना मान्य केली नव्हती. स्वत:ची उन्नती करण्याच्या बाबतीत उपेक्षित समाजाकडून चाललेल्या प्रयत्नांमध्ये 'वतन' ही एक मोठी आडकाठी होती. वतनदार उपेक्षितांनी भाकरीचे हक्क यांच्या रूपाने त्यांच्या कामाचा मोबदला देण्याची जी वहिवाट आहे, तीच उपेक्षित समाजाच्या असहाय व निकृष्ट स्थितीचे मूळ कारण होते.

काही समाजात, केलेल्या कामाचा मोबदला म्हणून त्यांना थोडीशी जमीन इनाम देण्यात येत असे आणि काही थोडेसे रुपये. हे दिलेले वेतन इतके अल्प होते की, त्यात उपजीविका करणे कठीण होते. त्यात सुधारणा करून वतनदारीवर होणारा अन्याय दूर करण्यावर बाबासाहेबांचा भर होता. १९३७ साली बाबासाहेबांनी मांडलेल्या विधेयकात कोणावरही वतन सोडून देण्याच्या बाबतीत सक्ती करण्याची तरतूद केलेली नसली, तरी वतन नष्ट करावे असेच बाबासाहेबांचे मत होते आणि ते त्यांनी वतनदारांपासून लपवूनही ठेवले नाही. वतनात सुधारणा करण्यापेक्षा ते खारीज केलेले बरे, असे त्यांचे मत होते. वतनामुळे वतनदार स्वाभिमानशून्य झाले आहेत. त्यांच्यामधील महत्त्वाकांक्षा साफ नष्ट झाली आहे, असे बाबासाहेबांना वाटत होते. वतन नष्ट झाल्याशिवाय वतनदाराची सुधारणा होण शक्य नाही, अशी त्यांची खात्री झाली होती. सर्वांना 'स्वाभिमानानेच जीवन जगा' असे सांगणारे व त्याकरिता त्यांना प्रवृत्त करणारे एकमेव द्रष्टे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत.

## खोती उर्फ गुलामगिरीतून मुक्तता

खोती पद्धतीखालील शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिती वाईट असायची; परंतु इतर बाबतीतही त्यांची अवनती झाल्याचे दिसून येते. विशेषतः स्वाभिमान, तडफ, हिंमत हे मनुष्याच्या उन्नतीस आवश्यक असलेले गुण खोतीसारख्या गुलामगिरीमध्ये पिळून निघाल्यामुळे नष्ट झाले होते. खोतीच्या जाचाची कल्पना माहितगाराखेरीज पिळून निघाल्यामुळे नष्ट झाले होते. खोतीच्या जाचाची कल्पना माहितगाराखेरीज इतरांना होणे शक्य नव्हते. खोत म्हणजे गावातला एक लहानसा सुलतान असतो.

जेव्हा गावची खोती वेगवेगळ्या लोकांमध्ये व त्याच्या अनेक घराण्यांमध्ये हिस्सेरसीने विभागली असते, तेव्हा अनेक सुलतानांचा जुलूम गावातल्या शेतकऱ्यांना सोसावा लागतो. शेतकऱ्याला सरकार-देणे देऊन शिवाय खोती हक्काबद्दल वेगळे देणे द्यावे लागते. रयतवारी पद्धतीमध्ये फक्त सरकारलाच देणे द्यावयाचे असे. खोतीमध्ये अशा रीतीने शेतकऱ्यावर कराचा बोजा अधिक पडायचा. परंतु त्याखेरीज नानाप्रकारांनी कुळांकडून खोत पैसे उकळीत असतात. कुळाने पैसे भरले म्हणजे रीतसर पावती द्यावयाची नाही. कुळाला स्वामित्व असे कोठेच नव्हते! जे खोताच्या कचाट्यात सापडत होता.

खोताच्या जुलुमाचा दुसरा सर्वात वाईट प्रकार म्हणजे वेठीच्या कामाची पद्धती होय. कायद्याने वेठीला मनाई केली होती; परंतु खोत हा गावातला कर्तुमकर्तुम सामर्थ्यवान असल्यामुळे कायद्यातील मनाई असून नसून सारखीच होती. खोताच्या खासगी म्हणून काही जमिनी असत. या जमिनीमधील लागवडीची सर्व कामे खोत लोक वेठीने करून घेत. या कामाबद्दल शेतकऱ्याला व त्याच्या बायकामुलांना धड पोटापुरतीही मजुरी मिळत नसे. खोत हाच गावातला सावकार असतो व त्या रूपानेही शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळू नये,



काही त्याच्या घरात असेल ते खोताच्या मालकीचे! एखादा शेतकरी खोताच्या जुलुमाचा प्रतिकार करण्यास पुढे सरसावला, तर त्याला वठणीस आणण्याची अनेक साधने खोतापाशी असत. दुसरा एक उपाय म्हणजे शेतकऱ्यांची गुरे चरणीस गेली असता कोंडवाड्यात घालणे हा होय. गावातील चराईची जमीन खरोखर सबंध गावाच्या मालकीची असते. तिच्यावर खोत आपला मालकी हक्क गाजवत असत आणि गुरावाचून शेती शक्य नसल्यामुळे शेतकऱ्याला आपल्या ऐपतीप्रमाणे व जरुरीप्रमाणे गुरे बाळगावीच लागत. शेतकऱ्यांच्या खास मालकीची चराईची जमीन नसल्यामुळे गावचराईत ती धाडावी लागत. अर्थात शेतकरी स्वाभाविकपणेच यासाठी खोत हरप्रकारे प्रयत्न करत असत. कारण शेतकरी लिहावयास व वाचावयास शिकले, तर आपली सुलतानी अशीच चालू देणार नाहीत, याची त्यांना खात्री होती. त्याखेरीज शेतकऱ्यांवर खोतांचा सामाजिक जुलूम तर विचारूच नये. कुणबी मुंबईला येऊन दोन पैसे मिळवून गावी गेला आणि त्याला धोतर, कोट, रूमाल, वापरण्याचे सामर्थ्य असले, तरी गावात गेल्यावर धोतर सोडून लंगोटी नेसणे भाग पडे. खोताने ठरवलेल्या हीन दर्जाचाच पोषाख केला पाहिजे. नाहीपेक्षा त्याने आपली मर्यादा ओलांडली असे खोत समजत! कुणब्याच्या बायकांवरसुद्धा विशिष्ट पद्धतीने लुगडे नेसण्याची सक्ती असे!

खोती पद्धती समूळ नष्टच केली पाहिजे. सध्या खोतीसंबंधीचा कायदा आहे. तो अत्यंत अपुरा आहेच; परंतु जो कायदा आहे त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होऊ शकत नाही. आणि जोपर्यंत खोती नष्ट होत नाही, निदान तिची नखे काढून टाकण्यात येत नाहीत व तिचे दात पाडण्यात येत नाहीत, तोपर्यंत त्या कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होणे केव्हाही शक्य नाही. सदरील कायद्यात तात्पुरती दुरुस्ती करूनही काही उपयोग व्हावयाचा नाही. याकरिता डॉ. आंबेडकर यांनी कायदे काऊन्सिलमध्ये खोतीसंबंधीचे एक झणझणीत बिल आणण्याचे ठरवले होते व तसे त्यांनी चिपळूणच्या शेतकरी परिषदेमध्ये जाहीरही केले.

१७ सप्टेंबर १९३७ रोजी बाबासाहेबांनी खोती पद्धत नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक मांडले, खोत हा गावचा मालक आहे. त्यास ते गाव गहाण टाकता येते. विकता येते, खोती कुळांची धारेकरी कुळे बनवता येतात. सरकारला खोताने कबुली दिली, म्हणजे सरकारला ती नाकबूल करता येत नाही. भात जमिनीतून होणाऱ्या उत्पन्नाचा अर्धा भाग आणि वरकस जमिनीतील पिकाचा एक तृतीयांश भाग खोताने कुळाकडून वसूल करावा अशी पद्धत होती. ओसाड तसेच जंगलांनी वेढलेल्या पडित बुडीत जमिनी अपार श्रम करून आणि भांडवल खर्च करून लागवडीस आणल्या आणि अशा प्रकारे कुळांना त्रास देऊन गावेच्या गावे वसवली आहेत. डॉ. बाबासाहेबांनी खोती पद्धत नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक आणून जमिनदाराकडून होणारी शेतकरी कुळांची पिळवणूक कमी करण्याचा प्रयत्न केला आणि खोती ही प्रवृत्ती शेतकऱ्यांच्या हिताला विरोधी असल्यामुळे त्यापासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे, अशा स्वरूपाचे कायदे केलेत. राष्ट्रीय स्तरावर सर्वांच्या फायद्याचे काम करून डॉ. बाबासाहेबांनी राष्ट्रीय एकात्मतेत भर घातली. शेतकऱ्यांविषयी बाबासाहेबांना केवढी कणव होती, हे यावरून दिसून येते.

**(लोकराज्य ऑक्टोबर २००६ मधून पुनर्मुद्रित)**

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन...



इंदू मिल दादर येथे तयार होणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक देशासाठीच नव्हे, तर जागतिक स्तरावर सर्वांना प्रेरणा देणारे ठरेल, असे मत राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केले.

दादरस्थित चैत्यभूमी येथील डॉ. आंबेडकर यांच्या स्मारकाच्या ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केल्यानंतर आयोजित मुख्य कार्यक्रमात राज्यपाल श्री. बैस बोलत होते. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, पर्यटनमंत्री मंगल प्रभात लोढा, खासदार राहुल शेवाळे, माजी मंत्री अविनाश महातेकर, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्ज्वल निकम, आनंदराज आंबेडकर, सुजात आंबेडकर, अखिल भारतीय भिक्खू संघाचे उपाध्यक्ष भदंत डॉ. राहुल बोधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समन्वय समितीचे महासचिव नागसेन कांबळे, चैत्यभूमीचे व्यवस्थापक प्रदीप कांबळे, भारतीय बौद्ध महासभाचे अध्यक्ष उत्तम मगरे उपस्थित होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विविध पैलू असलेले व्यक्तिमत्त्व होते. वंचित आणि उपेक्षित समाजबांधवांच्या न्याय्य हक्कासाठी ते अहोरात्र लढले. मुंबई शहर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 'कर्मभूमी' म्हणून ओळखली जाते. येथेच त्यांनी शिक्षण घेतले आणि जागतिक स्तरावरचे नेतृत्व म्हणून इथेच ते नावारूपास आले. समता, बंधुता व न्याय ही तत्त्वे समाजामध्ये रुजवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या शिकवणीवर आपण सर्वांनी चालले पाहिजे, असे राज्यपाल रमेश बैस यांनी सांगितले.

या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी दाखवलेल्या मार्गामुळेच आज आपल्या देशाचे नाव जगात आघाडीवर आहे. सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून अनेक योजना नव्याने सुरू करत आहोत. त्यासाठी राज्य शासन २०-२२ हजार कोटी रुपयांचा निधी खर्च करत आहे. इंदू मिल येथील जागतिक दर्जाचे स्मारक लवकरच पूर्ण करणार आहोत. बौद्धजन पंचायत समितीच्या इमारतीसाठी २५ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात येणार असून, वरळी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला निधी कमी पडू देणार नाही.

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य अतुलनीय आहे. त्यांनी भारताला दिलेले संविधान हे अनमोल देणगी आहे. भारत वेगाने विकास करत आहे याचे सर्व श्रेय आपल्या संविधानाला जाते. संविधान जगात आपल्याला पुढे नेणारे ठरेल. त्यांनी दिलेल्या शिकवणीनुसार आपण काम केले पाहिजे. इंदू मिल येथील स्मारकाचे काम वेगाने सुरू आहे. कामात येणाऱ्या अडथळ्यांबाबत मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेऊन अडथळे दूर करण्यात येतील. पुढील वर्षभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारक पूर्ण करण्यात येईल.'

•••

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

आज़ादी का अमृत महोत्सव | महाराष्ट्र शासन | G20

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : जयश्री भोज